
॥अप्पा पंत॥

# ॥मुलखावेगळा राजा॥



अनुक्रमणिका

# ॥ मुलखावेगळा राजा ॥


## ॥ आप्पा पंत ॥


**मानसन्मान**

प्रकाशन

पुणे


अनुक्रमणिका



# अनुक्रमणिका



# अनुक्रमणिका

मानसन्मान

प्रकाशन

पुणे

**मानसन्मान**

**प्रकाशन**

**पुणे**

## अनुक्रमणिका

# ॥ आप्पा पंत ॥

अनुक्रमणिका

# ॥ मुलखावेगळा राजा ॥

अनुक्रमणिका



महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
आणि मानसन्मान प्रकाशन, पुणे

॥ दहावा मानसन्मान॥
मुलखावेगळा राजा
लेखक बॅ. आप्पा पंत
आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार
६ वे प्रकाशन
प्रथमावृत्ती ऑगस्ट १९८६
© सर्व हक्क सुरक्षित

सूत्रधार
चंद्रशेखर कुलकर्णी
रेखाचित्रे/ग. ना. जाधव
मुखपृष्ठ/ठसे
आईज ॲडव्हरटायझिंग-पुणे.
किंमत ३५ रुपये

प्रकाशक
रवींद्र कुलकर्णी
मानसन्मान प्रकाशन
४/४० चंद्रप्रकाश
कर्वे रोड, पुणे ४११००४
आणि
सूर्यकांत देशमुख
सचिव, महाराष्ट्र राज्य
साहित्य संस्कृती मंडळ मुंबई
मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

## अनुक्रमणिका

प्रिय सखा
मॉरीस फ्रेडमन
यास
-आप्पा

# अनुक्रमणिका

**लेखकाचे काहीतरी**

मुलखावेगळा राजा ही गोष्ट आहे. इतिहास नाही, पण सत्य गोष्ट आहे. भावनेत, स्मृतींत, जशी नोंद झाली आहे तशीच सांगितली आहे.
व्यक्ती सर्वच्या सर्व खऱ्या आहेत, काल्पनिक नाहीत, त्यांच्यासंबंधीचा काही मजकूर त्यांना आवडणार नाही, कदाचित बोचेलसुद्धा. त्याबद्दल अगदी सपशेल, बिनशर्त दिलगिरी. कोणाला दुखविण्याचा, डिवचण्याचा हेतू नाही.
सर्व संवाद भावना-स्मृतीत आहेत तसे, थोड्याफार फेरफाराने घातले आहेत. हे संवाद ध्वनिफितीवर नोंदले वा कागदावर टिपले नव्हते. पण त्यामागील भावना, हेतू सत्य आहे.
साल, महिना, तारीख कदाचित काही ठिकाणी चुकली असणार. त्याबद्दल क्षमायाचना.
श्री. रवींद्र कुलकर्णी यदुनाथ थत्तेंना घेऊन आले नसते तर ही गोष्ट कागदांवर आली नसती.
गोष्ट लिहिताना जो आनंद वाटला त्याबद्दल त्या दोघांना धन्यवाद.

*आप्पा पंत*

आप्पा पंत - (पंत निवास : बंगलोर-लोणावळा)
“पंत निवास”, भांडारकर रोड, पुणे ४११००४
फोन : ५८६१५

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

“आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार” मालेसंबंधी दोन शब्द शब्द .................................................. १२
कथा राजाची पण व्यथा मुलखाची .............................................................................. १४
१ मुलखावेगळा राजा ................................................................................................ २४
२ एक होता राजा ..................................................................................................... ५२
३ ........................................................................................................................ ६८
४ १९३८४२- ............................................................................................................ ८१
५ १९४२४५-............................................................................................................. ९९
६ १९४५ - ५१ ........................................................................................................१२०
७ शेवटी...................................................................................................................१३२
औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा कायदा १ ला...............................................१४०
उपसंहार................................................................................................................१५२

## “आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार” मालेसंबंधी दोन शब्द शब्द

इसवी सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला; आणि १९४७ मध्ये इंग्रज हिंदुस्थानातून गेले. नागपूरकर भोसल्यांचे राज्य १८५४-५५ ला इंग्रजांच्या पूर्णपणे ताब्यात आले. वऱ्हाड हा आधीचा निजामाचा मुलूख तो इंग्रजांच्या ताब्यात १९०२ मध्ये आला. मराठवाडा तर भारतातून इंग्रज गेल्यावर पोलिस कारवाईनंतर. या चार घटकांपैकी नागपूर आणि वऱ्हाड हे दोन घटक मध्यप्रदेशात आणि मराठवाडा हैदराबाद संस्थानात. १९६० मध्ये हे सर्व घटक एकत्र आले आणि त्यांचे महाराष्ट्र राज्य बनले.

आधुनिक महाराष्ट्राच्या पुनर्जागरणाचे व उभारणीचे प्रयत्न १८१८ नंतर ताबडतोब सुरू झाले. पश्चिम महाराष्ट्रात या जागरणाची सुरुवात झाली. त्याचे लोण हळूहळू इतरत्र पसरले. महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अशा सर्व क्षेत्रात महनीय कामगिरी करणारे धुरीण झाले. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ कृष्ण गोखले, प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे राजकीय व सामाजिक नेते; श्री. विष्णुबुवा ब्रह्मचारी, श्री. राजारामशास्त्री भागवत, पंडिता रमाबाई यांच्यासारखे विचारवंत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्री. हरी नारायण आपटे, केशवसुत, रेव्ह. नारायण वामन टिळक यांच्यासारखे साहित्यिक; श्री. विष्णुदास भावे, श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर, श्री. गोविंद बल्लाळ देवल, श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्यासारखे नाटककार; खाँसाहेब अब्दुल करीम खाँ, पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, पं. विष्णू नारायण भातखंडे, पं. भास्करबुवा बखले यांच्यासारखे संगीततज्ज्ञ; श्री. केरुनाना छत्रे, श्री. दीक्षित, डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी यांच्यासारखे गणिती, श्री. भाऊराव कोल्हटकर, श्री. बालगंधर्व, श्री. केशवराव भोसले, श्री. गणपतराव जोशी, श्री. गणपतराव बोडस, मा. दीनानाथ मंगेशकर, श्री. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. केशवराव दाते यांच्यासारखे अभिनेते; श्री. करमरकर, श्री. र. कृ. फडके, श्री. बाबुराव पेंटर, श्री. सातवळेकर, श्री. धुरंधर, श्री. अलमेलकर यांच्यासारखे शिल्पकार अथवा चित्रकार; श्री. दादासाहेब फाळके, श्री. भालजी पेंढारकर, श्री. व्ही. शांताराम यांच्यासारखे चित्रपटनिर्माते, यांनी महाराष्ट्राच्या वातावरणात चैतन्य निर्माण केले.

महाराष्ट्राच्या शिल्पकारांची ही न संपणारी यादी आहे. “आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार” असे सतत जन्माला येणारे आहेत; त्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती प्रतिचंद्रलेखेव विकसित होत जाणार आहे.

या सर्व शिल्पकारांची ओळख आजच्या आणि भावी पिढीस व्हावयास पाहिजे. हे सर्वच काम अंगावर घेणे सोपे नाही. तरीही यांपैकी काहींची ओळख करून दिल्यास या कार्याचा शुभारंभ तरी होईल. महाराष्ट्र शासनाने आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांची ओळख करून देण्याची एक योजना आखली आणि ती साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या हवाली केली. त्यातून कमीत कमी शंभर तरी चरित्रे पुढील पाच-सात वर्षांत प्रकाशित व्हावी, अशी अपेक्षा आहे.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचा परिचय करून देणारे “मुलखावेगळा राजा” हे पुस्तक हे यापैकीच एक. “आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार” या मालेतील सहावे पुष्प. लवकरच मागील व पुढील काही पुष्पे प्रकाशित होतील अशी आशा करू या. ही पुष्पे प्रकाशित करताना कालानुक्रम पाळणे आम्हाला अभिप्रेत नाही. पुस्तके जसजशी तयार होत जातील, तसतशी ती प्रसिद्ध करण्याचा मंडळ प्रयत्न करील.

अनुक्रमणिका

आमच्या या योजनेत सहभागी झाल्याबद्दल “मानसन्मान प्रकाशन” चे श्री. रवींद्र कुलकर्णी यांनाही धन्यवाद. असेच सहकार्य महाराष्ट्रातील इतर प्रकाशकांनी दिल्यास ही योजना लवकर फलद्रूप होऊ शकेल.

मंत्रालय, मुंबई
४०००३२

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# कथा राजाची पण व्यथा मुलखाची

सामान्यतः राजे मुलखावेगळेच असतात. कारण ते श्रीमंत असतात, सर्वसाधारण माणसापेक्षा वेगळे असतात आणि नादिष्टपणा आणि लहरीपणा हे त्यांचे अंगभूत गुणच झालेले असतात. पण ज्या राजाचे हे चरित्र आज प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहे तो इतर मुलखावेगळ्या राजांपेक्षासुद्धा अधिक मुलखावेगळा होता. त्याने केलेल्या राज्यकारभाराच्या आणि घटनेच्या महत्त्वाच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रयोगावर कितीतरी साहित्य निर्माण झाले आहे, आणि होईल.

खरे म्हणजे हे एकाच (मुलखावेगळ्या) राजाचे चरित्र नाही. दोन मुलखावेगळ्या माणसांचे, राजाचे आणि राजपुत्राचे हे चरित्र आहे आणि हा राजपुत्रही असा तसा नाही तर जागतिक कीर्तीचा भारतीय राजदूत आहे. अर्धी चड्डी आणि बनियन लावून आपल्या संस्थानात फिरणारा हा राजपुत्र भारताचा राजदूत म्हणून पुढे अनेक देशात गाजला आहे. अशा या राजपुत्राने आपल्या वडिलांचे आणि एका रीतीने संस्थानच्या प्रजेचे लिहिलेले हे चरित्र; आपले आणि आपल्या कुटुंबाची अशी सांगितलेली कहाणी. त्यांच्या संस्थानात घडलेल्या प्रयोगाचाच हा इतिहास. हा राज्यव्यवस्थेचा प्रयोग 'औंध एक्सपेरिमेंट' म्हणून आज प्रसिद्ध आहे. या प्रयोगाची घटना खास गांधीजींच्या डोक्यातली, आप्पासाहेब पंत आणि मॉरिस फ्रीडमन यांच्या लेखणीतून उतरलेली, आणि गांधीजींची स्वहस्ताने दुरुस्त करून मान्यता दिलेली.

औंधचे राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंत यांची प्रसिद्धी दोन कारणाने. एकतर त्यांनी सूर्यनमस्काराचा प्रसार केला आणि दुसरी गांधीवादी राज्याची घटना राबविली.

प्रथम सूर्यनमस्काराच्या या कल्पनेचा अपप्रचार झाला. 'संडे रेफरी' या इंग्लंडमधील पत्राने काहीतरी आचरटपणाचे लिहिले आणि शेवटी त्या पत्रावर खटल्याची नोटीस दिल्यावर क्षमाही मागितली. हळूहळू या व्यायामाचा प्रसार परदेशातही झाला. राजाच्या या छांदिष्टपणावर आचार्य अत्रेंनी नर्मविनोद केला आणि 'साष्टांग नमस्कार' नावाचे नाटक पण लिहिले.

आप्पासाहेबांनी आपल्या वडिलांच्या छांदिष्टपणाचा बढती व बदली करून घेण्याकरिता लोक कसा उपयोग करून घेत हे पण फार चविष्टपणे सांगितले आहे. "एक तर मास्तर असे होते की, ज्या वेळी राजाची गाडी पहाटे ६ वाजता डोंगराकडे जाई त्या वेळी त्याच रस्त्याला लागून असलेल्या छात्रालयाच्या त्यांच्या खोलीतच अंथरुणावर पडल्या पडल्या ते मोठ्याने 'ओम् ह्राम् मित्राय नमः' वगैरे सूर्यमंत्र म्हणावयाचे. मुलांनी एकदा तर त्यांचे दार एकदम हा प्रकार चालू असता खडखडवले. तेव्हापासून ही फसवणूक बंद झाली." (पृ. ४) राज्यकारभारात फसवणुकीने कसा घोळ घातला जातो (आणि त्याला गांधीवादी राज्यघटनाही अपवाद ठरत नाही) हे आप्पासाहेबांनी दाखवून दिले आहे.

आपल्या वडिलांच्या स्वभावाचे आप्पासाहेबांनी फार सुंदर पण खरेखुरे वर्णन केले आहे. सूर्यनमस्काराप्रमाणेच त्यांना कीर्तनाचाही छंद होता. त्यांचे प्रत्येक कीर्तन त्यांनी स्वतःच लिहिलेले होते. "विषय सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक असत. सहकार, कर्तव्यनिष्ठा, स्वार्थत्याग, लोकसेवा, अस्पृश्योद्धार या विषयावरच कीर्तने असत" (पृ. १०). "राजा बहुश्रुत होताच, गाणे उत्तम म्हणे. आवाज गोड होता. लहानपणापासून गाण्याबजावण्याचा नाद. तमाशेसुद्धा केले होते. जीवनाची सर्व अंगे जाणली पाहिजेत, अनुभवली पाहिजेत असे तो नेहमी म्हणे." (पृ. १०) "औंधच्या ४-५ वीच्या इयत्तेतील मुलांची

क्रिकेट मॅच ती काय असणार? पण 'बाबा, आमची आज महत्त्वाची मॅच आहे. याल का?' असे विचारायचा अवकाश की, फरासाला ताबडतोब हुकूम. 'जा, आप्पाची मॅच आहे. तंबू घेऊन जा, आम्ही ४ वाजता जाऊ." (पृ. १०) कुंडलचे शाहीर शंकरराव निकम आणि कै. ग. दि. माडगूळकर यांची गोष्टही आप्पांनी अशीच सांगितली आहे. "एकदा कुंडलची शाळा तपसायला राजा गेला. एक उत्तम गाणारा, गोजिरवाणा मुलगा राजाच्या दृष्टीस पडला. पोवाडा उत्तम म्हणावयाचा, नकलाही करावयाचा, पण महा वात्रट व सर्वांची नेहमीच चेष्टाकुचेष्टा करणारा. क्लास मधून पुढे राजा जातो न जातो तो मोठा हशा त्या क्लासमधून आला. राजा थांबला, त्याचीच हुबेहूब नकल निकम करीत होता. राजा परत क्लासमध्ये गेला आणि त्या मुलाच्या पाठीवर हात ठेवून म्हणाला, 'अरे बाळ जगदंबेने तुला उत्तम आवाज दिला आहे. गाणेही छान म्हणतोस. या दैवी देणगीचा उपयोग लोकसेवा, लोकजागृती, पतितोद्धाराकरिता कर, तुझे कल्याण होईल. उगीच टवाळकी करणे सोडून दे. 'नक्कल ठीक टिंगल नको'" "हाच पुढे दहा वर्षांनी शाहीर निकम झाला, ज्याने १९४२ मध्ये लोकजागृतीचे रान उठवले होते व हजारो लोक ज्याचे गीत ऐकून तल्लीन होत असत."

आप्पासाहेब आपल्या वडिलांच्या पूजाअर्चेचे आणि भक्तीचेही वर्णन करतात. पण तरीसुद्धा ते अंधश्रद्धेपासून तसे दूरच होते असेही सांगतात. आप्पासाहेब लिहितात, "तो भाबडा मुळीच नव्हता. राजाच्या मनात भक्ती भरपूर होती, पण अंधश्रद्धेचा मागमूस नव्हता. पूजा, अर्चा, आरती, नैवद्य, उत्सव मोठ्या श्रद्धेने करावयाचा. शंकराचार्यांच्या देवीच्या मानसपूजेचे श्लोक मोठ्यांदा म्हणताना अगदी गहिवरून येई व आप्पाला तर राजाचा आवाज भक्तीमुळे जरा घोगरा झालेला ऐकून रडूच कोसळे." "पण संस्थानात धर्माच्या नावाखाली भोंदूपणा, पिळवणूक करणारे संन्यासी, संत, महंत यांना त्याने कधीच थारा दिला नाही. मंत्र-तांत्रिकापासून दूर राहिला. राजाची दुसरी पत्नी, आप्पाची आई, शिर्डीच्या साईबाबांचे तीर्थ घेण्यास निघाली व पुढे तिची साईबाबांच्यावर मोठी भक्ती बसून तिने आप्पाला त्यांचा गंडा बांधला, हे राजाला मुळीच पसंत पडले नाही. या पत्नीच्या आग्रहास्तव राजा आप्पा दोन वर्षाचा असताना त्याला घेऊन शिर्डीला गेला पण जेवणाच्या वेळी भर पंक्तीत ज्या वेळी बाबांच्या पायाचे तीर्थ सर्वांना वाटण्यास शागिर्द आले त्या वेळी त्याने हात पुढे केलाच नाही. साईबाबा आपल्या आसनावरूनच ओरडले, 'वो नहीं लेंगा, उनको जरुरत नहीं, उनको छोड देओ'". राजा अस्पृश्यता न मानणारा, निरनिराळ्या धर्मांचा, लोकांचा भेद न करणारा असा होता. याचेही विवेचन आप्पासाहेबांनी केले आहे. "शिक्षकांत हरिजन, मुसलमान असेल तर तो त्यांना ब्राह्मणच समजे, कारण तो त्यांचा स्वधर्म झाला. अस्पृश्यता राजाने मानलीच नाही. वाड्यात खुद्द राणीच्या स्वयंपाकघरात काम करणारी स्त्री हरिजन होती." राजाच्या या स्वभावानेही त्यांच्या कुटुंबातील लोक कसे जखडून जात याचेही आप्पांनी फार सुंदर वर्णन केले आहे. आप्पासाहेब लिहितात, "राजाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जखड्यातून ते स्वतःपण पूर्णपणे सुटू शकले नाहीत. आप्पांच्या पत्नी डॉ. नलिनीबाई यांनाही असल्या भावनाप्रधान वातावरणात साहजिकच गुदमरल्यासारखे झाले." (पृ. ४०)

१९३४ च्या सुमाराला बाळासाहेब पंत प्रतिनिधी आणि आप्पासाहेब हे गांधीजींच्या स्वराज्य कल्पनेने, ग्रामराज्य कल्पनेने, भारले होते, आणि गांधीवादी पद्धतीच्या राज्यघटनेचा विचार करण्याकरिता स्वतः आप्पासाहेब पंडित सातवळेकर आणि भारतानंद म्हणजे मॉरिस फ्रीडमन यांना बरोबर घेऊन गांधींना भेटावयास गेले होते. खुद्द औंधचे राजे गांधींना भेटण्यास कसे गेले याचे वर्णन आप्पासाहेबांनी फार चांगले केले आहे. "एकदा आटपाडीला राजा मारुती व्यंकूच्या मळ्यात बोरांच्या झाडाखाली बोरे खात बसला होता. (डिसेंबर १९३८) इतक्यात राजाचा दुसरा मुलगा नेहमीच्या घाईगडबडीत अचानक आला व

म्हणाला, ‘महात्मा गांधींनी आपल्याला भेटावयास वर्ध्यास बोलावले आहे.’ ‘असं होय’, राजा म्हणाला, ‘तर चला मग’. राजा निश्चयी पण निकाल नेहमी झटपट.” (पृ. ५)

आपल्या ७३ व्या वाढदिवशी भर दरबारात राजाने घोषणा केली होती की, “सर्व संस्थानचा कारभार आता लोकांनीच पूर्णपणे चालवावा. राजा फक्त लोकांचा आद्य सेवक व त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीचा विश्वस्त म्हणून यापुढे राहणार.” (पृ. ६) ही घोषणा की राजाच्या नैमित्तिक लहरीचा मासला असा संभ्रम त्या वेळी लोकांना झालेला असणार. पण आपले औंध संस्थान “सर्वांच्या पुढे नेहमी असावे.” ही राजाची नेहमीची इच्छा (अहंभाव), राजाच्या या मनोभूमिकेच्या मागे असावा असे पण आप्पासाहेब सूचित करतात. “आपल्या टीकाकारालाही ते जवळ करीत, आमचे चुकते कोठे ते सांगा, मला सुधारून सर्वांचे कल्याणच करावयाचे आहे असे ते नेहमी म्हणत.” (पृ. ७) त्यामुळेच “श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, महामहोपाध्याय पंडित सातवळेकर, श्री. नानासाहेब चापेकर, श्री. आत्माराम ओगले, श्री. आण्णासाहेब बखले, श्री. नानासाहेब जोशी अशी कर्तबगार माणसे संस्थान सुधारण्याच्या खटाटोपाला राजाला मदत करू लागली.” (पृ. ७) आप्पासाहेबांनी कोणताही आडपडदा न ठेवता पुरोगामी राज्याच्यामागील राजाच्या मनोभूमिकेचे विश्लेषण केले आहे. लोकांच्या हाती कारभार देताना सुद्धा “ही माझी लेकरे आहेत.” हाच विचार राजाच्या मनात होता. राजा भवानरावांचे लक्ष संस्थानची खेडी स्वावलंबी कशी करता येतील इकडे, राज्यकारभार हाती घेतल्यापासूनच लागले होते. पण आप्पासाहेब म्हणतात त्याप्रमाणे “सत्तेचे विकेंद्रीकरण पहिल्यापासून त्यांच्या ध्यानीमनी होते की नाही याची शंका असू शकते. मी राजा, मी लोकांचे पालन-पोषण करणारा, राजधर्माप्रमाणे सर्वांना सारखे लेखणारा मीच, अशा भावनेनेच हा राजा आधुनिक लोकशाहीच्या युगात पदार्पण करीत होता. १९३८ सालीही सर्व सत्ता लोकांच्या हाती दिल्यावरही ‘ही माझी लेकरे मीच वाढविलेली आहेत. आता उत्तम चालायला शिकली आहेत. त्यांना मांडीवर बसवून घेण्याची जरुरी नाही.’ हाच विचार राजाच्या ध्यानी होता.” एका रीतीने औंध प्रयोग हा जसा लोकशाहीचा प्रयोग होता, तसाच तो राजशाहीचाही प्रयोग होता.

पुढील प्रकरण औंधचा विकास व गांधीवादी घटनेच्या प्रयोगासंबंधी आहे. पण या प्रयोगाचे प्रशिक्षणही नियतीने त्यांना द्यावयास पूर्वीच आरंभ केला होता. आपल्या आणि जवाहरलालजींच्या भेटीसंबंधी आप्पासाहेबांनी केलेले वर्णन फार बोलके आहे. पुढील आयुष्यात अच्युतराव [पटवर्धन], अरुणाबाईंच्याबरोबर क्रांतीच्या प्रयोगात आणि समाजवादी निष्ठेत स्वतःला झोकून देणारे आप्पासाहेब स्वतःबद्दल सांगतात, आप्पासाहेब ऑक्सफर्डला शिकायला असताना पंडित जवाहरलाल नेहरू तेथे १९३५ मध्ये आले होते. तेव्हा आप्पांनी त्यांना प्रश्न केला, “अहो स्वराज्याच्या सामन्यात हिंदी संस्थानिकांनी काय केले पाहिजे?” आप्पासाहेब लिहितात, “सिंहासारखे चवताळून तरुण जवाहरलाल ओरडला, नष्ट झाले पाहिजे.” आप्पासाहेब पुढे लिहितात, “हा जवाहरलाल तर सर्व नष्टच करू पाहात आहे. काय करावे? सुचेचना?” “एक नवीन व चैतन्यपूर्ण आयुष्याचे दालन उघडते आहे व नियती त्याचेकडून काही करवून घेणार आहे त्याची अस्पष्ट अशी काही कल्पनाही आप्पाला नव्हती” “बिचारा बार-ॲक्ट-लॉ विनाकारणच झाला.”

औंध विकासाच्या प्रयोगात त्यांचा सहकारी होता त्यांचा मित्र मॉरीस फ्रीडमन, एक पोलीश. पोलंडमध्ये क्रॅको येथे जन्मलेला ज्यू पण मनाने भारतीय, भारताला मानणारा. आप्पासाहेबांची व फ्रीडमनची भेटही नियतीनेच घडवून आणलेली. आप्पासाहेबांचे मन हे कविमनच. त्यामुळेच नियतीचे आणि आपल्या अहंकाराचेही अत्यंत रोचक असे वर्णन दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभी आपणास आढळेल. पण

काव्याच्या जगातून आप्पासाहेब लगेचच कर्तव्याच्या जगात प्रवेश करतात. मॉरीस फ्रीडमनची त्यांची भेट बंगलोरला होते व आप्पासाहेबांच्या, औंधच्या राजाच्या आणि औंध संस्थानच्या एका नवीन जीवनास प्रारंभ होतो. फ्रीडमन तेव्हा बंगलोरच्या कारखान्यात इजिनिअर म्हणून काम करीत असतो. आप्पासाहेब कारखाना पाहायला जातात. आप्पासाहेब लिहितात, "आप्पा मोटारीतून ऐटीने उतरून हसत हसत हात पुढे करतात तो चिडक्या रागीट आवाजात मॉरीस म्हणतो, 'काय राजपुत्र, इलेक्ट्रिसिटी इंजिनिअरिंगसंबंधी काही आपल्याला कळते का? मी माझा महत्त्वाचा वेळ विनाकारण दवडतो आहे?' "ही पहिली सलामी, पण अशा पहिल्या भेटीतून आप्पासाहेब व फ्रीडमन यांची मैत्री वाढत गेली. दोन महानुभवांची मैत्री. 'लघ्वीपुरा वृद्धिमतीच पश्चात्' अशी छायेसारखी असते. या सुभाषिताचा या ठिकाणी प्रत्यय येतो. आप्पासाहेब व फ्रीडमन यांनी मग औंधची सामाजिक सुधारणा करावयास कंबर कसली, हळूहळू समाजसुधारकांची एक चमूच निर्माण झाली.

आटपाडीच्या लोकांनी मोर्चा आणला त्याला आप्पासाहेब सामोरे गेले. याचेही फार सुंदर वर्णन आप्पासाहेबांनी केले आहे. या सर्व वागणुकीचा परिपाक आपल्या एका वाढदिवशी राजाने आपल्या संस्थानचा कारभार लोकांच्या स्वाधीन करणे यात होणे अपरिहार्यच होते. आप्पासाहेब लिहितात, "राजा म्हणाला आता औंध संस्थानची माझी प्रजा आपला सर्व कारभार स्वतः करावयास समर्थ आहे. यासाठी गेली तीस वर्षे आम्ही त्यांना शिकवून तयार केले आहे."

गांधीवादी घटनेचा प्रयोग जर जगात प्रथम कोठे सुरू झाला असेल तर तो औंध संस्थानात (सन १९३८). स्वतः गांधीजींनी ही घटना वाचून दुरुस्त करून दिली होती हे वर आलेच आहे. पण या घटनेची सुरुवात फ्रीडमनच्या हातची. त्याने एक मसुदा करून राजाला दिला आणि राजाने तो स्वतः वाचून "नशापाणी न करिता" त्यावर सही केली. अशी ही कथा स्वप्नातही येण्यास कठीण अशी अद्‍भुतरम्य. या घटनेची कथा आणि आप्पासाहेबांची. गांधीभेट याचेही फार सुंदर आणि खुसखुशीत वर्णन आप्पासाहेबांनी केले आहे. त्यातूनच महात्मा गांधींनी पंत प्रतिनिधींना भेटीचे आमंत्रण दिले. ही भेट इतिहास घडविणारी होती. यात शंकाच नाही. आप्पासाहेब लिहितात, "बापूजी एक नवेच दर्शन त्याला घडवीत होते. बाबांनी जे मर्यादित स्वरूप जीवनाचे दाखविले त्याच्या पलीकडे भव्य विस्तीर्ण असे, मानव्यता व्यक्त करणारे कर्तव्यकर्म सर्वांच्या पुढे आहे हे गांधीजी दाखवीत होते." "हिंदुस्थानच्या प्रचंड क्रांतीला छोट्या औंधपासून सुरुवात झाली." "औंधला नामशेष करण्यास ब्रिटिशांना वेळ लागला नसता, पण वेळोवेळी त्यांचा मित्र फ्रान्सिस वॉटसन, जो दिल्लीला इन्फर्मेशन खात्यात प्रमुख पदावर होता, त्यांच्या मदतीला होता," असेही आप्पासाहेब सांगतात.

औंध संस्थानचा आणि मुलखावेगळ्या राजाच्या जीवनातील आणखी एक अध्याय म्हणजे "भारत छोडो" चळवळ. साताऱ्याचे प्रतिसरकार जगात प्रसिद्ध पावले आहे. पण ही प्रतिसरकारची चळवळ शक्य झाली याचे कारण औंध संस्थान. कुंडल गावचा हिस्सा या चळवळीत फार मोठा. ब्रिटिश मुलूख आणि संस्थानी खेडी इतस्ततः विखुरलेली. त्यामुळे भूमिगत होणे, पोलिसांपासून स्वतःस बचावणे हे बरेच सोपे होते. पण औंधचा ब्रिटिशांशी संघर्ष गांधीवादी घटना अंमलात आणतानाच झाला. ब्रिटिश अधिकाऱ्यांशी बोलताना औंधचा मुलखावेगळा राजा म्हणाला, आप्पासाहेब लिहितात, "हे सर्व चालू असताना राजाचा पारा हळूहळू चढत होता. राजा एकदम उफाळून म्हणाला, 'गेली तीस वर्षे माझ्या प्रजाजनांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. माझे सर्व अधिकार प्रजेच्या स्वाधीन करणे हे ह्या माझ्या स्वकर्तव्यपालनेचा शेवटचा टप्पा असे मी समजतो. उत्तम सल्ला घेऊन लोकांचे कल्याण कसे करावे हाच

ध्यास मला सतत लागला आहे. जगदंबेला स्मरून मी स्वधर्म पालन करीत आहे, हे माझे स्वधर्म पालन तुम्हाला किंवा कोणा इतरांना पसंत पडण्याकरता मी करीत नाही. माझे वागणे व विचार आपल्याला पसंत नसतील तर हा मी परत जातो औंधला अंबाबाईचे चरणी.' " (पृ. ८६)

शेवटी औंध संस्थान आणि ए. जी. जी. यांचा वाद एकदाचा सुटला आणि गांधीवादी घटनेचा प्रयोग, लोकशाहीकरिता सर्वांना साक्षर करण्याचा प्रयोग औंध संस्थानात सुरू झाला. या गांधीवादी घटनेच्या संबंधात पंडित नेहरूशी हाथीसिंग यांच्या घरी झालेल्या भेटीचेही असेच हृद्य वर्णन आप्पासाहेबांनी केले आहे. गांधीवादी घटना राबविताना श्रमदानाचे, समाजाला सुशिक्षित करण्याचे जे प्रयोग आप्पासाहेबांनी केले त्यामुळे औंधच्या जनतेत कशी जागृती निर्माण झाली याचेही या पुस्तकात जे वर्णन आले आहे त्यामुळेही खरे तर सारी मराठी माणसे जागी व्हावीत.

आप्पासाहेबांनी आपल्या आजारीपणाचे आणि तदनंतर झालेल्या त्यांच्या विवाहाचेही सुंदर वर्णन या पुस्तकात केले आहे. आप्पासाहेब आजारी असताना डॉक्टरांनी त्यांना मांस खावयास सांगितले. गांधीजींना आप्पांनी रिपोर्ट दाखविला तेव्हा गांधीजी म्हणाले, "मांस खाल्ले पाहिजे." गांधीजी किती वास्तववादी होते हे यावरून कळते.

औंधला गांधीवादी प्रयोग करावयाला औंधचे राजे तयार झाले. पण त्यात अहंकार, लोकांचा मान, मोठेपण याचाच भाग, त्याग आणि सेवेची भावना यापेक्षा अधिक होता, इतकेच नव्हे तर गांधीजींना पण आप्पासाहेबांनी तसे कळविले आणि गांधीजींनी आप्पांना वडिलांच्या विरुद्ध उपवास करावयास सांगितले. हे आप्पांनी प्रांजळपणे लिहिले. एकूण ही सर्व कथा अद्‌भुतच आहे.

आप्पासाहेब लिहितात वडिलांच्या विरुद्ध उपोषण करण्याची माझी तयारी नव्हती. त्यांचा आणि मॉरीस फ्रीडमन यांचा झालेला वादविवाद आप्पासाहेबांनी अत्यंत रोचकपणे रंगविला आहे. कोणतीही गोष्ट प्रामाणिकपणे रंगविणे, सत्य तेच सांगणे हीच या पुस्तकामागील खरी शक्ती होय. या शक्तीमुळेच देशाला घडविणारे शिल्पकार उत्पन्न होतात. १९४२ च्या चळवळीच्या वेळीही आप्पासाहेबांनी गांधीजींकडे जाऊन औंधने काय करावे असा प्रश्न विचारला. त्या वेळी गांधीजींनी दिलेले उत्तरही फार महत्त्वाचे आहे. आप्पासाहेब लिहितात, "गांधीजी आप्पाच्या तोंडावरील ती थोडी भीती जादा चिंता व नेहमीचीच मनातील चलबिचल पाहून हसले. म्हणाले, 'बघ प्रसंग अत्यंत महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानाचे रक्षण ब्रिटिश करू शकणार नाहीत. जपानी कदाचित हिंदुस्थानावर आक्रमणही करतील. तसे झाले तर त्यांच्याही विरुद्ध आपला लढा चालूच राहणार. अशा वेळी ताबडतोब औंधच्या राजेसाहेबांनी व्हाइसरॉयला स्पष्ट लिहावे की, औंधचा हा राजा प्रजेच्या पूर्ण सहमतीने ब्रिटिशांना औंधचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करीत आहे. पूर्वीचे सर्व करारमदार आता रद्द समजावे. औंध स्वतंत्र आहे व ते तसेच राहणार.' "

'छोडो भारत' चळवळीमध्ये आप्पासाहेब आणि अच्युतराव पटवर्धन यांचे फोनवरील बोलणे आणि नंतर प्रत्यक्ष बोलणे हेही ४२ च्या चळवळीतील एक महत्त्वाची घटना मानावी लागेल. या ४२ च्या मंतरलेल्या काळात औंध संस्थानने जी भूमिका बजावली त्याचे बोलके वर्णनही आप्पासाहेबांनी या चरित्रवजा पुस्तकात दिलेले आहे.

हाही एक योगायोग म्हटला पाहिजे की, गांधीवादी ग्रामराज्याच्या प्रयोगाची सुरुवात जशी औंध संस्थानात झाली तशीच किर्लोस्करांसारख्या प्रचंड उद्योगसमूहाची, भांडवलशाहीची पायाभरणीही औंधमध्येच झाली. आप्पासाहेब लिहितात, “श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर राजाचे जिवलग दोस्तच होते. जवळ जवळ समवयाचेच. किर्लोस्कर बंधू त्या वेळी बेळगावात होते. सायकल रिपेअरिंगचा उद्योग होता. तेथेच लक्ष्मणराव नांगराचे फाळ तयार करू लागले. साहेबाला कोणी सांगितले की, जिथे फाळ ओतले जाऊ शकतात, तिथे बॉंबही होईल. कडक पाळत ठेवा......त्याच वेळी बापूंनी भवानरावांना सुचविले की, लखूमामांना औंधला बोलवा. तिथे आपण जागा घेऊ. इतर त्रास होणार नाही.” “झटपट निश्चय झाला, १९१० साली कुंडलच्या माळावर कारखाना सुरू झाला. पुढे सर्व जगविख्यात किर्लोस्कर उद्योगाचा वृक्ष फोफावला.”

औंधमधे भूमिगत ग्रामराज्याचा, गांधीवादी घटना राबविण्याचा प्रयोग झाला हे एक ऐतिहासिक सत्य आणि किर्लोस्करसारख्या प्रचंड उद्योगसमूहाचा जन्महीं तेथेच झाला, हे दुसरे ऐतिहासिक सत्य. या दोन्ही घटना औंधमध्ये जन्मास याव्या असा काही कार्यकारण संबंध आहे काय असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. याचे एक उत्तर नाही असेच आहे. परंतु गांधीवादी घटना राबविण्याची इच्छा आणि उद्योगधंद्याला मदत करण्याची इच्छा उद्योगधंदे वाढवावे अशी इच्छा ही औंधकरांना होती, हे तर खरे आहेच. त्यामुळेच उद्योगसमूह कसा जन्मतो व कसा वाढतो याचा अधिक खोलात जाऊन विचार करावा लागेल.

उद्योगसमूह हा मोठा असो किंवा लहान, त्याला एक आश्रय लागतो. हा आश्रय पैशाचा असतो, मोकळ्या हवेचा असतो, संधी मिळण्याचा असतो आणि विकासाला लागणाऱ्या स्वातंत्र्याचा असतो. अशा प्रकारचा आश्रय पुढे फार मोठ्या झालेल्या उद्योगाला औंधकरांकडून मिळाला. त्या काळात किंवा आज सुद्धा राष्ट्रीय वृत्तीच्या माणसासमोर भांडवलवादाच्या प्रश्नापेक्षा स्वदेशीचा प्रश्न अग्रक्रमाने उभा असतो. “नॅशनल बुर्झवायजी” ची संकल्पना ही याच विचारातून उत्पन्न झाली आहे. व्यक्तिस्वातंत्र्य जसे लोकशाहीला आवश्यक असते, तसेच ते भांडवलशाहीला पण आवश्यक असते. या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेमुळेच सर्वांना समान संधी मिळते. पण एखादाच उद्योजक त्या संधीचा उपयोग करू शकतो. समाजवादी नेते जरी सर्वांना समान संधी पाहिजे असे म्हणत असले, आणि व्यक्तीच्या विकासाकरिता संधी उपलब्ध होणे जरी आवश्यक असले तरी समान संधीचा फायदा सर्वांनाच मिळत नसतो, आणि शेवटी व्यक्तिस्वातंत्र्यामुळे समान संधीचा परिणाम हा असमानतेत किंवा विषमतेतच होतो. संधी समान असली तरी माणसाचा अहंपणा हा वेगवेगळ्या प्रकारचा असतो. त्या अहंपणाची शक्ती वेगवेगळ्या प्रकारची असते. त्या शक्तीतून उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीचा मागोवा किंवा भोग घेण्याची शक्ती ही वेगवेगळ्या प्रकारची असते. आणि या ठिकाणी माणसाचे कर्तृत्व, त्याची बुद्धी, त्याचा निर्णय घेण्याची शक्ती या गोष्टी कामाला येतात. वैवस्वत मनूची कथा आहे. हा सूर्यवंशातील राजा नदीच्या काठी संध्या करीत होता. त्याने ओंजळीत पाणी घेतले आणि तो सूर्याला अर्घ्य सोडणार इतक्यात त्याला दिसले की, आपल्या ओंजळीत एक इटुकला मासा आला आहे. औंधकरांच्या ओंजळीतही असाच इटुकला मासा आला होता. बेळगावात सायकलदुरुस्तीचे दुकान चालविणारा हा ‘इटुकला मासा’ औंधकरांच्या ओंजळीत काही काळ तरी सुरक्षित राहू शकला. त्याला श्वास घेण्यास मोकळी हवा मिळू शकली. मूळच्या सायकलच्या दुरुस्तीच्या दुकानाचे परिवर्तन नांगराचे फाळ करण्याच्या लहानशा कारखान्यात झाले. असा कारखाना, असा उद्योगधंदा देशाच्या प्रगतीला पूरक आहे, असा सर्वसामान्य सद्‌गुणी विचार मोकळ्या बुद्धीच्या औंधकरांच्या मनात निश्चितच होता. हे स्वदेशीला उत्तेजन देणे होते. नांगराचे फाळ बनविणारा कारखाना बॉम्बची कवचेही बनवू शकतो हा देशभक्तिपर विचारही एखाद्या बुद्धिमान माणसाच्या मनात येऊ शकतो. सुरुवातीच्या काळात या

अनुक्रमणिका

नांगराच्या फाळाकरिता बाजारपेठ जवळपास उपलब्ध नव्हती. पण वऱ्हाडातील कापसाची शेती तेव्हा तेजीत असल्यामुळे हा कारखाना सुरक्षित राहिला. कदाचित त्या वेळी हा कारखाना मुंबई किंवा टाटानगर येथे निघाला असता तर तो नाहीसा तरी झाला असता किंवा दुसऱ्या मोठ्या उद्योगसमूहाचा एक उपकारखाना म्हणून तरी त्याचे स्थान राहिले असते. छोट्या कारखान्याची निर्मितिप्रक्रिया व विकास पूर्ण झाल्यावर हा कारखाना केवळ औंधच्या परिसरात राहिला नाही. तो हळूहळू सोलापूर, हरिहर, पुणे इत्यादी ठिकाणी गेला. एका कारखान्याचे अनेक कारखाने झाले. या ठिकाणीसुद्धा हा उद्योगसमूह अजून लहानच होता. वैवस्वत राजाच्या ओंजळीतील मासा प्रथम कमंडलूत, नंतर विहिरीत, नंतर तलावात, नंतर नदीत, आणि नंतर समुद्रात सोडावा लागला. आणि तो समुद्रात जेव्हा सोडला गेला तेव्हा तो मासा जगाला वाचविणार किंवा जगात प्रलय घडवून आणण्याची शक्ती असणारा ईश्वराचा पहिला अवतार म्हणून प्रसिद्ध झाला. औंधकरांनी अभय दिलेल्या या माशाला सुद्धा पश्चिम जर्मनीपर्यंत अशीच प्रगती करता आली. निरनिराळ्या क्षेत्रांत, साहित्य क्षेत्रातसुद्धा, या माशाने नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केला आणि लोकप्रियता मिळविली.

पण केवळ लोकप्रियतेच्या भरवशावर एखादा माणूस मोठा उद्योगपती होत नाही. ज्याप्रमाणे जुन्या काळी किंवा आताही काही राजकीय लग्ने होत असतात त्याचप्रमाणे काही औद्योगिक संबंधही जुळतात. या उद्योगसमूहाचा संबंध राजकारणातील काही महान व्यक्तींशी आणि परदेशातील उद्योगपतींशी जुळल्यामुळे कळत किंवा नकळत त्यांच्या वाट्याला यामुळेच इतरांच्यापेक्षा अधिक अनुकूलता येणे अपरिहार्य होते. आपल्या उद्योजक शक्तीच्या जोरावर त्या सर्व संधीचा या उद्योगसमूहाने उपयोग करून घेतला. हा त्यांच्या योजकतेचा भाग. आपल्याकडे किंवा व तसे म्हटले तर जगात कोठेही उद्योगीकरणाची लाट ही सावकारशाहीशी नाही म्हटले तरी कधी कधी निगडित झाली आहे. १९ व्या शतकातील दोन मोठे विचारवंत मार्क्स आणि प्रूधाँ यांच्यात भांडवलशाहीची पुढील वाटचाल कशी होईल यासंबंधी वाद रंगला होता असे म्हणतात. केवळ उद्योगीकरणातून, तंत्रज्ञानातून भांडवलशाहीचा विकास न होता तो थोड्याफार सावकारशाहीतूनही होईल असे प्रूधाँला वाटत होते. ही सावकारशाही निरनिराळ्या रूपाने हिंदुस्थानातील निरनिराळ्या उद्योगपतींच्या वाट्याला आली हे नाकारता येणार नाही. पैसे एका विशिष्ट आकारमानाच्या पलीकडे वाढले म्हणजे मग ते पुढे आपोआप वाढतात. अर्थात हे वाढणे म्हणजे मिथ्या वाढणे, आणि भांडवलशाहीच्या जगात पैसा अशा रीतीने वाढू शकतो असा माझा समज आहे. आज भारतभर फोफावलेले कित्येक उद्योगसमूह मुळात असेच सावकारी पद्धतीने वाढलेले आहेत. एका मोठ्या उद्योजकाला एक मोठा कारखाना कर्जात मिळाला असे म्हणतात. माझे एक सर्वोदयी मित्र परवा म्हणत होते की, कोणत्या एका स्कूटरच्या कारखान्याला केवळ स्कूटरची नोंद करण्याकरिता ग्राहकांकडून १५० कोटी रुपये मिळाले. म्हणजे एवढ्या भांडवलात आजच्या डेफिसीट अर्थशास्त्राच्या पद्धतीने नवनवीन कारखाने सुरू होऊ शकतील. पण या १५० कोटी रुपयांपैकी आजही काही कोटी रुपये हे कारखानदार मोठे व्याज घेऊन इतरत्र गुंतवत असतात. त्यातूनही एकमेकास साहाय्य होते आणि सर्व सुपंथ धरतात. औंधात सुरू झालेल्या कारखान्याचे थोड्याफार अंशी तरी असे झाले असणार.

१९४७ मध्ये स्वराज्य मिळाल्यानंतर उद्योगीकरणाची एक प्रचंड लाट आपल्या देशात आली. त्याचाही बुद्धिमान लोकांनी फार मोठा उपयोग करून घेतला. एका देशात विकसित झालेले तंत्रज्ञान देश प्रगत असेल तर काही दिवसांनी तेथे कुचकामी ठरेल. पण मागासलेल्या देशामध्ये हेच तंत्रज्ञान पंचपक्वान्नाचा नैवेद्य ठरू शकतो. जर्मनीतील एका उद्योजकाच्या सहकार्याने शंभर कोटी रुपयांचा एक कारखाना, युरोपमधील एक कारखाना (युरोपात या जुन्या तंत्रज्ञानाने चालणाऱ्या कारखान्यास जागा

नसल्यामुळे) भारतातील एका उद्योजकास केवळ एका रुपयास कसा मिळाला याचीही हकीकत माझे सर्वोदयी मित्र सांगत होते. अशा देणग्या विज्ञानाच्या क्षेत्रात सुद्धा विद्यापीठांना मिळतात आणि त्यामुळे काही विद्यापीठे भराभर विकसित झाल्यासारखी भासतात. शंभर कोटी रुपयांनी आम्ही आपल्या देशाला संपन्न करीत आहोत, या मंत्राच्या जोरावर कस्टमपासून सुद्धा आम्हाला मुक्त करा असे काही उद्योजकांनी म्हटल्याचेही ऐकिवात आहे. भांडवल अशाही रीतीने मिळते आणि भांडवलाची अशी गुंतवणूक सावकारी पद्धतीचीच गुंतवणूक असते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या पोटात लोकशाहीची बीजे जशी साठवलेली असतात तशीच भांडवलशाहीची आणि त्याच्या विकासाची बीजे सुद्धा साठविलेली असतात, हे पण लक्षात घेतले पाहिजे. औंधमध्ये जन्माला आलेल्या भारतातील एका मोठ्या उद्योगसमूहाच्या विकासाची कथा ही अशा प्रकारची आहे.

पण ज्याप्रमाणे एक मोठी उद्योगशाही औंधमध्ये विकसित झाली त्याचप्रमाणे गांधी राज्यघटनेच्या प्रयोगाचाही औंधमध्ये विकास झाला. पण शेवटी तो अपयशी ठरला. याकरिताही त्या वैवस्वत मनूची गोष्टच मार्गदर्शक ठरणार आहे. वैवस्वत मनूच्या ओंजळीत आलेला हा गांधीवादी प्रयोगाचा मासा जर हळूहळू दक्षिणी संस्थानात, निरनिराळ्या प्रांतांत, भारतात, सोडता आला असता तर हा प्रयोग कदाचित यशस्वी होऊ शकला असता. परंतु हा मासा औंधकरांच्या कमंडलूबाहेरच जाऊ शकला नाही आणि पुढे तर हा कमंडलूच नाहीसा झाला. त्या कमंडलूतील पाणी आणि माशाची आकांक्षा, इच्छा, विकासाची शक्यता पण औंध संस्थानचे विलीनीकरण झाल्याबरोबरच संपली. या प्रयोगाचे कर्तेही संस्थानच्या बाहेर पडले. त्यांनी देशात आणि देशाबाहेर आणखी मोठमोठ्या कामगिऱ्या बजावल्या. पण मोठा मासा लहान माशाला गिळतो तसे मोठ्या राज्यशासनाने आणि तेथील घटनापद्धतीने औंधकरांच्या घटनापद्धतीला गिळून टाकले. १९३८ ते १९४७ एवढेच काय ते या घटनापद्धतीचे जीवन. मुंबई राज्यात सामील झाल्याबरोबर मुंबई राज्याचे धोरण (किंवा व्यवस्था) औंधातही अंमलात आले आणि त्यामुळे जुनी गांधीवादी राज्यव्यवस्था संपुष्टात आली हे सत्य दृष्टीआड करून चालणार नाही. दुर्दैवाने अशी गांधीवादी व्यवस्था सर्व देशाने अंगीकारली नाही, आणि जिल्हा परिषदा इत्यादींच्या रूपाने जेव्हा अशा व्यवस्थेचा पुनर्जन्म झाला तेव्हा ते विकेंद्रीकरणही एका वेगळ्या स्वरूपाचे, गांधीवादी विकेंद्रीकरणाला पोषक न ठरणारे असे झाले. पुढे महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाने सहकाराच्या क्षेत्रात एक विक्रम घडविला. सहकारी साखर कारखान्यांची चळवळ याकडे उदाहरण म्हणून बोट दाखविता येईल. पण ज्या सहकार तत्त्ववेत्त्याच्या दिग्दर्शनाखाली हा प्रयोग झाला, त्यांच्या मनात येथे सहकारी समाजवाद आणावयाचा होता, उलट जो निर्माण झाला तो सहकारी भांडवलवाद. येथील सहकारी समाजवादाची कथा आणि इंग्लंडमधील भांडवलशाहीची कथा (जॉइंट स्टॉक कंपनीची कथा) ही त्याच्या सर्व अंगोपांगांचा विचार केला तर एकसारखीच दिसेल. औंधच्या गांधीवादी घटनेची फलश्रुती अपयशात झाली. कारण पृथ्वीला पाण्याने आणि पाण्याला आकाशाने ग्रासले. पुराणातील प्रलयाची कथा ही अशी आहे.

पण गांधीवादी घटना जर त्या वेळी राबविली गेली नसती तर ४२ साली साताऱ्यात निर्माण झालेली प्रतिसरकार किंवा पत्रीसरकार हे पण उत्पन्न झाले नसते, हे विसरता येणार नाही. एवढी ऐतिहासिक भूमिका औंधकरांनी गांधीवादी राज्यघटना राबवून निर्माण केली याबद्दल तरी आपण तेथल्या मुलखावेगळ्या राजाचे आणि मुलखावेगळ्या राजपुत्राचे अभिनंदन करावयास पाहिजे. हा गांधीवादी प्रयोग पण एका अर्थी लोकांच्याकरिता जसा लोकशाहीचा होता तसा राजाच्या मनोभूमीत राजशाहीचाच होता. राजाच्या मनामध्ये जी राजशाही शिजत होती त्याचा बाहेरचा प्रतिध्वनी हा गांधीवादी घटनेच्या रूपाने येत

होता. या मुलखावेगळ्या राजाचे चरित्र-लेखक तसे सुचवितात, आणि त्यात महत्त्वाचा सत्यांश आहे. पण तरीसुद्धा अशी लोकशाही मनोभूमी राजमनात उत्पन्न होणे ही पण साधीसुधी बाब नाही.

या सर्व प्रश्नांतून उत्पन्न होणारा आणखी एक प्रश्न. आज तंत्रज्ञान एकसारखे विकसित होत आहे. भारताचे उद्योगीकरण तर सुरूच आहे. पण ते आता अणुऊर्जा आणि संगणक इत्यादी रूपानेसुद्धा बाहेर येणार आहे. या नित्य नूतन तंत्रज्ञानाच्या संदर्भात केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक ऋण इत्यादीकडे कसे पाहावयाचे हा खरा प्रश्न आहे. एखादा वेडा माणूस व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली विश्वप्रलय घडवून आणू शकतो. एका रीतीने आजच्या संदर्भात स्वतंत्र व्यक्तित्व आणि बहुव्यक्तित्वाची कल्पनाच संपुष्टात येऊ पाहात आहेत. त्यामुळे केंद्रीकरण की विकेंद्रीकरण या प्रश्नाचे मूलभूत स्वरूप बदलत चालले आहे. विकेंद्रित समाजव्यवस्थेत संगणक यंत्रे असू शकतात. अणुउर्जेचाही उपयोग असू शकतो. कारण विकेंद्रीकरणाचा हा अर्थ नाही की विश्वातील इतर घटकाशी संबंधच येऊ नये. परंतु हे पण लक्षात ठेवले पाहिजे की नित्यनूतन अशा विकसित तंत्रज्ञानाला एक शिस्त लागते. एका विशिष्ट प्रकारच्या शिस्तीतच हे तंत्रज्ञान वाढते. जर शिस्त नसेल तर असे तंत्रज्ञान आणि देशाचा विकाससुद्धा लोप पावल्यावाचून राहणार नाही. अशी भीती पण अशा विकासाच्या पोटात असते. आजचे राज्यकर्ते, आजची नोकरशाही आणि आजचे बुद्धिवंत ही सर्व आव्हाने पेलू शकतील की नाही असा संभ्रम व्हावा अशी परिस्थिती आहे. संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आणि शिस्त हे कधी कधी एकमेकांना छेदतात आणि असा छेद हा फार भयंकर असतो. त्यामुळे अराजक माजण्याचा फार मोठा संभव असतो. शिवाय आजच्या अती विकसित तंत्रज्ञानामुळे जी समाजव्यवस्था उत्पन्न होते ती अतिकेंद्रित अशी असते. अतिकेंद्रित तंत्रज्ञांचा वर्ग म्हणजे एक नवा मंत्रदृष्ट्या ब्राह्मणाचा नवा वर्ग. तो ज्याप्रमाणे समाजाचा विकास साधू शकतो त्याप्रमाणे समाजाला अपाय पण करू शकतो. आपली फार मोठी शक्ती ही जनशक्ती आहे. अति-विकासात तंत्रशक्तीबरोबरच आपल्या जनशक्तीचा पण उपयोग झाला पाहिजे हे नजरेआड करून चालणार नाही. जनशक्ती ही एक ऊर्जा आहे हे एक तर राज्यकर्त्यांच्या ध्यानातच येत नाही आणि आले तरी त्याचा उपयोग जेव्हा केवळ राजकारणाकरिता आणि निवडणूक जिंकण्याकरिताच होतो तेव्हा एक नव्या तऱ्हेचा साम्राज्यवाद, आर्थिक साम्राज्यवाद तरी उत्पन्न होतो किंवा दुसऱ्या प्रचंड आर्थिक साम्राज्यवादापुढे शरणागती तरी पत्करावी लागते. या दोन्ही गोष्टी इष्ट नाहीत. तंत्रज्ञान हे समाजविकासाकरिता, समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाकरिता वापरणे आवश्यक असते. आज जगातील बहुतेक देशांतून ते वापरले जात नाही हेच आजच्या सामाजिक विलापिकेचे कारण आहे. यातून भगवान बुद्धाने सांगितल्याप्रमाणे दुःख निर्माण होते, पण प्रज्ञेचा अंगीकार न केल्यामुळे या दुसऱ्यांच्या दुःखाने आपल्याला करुणेच्या रूपात दर्शन होत नाही. आणि या करुणेचेही पुनश्च प्रज्ञेच्या योगाने अहिंसेत रूपांतर न झाल्यामुळे शोषणरहित समाजव्यवस्था उत्पन्न न होता शोषक, शोषित असा भेद समाजात सतत राहण्याची शक्यता असते. ही अर्थात भीती आहे. प्रत्येक आव्हानाच्या मागे भीती असते आणि भीती आहे म्हणूनच आव्हानेही असतात. अर्थात ही सर्व आव्हाने आपण स्वीकारलीच पाहिजेत.

"मुलखावेगळा राजा" या पुस्तकातील शेवटची दोन-तीन प्रकरणे तर आणखीनच महत्त्वाची. १९४५ पासून राजकीय घडामोडींची चक्रे फारच जोरात वाहू लागली. ४६ला आंतरिक सरकार आले. घटना समितीची स्थापना झाली. ४७ ला स्वातंत्र्य मिळाले. संस्थाने विलीनीकरणात सारे संस्थानिक नाहीसे झाले. त्यात "मुलखावेगळ्या राजा"चे संस्थानही नाहीसे होणारच. आप्पासाहेबांनी ही औंधची कथा ६व्या प्रकरणात चितारली आहे. प्रथम मुंबई इलाख्यातील दक्षिणी संस्थानांच्या फेडरेशनपुढे आपला "ग्राम राज्याचा संसार आटोपता घ्यावयाचा का" हा प्रश्न उत्पन्न झाला. बॅरिस्टर जयकरांचा सल्ला घेण्यात आला.

अनुक्रमणिका

सरदार पटेलांनी दक्षिणी संस्थान संघराज्याच्या कल्पनेची टिंगल पण केली. सरदारांनी कमलनयन बजाजला पाठविले. संघराज्याचे उद्घाटन झाले, आणि २४ तासांत संघराज्य खलासपण झाले. शेवटी विलीनीकरणही झाले. अशी ही कथा. खेर, मोरारजींनी ४२ च्या क्रांतिवीरांना कसे लाथाडले ह्या साऱ्या कथांच्या वर्णनांनी नटलेले हे प्रकरण. सातारच्या भूमिगत क्रांतिवीरांची आणि पंडित जवाहरलालजींची आप्पांनी तारदेवाला कशी भेट घडवून आणली हे पण या प्रकरणात सांगितले आहे. औंधच्या ग्रामराज्याचा प्रयोग तसाच चालू राहावा हा महात्माजींचा आग्रह. पण गांधीजींचा खूनच झाला आणि थोड्याच दिवसांत "३१५ वर्षांचे औंध काळाच्या जबड्यात गडप झाले!" औंध प्रयोगाचाही शेवट येथेच होतो. पुढील प्रकरणात आप्पासाहेबांनी घटना समितीत त्यांचा एका मताने कसा पराभव झाला आणि पुढे परराष्ट्र वकील म्हणून त्यांची कशी नेमणूक झाली हे पण सांगितले आहे आप्पासाहेबांची ही कारकीर्द फार गाजली हे सांगणे नकोच.

आप्पासाहेबांनी पुस्तकाचा उपसंहार केला आहे - "आणि हो, जुने पुराणे बेकार राजे गेले. घालविले, छानच झाले. पण नवीन राजांचे एक मोठे पेवच फुटले. गावोगावी शहरोशहरी 'राजेच राजे'. सत्ता संपत्ती उपभोग हेच ध्येय. लोक म्हणू लागले की, ही काय लोकशाही? का साम्यवाद? हे काय झाले? यातून बेकारी, गरिबी, झोपडपट्ट्या, अत्याचार, अनाचार, गुन्हे, भ्रष्टाचार, अस्थिरता जाणार की वाढणारच?"

"मोठा प्रश्न पडला." आप्पासाहेबांना शेवटी मोठा प्रश्न पडला आणि हा प्रश्न दिवसानुदिवस अधिकाधिक मोठा होत चालला. यातून शेवटी काय निष्पन्न होईल हे सांगता येत नाही. आप्पासाहेबांची, एका मुलखावेगळ्या राजाच्या राजपुत्राची ही खंत. साऱ्या भारतीयांचीसुद्धा हीच खंत आहे.

पण ही कथा आणि ही खंत म्हणजेच आधुनिक महाराष्ट्राच्या एका शिल्पकाराची कहाणी.

आप्पासाहेब पंतांनी "मुलखावेगळा राजा" हे पुस्तक लिहिले नसते तर माझ्या मनात आता उत्पन्न झालेली स्पंदने उत्पन्नच झाली नसती. मग ती विचारांच्या रूपाने प्रस्तुत करणे तर दूरच. ही स्पंदने उत्पन्न करण्याचे कर्तृत्वही आप्पासाहेबांचेच म्हणून व्यक्तिशः मी त्यांचा ऋणी आहे.

यशोधन
१३ एप्रिल १९८६

**सुरेन्द्र बारलिंगे**

# १ मुलखावेगळा राजा

एक होता राजा. तसा जरा म्हाताराच होता. असेल साधारण सत्तर वर्षांचा. पण चाले अगदी रुबाबात. ऐटीत. तरुणपणी खूप व्यायाम करायचा. घोड्यावर बसायचा, डोंगरावर देवीचे देऊळ होते तिथे रोज पळत जायचा. तालीम, कुस्ती, जोर, बैठकीचा षोक. उंची फारतर असेल पाच फूट आठ इंच. पण वजन जवळजवळ २०० पौंड होते. राजाचा रोजचा आहार सात्त्विकच असे. अधूनमधून जरा चमचमीत खात असे, पण रोज दूध, साय, ताक, दही व अगदी साधे जेवण घेई. फळे, भाज्या फार आवडत त्याला.

दर आठवड्याला दोन उपास करी हा राजा. शरीर व मन शुद्ध आणि उत्तम स्थितीत ठेवण्याचा त्याला छंदच होता. दर सोमवारी व मंगळवारी दिवसभर उपास. नवरात्राचे नऊ दिवस पूर्णपणे दूध व फळांवरच राहायचा.

शरीर व मन त्याने इतके कमावले होते की सत्तर वर्षे झाली तरी अगदी ताठ चालायचा. डोंगरावरील देवीला रोज न चुकता जायचा, पण साठ वर्षांनंतर पळत जाणे मात्र सोडले होते त्याने. पंचेचाळीस वर्षांनंतर मिरज संस्थानचे वृद्ध समवयस्क राजे बाळासाहेब पटवर्धन यांच्या सांगण्यावरून सूर्यनमस्कार घालण्यास या राजाने सुरुवात केली. पंचवीस वर्षे रोज तीनशे नमस्कार घाली. दोन तास लागत. रोज पहाटे तीन वाजता उठून स्नान-संध्या केल्यावर मोठ्याने मंत्र म्हणून जोरदार प्राणायामाबरोबर शास्त्रोक्त नमस्कार घाली. सूर्यनमस्कार व सूर्योपासना या राजाने वीस वर्षे सतत केल्यावर त्यांचा प्रचार करण्यास त्याने सुरुवात केली. सूर्यनमस्कारावर छायाचित्रांसह पुस्तक प्रसिद्ध केले. संस्थानच्या सर्व शाळांतून रोज पंचवीस समंत्रक, सप्राणायाम नमस्कार घालण्याची सक्तीही केली. हजारो तरुण मुला-मुलींवर यामुळे उत्तम संस्कार झाले. अनेकांनी या सूर्यनमस्कार-राजाला धन्यवाद दिले.

काहींनी अर्थात शिव्याही दिल्या त्याला. असेल झाला मत्सर त्या बिचाऱ्यांना. एकदा तर (१९३५) एका विलायती वृत्तपत्राने हा राजा इंग्लंडला प्रवासाला गेला असताना काही भलभलता मजकूर त्याच्याबद्दल छापला. या वृत्तपत्राचे नाव होते 'सन्डे रेफरी' (SUNDAY REFERE). या पत्राने हिंदुस्थानातील लोक किती गलिच्छ आहेत हे सिद्ध (?) करण्याकरताच की काय, लिहिले की "हिंदुस्थानात अनेक व्यसनी व आचरट राजे आहेत. त्यांपैकी एक वयस्कर राजा आताच लंडनमध्ये आहे! त्याला एका विशिष्ट व्यायामाचे वेड आहे. त्याने हा व्यायाम आपल्या संस्थानात सर्वांनी घालण्याचा दंडक काढला आहे. हा दंडक विशेषतः तरुण मुलींना लागू आहे. ह्या व्यायामामुळे या मुली सडपातळ व सुंदर दिसू लागल्या की तो त्यांना लगेच आपल्या जनानखान्यात घालतो !!" याच वेळी राजाचा दुसरा मुलगा ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचे शिक्षण संपवून बॅरिस्टरीचा अभ्यास करण्याच्या खटाटोपात होता. त्याने हे वृत्तपत्र वाचल्याबरोबर वडिलांना तारच ठोकली की, "या बदमाशाला कोर्टात खेचू पाहतो. परवानगी असावी."

राजाला या मुलाचा आततायी तापट स्वभाव माहीत होता. घाईघाईत पूर्ण विचार न करता काहीतरी एकदम करण्याची त्याला खोड. अनेक वेळा त्याने या मुलाला सबुरीने वागण्याचे समजावून सांगण्याचा निष्फळ प्रयत्नही केला होता. राजाने मुलाला तार पाठविली, "परदेश आहे, तेथील कायदे वेगळे आहेत, हे विसरू नये. एखाद्याने अंगावर घाण टाकली तर आपण त्याचावर घाण परत बदला म्हणून टाकण्याची जरुरी नाही."

अनुक्रमणिका

तार पोचेतोपर्यंत या मुलाला कुठला दम निघायला? बॅरिस्टरीच्या परीक्षा देण्याच्या नशेतच तो एका मित्राबरोबर येथील नामवंत सॉलिसिटरकडे गेला. या भव्य शांत प्रसन्न चेहऱ्याच्या कायदे-पंडिताने पहिलाच प्रश्न केला, "काय हो तुमच्या वडिलांची वागणूक स्वच्छच आहे असे तुम्ही सिद्ध करू शकाल?"

एकदम रागाच्या भरात या तरुण मुलाला काय बोलावे हे सुचेचना. आपल्या वडिलांच्या चारित्र्यासंबंधी पृच्छा, संशय! काय महामूर्ख माणूस हा!

बरोबरीचा मित्रच मध्ये बोलला, "अरे आप्पा, इंग्लंडमध्ये कोणी तुझ्या वडलांविषयी माहिती असणारे आहेत का? जर ही केस कोर्टात यायची तर त्यांची साक्ष काढावी लागणार. आपल्याला हे सर्व विचारात घेतले पाहिजे."

मुलाने ताबडतोब दहा-बारा इंग्रजी मोठ्या माणसांची नावे सांगितली. नुकतेच वडील इंग्लंडमध्ये येऊन गेले असल्याने त्याचीही या थोर लोकांशी गाठ पडली होती. लॉर्ड ब्रेबर्नपासून जज्ञ किंकेडपर्यंत त्याने एक यादीच या कायदेपंडितापुढे टाकली.

संस्थानी सवयीप्रमाणे बाहेर जाताना इतर सभ्याचाराबरोबर फी-पैसे वगैरेची बातच केली नाही. राजे-राजपुत्र पैशांच्या हिशोबाचे सर्व काम दिवाणाकडे सोपवतात ना, मोठ्यांनी अशा हलक्या गोष्टीत लक्ष घालायचे नसते!!

बाहेर आल्यावर त्याच्या मित्राने या मुलाला हळूच सुचवले, "परत जा, फीबद्दल बोल."

केवढा पेचप्रसंग. राजपुत्र पैशांसंबंधी कसे बोलणार?

काय करणार, बिचारा गेला एकटाच परत.

दारावर टक् टक् करून आत गेला. तोंडातून पैशांचा शब्दच फुटेना. त्या चाणाक्ष कायदेपंडिताने ताबडतोब हा पेचप्रसंग जाणला व म्हणाला,

"आपण फी-बिलासंबंधी कोर्ट केस झाल्यावरच विचार करू."

हुश्श्श् करीत मुलगा बाहेर आला! आता पुढे काय? या बॅरिस्टर मुलाची सर्व आयुष्यात हीच एकमेव कोर्टाची केस ठरणार होती!

पण कोर्टाची पायरी पुन्हा न चढता पंधरा दिवसांतच 'सन्डे रेफरी' ने पूर्ण माफी मागून चारित्र्याबद्दल शंका घेतल्याची भरपाई म्हणून दोन हजार पौंड, म्हणजे तीस हजार रुपये, कोर्टात दंड भरला! ताबडतोब मुलाने तारेनेच पैसे वडलांना पाठवले. वडिलांनी ते बँकेत ठेवले व पुढे पंधरा वर्षे त्याच्या व्याजातून दोन सूर्यनमस्कार प्रचारक, हिंदुस्थानभर या व्यायामाच्या राजाचा, सूर्यनमस्कारांचा, प्रचार करण्याकरता नेमले. श्री. लाळे व श्री. देशपांडे १४ वर्षे हे काम सतत करत असत. हजारो लोक सूर्यनमस्कार शास्त्रोक्त घालायला शिकले व उत्तम आयुरारोग्य अनुभवू लागले. सूर्यनमस्काराचा प्रचार आपोआप परदेशातही

झाला. इंग्लंडमध्ये न्यूज क्रॉनिकल या दैनिक वृत्तपत्राने सहा लेख सूर्यनमस्कारावर प्रसिद्ध केले. या लेखांचेच रूपांतर श्रीमती लुईस मॉरगन हिने केले व 'टेन पॉईंट वे टू हेल्थ' (पूर्ण आरोग्यासाठी दहा आसने) हे पुस्तक प्रसिद्ध केले (१९३७). या पुस्तकाच्या बावीस (२२) आवृत्त्या निघाल्या आहेत व ते पुस्तक अजून खपते आहे! नंतर फ्रान्स, इटली, जर्मनी, डेन्मार्क व इजिप्तमध्येही त्या त्या देशांच्या भाषांत सूर्यनमस्कारांचा प्रचार झपाट्याने झाला.

१९२० ते १९४८ पर्यंत औंध संस्थानच्या प्रत्येक शाळेत अभ्यास सुरू होण्यापूर्वी सर्व मुले मोठ्याने मंत्र म्हणून रोज पंचवीस नमस्कार प्राणायामासकट घालत. औंधच्या यमाईच्या देवळात हिंदू, ख्रिश्चन, ज्यू, मुसलमान, हरिजन सर्वच्या सर्व आनंदाने हा व्यायाम नित्य करत.

या राजाला व्यायाम व विशेषतः सूर्यनमस्काराचा ध्यास आहे, असे सर्वांना माहीत होते. राजाची मर्जी संपादन करायला सूर्यनमस्कार, सात्त्विक आहार, स्वदेशी वगैरे उपयोगी पडतो हे त्यांना माहीत होते. रोज सूर्यनमस्कार घालतो, फार उपयोग झाला, हे राजाला सांगून बढती, बदली वगैरे करून घेण्याची लोकांची धडपड असे!

एक तर मास्तर असे होते की, ज्या वेळी राजाची गाडी पहाटे ६ वाजता डोंगराकडे जाई त्या वेळी त्याच रस्त्याला लागून असलेल्या छात्रालयाच्या त्याच्या खोलीतच अंथरुणावर पडल्या पडल्या ते मोठ्याने ओम हाम् मित्राय नमः वगैरे सूर्यमंत्र म्हणावयाचे. मुलांनी एकदा त्यांचे दार एकदम हा प्रकार चालू असता खडखडवले. तेव्हापासून ही फसवणूक बंद झाली.

व्यायामाबरोबर स्वच्छ हवा व सात्त्विक माफक आहारावर राजाचा कटाक्ष असे. शाळेशाळेतून स्वतः जाऊन राजा मुलांना काय खावे, किती खावे, कसे खावे, केव्हा खावे याविषयी व्याख्याने देत असे. गरीब मुलांना दूध-ताक-दही मिळत नाही, तर त्यांनी आपली स्वतःची मूठ भरून हरभरे रात्रभर भिजवून रोज सकाळी स्वच्छ धुऊन गुळाबरोबर खावेत म्हणजे शेरभर दूध पिण्याइतके सत्त्व त्यात मिळते, असे तो सांगे. सोपा, सहज, सात्त्विक आहार व नियमबद्ध आणि वक्तशीर वागणे हीच आनंदाची व निरोगीपणाची गुरुकिल्ली आहे असे तो सारखे बजावी.

त्या काळी फळे म्हणजे मोसमात रायवळ आंबे, पेरू व बोरे, केळीही कोठे कोठे मिळत. तीच खावीत व शक्य तितके कच्चे अन्न खावे असे तो सांगे.

पेरू, बोरे या राजाला फार आवडत. औंध संस्थानातील काही खेडी (४०) माण प्रदेशात होती. आटपाटी हे तेथील मुख्य गाव. पेरू, बोरे, डाळिंबे, केळी यांच्या अनेक बागा तिथे होत्या. मारुती व्यंकू म्हणून एका शेतकऱ्याचा राजावर फार लोभ होता. दिवाळीनंतर राजा संस्थानच्या दौऱ्यावर निघाला म्हणजे आटपाडी, दिघंची, करभणी, भिव घाट या सर्व ठिकाणी मिळून एक महिना तरी मुक्काम असे. मुक्कामात रोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ लोकांची भेटीसाठी घरी रीघ लागलेली असे. कोणाला मज्ञाव नसेच.

आटपाडीला गेल्याबरोबर बन्याबापू देशपांडे, विश्वनाथ दर्शने, रस्तुमराव देशमुख वगैरे लोक भेटीला रोज यावयाचेच, त्यांच्यात मारुती व्यंकूही असे. ताटात बोरे, पेरू, डाळिंबे घेऊन यायचा राजाने मग स्वतःजवळच्या चाकूने पेरू, डाळिंबे कापून सर्व लोकांच्या बरोबर अत्यंत प्रेमाने व आवडीने ती चाखायची.

आप्पा, आक्का, भैया ही मुले बरोबर असायचीच. त्यांची चंगळ असे. मग मारुती व्यंकूने किंवा रामभाऊ माळी यांनीं "महाराज मळ्यातच या, कणसेही आहेत. हुरडा, आहे." असे विनवावयाचे.

एकदा मारुती व्यंकूच्या मळ्यात बोरांच्या झाडाखाली बोरे, पेरू खात राजा बसला होता, (१९३८ डिसेंबर) इतक्यात राजाचा दुसरा मुलगा नेहमीच्याच घाई-गडबडीत अचानक आला व म्हणाला, "महात्मा गांधीनी आपल्याला भेटायला वर्ध्याला बोलावले आहे, ताबडतोब."

राजा म्हणाला, "असं होय, चला तर मग." राजा निश्चयी, पण निकाल नेहमी झटपट!

खरे म्हणजे राजानेच आपल्या या दुसऱ्या मुलाला महात्मा गांधींचा सल्ला विचारण्यासाठी पंडित सातवळेकर व श्री. भारतानंद (मॉरिस फ्रीडमन) यांना बरोबर घेऊन पाठवले होते.

आपल्या ७३ व्या वाढदिवसाला राजाने भर दरबारात घोषणा केली होती की, "सर्व संस्थानचा कारभार आता लोकांनीच पूर्णपणे चालवावयाचा. राजा लोकांचा आद्य सेवक व त्यांच्या सद्विवेक बुद्धीचा विश्वस्त म्हणूनच फक्त यापुढे राहणार." या घोषणेचे स्वागत करावे की ती एक राजाची लहर आहे म्हणून समजावे यासंबंधी लोकांनी त्या वेळी काहीच कौल दिला नव्हता.

या ७३ व्या वाढदिवसादिवशी केलेल्या घोषणेपाठीमागे राजाचा निश्चय तर होताच, पण त्याची नेहमीच ही इच्छा असायची की आपले औंध संस्थान सर्वांच्या पुढे नेहमी असावे. माझे संस्थान व मी संस्थानचा ही त्याची मनोभूमिका.

लोकांनी चांगले म्हणावे, ही नैसर्गिक भावना, राजाच्या मनात सर्वांप्रमाणे नेहमी असायचीच. पण झपाट्याने बदलत्या काळात सर्वांच्यापुढे कसे राहायचे, काय करायचे, हा प्रश्नच होता. या मूलभूत प्रश्नांचा तो सदैव विचार करी.

राजाने सुज्ञपणाने काळाची झेप ओळखून १९१७ सालीच रयत सभा नेमली. स्वतः या रयत सभेचा अध्यक्ष म्हणून बसू लागला. नंतर १९२२ साली आपला पहिला मुलगा, त्रिंबकपंत ऊर्फ राजेसाहेब याला कौन्सिलचा अध्यक्ष केला. कौन्सिलचे सर्व सदस्य ग्राम पंचायतीचे सदस्य असत.

या कौन्सिलपुढे सर्व संस्थानच्या सर्व जमाखर्चाचे हिशोब तो ठेवू लागला. हळूहळू लोकप्रतिनिधींच्या मनावरील सरंजामशाही दडपण कमी होऊन ते बजेट व इतर कायदे आणि राज्यकारभारासंबंधी स्पष्ट बोलू लागले, भांडू लागले. राजाला आनंद झाला.

दुर्दैवाने अत्यंत बुद्धिमान, चाणाक्ष व कर्तव्यदक्ष राजेसाहेब १९२३ साली वयाच्या ३६ व्या वर्षीच तीन मुलांना, आक्का, बापू व मैना यांना सोडून देवाघरी गेले. म्हाताऱ्या राजाचा मुख्य आधारच कोसळला!

पहिल्या कुटुंबावर म्हणजे राजेसाहेबांच्या मातोश्रींवर राजाचे खरेखुरे पूर्ण प्रेम होते. ती निवर्तल्यावर दुसऱ्या मुलाच्या आईशी १९०९ साली राजाने लग्न केले व त्याला औंध संस्थानचे राज्यपद एका वर्षाच्या आत मिळाले! एकदा आप्पाची आई यासंबंधाने काही पुटपुटली. राजा खूपच रागावला. लहानच होती १८-१९

वर्षांची. अगदी काळी-सावळी, (शालजोडीवर ठिगळ असे काही म्हणत) पण ती अत्यंत रुबाबदार व सुसंस्कृत होती. सर्व लोकांना आपलेसे करणे व आपली छाप त्यांच्यावर ताबडतोब बसविणे हे तिला सहजच होते. पण तीही आप्पा अडीच वर्षांचा असताना देवाघरी गेली ! हे सर्व धक्के बसत असतानासुद्धा राजाने आपले चिमुकले संस्थान सर्वांच्या पुढे ठेवण्याचे आपले व्रत सोडले नाही. राजेसाहेब दिवंगत झाल्यावर एक वर्षाचे आत स्वतःला सावरून त्याने औंधच्या लोकांना स्वतःच स्वतःचे कल्याण स्वतःच्या जबाबदारीने व कर्तव्यदक्ष राहून करण्याचे धडे देण्याचे काम पुढे चालू ठेवले.

१९२५ मध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी कौन्सिलमध्ये बसू लागले. १९२७ साली कौन्सिलमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी बहुसंख्य झाले व १९३० साली लोकनियुक्त मंत्री म्हणून प्रथम श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर औंधचे काम पाहू लागले!

चांगल्या व शहाण्या लोकांचा सल्ला घ्यावा, कर्तबगार, धडाडीने काम करणाऱ्यांकडून मदत घ्यावी, असे राजाला नेहमी वाटे. इतकेच नव्हे तर आपल्यावर टीका करणारालाही तो जवळ करी व आमचे कोठे चुकते सांगा, मला सुधारून सर्वांचे कल्याणच करावयाचे आहे, असे तो नेहमी म्हणे. याचाच परिणाम चिमुकल्या औंध संस्थानात श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, पंडित सातवळेकर, श्री. नानासाहेब चापेकर, आत्माराम ओगले, श्री. आण्णासाहेब जोशी अशी कर्तबगार व बुद्धिमान माणसे संस्थान सुधारणेच्या खटाटोपाला राजाला मदत करू लागली.

दैनिक ज्ञानप्रकाशचे त्या वेळचे संपादक व सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या आद्य संस्थापकांपैकी एक श्री. अनंत विनायक तथा वामनराव पटवर्धन औंध व राजा भवानरावांबद्दल चिकित्सा-टीकेचा नेहमी भडिमार करत. त्यांना प्रत्यक्ष भेटून मोठ्या आदराने राजाने औंध कौन्सिलवर राजनियुक्त म्हणून नेमले. दर कौन्सिलच्या बैठकीत श्री. वामनराव पटवर्धन बोलावयाला उठले की, संस्थानच्या सर्व अधिकारीवर्गाला घामच सुटे. राजा चिटाच्या पडद्याआडून सर्व ऐकावयाचा व श्री. पटवर्धनांच्या भरघोस टीकेला टाळ्याही वाजवायचा!! कौन्सिलच्या अध्यक्षपदी जवळजवळ दहा वर्षे श्री. जगन्नाथ महाराज पंडित होते. कौन्सिलचा अध्यक्ष कौन्सिल निवडे. जगन्नाथ महाराज पंडित जरी राजनियुक्त होते तरी राजकारणपटुत्व व अत्यंत मनमिळावू स्वभाव यामुळे लोकप्रिय होते. शिवाय ते इंग्रज सरकारचे लाडकेही होते! दिल्लीच्या केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य होते. त्यांच्या अध्यक्षपदाचा छोट्या औंध कौन्सिलला फार उपयोग झालाच, पण राजाच्या मनातील हेतू की इंग्रजांच्या दरबारी आपली सरळ स्वच्छ बाजू जशीच्या तशी मांडली जावी तोही सफल होत गेला.

१९४२ ते १९४७ या वर्षांत, स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात इंग्रज शासकांच्या मनात औंधबद्दल वेगळ्या कल्पना भरवण्याचा प्रयत्न अनेक हितशत्रूंनी केला. श्री. जगन्नाथ महाराजांनी त्यांच्या खास पद्धतीने औंधच्या राज्यव्यवस्थेसंबंधी दिल्लीला अनेकदा खरी बाजू मांडण्यास मदत केली.

खरे म्हणजे राज्यकारभार हाती घेतल्यापासून (१९०९) राजा भवानरावांचे लक्ष, संस्थानची खेडी स्वावलंबी कशी करता येतील, इकडे लागले होते. सत्तेचे विकेंद्रीकरण पहिल्यापासून त्यांच्या ध्यानीमनी होते की नाही यासंबंधी शंका असू शकते. मी राजा, मी लोकांचे पालनपोषण करणारा, राजधर्माप्रमाणे सर्वांना सारखे लेखणारा मीच, अशा भावनेनेच हा राजा आधुनिक लोकशाहीच्या युगात पदार्पण करत होता. १९३८ सालीही सर्व सत्तामत्ता लोकांच्या हाती दिल्यावरही "ही माझी लेकरे मीच वाढवलेली आहेत. आता उत्तम

अनुक्रमणिका

चालायला शिकली आहेत. त्यांना पुन्हा मांडीवर बसवून घेण्याची जरुरी नाही" हाच विचार राजाच्या मनात होता. अधिकाराचा गर्व किंवा सत्तालोलुपता या राजाच्या मनात डोकावत नसाव्यात असे म्हणता येईल. पण लोकांच्या कल्याणाचा मार्ग मी माझ्या लोकांना दाखवू शकतो व माझ्या स्वतःच्या स्वधर्मपालनाने तो त्यांना शिकवू शकतो हा थोडा सात्त्विक का होईना अहंकार राजापाशी होताच, पण हा स्वधर्मपालनाचा, सर्वांच्या कल्याणाचा मार्ग दाखवत असताना इतर सर्व तऱ्हेच्या शहाण्या-सुर्त्यांकडून या कार्यात मदत घेण्याची भावनाही त्याच्या मनात सतत असे.

म्हणूनच दरवर्षी दोन वेळा, एकदा अनंत चतुर्दशीला आपल्या वडिलांच्या - श्री. राजर्षी श्रीनिवास महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी व नंतर श्रीशिव-जयंतीला एक पूर्ण आठवडा हिंदुस्थानातील नामवंत विचारवंतांना व पराक्रमी व्यक्तींना बोलावून त्यांचे विचार ऐकवी व नंतर विचारविनिमय जाहीर सभेत तो घडवून आणी. १९१७ ते १९४७ पर्यंत हा ज्ञान-सोहळा दरवर्षी दोन वेळा औंधच्या प्रजाजनांना ऐकावयास व अनुभवण्यास मिळे. अर्थात सर्व शालेय मुलांना ही पुष्कळदा न कळणारी कंटाळवाणी भाषणे व चर्चा सक्तीने ऐकावी लागे. नकळत प्रगल्भ संस्कार होत जात. पुढे पन्नास वर्षांनी या संस्कारांचे महत्त्व कळू शकले.

या दोन मेळाव्यांच्या शेवटच्या दिवशी राजा स्वतः कीर्तन करी. लोक म्हणत राजा झाला नसता तर कीर्तने करूनही पोट भरू शकला असता! राजाचे प्रत्येक कीर्तन स्वतःच लिहिलेले असे. पहिले कीर्तन श्रीनिवासराव महाराजांच्या पुढे वयाच्या १५-१६ व्या वर्षी केले. त्यांच्याच सांगण्यावरून. तरुणपणी वडील बंधू श्री. तात्यासाहेब यांच्याबरोबर बसून तासन्‌तास, गाणे-बजावणे-भजने करीत असे. आवाज-ताल-सूर-उत्तम साधे. तमाशातल्या लावण्याही उत्तम म्हणे.

म्हणूनच एकदा वडील म्हणाले, "अरे कीर्तन का करीत नाहीस? मूळ पुरुष परशुराम त्रिंबकांनी आपल्या कीर्तनाने जयरामस्वामींची समाधी डोलवली. तू आम्हाला तरी डोलव."

श्री. भवानरावांनी पहिले कीर्तन त्र्यंबकपंत कुलकर्णी यांच्यावरतीच स्वतः रचले. त्र्यंबकपंतांचे चिरंजीव, परशुराम त्र्यंबक यांच्या काही आर्या, पदे घालून, काही स्वतःही रचून त्र्यंबकपंतांची औंधच्या अंबाबाईच्या भक्तीची गोष्ट उत्तम रंगवली. औंधची अंबाबाई किन्हईला कशी त्यांनी नेली याचे रसभरित वर्णन पहिल्या कीर्तनात केले. वडलांनी शाबासकी दिली व दरवर्षी एकतरी कीर्तन कर, असे फर्मावले. श्रीनिवास महाराज निर्वतल्यानंतरही स्वतः कीर्तनरचनेचा व दरवर्षी एकदा तरी कीर्तन करण्याचा नाद भवानरावांनी चालूच ठेवला. अनंत चतुर्दशीला दरसाल नवीन कीर्तन होऊ लागले. खूपच पाहुणे येत. खेडोपाडीच्या लोकांना कीर्तन करणाऱ्या राजाचे कौतुक वाटे. हिंदुस्थानातील बुद्धिवान शहाणे, अभ्यासू लोक जमत, वाहवा करीत. पुढे १९२७ नंतर श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या वाढदिवशीही कीर्तन करण्यास राजाने सुरुवात केली. श्री. भवानरावांची कीर्तने एकंदर साठ-सत्तर झाली. विषय सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक असत. सहकार, कर्तव्यनिष्ठा, स्वार्थत्याग, लोकसेवा, अस्पृश्योद्धार या विषयांवरच कीर्तने असत.

राजा बहुश्रुत होताच, गाणे उत्तम म्हणे. आवाज गोड होता. लहानपणापासून गाणेबजावण्याचा नाद. तमाशेशुद्धा केले होते! जीवनाची सर्व अंगे जाणली पाहिजेत, अनुभवली पाहिजेत, असे तो नेहमी म्हणे. स्वतःच्या उदाहरणाने तो दाखवून देई की, जीवन जगण्याकरता आहे, उपभोगाकरता आहे, पण जीवन व

उपभोग सुसंस्कृत हवेत. हव्यास, अप्पलपोटेपणा, अजीर्ण उपयोगी नाही. संयमाने, सर्वांना बरोबर घेऊनच उपभोग हवा. एकट्याला तो पचत नाही.

गाणे-बजावणे, चित्रकला, मूर्तिकला, नाच, घोडे-हत्ती-उंटावर बसणे, मोटार-विमान चालविणे ही सर्व उत्तम केली पाहिजेत, असा त्याचा अट्टाहास. मुले खेळावयास लागली तर राजा स्वतः जाऊन खुर्ची मांडून बसावयाचा व उत्तमतेलाच शाबासकी द्यावयाचा. धरसोडवृत्ती त्याला मुळीच पसंत नसे. सतत केल्याने, अभ्यासानेच उत्तम करता येते असे तो म्हणे.

औंधच्या ४-५ व्या इयत्तेतील मुलांची क्रिकेट मॅच ती काय असणार, पण, “बाबा, आज आमची महत्त्वाची मॅच आहे. याल का?” असे विचारायचा अवकाश की फरासाला ताबडतोब हुकूम. “जा, आप्पाची मॅच आहे. तंबू घेऊन जा, आम्ही ४ वाजता जाऊ.”

पण हा दुसरा मुलगा मोठा धडपड्या. मात्र काही कधी सरळ नीट करायचे नाही.

लक्ष्मण पाठक, विमानतज्ज्ञ कबाली, आबा ओगले यांच्या नादी लागून सर्व आशिया-आफ्रिका खंडातला पहिला ग्लायडिंग क्लब औंधमध्ये काढायचे ठरवले. (१९३०)

सर्वांत प्रथम “पुढाऱ्या” लक्ष्मण (यकूनंतर लखू) पाठक. राजाच्या भाचीचा, श्रीमती सखूताई पाठक यांचा दुसरा मुलगा. अपपापेक्षा नऊ वर्षांनी वडील. अत्यंत हुशार, उनाड, अभ्यासात कच्चा, म्हणजे जवळजवळ शून्यच (मॅट्रिकला तीन वर्षे नापास होत होता गडी) पण खेळणे, नकला करणे, लोकांना सारखे हसविणे यामुळे सर्वांचा त्या वेळी तो पुढारी असे.

चांगले वाचावे, थोर पराक्रमी पुरुषांची चरित्रे वाचावी, त्यांचे अनुकरण करावे ही लखूची धडपड. आप्पाला यकूशिवाय जेवण जात नसे. यकूने गोष्ट सांगितली तरच घास गिळायचा, नाहीतर तोंड बंद! वयाच्या तीन वर्षांपासून यकू म्हणजे उत्साहाचे गंमतीचे माणूस म्हणून सारखे त्याच्याच मागे मागे असावयाचे.

लखूनेच मौंट एव्हरेस्टच्या गोष्टी सांगाव्यात. फ्रान्सिस यंग हजबंडची धाडसी कृत्ये. तसेच रोनाल्ड आमुंडसन उत्तर ध्रुवाला चालत गेला व दक्षिण ध्रुवाला सर्वांत प्रथम पोचला, याची रसभरीत वर्णने करावीत.

ॲडमिरल बर्ड, लिंडबर्ग यांची चरित्रे वाचवून घ्यावी.

अर्थात या ग्लायडिंगच्या बंडात तोच पुढारी. त्यानेच कबालीची ओळख करून घेतली. नंतर मग पंडित (महाराज) पोपट, बाबू, इनामदार (तात्या) वगैरे त्यात सामील झाले.

जर्मनीतून स्पेशल हलके पण मजबूत स्प्रूस लाकूड आणले. तिकडचाच डिंक आणला. ग्लायडर बांधावयाकरता तज्ज्ञांनी केलेले नकाशे आणले. अमेरिकेतूनही सर्व सामान आणले.

अनुक्रमणिका

या सर्वाला पंधराशे रुपये खर्च येणार होता. पैसे कोणापाशी होते? मुलगा राजाकडे गेला. संस्थानात त्या वर्षी दुष्काळ पडला होता. जमीन सारा येणार नव्हता.

“बाबा, आम्ही ग्लायडर करणार आहोत. माल मागवला आहे. पंधराशे रुपये पाहिजेत!”

राजा जरा गरम झाला. आप्पाला केव्हा काय विचारावे याचा तोलच नव्हता. पण लहानपणापासून राजा, त्याचे आई व बाप दोन्ही होता. प्रेम तर होतेच, पण कौतुकही होते.

विमानतज्ज्ञ कबालीशी राजा बोलला. लक्ष्मण पाठक होताच तरफदारी करावयाला. राजा म्हणाला, “माझी काळी पेटी जामदाराला आणायला सांग, देऊ पैसे” (या काळ्या पेटीत राजा स्वतःचे किन्हई कारगणीचे खाजगी उत्पन्नाची रक्कम ठेवीत असे) ग्लायडरचे लाकूड, पंख्याला लावण्याचे टणक कापड, तारा व ते उडविण्यासाठी रबरी चार इंच जाडी दोरखंड. प्रचंडच सामान होते. दोन ट्रकमध्ये घालून लक्ष्मण पाठक, पंडित महाराज, पोपट यांनी (लक्ष्मणचा धाकटा भाऊ) ते सर्व सामान औंधात आणून एका मोठ्या खोलीत ठेवले.

नकाशे काढून ग्लायडर बनवण्यास सुरुवात झाली. लक्ष्मण पाठक इंजिनियरिंग कॉलेजमध्ये शिकत होता. त्या मुलातील खराखुरा इंजिनियर आबा ओगलेच. सुतारकाम, लोहारकाम, कापड कापणे सर्वांवर आबांचीच सुपरव्हिजन.

राजाला ६ मुली होत्या पण सर्वांची अध्वर्यू नात आक्का. हस्तकाम अत्यंत सुरेख व सत्त्वर. काम झटपट व बुद्धी वापरून करावयाचे.

हां हां म्हणता पंख तयार झाले. मूळ ग्लायडरला ते जोडलेही. आक्का, वासंती, सर्वांना बरोबर घेऊन रात्रंदिवस झटली. जर्मनी-अमेरिकेमध्ये होणार नाही असे उत्तम शिवण केले.

दोन ग्लायडर पूर्ण झाल्यावर लक्षात आले की ही अवाढव्य अवजारे दारे किंवा खिडकीतून बाहेर जाणार नाहीत!!

झाले, पुन्हा, “बाबा, आम्ही वाड्याची एक भिंत पाडू? ग्लायडर बाहेर काढल्यावर गवंड्यांकडून ताबडतोब दुरुस्त करता येतील.”

मुलांची हौस, त्यांचा हिरमोड कधी म्हणजे कधी करावयाचा नाही. प्रोत्साहनच देणेचे.

राजा म्हणाला, “खुश्शाल पाडा. लवकर आमची भिंत बांधून घ्या.”

सर्व आशियामध्ये सर्वात पहिले ग्लायडर पायलट श्री. बाळा महाराज पंडित. हे राजाचे भाचेच. कोल्हापूरचे. राजाच्या मोठ्या मुलाबरोबरीचे. त्यांच्या नंतर कबालीनी ग्लायडिंग केले. नंतर एफ. एच. इराणी यांनी केले.

अनुक्रमणिका

आप्पाची वेळ आली त्या वेळी या रबरी दोरखंडांना त्याने चार माणसांच्या ऐवजी सहा माणसं लावली म्हणजे आचरटपणाच झाला. पण आप्पाच्या स्वभावच तसा होता त्याला तो तरी काय करणार? दुसरे लोक हसतात याचे भान कोणाला होते?

१९३० साली ग्लायडर उडवायला वुईंच लाँच नव्हते. या चार इंच जाड व दोनशे फूट लांबीच्या दोरांचा उपयोग गलूलीने जसा रबरी पट्ट्यांचा केला जातो तसा केला जाई. या दोनशे फूट लांबीचे दोरखंडाला बरोबर मध्ये, शंभर फुटावर, एक कडी लावावयाची. ती कडी ग्लायडरचे पुढचे बाजूस. दुसरी कडी असे त्यात अलग अडकवावयाची. मग ग्लायडरच्या शेपटीच्या बाजूला दोन माणसांनी ग्लायडर घट्ट पकडून ठेवावयाचे. दोन माणसे एका बाजूला व दोन माणसे दुसऱ्या बाजूला असे तो दोर मग ओढावयास लागतात. दोन्ही बाजूंनी दोर अगदी सारखा ओढला गेला पाहिजे.

दोर भरपूर ताणला गेला असे पायलटला वाटले की तो हाताने मागील शेपूट पकडून ठेवलेल्या माणसाला-सोडा-असे सांगतो.

त्यासरशी गलूलीतून जसा धोंडा जातो तसे ग्लायडर भरकन सरकत जाऊन वेग घेते. २० मैलाचा ताशी वेग आला की ग्लायडर हवेत उडते व रबरी दोर कडीतून निसटून खाली जमिनीवर पडतो. एकेका बाजूला दोन-दोन माणसांनी ओढावयाच्याऐवजी आप्पांनी तीन तीन माणसे लावली, व दोर ताणत ताणत गेला तरी लवकर सोडा, म्हणालाच नाही. भयंकर ताण बसला गेला. झाले, ग्लायडर सोसाट्याने एकदम आप्पासकट १०० फूट उंचावर गेले, पण त्या रबरी दोरखंडाचे जादा ताणामुळे ग्लायडरचे शेपूटच तुटले, ग्लायडर मोडून दगडासारखे खाली कोसळले.

झाले, स्वारी खाली आली. - राजे - राजपुत्रांना पडले म्हणावयाचे नसते. लोकांना वाटले मेला बिचारा, पण सुटला. नुसता डावा पायच मोडला. खूपच दुखला. रडू येत होते पण वर दाखविले नाही त्याने. लोक म्हणतील रडव्या, त्याचे दुःख जास्त होते, शूर व्हावयाचे होते ना!!

संस्थानचे चीफ मेडिकल ऑफिसर डॉक्टर भाऊसाहेब ठकार - त्या संस्थानी दवाखान्यात क्ष-किरण वगैरेची भानगड नव्हती, पाय जोराने ओढला आणि खुट्ट आवाज झाल्यावर तेथीलच दोन फळ्या घेऊन बांधून टाकला. झाले ऑपरेशन...

पण आप्पा पडला, पाय मोडला हे आता राजाला सांगणार कोण? राजा खरा प्रेमळ, नेहमी आनंदी, शांत, पण रागावला म्हणजे अगदी जमदग्नी... कोणीच राजाला सांगायला जाईना. सर्व त्याच्या रागाला घाबरत.

शेवटी पंडित सातवळेकरांना निरोप पाठवला. वेळ संध्याकाळची. या वेळी राजाला भेटण्यास कोणी जात नसे, पण पंडितजींना मान राज-दरबारी मोठा. दरबारात राजा उठून, त्यांचे स्वागत करी (त्यांना समारंभाला येणास उशीर झाला तर - खरे म्हणजे दंडक असे की सर्वांनी राजाच्या आधी कचेरी-कीर्तनाला-सभेस हजर झाले पाहिजे)

संध्याकाळी पंडितजी कधीच राजवाड्यात जात नसत. पण काय करणार? उपद्व्यापी आप्पाकरता राजाला जाऊन भेटले.

अनुक्रमणिका

राजाने विचारले, “का आला?” पंडितजी आपल्या भव्य, शांत मुद्रेने राजास समजावू लागले, “त्याचे असे महाराज की, मुले खेळतात, केव्हा केव्हा पडतात, लागतेही.” राजा एकदम जरा गरम होऊन म्हणाला, “काय म्हणता आहात काय पंडितजी?” पंडितजींनी सर्व वृत्तांत देण्यास सुरुवात केली. त्यांना एकदम थांबवून राजा म्हणाला, “अहो पंडितजी जो चढेल तोच पडेल. जमिनीवर सरपटणारे पडत नाहीत.”

झाले, ताबडतोब आप्पाकडे जाऊन राजा म्हणाला, “हं, आता लवकर बरा हो. ग्लायडरवर पुन्हा जा, भ्यायचे नाही. रडला नाहीस ना”? “जयजगदंबे” असे म्हणून राजा निघून गेला.

असे सर्वांना नेहमी प्रोत्साहनच द्यायचा हा राजा. त्यांच्याकडून कामे करवून घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावयाचा. सर्वांच्यातील चांगले तेवढेच पुढे आणून वाईट, घाण, कमीपणाचे असेल ते हळूहळू कमी करण्याची खटपट त्यांच्याकडूनच करावयाचा.

फिरतीवर राजा गेला की शाळेच्या मुलांच्या नकला, नाटके ठरलेली असत. एकदा आटपाडीला राजा गेला असताना कोणा एका विद्यार्थ्याने नाटकात उत्तम काम केले व नकला तर अशा केल्या की, राजा कधीही खदाखदा (असंस्कृत) हसावयाचा नाही, पण त्या रात्री तो मनापासून हसला व मुलाला बोलावून पाठ थोपटून बक्षीस दिले व विचारले - कोणत्या इयत्तेत आहेस? - मास्तरनी सांगितले - गजानन माडगूळकर ( ग. दि. मा.) अभ्यास करीत नाही. सारखी टवाळी करतो, गावात भटकतो, महाराजांनीच त्याला काही सांगावे, तसा हुशार आहे.

राजा म्हणाला, “गजानन, तू या मास्तरांचे नादी लागू नकोस. तुला अभ्यास जमायचा नाही, सिनेमात जा, जगदंबा तुझे कल्याण करील....”

तसेच एकदा कुंडलची शाळा तपासायला राजा गेला. एक उत्तम गाणारा, गोजिरवाणा, निकमांचा मुलगा राजाच्या नजरेत आला. पोवाडा उत्तम म्हणावयाचा, नकलाही करावयाचा. पण महावात्रट व सर्वांनी नेहमी चेष्टा-कुचेष्टा करणारा.

क्लासमधून पुढे राजा जातो न जातो तो मोठा हशा त्या क्लासमधून ऐकू आला. राजा थांबला, त्याचीच हुबेहूब नक्कल निकम करीत होता... राजा परत क्लासात गेला आणि या मुलाच्या पाठीवर हात ठेवून म्हणाला, “अरे बाळ, जगदंबेने तुला उत्तम आवाज दिला आहे गाणेही छान म्हणतोस. या दैवी देणगीचा उपयोग लोकसेवा, लोकजागृती, पतितोद्धाराकरिता कर. तुझे कल्याण होईल. उगीच टवाळकी करणे सोडून दे...”

हाच पुढे १० वर्षांनी शाहीर निकम झाला. ज्याने १९४२ मध्ये लोकजागृतीचे रान उठवले व हजारो लोक त्याचे गीत ऐकून तल्लीन होत असत. तामस वृत्तीतून (आळस, अज्ञान, निद्रा, निंदा) राजसाकडे (पराक्रम, शौर्य, उपभोग), व राजसातून सत्त्वाकडे (करुणा, सहकार, सर्वोदय) राजा सर्वांना नेण्याची खटपट करी. स्वतःतील तामस व राजसही हळूहळू त्याने खूपच कमी केले होते.

श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर (लकाकी, लखूमामा) १९१० साली औंध संस्थानात कुंडलपासून तीन मैलावर असलेल्या उजाड माळरानात कारखाना काढण्यासाठी आले. श्री. नागूदाद व आत्मारामपंत ओगले औंध

संस्थानातले. त्यानंतर १९१६ साली ओगलेवाडी इथे (कराड नजीक) स्थायिक झाले. सर्व ओगले बंधू अत्यंत निष्ठेने, तन्मयतेने, काम करीत पण त्यांच्यापैकी चवथा भाऊ व्यंकटेश (व्यंकट, व्यंकू काका) याला काही मार्ग सापडत नव्हता.

केव्हा नाटकात कामे करावीत, केव्हा चित्रे काढावीत, केव्हा श्री. बाबूराव पेन्टर, श्री. भालजी पेंढारकर यांच्याबरोबर कोल्हापुरात सिनेसृष्टीत वावरावे असे त्याचे झाले.

व्यंकूच्या ह्या चाळ्यामुळे नागूदाद व आत्मारामपंतांना फार वाईट वाटे.

एकदा भवानराव ओगलेवाडीला वार्षिक भेटीकरता गेले होते. सर्व ओगले बंधूंनी इस्त्रीच्या सफेद पँट व कडक धुतलेले शर्ट घालून राजाचे स्वागत केले. गप्पा-गोष्टी होता होता राजाने व्यंकोबाकडे पाहिले व काय ते तो समजला, व म्हणाला, “अहो व्यंकोबा” (राजा, त्याला प्रेमाने नेहमी व्यंकोबा म्हणे.) तू चित्रे चांगली काढतोस. आम्ही अजंठाला तेथील फ्रेस्कोंची नकला करण्याकरता महाराष्ट्र - गुजरात - बंगालमधील पंचवीस चित्रकारांना निमंत्रण दिले आहे. एक महिन्याचा तिथे मुक्काम आहे, तुम्हीही आमच्याबरोबर चला, चित्रे काढा. आम्ही विकत घेऊ -”

त्या दिवसापासून व्यंकटरावांच्या आयुष्याला वेगळेच वळण लागले.

शाळा-कॉलेजांच्या शिक्षणापलीकडे खऱ्या जीवनाचे शिक्षण घ्यायचे आहे हे हा राजा सर्वांना समजावून सांगे. यंत्र-शास्त्राचे युग येते आहे, या युगाकरता तयार व्हा, असे तो म्हणे.

१९२५ सालापासून फक्त औंध संस्थानात तयार झालेलाच कपडा वापरावयाचा असा राजाने निश्चय केला. म्हैसूरहून रेशीम आणून औंध संस्थानातील हातमागावर ते विणून घ्यावयाचा. सर्व राजपुत्र व राजकन्यांना कुंडलमधील श्री. खारगे यांच्या हातमागावरील जाडेभरडे कापड विजारींना व परकर-पोलक्यांना दिले जाई. समारंभात सुद्धा फक्त औंधातीलच कापडाचे बनवलेले पोशाख. दुसऱ्या इतर राजे, राजपुत्र राज-कन्यांच्या पुढे त्या सर्वांचा काय अवतार दिसत असेल तो त्यांनाच माहीत! औंधचे राजपुत्र-राजकन्या मात्र राजाच्या स्वराज्य स्वावलंबनाचे स्वप्नातच गुंग. गम्मतच होती !!!

पुढे १९३१-३२ साली तर राजाने शेतसारा सुतात व लोकरीत घेतला जाईल, अशी घोषणा केली. काहींनी सूत कातून सारा दिलाही. राजाची अर्थशास्त्राची एक चतुःसूत्री होती.

- पक्का द्यावा, कच्चा घ्यावा. पक्का घेऊ नये, कच्चा देऊ नये हे व्रत राजाने १९५१ पर्यंत म्हणजे शेवटपर्यंत चालवले. याच धोरणाने संस्थानात उद्योगधंद्यांना मदत-प्रोत्साहन त्याने दिले. श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर तर राजाचे जिवलग दोस्तच होते. जवळ जवळ समवयस्क.

श्री. लक्ष्मणराव मुंबईला व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये ड्रॉईंग मास्तर होते. तेव्हापासून राजाची व त्यांची मैत्री जमली. नुसते समवयस्कच नाही, पण विचारधाराही दोघांची जवळ जवळ सारखी. यंत्रशास्त्र युगातील-ज्ञान-निपुणता मिळविल्याखेरीज सुराज्य होऊ शकणार नाही हाच दोघांचा दृष्टिकोण.

अनुक्रमणिका

१८९५-९६ साली किर्लोस्कर बंधू, रामोआण्णा, लक्ष्मणराव व वासुदेवराव यांनी भवानराव यांच्या वडलांचे श्रीनिवासराव महाराजांचे चीफ सेक्रेटरी असताना, औंधच्या यमाई मंदिराचे मोठा मंडप बांधण्याचे कॉंट्रॅक्ट घेतले. त्या वेळी जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी ७५००० रुपये खर्च झाला. काम चोख व उत्तम झालेच पण पुढे किर्लोस्कर उद्योगाचा मोठा वृक्ष होणार होता त्याचे बीजारोपण औंधमध्ये झाले. १९०७ सालानंतर सबंध हिंदुस्थानात राजकीय परिस्थिती बदलू लागली. महाराष्ट्रात रॅंडसाहेबांच्या खुनानंतर तर धरपकड, संशय यांची वावटळ उठू लागली.

किर्लोस्कर बंधू त्या वेळी बेळगावात होते. सायकलचा रिपेअरचा उद्योग होता. तिथेच लक्ष्मणराव नांगराचे फाळ तयार करू लागले. साहेबाला कोणी सांगितले की जिथे फाळ ओतले जाऊ शकतात तिथे बॉंबही होतील. कडक पाळत ठेवावी.

झाले, किर्लोस्करांचे पाठीमागे गुप्तहेर लागले. कोठे जातात, कोणाशी बोलतात, काय बोलतात, केव्हा बोलतात वगैरेची फाईल तयार झाली, ती फाईल वाढतच गेली.

याच काळात भवानराव व त्यांचे दोस्त बाजीराव गुत्तीकर यांना भेटण्यास बेळगावला गेले होते. त्यांच्या बरोबर संस्थानचे दिवाण जेकब बापू होते. खरे म्हणजे जेकब बापू इंग्रज सरकारचा हस्तक, त्यांनीच नेमलेला औंध संस्थानचा दिवाण. पण भवानरावांना माणसे कशी राखावी, त्यांना न दुखवता डोईजड झाली, अवघड झाली तर कसे हळुवार रीतीने काढावे, इंग्रजांनाही संशय येऊ नये, पण आपणही मोकळे व्हावे असे कसे करावे हे चांगलेच अवगत होते.

भवानराव, जेकब बापू, लक्ष्मणराव किर्लोस्कर व बाजीराव गुत्तीकर हे मेसानिक लॉजचे सदस्य. लॉजच्या मीटिंग्ज बेळगावात होत. या मीटिंगला म्हणूनच भवानराव बेळगावला गेले होते.

याच वेळी जेकब बापूंनी भवानरावांना सुचवले की लखुमामांना (मास्तर-त्यांना भवानराव म्हणत) औंधात बोलवा. तिथे आपण जागा देऊ. कारखाना काढतील, इतर त्रास होणार नाही.

झाले, झटपट निश्चय झाला. १९१० साली कुंडलच्या माळावर कारखाना सुरूही झाला व पुढे सर्व जगविख्यात किर्लोस्कर उद्योगांचा वृक्ष फोफावला. राजाचे सुधारणा करण्याचे, पुढे जाण्याचे, सर्वांचे चांगले करण्याचे स्वप्न साकार होऊ लागले.

राजा नेहमी म्हणे हे इंग्रजांनी सुरू केलेले कारकून व कारकुनी वृत्ती तयार करण्याचे शिक्षण अगदी कुचकामाचे आहे. उद्योगधंदा, कला, पैसे कसे मिळवावेत, समाज संपन्न कसा करावा, व्यापार कसा करावा हे शिक्षण हवे. खरा पुरुषार्थ करावयाचा असेल तर हस्तव्यवसाय व यंत्रशास्त्रात निपुणता येण्याचेच शिक्षण दिले गेले पाहिजे.

दर शाळेत दरवर्षी प्रदर्शने व्हावयाची त्या वेळी राजा सर्व मुलामुलींना स्वतः प्रदर्शन पाहिल्यावर बक्षिसे वाटी. केव्हा केव्हा तर सर्व मास्तर लोकांच्या समोर-हे तुमचे शिक्षण पुस्तकातच ठेवा, हाताने काम करावयाला शिकवा, असे व्याख्यानात सांगावयाचा.

अनुक्रमणिका

घरात सर्व मुला-मुलींवर याचा व्हायचा तोच परिणाम झाला. मॅट्रिकला बसेपर्यन्त व धोंडोपंत कुलकर्णी, लेले, पाठक, व पाटणकर खनपटीला बसून अभ्यास करून घेईपर्यन्त आप्पाला दरवर्षी वरील क्लासात प्रमोटेड स्पेशल केस म्हणून, हाच शेरा!! मुलांना राजवाड्यातच एका हॉलमध्ये सर्व सुतारकामाची हत्यारे व दोन फ्रेटवर्क कामाची मशिन्स आणून दिली. या रॉयल टॉय फॅक्टरीचे पोअध्वर्यू पंडित महाराज व पट पाठक-राजाचे दोन नातभाचे. पुढे नामवंत झालेला मूर्तिकार-चित्रकार केशव देशपांडे या सर्व व्यवसायात खरा हस्तव्यवसायी होता. उगीच झपाटल्यासारखे काम करणारा वासू खाडिलकर व कोणत्याही कामात मदत करण्यास तयार बाबू महंमद पटवेकरी. पुढे पंडित पोपट कारखानदार झाले. केशव पुण्याला स्थायिक होऊन मूर्तिकार म्हणून नावाजला गेला. बाबू महंमद पटवेकरी मात्र एक साधू-सिद्ध होऊन परदेशी अनेकदा जाऊन मानवी धर्माचा सच्चा प्रचार करता झाला.

रॉयल टॉय फॅक्टरीच्या साबणाने मात्र औंधचे तलावाचे पाणी पिवळे जर्द झाले... सोडा, सल्फ्युरिक ॲसिड व ग्लिसरीन घालून साबण करण्याची पद्धती सोपी. त्यात पिवळी माती घालून तो रंगीत, आकर्षक करायचा पण घालताना माती तिप्पट घातली गेली ! (आप्पाने)

झाले, गणपतराव परीट वाड्यातील सर्व कपडे तळ्यात रोज स्वच्छ धुवावयाचे. त्यांनाच हा रॉयल टॉय फॅक्टरीचा साबण पोपटांनी दिला. त्यांनीही तो मोठ्या प्रेमाने वापरला. तळे पिवळे जर्द झालेले पाहून पोपट-पंडितांना खरा कारखाना काढण्यास अजून बरेच शिकवावे लागेल हे राजा रागारागाने म्हणाला.

तसेच रॉयल टॉय फॅक्टरीच्या ब्लॉटिंग पेपरची कथा. राजाची रोजची वर्तमानपत्रे वाचून झाली म्हणजे ती वाड्यामागील अंगणात पाणी तापवायच्याच हंड्यात उकळायची. कागदाची खळ विरघळली म्हणजे वाळविल्यावर झाला ब्लॉटिंग कागदच!!

एकदा पोपट-आप्पा मोठा जाळ करून पाणी उकळीत होते. भय्या लहान म्हणून या व्यापात त्याला येऊ द्यावयाचे नाही. दार बंद करून हा कार्यक्रम चालू होता. भैय्या बाहेर, “पोपट-आप्पा आग लावताहेत, मला येऊ देत नाहीत”, म्हणून मोठ्यांदा रडू लागला. (वय ६ वर्षे).

राजा हे रडणे ऐकून वरून खाली आला व बंद दरवाजा खडकावू लागला. आप्पाने दार उघडले, पण पोपट पळून गेले.

पोपटाला वाटले आता मार चुकेल. पण संध्याकाळी अगदी ‘धार्मिक’ भावनेने डोळे मिटून जानव्याला हात लावून गायत्री मंत्र जपत बसलेला. पूजेच्या दिवाणखान्यात बसलेला पोपट राजाने पाहिला. पोपटला वाटले, पवित्र संध्येमध्ये मग्न असताना राजा कसे मारेल?

पण शिक्षा झालीच. संध्येवरचा विश्वास पोपटाचा उडाला!! पण कारखानदार मात्र झाले.

राजाची नात आक्का आप्पापेक्षा तीन वर्षांनी लहान. लहानपणापासून दिसायला सुंदर व निटनेटकी. ड्रॉईंग, शिवण, गाण्यात उत्तम पण बाकी अभ्यास जवळ जवळ शून्यच! हुजरे-स्वैपाकिणीत बिघडणे अगदी सोपे असते, पण राजाने आई-वडील वारल्यावर हस्तव्यवसायाचेच शिक्षण तिला दिले. श्रीमती सोनूताई काळ्यांच्या सारखी विद्वान व उत्तम कंपॅनिअन म्हणून दिली.

१९३३ मध्ये आक्काला तिच्या वडिलांच्या नावाने, त्र्यंबकपंत ऊर्फ राजेसाहेब यांच्या नावाने त्र्यंबककलाभवन म्हणून एक चित्रकला-हस्तव्यवसायाची संस्था काढून दिली. आक्काने ही संस्था उत्तम चालवून शेकडो मुला-मुलींना आपल्या हाताने पोट भरण्यास शिकविले. विलायतेतून शिकून आल्यावर लग्न होईपर्यंत त्र्यंबक कलाभवन तिने महाराष्ट्रात नावाजविले.

पुढेही देशात व परदेशात उत्तम चित्रकला-हस्तकला शिक्षक म्हणून नाव पुढे आणले.

उद्योगधंद्याबरोबर, पैसा मिळवण्याबरोबर, नफा करण्याबरोबर किंवा त्याच्या आधीही माणसाला सुसंस्कृत होण्यसाठी संस्कार केले गेले नाहीत तर तो राक्षस होऊ शकतो व समाजाचा नाश होतो ही भवानरावांची पहिल्यापासून धारणा होती. आधी अधिष्ठान भगवंताचे, असे तो नेहमी म्हणे. भगवंताचे अधिष्ठान म्हणजे मूर्तिपूजा नव्हे. अंधश्रद्धा नाही.

राजा नेहमी बजावून सांगे की, समाज ज्यामुळे समतोल राहून सुधारतो, सर्वांना सुखी करतो, ती कर्तव्य-परायणता म्हणजेच खरा धर्म.

हा खरा धर्म शिकवण्यासाठी, हे संस्कार करण्याकरताच शिक्षण. भवानराव त्याच्या पहिल्या मुलाला, राजेसाहेबाला व त्याच्याबरोबर दादा महाराज, बाळा महाराज-त्याचे दोन भाचे व पंढरीनाथ इनामदार, नातभाचा यांना रोज चार तास तरी स्वतः शिकवी. संस्कृत, मराठी, इंग्रजी व इतिहास. भवानरावाला गणिताचे वावडे होते.

पुस्तकी शिक्षणाबरोबर खेळ-व्यायामातून उत्तम संस्कार होऊ शकतात म्हणून कुस्ती, पोहणे, आट्यापाट्या, चेंडू-लगोरी, सूर-पाट्या, स्वतः शिकवे व मुले खेळायला लागली म्हणजे खुर्ची मांडून तो बसे.

बैठ्या खेळांपैकी गंजिफा, सोंगट्या व क्वचित पत्तेही त्यांच्या बरोबर खेळे.

या त्याच्या प्रवृत्तीमुळेच औंधला १९०० साली हायस्कूल झाले. त्या वेळी भवानराव चीफ सेक्रेटरी म्हणून काम पाहात असे. श्री. शंतनुराव किर्लोस्कर या शाळेत होते. त्यांचे काका, श्री. रामोअप्पा औंधातच स्थायिक झाले होते. त्यांच्या घरी किर्लोस्कर परिवारातील अनेक मुले औंधच्या शाळेत शिक्षणाला येत. उत्तम शाळा म्हणून ही शाळा किती तरी वर्षे गाजली. पुढे याच शाळेतून, त्याच संस्कारातून श्री. शंकरराव खरातांसारखे विद्वान तयार झाले व काही महत्त्वाची जीवनमूल्ये जतन करीत कठीण परिस्थितीशी झगडले.

१९२० सालापासून संस्थानच्या सर्व प्राथमिक शाळांतून शिक्षण मोफत व सक्तीचे केले गेले. पुढील वर्गांत ही फी अत्यंत माफक असे. मॅट्रिकची फी चार आणे होती. (१९२९)

शिवाय बोर्डिंगचीही व्यवस्था होतीच. (१९११) पन्नास विद्यार्थ्यांना मोफत राहणे व भोजनाची व्यवस्था असे. रामपंचवटीत पंचवीस खोल्या व केदारलिंग महादेवालयात सत्तावीस. साने गुरुजींनी श्रीजगदंबेच्या परडीतील अन्न एक वर्ष खाल्ले होते. बोर्डिंगमध्ये अगदी पहिल्यापासून (१९११) जात-धर्म माहितीच नव्हते.

अनुक्रमणिका

आज नामवंत असलेले लेखक, कवी, चित्रकार, शास्त्रज्ञ, शिक्षक व अनेक क्रीडापती, उद्योगपती, औंधच्या बोर्डिंगमध्ये अन्न घेऊन देवीचा प्रसाद घेऊन पुढे पराक्रमी निपजले. आश्चर्य व योगायोग असा की याच काळात या चिमुकल्या आडवळणी गावाकडे व या लहानशा शाळेकडे अनेक चारित्र्य-संपन्न, उत्तम शिक्षकही आकर्षित झाले. संस्कृतला काकडे, गणित-मराठीला पाठक, इतिहासाला जाधव, भूगोल-खगोलाला पाटणकर, उच्च गणिताला लेले, इंग्रजीला काळे, कर्तव्यनिष्ठा, चारित्र्य, सातत्याने श्रद्धापूर्वक अभ्यास व विद्यार्थ्यांवर अलोट प्रेम याने धोंडोपंत कुलकर्णी व पाठक तर सर्व औंध संस्थानात नावाजले. पुढे धोंडोपंतांनी औंधच्या नव्या घटनेचा आत्मा, म्हणजे माणुसकीचे, सुसंस्कृततेचे शिक्षण हे खेडोपाडी घरीदारी पोचविले. ड्राइंगचे देवधर मास्तर व नीटनेटकेपणाची आवड असणारे, सतत छड्या मारून व कुजके बोलूनही नक्षा उतरविणारे नाईक मास्तर.

पण काळे मास्तरांची धडाडी, लोकप्रियता, विद्वत्ता व त्याबरोबरीचा थोडा अहंकार, धोंडोपंतांचे चारित्र्य, त्याग, रागीट मुद्रा व शिस्त, काकडे मास्तरांचा खट्याळपणा, देवघर मास्तरांचे विनोद, या सर्वांना ताब्यात ठेवून संस्थानच्या उत्तम शिक्षणाची व तत्पर शिक्षकांची एक परंपरा निर्माण करणारे, शिक्षण तज्ज्ञ श्री. पंढरीनाथ आत्माराम इनामदार. हे राजाच्या मोठ्या बहिणीचे, सौ. आक्का नेवरेकर, देशपांडे, यांच्या मुलीचे-गोजा आक्का इनामदार येळीवकर-यांचे चिरंजीव, सौ. आक्का नेवासकर, देशपांडे, राजापेक्षा पंचवीस वर्षांने मोठ्या होत्या. पंढरीनाथ, तात्या, राजाच्या पहिल्या मुलाच्या बरोबरीचे व दादा महाराज, बाळा महाराज या आपल्या भाच्यांबरोबर राजाने पहिली २० वर्षे संस्कृत, मराठी, इंग्रजी, व त्याच बरोबर व्यायाम, खेळ, शुद्ध वागणूक, स्वावलंबन, यांचे स्वतः धडे देऊन शिकविलेले. एम. ए., बी. एससी. होऊन औंधातच शिक्षण-खात्याचे प्रमुख झाले.

तात्या अत्यंत प्रेमळ पण स्पष्टोक्ती व जरा धारेने बोलण्याच्या पद्धतीमुळे अनेक लोकांना तिरसट भासत. राजाला कधी कधी त्यांनी आपल्या स्पष्टोक्तीने चकित केले होतेच. पण दरबारी लोकांना थोडे गैरसमज निर्माण करण्यास संधीही दिली होती. त्यामुळे राजाला कधी कधी वाटे की पंढरीनाथाचा जरा सवता सुभा आहे व तो त्यांच्याशी संभाळूनच वागे.

तात्यांचे सर्वावरच सारखे प्रेम व दरार. आम्ही मुले त्यांच्याकडे निःशंक मनाने आपली दुःखे (म्हणजे क्रिकेटचे चेंडू पाहिजेत, मॅचेस खेळू या, सहलीला जाऊ या वगैरे) सांगत असू. तात्या जसे करारी, प्रेमळ तसे नेहमी जोक्स, विनोद व्यक्त करून सर्वांना हसतही ठेवत. कामात कमालीची निष्ठा, उत्तमता.

एकदा तर राजाच्या दुसऱ्या मुलाला मूळपीठाला बरोबर नेऊन त्यांनी खूपच सुनावले! "आप्पासाहेब, तुम्ही जबाबदारी न कळण्याइतके लहानही आता नाही व मूर्ख असाल असे वाटत नाही. बाबा आता म्हातारे झाले आहेत. (१९२८ जानेवारी) तुमच्या दादांच्यावर, राजेसाहेबांच्यावर, राज्याचा भार टाकून ते स्वस्थ चित्रकला, कीर्तन, मनन-वाचन करीत बसणार होते. आता राजेसाहेब गेल्यापासून (१९२३) धैर्याने त्यांनी ५-६ वर्षे राज्याचा गाडा हाकला आहे. पाहता ना ते आता थकत चालले आहेत? त्यांचा बोजा कोण उचलणार? राजेसाहेबांचा मुलगा बापूसाहेब (छोट्या) फारच लहान. तुम्ही तर अभ्यास करीत नाही. बाबा बोलत नाहीत पण तुमच्या वागण्याचा फार भयंकर परिणाम त्यांच्या तब्येतीवर होत आहे!! "

अनुक्रमणिका

आप्पाला एकदम चर्र्र झाले. घेरी आल्यासारखे झाले. मूळपीठ चढता चढता काही दिसेना (अश्रूंमुळे...) तसा तो अत्यंत भावनाप्रधानच. एकदम म्हणाला, “मला शिकवणी ठेवा. मी शिकतो. बाबांना जन्मभर मदत करतो.”

गेला आप्पा मूळपीठहून परत आल्यावर राजाकडे व म्हणाला, “बाबा, मी मॅट्रिक पास होण्याचे ठरविले आहे. धोंडोपंत व लेले मास्तरांची शिकवणी हवी.” राजाने मोठ्याने श्वास टाकला व फक्त पुटपुटला, जयजगदंबे!!

मॅट्रिक परीक्षा खरी पास केली (१९२९) धोंडोपंत व लेले मास्तरनी !!... धोंडोपंत पहाटे ४ वाजता आप्पाला उठवावयास येत व मराठी, संस्कृत, इतिहास, भूगोल हे सर्व त्यांच्याकडून करवून घेत. १९२८ सालापर्यंत अजिबात अभ्यास न केलेला आप्पा एकदम, ‘अभ्यासी’ झाला. तात्यांच्या कानउघाडणीमुळे. त्यांचे किती उपकार त्याच्यावर!!

धोंडोपंतांनी तर प्रयत्नांची शर्थ केली. अभ्यास तर करविलाच पण मॅट्रिकमध्ये हायर सेकंड क्लासही त्याला मिळवून दिला. पुढे न जाणे, आप्पा आपल्या मूळ पदाला जातो की काय असे भय वाटून राजाने धोंडोपंताला ट्यूटर कंपॅनियन म्हणून चार वर्षे डेक्कन कॉलेजमध्ये दोन स्वतंत्र खोल्या, एक आचारी, एक पाणक्या, एक हुजऱ्या, स्वतंत्र मोटार व ड्रायव्हर तैनातीला देऊन त्याच्यावर देखरेख व मार्गदर्शनाकरता ठेवले.

किती कष्ट धोंडोपंतांनी या राजपुत्राकरता केले. सर्व हिशोब, सर्व खाण्यापिण्याची, कपडेलत्त्याची व्यवस्था, स्वतः पायाने डेक्कन कॉलेजमधून रोज गावात जाऊन भाजी, फळे, बदाम, बेदाणे त्याच्या करता आणायचे. आप्पाचा एक स्वतंत्र क्लबच डेक्कन कॉलेजमध्ये होता. (१९२९ -१९३३) रोज सहा लोकांचे जेवण. शिवाय आप्पाने अभ्यास करावा म्हणून त्याच्याबरोबर आणखी एक कंपॅनिअनही दिला होता. एक (पहिल्यांदा सरगर, करगणीचा व नंतर, जनार्दन अनंत कुलकर्णी ). धोंडोपंतांनी सर्व व्यवस्था इतकी चोख ठेवली होती की, दर पात्री महिन्याचा खर्च ११ रुपये असे. यात आप्पाचे दूध, बदाम, बेदाणे हा खुराकही. कारण त्या वेळी १५० सूर्यनमस्कार तो अगदी न चुकता घालत होता. बाबांना वचन दिले होते ना? पुढे पंचवीस वर्षे १५० नमस्कार घातले. (१९५५). पंढरीनाथ, तात्या, आप्पाचे नातलग तरी होते पण धोंडोपंतांनी आप्पाकरता इतके जिवाचे रान का करावे? त्यांना मुले नव्हती का? आपल्या मुलांचे का इतके केले नाही? नोकरी, पगाराकरता? किती पगार होता? पंचेचाळीस रुपये? (१९२९) धोंडोपंतांसारख्या उत्कृष्ट शिक्षकाला कोठेही नोकरी मिळाली असती. लाचारी म्हणून? धोंडोपंतांइतकी स्वतंत्र बाण्याची, निःस्पृह, निर्भीड व्यक्ती मिळणार नाही.

असे योगायोग विनाकारण, सहज (चान्स मुळे) की काही संकेतामुळे? मुळातच, उपजता एकमेकांचे आकर्षण काही विशिष्ट सूक्ष्म स्पंदनामुळे असू शकते का? ज्यांची अशी सूक्ष्म स्पंदने (व्हायब्रेशन) जमतात (हारमोनाईझ) जे जवळ येतात व या त्यांच्या संबंधातून, नवीन चैतन्य निर्माण होते. खरे का? कोणास ठाऊक? शोध चालू आहे, संपत नाही.

त्या काळी १९२५ ते १९३७, राजा सर्वच्या सर्व बजेट नियुक्त कौन्सिलपुढे मांडावयाचा, आपल्या दिवाणामार्फत. कोणीही, काहीही, कितीही टीका कोणच्याही बाबतीत करावी. राजपुत्र राजकन्या कसले,

अनुक्रमणिका

किती कपडे घालतात, काय खातात यापासून ते धरणे, विहिरी, शाळा, यांचे खर्चासंबंधी उपयुक्ततेसंबंधी भरघोस टीका होई. त्या वेळी आप्पाचे दरसाल १५०० रु. चे डेक्कन कॉलेजच्या खर्चाचे बजेट तपशीलवार धोंडोपंत सादर करीत. एकदा तर सांब दर्शने कौन्सिलचे मेंबर असताना त्यांनी हे १५०० रु. चे बजेट २०० रु. नी वाढवून दिले होते, कारण अप्पाचे कपडे करण्याकडे फारसे लक्ष नव्हते म्हणून!

औंधमधील ही सर्व मंडळी, प्रजा, का येवढा खर्च करीत होती? आप्पाकडून काही अपेक्षा यांची होती की काय? सुप्त, आंतर-मनातील गुप्त, हेतू की या मुलाने राजाला मदत करावी? हेतू की प्रजेची सेवा याने करावी? कोण जाणे? पण शिकार, शिक्षण, खेळ, विमान, ग्लायडर या सर्व गोष्टींत औंधमधील काही लोकांना थोडे-फार आकर्षण जरूर वाटे, पुष्कळ लोकांना यासंबंधाने अस्पष्ट कल्पना असेलही व त्यांनाही काहीतरी एक वेगळी व्यक्ती आहे, नेहमीच्या साच्यात बसत नाही पण आहे झालं राजपुत्र, असेच वाटे.

धोंडोपंत व पाठक मास्तर यांनी आप्पाला प्रेम दिले, उत्तम मार्गदर्शन केले, केव्हा केव्हा तर अगदी धारेवर धरले, पण कधीही त्याला राजपुत्र म्हणून वागवले नाही.

आप्पा ५-६ वर्षांचा असताना राजाने त्याला पाठक मास्तर गणित व मराठी शिकवण्यास ठेवले. अव्यवस्थित, चळवळ्या स्वभावाप्रमाणे आप्पा चुळबूळ करीत कसाबसा तासभर बसायचा अभ्यासाला. लक्ष सगळे बाहेर, दुसरीकडे. गणित विषय नावडता, इतिहास जमलाच नाही, (साल आणि राजा मेळ बसत नसत.) या विषयाचा कंटाळा म्हणून आप्पा दुसरे काही चित्राचे पुस्तक पायाखाली दडवून तेच वाचावयाचा बसल्या बसल्या, मास्तरांच्याकडे लक्ष नाहीच.

दोन तीन वेळा पाठक मास्तरांनी हे पाहिले व एकदा लालाबुंद होऊन ओरडले, “अरे पोऱ्या, गाढव तर नाहीस ना?”

राजपुत्राला नेहमी अहो-जाहोच म्हटले जाण्याचे माहीत. “अरे पोऱ्या”, म्हणून ओरडल्यावर, “गाढव” म्हटल्यावर त्यांचाही पारा एकदम चढला, पण मास्तरांचा तो रुद्रावतार बघून घाबरून चूप बसला. काय करणार, राजाने मास्तरांची बाजू घेतली असती.

राजाची सर्व शिक्षकांना सक्त ताकीद होती की आप्पाला किंवा राजवाड्यातील कोणालाही स्पेशल वागणूक नाही. मग आप्पा, पंडित, पोपट, बाबू यांनी पाठक, धोंडोपंत, नाईक, लेले यांच्याकडून भरपूर व वारंवार छड्या खाल्ल्या.

पण सर्व शिकले, विशेषतः आप्पा, की माणूस सुसंस्कृत असेल तरच श्रेष्ठ लोक त्याला मानतात, तो राजपुत्र आहे, श्रीमंत आहे, अधिकारी आहे म्हणून नाही. अगदी लहानपणापासून धोंडोपंत, पाठक, नाईक, देवधर, पाटणकर व लेले यांनी हा महत्त्वाचा धडा त्याला गिरवायला लावून किती उपकृत केले हे शब्दांकित कसे करता येईल? सुसंस्कृतता व लोकशाही, रामराज्य व लोकराज्य यांचे धडे द्यावेत तर धोंडोपंत, पाठक मास्तरांनीच. आपल्या स्वतःच्या चारित्र्याने, कर्तव्यनिष्ठेने, ज्ञान-तपश्चर्येने, अविश्रांत सहज अहंकारविरहित सेवेने. या राज्यात या ऋषिमुनींनी औंधमध्ये सुसंस्कृत मानवता रुजविण्याच्या खेडोपाड्यांत घरोदारी जाऊन पंचवीस वर्षे, दोन तपे, सतत, अनेक हालअपेष्टा सोशीत प्रयत्न केला. पुढील ग्रामराज्याचा महात्मा गांधींचा प्रयोग यशस्वी करणेस जे कारणीभूत झाले. त्यात या सर्व आदर्श

शिक्षकांचा अत्यंत मोठा वाट होता. रामराज्य, लोकराज्य सहजासहजी, तपश्चर्येशिवाय मिळत नाही व मिळाले तर पचत नाही. ग्रामराज्याचा दहा वर्षांच्या प्रयोगात (१९३८-१९४८) धोंडोपंत, पाठकांचे बरोबर अनेक शिक्षक स्वयंप्रेरणेने, उत्साहाने झटले.

तरुण पिढीतील मारुती मास्तर, देशमुख (आटपाडी), जनार्दन अनंत कुळकर्णी (गुरसाळे), अब्दुल काझी (आटपाडी), मारुती गुरव (खरसुंडी), तसेच दाढे, काका जोशी, गजानन मास्तर व कानडी खेड्यांत अत्यंत निष्ठेने व प्रेमाने काम करणारे निडोणी मास्तर यांनी सर्वांनी स्वराज्य म्हणजे स्व-संयमित वागणूक व स्वातंत्र्य म्हणजे स्वार्थत्यागपूर्वक सेवा, याचे शिक्षण स्वतःच्या वागणुकीने दिले.

भवानराव राजा नसता तर ही सर्व मंडळी स्वयंप्रेरित झाली असती का ? कोण जाणे? योजक प्रेरणा देणारा लागतो, मग सुप्त अध्याहृत असलेल्या शक्ती एकदम उफाळून येतात हे खरेच.

राजाचा कटाक्ष की बहुश्रुतता असल्याशिवाय सुसंस्कृतता नाही म्हणून शाळेतून गाणे, ड्रॉईंग, ड्रिल, कुस्ती, खेळ हे कंपलसरी होते.

गुळवणी, शाहुपरे यांच्यासारख्या, अभ्यासू स्कॉलरना ड्रॉईंग, गाणे वावडे. देवधर ड्रॉईंग मास्तरांनी जंग जंग पछाडले तरी हे उत्तम आदर्श विद्यार्थी ड्रॉईंगमध्ये कोरडे ते कोरडेच. विनोदी देवधर त्यांना ड्रॉईंगच्या तासाला आले म्हणजे म्हणावयाचे “हा, गुळवणी, शाहुपुरे तुम्ही काय काढता? वेळ काढा झालं.”

पण देवधर मास्तरांचा शिकवण्याचा एवढा हातखंडा होता की माधवराव सातवळेकर, बाबूराव पाठक, पाटील, वासू इंगळे यांसारखे नामांकित चित्रकार औंधच्या शाळेतून तयार झाले.

औंधचे सर्वच वातावरण चित्रमय होते. राजाचा चित्रांचा, मूर्तीचा, पोथ्यांचा संग्रह सर्व हिंदुस्थानभर नावाजलेला होता. प्रत्यक्ष पंडितजी सातवळेकर हे तर नामवंत चित्रकार-वेदमूर्ती औंधात स्थायिकच होते. शिवाय शंकरराव किर्लोस्कर (शंवाकि), धुरंधर, बाबूराव पटेल, हळदणकर, हे व अनेक इतर नामवंत चित्रकार, शिल्पकार, कलाकार औंधला नेहमीच येत. त्यांच्या सहवासात व त्यांनी केलेल्या कौतुकाचा विद्यार्थ्यांच्या मनावर योग्यच परिणाम होई.

बरमाप्पा कोट्याळकर हा औंध संस्थानतील कोट्याळ (विजापूर नजीक) गावाचा कुंभार. एकदा (१९२१) राजा कोट्याळला गेला असता त्यांनी केलेल्या काही मूर्ती राजाने बघितल्या.

राजाच्या समोर या तरुण चित्रकाराने भरकन उत्कृष्ट चित्रे काढून दाखविली. आनंदाने राजाला गहिवरून आले व बरमाप्पाला औंधला आणून राजवाड्यातच वीस वर्षे ठेवला.

बरमाप्पाचे ड्राइंगची रेषा म्हणजे जगविख्यात मिकेल आन्जेलो, पिकासो, टित्सियानो यांच्या तोडीची.

आठ-दहा दिवसांत उत्तमोत्तम चित्रे तयार व्हावयाची. राजाला पसंत पडणारच. मग भालदाराला बोलावून सुताराकडून ताबडतोब फ्रेम करण्याचा हुकूम.

अनुक्रमणिका

पेन्टरला या फ्रेमला खऱ्या सोन्याचा वर्ख लावण्याचा आदेश.

आजही बरमाप्पांच्या चित्रांचा उत्तम संग्रह औंधच्या म्युझियममध्ये आहे. सर्वांत बरमाप्पाचे गजगौरी व्रत, ही दहा चित्रांत चित्रित केलेली गोष्ट अप्रतिमच आहे.

माधव सातवळेकर, बाबूराव पाठक, पाटील, वासू इंगळे, वासू खटावकर यांच्या तरुण मनावर या सर्व वातावरणाचा परिणाम झालाच.

राजाला सर्वांनी आपल्याला चांगले म्हणावे, सुसंस्कृत म्हणून संबोधावे, मान द्यावा असे सर्वांच्याप्रमाणे वाटेच. पण आपली शक्ती किती, धाव किती व आव केवढा याचे भान नसे. त्यामुळे रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ. बेलवलकर, डॉ. सुखटणकर, न. चिं. केळकर यांच्यासारख्या विद्वानांनी थोडे हरभऱ्याच्या डहाळ्यावर चढविल्यावर राजा चढलाच व भांडारकर ओरिअंटल रीसर्च इन्स्टिट्यूटला महाभारताची क्रिटिकल आवृत्ती काढण्यास एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. (१९१९)

आपल्या दुष्काळग्रस्त चिमुकल्या संस्थानचे उत्पन्न किती ? सुकाळात सर्व सारा आला तर तीन लाख. दुष्काळात दीडच लाख. मग येवल्याचे सावकार गंगाराम छबिलदास यांचे सहा टक्के व्याजाने कर्ज काढावयाचे व नोकरांचा पगार द्यावयाचा ही नेहमीची पद्धती. मग भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेला एक लाख केव्हा, कोठून, कसे देणार?

गंगाराम छबिलदास यांची पेढी येवल्यालाच नाही तर सर्व महाराष्ट्रात प्रख्यात. मोठी मोठी 'धेंडे' त्यांच्याकडून कर्ज नेत. इतर संस्थानिकसुद्धा. स्वतः गंगाराम अत्यंत सालस व सुसंस्कृत. दरवर्षी सुगीनंतर त्यांचा मुक्काम ४-६ दिवस औंधात होई. जेवणाची राजाबरोबर व्यवस्था असे.

इतर गप्पा-गोष्टींबरोबर राजा गंगारामला म्हणावयाचा, "अहो तुमची लक्ष्मी आमचेकडे तुम्ही नांदणेस ठेवली आहे. आम्ही तिची उत्तम काळजी घेऊ!!!" नलिनीने हे जेव्हा पहिल्यांदा ऐकले तेव्हा तिला हसू आवरेचना!!

पण पूर्वीचे काळी सुसंस्कृत लोकांत बोलण्याच्या काही खुब्या असत. गंमत असे.

राजाचा हा सतत कर्जबाजारीपणा १९४४ सालीच रामाप्पा बिदरी यांनी संस्थान पूर्णपणे कर्जमुक्त करून संपविला. राजाचे हातून व आप्पाचे हातून हे कधीच शक्य झाले नसते.

संस्थान कर्जमुक्त झाले तेव्हा राजाने जगदंबेला मोठ्या भाविकतेने 'भोगी' केली.

पण कौतुक होते आहे, नाव होते आहे म्हणून राजाला भुरळ पडावयाचीच. कोणतीही गोष्ट चांगली आहे, मानवाचे त्यात कल्याण आहे, त्यात सुंदरता आहे, त्यातून संपत्ती निर्मिती आहे, चैत्यनाचा, शक्तीचा आविष्कार आहे असे वाटले की भारून जाऊन मदतीला, दानाला भवानरावाचा हात कधीच आखडला नाही. नेहमी म्हणावयाचा.... "जगदंबेच्या परडीत भरपूर आहे. होतेही" (आहेही !!)

अनुक्रमणिका

झाले एक लाखाची महाभारत "प्रतिनिधी" आवृत्तीला देणगी जाहीर झाली. पण ती चित्रासहित होणार होती. पैसा लागणार. मग राजा म्हणाला, मी चित्र काढून देतो. काही काढलीही. पुढील साठ चित्रांकरता नामवंत चित्रकार पूरम यांना औंधला आणून बारा वर्षे ठेविले. (१९२६-१९३७) मग काय चित्रप्रेमी माधव, बाबू, केशव, वासू (दोन) या सर्वांचा घोळका त्यांच्या पाठीमागे असावयाचाच.

हो खरेच! केशव देशपांडे यांच्याबद्दल जितके सांगावे तितके थोडेच आहे. एक अगदी गरीब, जवळ जवळ अनाथ कुटुंबातून कर्नाटकातून राजाचे परमस्नेही न्यायमूर्ती बाजीराव गुत्तीकर यांनी वयाच्या बाराव्या वर्षी त्याला औंधला आणले. चित्र काढतो. याला तुम्ही शिकवा. मराठी येत नाही, संभाळून घ्या, असे सांगितले व ते निघून गेले हुबळीला.

अप्पा, पोपट, पंडित, बाबू यांनी एक नवीन पाखरू चिडवावयाला व खेळायला मिळाले!! केशव सोशिक पण या चौकडीच्या हल्ल्याला तोंड देणे त्याला कठीण झाले व एक दिवस रागाने घरी जायला निघाला.

राजा रागावेल या भीतीने मग त्याला सर्वांनी आपल्यात घेतले व पुढे सर्वच कार्यक्रमांत केशवशिवाय चालेनासे झाले.

केशव उत्तम कोरीव काम मारबल, हस्तिदंत, पोळे व मौल्यवान जडजवाहिरावर करी. राजवाड्याच्या मागील बाजूस एका भल्या मोठ्या दालनात पांडोबा व महादबा पाथरवट यांनी भल्या मोठ्या संगमरवरी दगडांच्या अनेक मूर्ती राजाच्या आदेशाने तयार केल्या होत्या. उत्तम मारबल इटलीमधून यावयाचा. रहिमतपूर स्टेशनवरून बैलगाडीतून तो आणावयाचा, मग आप्पा, पंडित, पोपट, बाबू हे सर्व धूड कसे खाली उतरवितात हे पाहण्यात शाळेला जाण्याचे विसरून पाटणकर मास्तरांच्या छडीखाली सापडावयाचे हा नेहमीचाच कार्यक्रम.

आता केशवही त्यात सामील झाला. पांडोबा पाथरवट म्हणजे खरे तर इमारतीच्या दगडाला टाकी मारणारे, दगड घडविणारे, पण राजाने त्यांना स्वतः हळूहळू तयार केले व सरतेशेवटी पांडोबा व त्यांचे चिरंजीव महादबा साध्या फोटोवरून सुद्धा हुबेहूब सादृश दगडातून ठाक् ठाक्, ठाक् हा सकाळी नियमाने सातपासून ते संध्याकाळी सहापर्यंत घडविण्याचा आवाज करीत. ४-६ महिन्यांत निर्माण करीत. लक्ष्मणराव किर्लोस्कर, राजाच्या मातोश्रीपासून ते पंचम जार्ज बादशहाचे पुत्र प्रिन्स ऑफ वेल्स ते शंकर पार्वती, ते सर्व ऋतू ते इटालियन व ग्रीक नामांकित पुतळ्यांचे हुबेहुब नक्कलापर्यंत त्यांनी उत्कृष्ट काम करून सर्वांना चकितच केले. पुढे पुढे तर महादबा पाचू, नीळ, माणिक, ऑपल, एमॅथिस्ट, अशा कठीण जवाहिरावरही कोरीव काम करू लागले. त्यांच्याच हाताखाली केशव तयार झाला. पण मूर्ती व कोरीव काम याबरोबर केशव रॉयल टॉय फॅक्टरीचा मुख्य कामगार होता. फ्रेटवर्क, नक्षी काढणे, उत्तम सांधे घासणे ही सर्व कामे त्यांच्यावरच सोपवायची.

त्यातून मॉडेल विमान करण्याचा केशवला मोठा नाद. साध्या चिपाडाचे किंवा हलक्या बांबूचे तो विमानाचे मधले भाग करी (बॉडी) त्याला मधोमध छानदार आरपार भोक पाडी. त्यातून जुन्या सायकल ट्यूबचे कापून काढलेले फूट दीड फूट लांबीच्या दोन, चार, सहा, आठ, पाव इंच जाडीच्या पट्ट्या ओवी. पुढील बाजूला रॉकेलच्या पत्र्याचा पंखा (प्रॉपेलर) बसवी. या लांब रबरी पट्ट्यांना मग हा पंखा विरुद्ध दिशेने फिरवून पीळ घाली. खूप खूप पीळ बसला की पंखा सोडावयाचा की पीळ संपेपर्यंत पंखा एक ते चार मिनिटे

जोराने फिरे. मग या मुख्य भागाला (बॉडी) किंवा फ्यूसेलॉजला) टिश्यू कागदाचे तुकडे अगदी हलक्या बांबूंचे पातळ फाकीच्या जरूर त्या आकाराच्या साच्यात ताणात साध्या डिंकाने चिकटवी. रबरांचेच लूप करूनही पंखे (वुईंग्स) मुख्य भागाला जोडी.

केशव हे इतके उत्तम रीतीने करी ते लक्ष्मणराव किर्लोस्कर, शंतनुराव किर्लोस्कर, आत्मारामपंत ओगले अशी निष्णात इंजिनियर मंडळीही केशवचे आश्चर्ययुक्त कौतुक करीत.

राजा तर, “बाबा, केशवचे नवीन विमान बघायला चला” म्हटले की हौशीने आपली तांबड्या रेशमी कापडाची घडीची टोपी (औंधातच शिवलेली) घालून येई.

केशवने लहान-मोठी अशी १० वर्षांत १०० तरी विमाने केली असावीत. काही जमिनीवरून सरपटत वेग घेऊन उडत तर काही हातातूनच उडवावयाची.

एकदा तर केशवने माणूस उडेल एवढे ग्लायडर केले!! पंखे करावयास कापड पाहिजे. कोण देणार? कोणाला विचारावे? लोक वेड्यातच काढतील. हौशी मुलांच्या पुढे प्रश्न पडला. हिरमुसली होऊ लागली. इतक्यात बाबूमिया पटवेकरी नवा नऊवारी फेटा घालून आला व पाच मिनिटांत नव्या फेट्याचे तुकडे कापून ग्यालडरचे पंखे बनू लागले.

हे अवजड अशास्त्रीय, ग्लायडर उडवणार कोण? कसे उडवावयाचे, कोणाला माहीत? विचारात सर्व मंडळी पडली. पोपट, पंडित बाबू आपापले विचार सांगत होते. इतक्यात केशव म्हणाला, मीच पहिली उडी मारणार. (१९२६)

झाले, माळावर जाऊन वाऱ्याला सामोरे जाऊन (अप वुईंड) केशव जोराने पळू लागला. पुढे एक छोटासा कडा (२५ फूट) होता. त्याला वाटले हे विमान त्याच्यावरून उडी मारल्यास अलग खाली येईल. विमान खाली तर आलेच पण केशव आठ दिवस गुडघे फुटले म्हणून अंथरुणात पडून राहिला! मग १९३० पर्यंत असल्या ग्लायडरचे प्रयोग स्थगित झाले.

केशव चित्रकला, मूर्तिकला, विमाने, ग्यालडर यांच्या बरोबर खारोट्या पाळणे, त्यांना नाना प्रकारचे खेळ शिकविणे, तसेच पांढरे लाल डोळ्यांचे उंदीर, ससे, मुंगूस, पोपट, मैना ही सर्व आपल्या खोलीत आळीपाळीने व केव्हा केव्हा एकदमही ठेवी. केशवला कागदाच्या कुट्ट्यापासून (पेपर मॅशे) वेगळ्या देव-देवतांचे, राक्षस-भूत-पिशाच्चे मुखवटे बनविण्याचा नाद. औंधात त्या वेळी अनेक भक्त, भाविकपणाने देवळात जाऊन पूजा-अर्चा करावयाचे. अशा वेळी, हनुमान, विष्णू, शंकर यांचे बेमालूम दर्शन केशवने भक्तांना करविले होते.

हनुमानाने तर औंधमध्ये काही काळ अगदी कहर केला होता. माधवदास शेटजींपासून आत्मारामपंत ओगल्यांपर्यंत सगळ्यांना शेवटपर्यंत ह्यामागे केशव आहे हे कळत नसे. हे सर्व सांगण्याचे कारण अशाकरता की या काळी (१९२२-१९३३) औंधचे वातावरणच असे होते की हरहुन्नर कला, व्यवसाय, फोफावू शकत होते. राजा प्रेमाने त्याचे कौतुक करी व सहभागी होई.

अनुक्रमणिका

राजाने रामायणाची (वाल्मीकी) ६० उत्तम चित्रे १९१० ते १२ पर्यंत काढली होती. लॉर्ड सिडनहॅमपासून रामकृष्ण गोपाळ भांडारकर, प्रोफेसर रॉलिन्सन, प्रोफेसर सेल्बी, जज्ञ किंकेड या सर्वांनी आग्रह केल्यावर या चित्रांचे एक उत्तम पुस्तक छापले गेले.

वाल्मीकी रामायणातील एक श्लोक चित्राखाली व त्याचे थोडक्यात भाषांतर असे हे अप्रतिम पुस्तक पूर्ण रंगीत साठ चित्रांसहित हिंदी, बंगाली, तामिळ, तेलगू, मल्याळम्, गुजराथी, मराठी, इंग्रजी या भाषांतून प्रसिद्ध झाले व सर्वच्या सर्व भाषांतील ही पुस्तके १९३० पर्यंत दुर्मिळ झाली.

पुन्हा रामायण छापावे या कल्पनेने राजाला झपाटले. औंधातच ते छापले जाऊन १० रु. किंमतीला सर्व थरांतील आबालवृद्धांना ते उपलब्ध व्हावे असे वाटू लागले.

झाले, लागलीच रामभाऊ चिताऱ्यांना बाळा महाराज पंडितांच्याबरोबर मुंबई, मद्रास, कलकत्त्याला पाठवून कोठे कसे काम चालले आहे याची माहिती मिळविली.

लगेच कॅमेरा, स्टॅण्ड, सर्व प्रोसेसिंगची साधने, एक छोटा प्रेस सर्व सामान आणविले.

उत्तम ब्लॉक करण्याकरता बंगाली तज्ज्ञ, चौधरी औंधला राजवाड्यात सहा वर्षे ठेवून घेतले. त्यांच्या हाताखाली रामभाऊ चितारी, महादेव गुरव, शहाणे मास्तर असे अनेक औंधीय शिकवून तयार केले. महादेव गुरव तर उत्तम ब्लॉक करू लागला. रामायण महाभारतातील उत्तमोत्तम, स्वतः काढलेली चित्रे, बरमाप्पांची सर्व चित्रे, भवानी सहस्रनामातील जगदंबेची अनेक चित्रे यांचे भराभर ब्लॉक झाले व औंध स्टेट प्रेसमध्ये श्री. काकडे मास्तर यांचे निदर्शनाखाली पुस्तके छापून तयारही झाली.

लहान मुलांपैकी बाबू पाठक, आबासाहेब (राजाचा चवथा मुलगा) ब्लॉक मेकिंगमध्ये निष्णात झाले. पुढे (१९५१) आबासाहेबांनी राजाच्या निधनानंतर हे सर्व कार्यक्रम पुण्याला स्थायी करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

नाटकाचा तर राजाला फारच शौक. मुलांच्या करता १९२२ साली ‘चल रे भोपळ्या टराव टराव’ हे नाटक स्वतः लिहिले. कागद-कुट्ट्याचे सिंह, वाघ, अस्वल, कोल्ह्याचे मुखवटे गोविंदजी चिंताऱ्यांनी उत्तम बनविले. झाले! भाषणे पाठ होऊ लागली. नाटकाच्या तालमी घेण्याचे काम देवधर मास्तर व गोविंदजी चितारी करू लागले. रंगीत तालमीला राजा हजर. आप्पा सिंह, राजाचा पुतण्या आण्णासाहेब अस्वल, पोपट (पाठक) वाघ व हुशार लक्ष्मण (पाठक) कोल्हा, राजाची नात (गीतुताई काळे यांची मुलगी) बबूताई म्हातारी, आक्का तिची मुलगी व आप्पू हैबत देशपांडे (नेवरेकर) कुत्रा. नाटक फारच वठले व किती तरी वेळा ते पुन्हा पुन्हा करावे लागले.

गाणे, चित्रकला, नाटक, याबरोबर पाठांतर हवे म्हणून दुपारी जेवणाच्या वेळी एका मोठ्या काळ्या बोर्डावर सर्वांना दिसेल अशा ठळक अक्षरांत एक श्लोक लिहावयाचा. ईशोपनिषद्, महिम्न, रघुवंश वगैरे. सर्वांनी (राजा आणि राणी सोडून) तो श्लोक पहिला भात झाल्यावर एकानंतर दुसऱ्याने, नंतर तिसऱ्याने असे सर्व पंगतीने २५-३० वेळा मोठ्यांदा म्हणावयाचा. रोज २५-३० वेळा ऐकल्यानंतर एक श्लोक ४-६ दिवसांत

अनुक्रमणिका

सगळ्यांना पाठ होई. मग दुसरा श्लोक असे सहज घास घेता घेता सर्वांचे पाठांतर रोज होत होते. आचारी-पाणकेसुद्धा श्लोक म्हणून लागले.

राजा श्लोकांचे अर्थ पहिल्या दिवशीच सांगे. कोणाला शंका आली तर त्याचे निरसनही करी. महाभारत, रामायण, शिवाजी वगैरेच्या गोष्टीही जेवताना राजा मोठ्या रंगात येऊन सांगे. सर्वांत जे मूल लहान असेल त्याने, बाबा गोष्ट, म्हणाले की गोष्ट सुरू. सहज अशा रीतीने राजाने आपली आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी मुलांच्या व इतरांच्या मनात रुजविली. किती गंमतीने हा भोजनाचा दीड तासाचा वेळ जाई. बरोबर घंटेच्या १०-३० च्या टोल्याला राजा न चुकता भोजनगृहात येई, सर्वांनी त्याच्या आधी आलेच पाहिजे ही सक्ती. बाराच्या आत सर्व कार्यक्रम संपे. राजाची ही देणगी, खरोखरी अनेकांना अविस्मरणीय होऊन आयुष्याच्या खडतर प्रवासात ती किती मौल्यवान ठरली ते ज्याचे त्यालाच माहीत.

अशा गोष्टी सांगत सांगत, नाटके रंगवीत, राजाने आपल्या मुलामुलींना, नातीला कीर्तने करण्यास शिकविले. स्वतः कीर्तन शिकविण्याचा क्लास काढलाच होता. या क्लासात संस्थानचे व बाहेरचे अनेक विद्यार्थी शिकावयास येत. बाहेरील विद्यार्थ्यांना जरूर असेल तर रोज पंक्तीला राजवाड्यात दोन वेळ भोजनही मिळे.

राजाच्या दरवर्षीच्या दोन कीर्तनांबरोबर लखोबुवा, हरिदास, नारायणबुवा, आटपाडीकर, मार्तंडबुवा यांची दरवर्षी नवरात्र, रामजन्म, चैत्रीची मिळून वीसपंचवीस कीर्तने या विद्यार्थ्यांना ऐकायला मिळत.

लखोबुवा (उंचे ठाणकर) अत्यंत उत्तम, रसाळ भक्तिरसप्रधान सुश्राव्य कीर्तन करीत. नारायणबुवा आटपाडीकर, हास्य-विनोदात पटाईत होते. त्यांचे कटाव प्रसिद्ध असत. श्रोत्यांच्या उजव्या रांकेला करुणप्रधान वक्तव्य व गाण्याने रडावयास लावावयाचे व त्याच वेळी डाव्या रांगेतील मंडळींना हसवायचे असे प्रकार ते कीर्तनात करीत.

मार्तंडबुवा दाभाडे हे उत्तम पट्टीचे गायक होते. कीर्तन क्लासच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कीर्तनाचा कार्यक्रम एक महिना आषाढात होत असे. राजा स्वतः वही घेऊन मार्क मांडण्यास कीर्तनाला बसे. शोक, वीर, हास्य, करुण, शृंगार, बीभत्स रस कसे कीर्तनकाराने रंगविले, त्याचे हावभाव, गाणे, ताल, विद्वत्ता यांना तो मार्क देई. या परीक्षेचे दुसरे परीक्षक रामोअण्णा किर्लोस्कर व गोलवडीकर मास्तर. कधीकधी पंडित सातवळेकरही मार्क देण्यास बसत. राजघराण्यापैकी नात आक्का उत्तम कीर्तन रंगवी. वासंती, वर्षा, सुंदर ह्यांचे गाणे, हावभाव, उत्तम असत. धाकट्या तात्याने (वय १०) तर तानाजी मालुसरेचे कीर्तन इतके उत्तम केले की, अनेकांनी राजाला चोरून डोळे पुसताना पाहिले. प्रसंग होता शेलारमामा व तानाजीच्या रणांगणात स्वराज्याकरता देहत्याग.

राजा मोठा भावनाप्रधान. पण संयम व शिस्त अत्यंत कठोर असल्याने वर वर लोकांना तो नेहमी शांत वाटे. पहिला हातातोंडाशी आलेला मुलगा वयाच्या तिसाव्या वर्षीच वारल्यावर राजाच्या डोळ्यांत अश्रू आलेले कोणी पाहिले नाही, पण सहा महिनेपर्यंत पूर्ण मौनात होता. पण ज्या वेळी अधूनमधून जोरदार स्मृती येईल त्या वेळीचे त्याचे “हे राम” हे उद्‌गार आप्पाच्या मनात चरचर करीत.

अनुक्रमणिका

राजा भावनाप्रधान व अत्यंत प्रेमळ, पण लोकांत आदरयुक्त भीतीच त्याची वाटे. तो भाबडा मुळीच नव्हता. राजाच्या मनात भक्ती भरपूर होती पण अंधश्रद्धेचा मागमूस नव्हता. पूजा-अर्चा, आरती, नैवेद्य, उत्सव मोठ्या श्रद्धेने करावयाचा, शंकराचार्यांच्या देवीच्या मानसपूजेचे श्लोक मोठ्यांदा म्हणताना अगदी गहिवरून येई व आप्पाला तर राजाचा आवाज भक्तीमुळे जरा घोगरा झालेले ऐकून रडूच कोसळे.

पण संस्थानात धर्माचे नावाखाली भोंदूपणा, पिळवणूक करणारे संन्यासी, संत, महंत यांना त्याने कधीच थारा दिला नाही. मंत्र-तांत्रिकापासून दूर राहिला. राजाची दुसरी पत्नी, आप्पाची आई, शिर्डीच्या साईबाबाचे तीर्थ घेण्यास निघाली व पुढे तिची साईबाबांच्यावर मोठी भक्ती बसून तिने आप्पाला त्यांचा गंडा बांधला हे राजाला मुळीच पसंत पडले नाही. या पत्नीच्या आग्रहास्तव राजा आप्पा दोन वर्षांचा असताना त्याला घेऊन शिर्डीला गेला पण जेवणाच्या वेळी भरपक्तींत ज्या वेळी बाबांच्या पायाचे तीर्थ सर्वांना वाटण्यास शागीर्द आले त्या वेळी त्याने हात पुढे केलाच नाही. साईबाबा आपल्या आसनावरूनच ओरडले, ‘वो नही लेंगा, उनको जरूरत नहीं हय. उनको छोड देओ.’ मात्र विद्वान संतांचा तो सन्मान करी. कुर्तकोटी शंकराचार्यांची अनेक प्रवचने औंधात झाली. मात्र राजाने पाद्यपूजा, वगैरे केले नाही. पाचलेगावकर महाराज २०-२२ वर्षांचे असताना साप, नाग घेऊन औंधला आले असताना राजाने त्यांना सन्मानाने देवळात बोलावून त्यांचे प्रवचन करविले. मात्र भूतेखेते मंत्र-तंत्र या भानगडीत काही लोक पडले तेव्हा राजा रागावला. एकदा तर तो असताना पाचलेगावकर महाराजांच्या समोर चिदांबरबुवा पखवाजी यांच्या अंगात आले व त्यांनी मुली-बाईंना शिव्या व मारहाण भर सभेत सुरू केली. तेव्हा राजाने ताडकन उठून आपला लाकडी सोटा जोराने त्यांच्या डोक्यात मारला.

झाले, बुवांच्या अंगातील भूत गेले व ते शुद्धीवर आले. पाचलेगावकर महाराजही म्हणाले, “महाराज बरोबर केलेत.”

वाईचे नारायणशास्त्री मराठे व त्या वेळेचे तरुण बाणेदार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी औंधला वारंवार येत व व्याख्याने देत. एकदा तर प्रथमच नारायणशास्त्र्यांच्या आग्रहास्तव आपले एक कीर्तन, ‘अहंकार’ हे वाईला केले, पण ते बसूनच केले, कारण औंधचे बाहेर व वडिलांची समाधी आणि यमाईचे देवळाशिवाय इतर कोठे कीर्तनाला उभे न राहण्याचा त्यांचा कटाक्ष होता.

राजाची श्रद्धास्थाने तीन. एक जगदंबा, महिषासुर-मर्दिनी-मूळ पीठची देवी. दुसरे छत्रपती श्रीशिवाजी महाराज व तिसरे म्हणजे वडील श्रीनिवासराव महाराज. या तिघांशिवाय खाली वाकून राजाने कोणाला प्रणाम केला नाही की कोणाची गुरुपूजा केली नाही.

येमाई, जगदंबा, महिषासुरमर्दिनी तर राजाचे कुलदैवतच. पंत घराण्याचे आद्य पुरुष त्र्यंबकपंत कुलकर्णी (किन्हई, जांब, हिवरे गावाचे) यांच्या भक्तीला वश होऊन म्हणे औंधची अंबाबाई किन्हईला स्थानापन्न झाली.

मोठी रम्य व रोमांचकारी दंतकथा आहे ती, पण पंत घराण्यात या कथेवर सत्य-कथा, अशीच श्रद्धा आहे. म्हणे त्र्यंबकपंतांचे चिरंजीव परशुराम त्रिंबक यांच्या जन्माच्या वेळी प्रत्यक्ष जगदंबेने त्यांच्या कोल्हापूरमध्ये राहणाऱ्या बहिणीचे रूप घेऊन बाळंतपणात मदत केली होती. याचे मोठे रसभरित कीर्तनही राजा करीत असे. दंतकथा किंवा सत्यकथा काहीही असो पण मुलांचे मनावर संस्कार तर चांगलेच अशा कथांचे होणार.

अनुक्रमणिका

क्रोध, द्वेष, मत्सर, मारामारी, पिळवणूक, खून, दरवडे याच्या गोष्टीही संस्कार निर्माण करतातच. त्यांच्या ऐवजी आदर्श (हीरो) पुढे ठेवावयाचाच तर चांगला, भक्त, कल्याण, प्रेम करणारा, आनंद देणारा काल्पनिक का होईना, का न ठेवावा? त्यातून अंधश्रद्धा, मनातील भीती, लाचारी, परतंत्रता वाढली जाणार नाही अशी दंत किंवा सत्य कथा असली पाहिजे. मुला-मुलींना कथा-गोष्टी, हव्यातच. पण त्या आनंद, शौर्य निर्माण करणाऱ्या, सेवाधर्म, सहकार, स्वातंत्र्य, शिकविणाऱ्याच असाव्यात.

स्वधर्माने चालावयाचे पण थोतांड करावयाचे नाही अशी राजाची प्रवृत्ती. स्वतः पहाटे तीन वाजता उठून दीड तास स्नानानंतर नमस्कार घाली. नंतर भवानी सहस्रनाम, शिवकवच म्हणून बरोबर सहा वाजता कधीही न चुकता मूळपीठाला जाई. पुढे पुढे, म्हणजे साठ वर्षांनंतर मोटारने वरपर्यंत जाई.

शिवाय उत्सव म्हणजे गणपती, राम, नवरात्र, चैत्री, शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव व अनंत चतुर्दशी (श्रीनिवासराव महाराजांची पुण्यतिथी) हे मोठ्या उत्साहाने साजरे करी.

संस्थानातील सर्व मुसलमान जमातीचा तो काझीही होता. खुतबा, स्वतः घेत असे. मशिदीत नमाज पढण्यास जो जाणार नाही त्याला दंड करी. डोल्याच्या मिरवणुकीत संस्थानचे हत्ती, घोडे असत. ७-८ वर्षे वयाचा होईपर्यंत आप्पाला तर तो डोल्यापुढे वाघाचे सोंग देऊन नाचण्याला पाठवी. पंडित सातवळेकर, आर्यसमाजिस्ट. वेदमूर्ती, हिंदू धर्माचे कट्टर अभिमानी. राष्ट्रसेवासंघ, हिंदू महासभा यांचे पुरस्कर्ते, पण खादीधारी व गांधीचे स्नेही. त्यांचे पुरुषार्थ मासिक वैदिक धर्मांचा पुरस्कार करणारे तर शंकरभाऊ किर्लोस्कर (शंवाकि) यांची किर्लोस्कर, स्त्री, मनोहर ही अगदी क्रांतिकारी मासिके. दोनीही औंध संस्थानातच निपजली व वाढली.

सत्याचा शोध हवा, मनावी मनावर झापड नसावी, सरळ, मुक्त वादविवाद होऊन समाजकल्याणाला व्यक्तीच्या उन्नतीला योग्य असे शिक्षण व संस्कार व्हावेत, म्हणून राजाने कोणतीही बंधने किंवा नियंत्रण अशा लिखाणावर किंवा व्याख्यानावर घातले नाही. उलट श्रीनिवासराव महाराजांच्या उत्सवात दोन-तीन वेगवेगळ्या विचार प्रवृत्तीच्या लोकांना बोलावून त्यांची व्याख्याने तो मुद्दाम करी. शिवाजी महाराजांचे स्तुतिपाठक बाबासाहेब देशपांड्यांच्या बरोबर स्पष्टोक्तीत प्रसिद्ध प्रो. न. र. फाटक यांचेही व्याख्यान असे.

प्रोफेसर घुंडिराजशास्त्री विनोदांचे बरोबर वैमानिक कबाली किंवा क्रांतिकारी “भूमिगत” रत्नाप्पा कुंभारही असत. (१९४४)

जीवनाची विविधता, वैचित्र्य व वरवर परस्पर विरोधी वाटणारी पण मुळात साकल्याने पाहणाराला अनुभूत होऊ शकणारी रम्यता व पूरकता ह्यातून पूर्णत्वाचा आनंद होतो हे सर्व स्वतः समजून दुसऱ्याला समजविण्याची राजाची धडपड. एकांगी होऊ नका, बहुरूपी, बहुश्रुत, पराक्रमी व्हा, त्यातच खरी भक्ती, धर्म, पूजा आहे असे तो समजण्याचा व समजावण्याचा प्रयत्न करी.

शिवाजी महाराज नुसते आदर्श पुरुषच नाही तर सांबशिवाचे खरे अवतार होते असे तो मानी. खरा मानवधर्म, शिवाजी महाराजांनी प्रस्तापित करून महाराष्ट्राला सुसंस्कृत, बनविण्याची धडपड स्वराज्य प्रस्थापित करून केली व वेगवेगळ्या प्रकृतीच्या प्रवृतीच्या शूर, स्वार्थत्यागी, निष्णात व्यक्तींना चेतना देऊन

एका स्वराज्याच्या कार्याला जुंपणे ही शिवरायाचीच शिकवण आजच्या काळी पूर्ण उपयोगी आहे असे तो समजे.

सातारचे छत्रपती चार वर्षे वयाचे पण कोठेही गाठ-भेट झाली काही प्रसंगाचे निमित्ताने तर अदबीने खाली वाकून महाराष्ट्रीय मुजरा त्यांना करी व म्हणे "महाराज आम्ही आपले प्रतिनिधी आपलेच अन्न खातो आहो."

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज व या औंधच्या प्रतिनिधीचे सूत ब्राह्मण-मराठा वादावरून बिघडले. छत्रपती शाहू महाराजांचेच राजगुरू पंडित महाराज. त्यांच्या घरी मुंजीला छत्रपतींना निमंत्रण व औंधचा राजा तर त्यांचा मामाच. तोही येणारच. मग छत्रपतींचा निरोप आला, बाळा महाराजांचा की, तो रंगारी येऊन गेल्यावर मी येईन!!!

पण शाहू महाराज काही समारंभात भेटले तर भवानराव अगदी लवून तीन वेळा मुजरा करायला चुकला नाही. लहान आप्पाला (१९२१) हे कसेसेच वाटे. ही सरंजाम पद्धती आज टिकणार आहे की काय असे त्याच्या मनात वारंवार येई. मराठा तितुका मेळवावा, हे छत्रपती शिवरायांचे स्वप्न छोट्या औंधात साकार करावे, हिंदू, मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा, हरिजन, वाणी, रामोशी, मांग या सर्वांनी आपापला स्वधर्म, म्हणजे समाजासंबंधीचे आपले जे कार्य ते उत्तम रीतीने ते करू शकतील, सेवाबुद्धीने समाजाची सुधारणा व सुस्थितीला हातभार सहकार्याने लावतील अशी शिकवण राजाला द्यावयाची होती. शिक्षकांत हरिजन, मुसलमान असेल तर तो त्यांना ब्राह्मणच समजे. का की तो त्यांचा स्वधर्म झाला. अस्पृश्यता राजाने मानलीच नाही. वाड्यात खुद्द राणीच्या स्वयंपाकघरात काम करणारी स्त्री हरिजन होती. (१९३३-३४)

जगदंबा, छत्रपती शिवाजी महाराज व श्रीनिवासराव या तीन श्रद्धास्थानांचा पगडा राजाच्या मनावर कायम बसला होता. त्याच्या मुला-मुलींवर, नातू-नातीवर हा संस्कार होणे आवश्यक आहे असे त्याला वाटे. म्हणून नवरात्रातील उपास, आरत्या, रामजन्म, गणपती उत्सव, शिवाजी महाराजांचा उत्सव या सर्वांत सर्व कुटुंबाने पूर्ण सामील झालेच पाहिजे असा त्याचा दंडक असे.

पराक्रम केला पाहिजे, यत्न तो देव मानावा, पण सरते शेवटी जगदंबाच सर्व करते, मी काही नाही, ही पूर्ण भक्तीची भावना राजाने आपल्या आचरणाने कुटुंबियांच्या पुढे व आपल्या सर्व प्रजाजनांपुढे ठेवली होती.

अर्थात या भावनेत थोतांड, अर्धसत्य, अंधश्रद्धा असू शकते स्वतःची फसवणूक (सेल्फ डेल्यूजन) ही असे आप्पाला अधूनमधून वाटे. स्वतः पूजा, आरती, केली नाहीच, पण वडिलांची आज्ञा म्हणून 'साक्षी' म्हणून हजर राहण्यासही चुकला नाही. ही आप्पाची वृत्ती राजा समजू शकत होता.

आप्पा मूळपीठाला जाई, नमस्कार कधी चुकविले नाहीत. (१९२८ नंतर) उपासही करी, पण ब्राह्मणभोजन, पूजा, आरती, देवाला भीक मागणे, देवाला भीड घालणे हे सर्व अंधश्रद्धेचेच लक्षण आहे असे तो मानी.

राजा त्याला आपल्या मार्गाने जाऊ देई. त्याने आप्पाने हे सर्व केलेच पाहिजे असा आग्रहही धरला नाही.

अनुक्रमणिका

राज्याच्या या व्यक्ति-प्रकृतीमध्ये आप्पा व त्याचे सर्व सापत्नभाऊ (पाच) व बहिणी (सहा) जखडून गेले होते. आप्पा त्यातून निसटण्याचा अर्धामुर्धा प्रयत्न करी. पण वडिलांची सेवा करण्याची, त्यांना सुख देण्याची, विश्रांती देण्याची भावना इतकी जबरदस्त होती की या राजाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जखड्यातून पूर्णपणे आप्पा सुटू शकला नाहीच. लग्नानंतर (१९४२) त्याच्या पत्नीला तर तिच्या स्वतंत्र बाण्याला अनुसरून आप्पाचे पूर्णपणे भावना-सुरक्षिततेकरता वडिलांच्यावर अवलंबून राहणे अगदी पोरकट वाटले यात नवल नाही. या असल्या भावना-प्रधान वातावरणात तिला साहजिकच गुदमरल्यासारखे झाले.

नलिनीचे वडील श्री. नटेश आप्पाजी द्रविड म्हणजे स्त्री-स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते. १९१० साली एका बालविधवेशी लग्न करून समाजक्रांतीचे शिंग त्यांनी फुंकले. आपल्या पत्नीला लग्नानंतर शिकवून स्वावलंबी बनविले. श्रीमती मथूताई द्रविड या सरतेशेवटी अमरावतीच्या स्त्री-शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापिका झाल्या.

श्री. नटेश आप्पाजी द्रविड हे नामदार गोखल्यांच्या बरोबर पुण्याच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे आद्य संस्थापक (१९०७). या अशा घरच्या संस्कारातून वाढलेली नलिनी औंधच्या सरंजामशाही, एका व्यक्तीच्या मर्जीप्रमाणे सर्व चक्रे फिरणाऱ्या या छोट्याशा संस्थानात आपला स्वधर्म व व्यक्तिमत्त्व, टिकवून संसार करण्याची खटपट तर करून राहिली व त्यात यशस्वीही झाली. पण ती गोष्ट वेगळी आहे. आप्पा १९३३ (ऑगस्ट)ला ऑक्सफर्ड व बार-एट-लॉ करण्याकरता विलायतला गेला आणि राजा १९३४ साली भयंकर आजारी पडला. राजाच्या आजारपणाची तार ऑक्सफर्डला आली. त्या वेळी आप्पाची मनःस्थिती काय झाली असेल त्याचे वर्णन अशक्य आहे. सर्व भावना-बुद्धी वडिलांत केंद्रित झालेली. आप्पाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे बव्हंशी वडिलांनी संस्कार केलेले. तेच वडील वारले तर ह्या व्यक्तिमत्त्वाचे (आयडेंटिटीचे) काय होणार? आप्पाला अस्तित्त्व काय?

मग तारांवर तारा ठोकून बरे झाल्यावर विलायतची सफर विश्रांतीकरता घेण्याचे वडिलांकडून कबूल करवून घेतले व मग आप्पाला जरा शांत वाटले. ऑक्सफर्डच्या तीन वर्षांत आप्पावर नवीन नवीन संस्कार झाले. साम्यवाद, वर्ण व वर्ग संघर्ष, युरोपमधील नात्झी व फॅसिस्ट लोकांच्या आडदांडपणे सत्ता कब्जा करण्याच्या कारवाया व त्यातून भयानक युद्ध निर्माण होणार की निश्चितता या सर्वांमुळे नवीन एक मोठे भव्य क्षितिज त्याच्या पुढे दिसू लागले. औंध, अंबाबाई, उत्सव, बाबा हे सर्व वेगळ्या दृष्टिकोणातून वेगळ्याच रूपाने पुढे येऊ लागली.

१९३५ साली जेव्हा राजा विलायतेला आपले भाचे बाळा महाराज पंडित व रामभाऊ चितारी (फोटोग्राफर) यांना घेऊन आला तेव्हा दोन महिने आप्पा त्यांच्याबरोबर युरोप-इंग्लंडमध्ये फिरला व बाबांना, हे सर्व नवीन भले लांब-रुंद क्षितिज (होरायझन)-ज्यावर एक मानवाच्या इतिहासाचा नवा कालखंड सुरू होत होता तो समजावून देण्याचा प्रयत्न करू लागला.

या वेळी आप्पाला वडिलांचे व्यक्तिमत्त्व-भावना-संस्कार याच्या पलीकडे काही कार्य आहे याची थोडीशी जाणीव झाली होती.

अनुक्रमणिका

पण हे कार्य कोणते, केव्हा, कोठे सुरू होणार याची काहीही कल्पना त्याला नव्हती. हिंदुस्थानातील स्वातंत्र्य संग्राम, काँग्रेस चळवळ, गांधी, नेहरू, पटेल वगैरेविषयी अगदी जुजबी, तुटपुंजीच समज त्याला होती.

१९३५ साली पंडित जवाहरलाल नेहरू जेव्हा कमला नेहरू व इंदिराला बरोबर घेऊन ऑक्सफोर्डला आले होते तेव्हा संभाषणानंतर काही प्रश्नोत्तरे झाली. त्यात आप्पाने धाष्ट्यानि उठून कर्कश आवाजात प्रश्न केला, "अहो स्वराज्याच्या सामन्यात हिंदी संस्थानिकांनी काय केले पाहिजे?"

सिंहासारखे चवताळून तरुण जवाहरलाल ओरडला, "नष्ट झाले पाहिजे !!"

झाले, आप्पाला एकदम डोंगरच कोसळला असे वाटले. औंध नष्ट व्हावयाचे? मग बाबा, अंबाबाई यांचे काय? बाबांना काय वाटेल? त्यांना मदत करण्याची, म्हातारपणी संभाळण्याची जबाबदारी, कर्तव्य त्याचे होते ना? मग हा जवाहरलाल तर सर्व नष्टच करू पाहात आहे. काय करावे? सुचेचना! एक नवीन व चैत्यन्यपूर्ण आयुष्याचे दालन खोलते आहे व नियती त्याच्याकडून काही करवून घेणार आहे याची अस्पष्ट अशी काही कल्पनाही आप्पाला नव्हती. बिचारा बार-अॅट-लॉ विनाकारणच झाला!! व एका प्रचंड वेगवान प्रवाहात तर अनेक काड्या, किडे, मुंग्यांप्रमाणे एक अननुभूत, चैतन्याचा थोडा अनुभव घेत घेत न कळत वाहू लागला. पण ही गोष्ट आता पुढचे प्रकरणी.

अनुक्रमणिका

# २ एक होता राजा

मानव नियतीच्या ताब्यात असतो की नियती मानवाच्या? एकाच वेळेला अनंत व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या कामात गर्क असतात. त्यांपैकी काही त्यांच्या मनात तसा हेतू नसताना सुद्धा आकस्मिक एकमेकांना अशा भेटतात? भेटल्यानंतर अगदी निराळ्याच प्रकारची कर्मे एकत्र येऊन कशी सुरू करतात?

मानवाला नेहमी अहंकार असतो की, मी हे योजिले, मी हे घडवून आणले, माझीच बुद्धी, माझेच योजनाचातुर्य, माझेच धाडस, माझीच शक्ती. किती प्रमाणात हे "माझेच," "माझीच" खरे आहे? मानवाच्या हातात जन्म घेण्याचे नाही, मी अमक्याच्याच पोटी जन्मीन, अजून तरी ते अशक्य दिसते. कदाचित यापुढे पेशीशास्त्र समृद्ध झाले तर मानवी वीर्य बँकांत ठेवून हा "मी" कोणा एकीच्या पोटी जन्मू शकेल. पण हा संकेत जन्मणारा "मी" करू शकत नाही तर प्रयोगशाळेतील डॉक्टर व ज्याला व जिला मूल हवे आहे ती व्यक्ती.

मोठे होत असताना कोण मित्र-मैत्रीण होईल, कोण शिक्षक भेटेल, कोणामुळे काय स्फुरण निर्माण होईल हेही व्यक्तीच्या हाती नाही.

संकल्प करूनही कोणत्या वेळी कोण कोठे भेटेल (चोर, स्त्री, संत, नेता, लॉटरी, मृत्यू) हे पूर्णपणे व्यक्तीच्या हातात नाही. मग हा "मी" "मी" चा अहंकार म्हणजे अज्ञानामुळेच ना?

आत्ता या क्षणाला आहे तेच आपले व त्यालाच पूर्णत्वाने सामोरे जाणे आपल्या, व्यक्तीच्या हातात आहे.

आयुष्याचा, नियतीचा डाव सारखा बदलत असतो. व्यक्तीच्या हातात फक्त ठरावीकच पाने असतात - त्याच्या पेशी, पेशीवर झालेले हजारो वर्षांचे संस्कार, त्याचे मज्जातंतू, त्यांचा मेंदू, त्याचे अवयव वगैरे.

ही हातातली पाने जर व्यवस्थित उत्तम स्थितीत असतील तर क्षणोक्षणी बदलणाऱ्या नियतीच्या डावाला व्यक्ती उत्तम सामोरे जाईल. जर ही पाने सुस्थितीत नसतील, त्याची किडनी, प्लीहा, लिव्हर, पचनक्रिया, फुफ्फुसे, काळीज, वगैरे व्यवस्थित काम करीत नसतील तर नियतीने मांडलेल्या डावाला त्या त्या क्षणाला तो उत्तम रीतीने सामोरा जाऊच शकणार नाही.

पण नियती म्हणजे कोणी एक मोठी व्यक्ती, कोठेतरी आकाशात बसली आहे व सर्व खेळ (लीला) खेळते आहे असे समजणे अज्ञानाचे होईल. विष्णू, शंकर, ब्रह्मा, काल्पनिकच.

असंख्य व्यक्तींच्या चेतनेतून व कर्मातून निर्माण झालेला कर्माचा प्रवाह म्हणजेच नियती. हा प्रवाह केव्हा कसा निर्माण झाला, त्याच्या पाठीमागे हेतू आहे का तो सहज (स्पाँटेनिअस) सुरू झाला? किती वर्षे चालणार? या प्रवाहाचा वेग, दिशा, व्यक्तीला बदलता येते का? का या अखंड प्रवाहाच्याच जोरात व्यक्ती व व्यक्तींचे समूह वाहून जाणार? प्रश्नच प्रश्न, अनेक ठिकाणी अनेक वेळी अनेकांनी यावर विचार केले, प्रमेये (हायपॉथिसिस) मांडली, गणिते केली, समजले, उमगले, सांगतो आता, माझ्या पाठीमागे या म्हणजे सर्व कळेल, असा डांगोरा पिटला. पण आहे ते वाहत आहे, बदलत आहे, क्षणोक्षणी वेगळे आहे.

त्याच्या पलीकडे ? "मौन. गुपचीप. आप्पा स्तब्ध राहा. चूप." (निसर्गदत्त महाराज १९८०)

राजाच्या छोट्या औंधच्या जीवनात अज्ञात व्यक्ती, अचानक, अकल्पित, एकदम कशा व का आल्या हे एक गूढच. यांपैकी अत्यंत महत्त्वाचे बदल करणाऱ्या दोन व्यक्ती परदेशीय, परभाषीय, परधर्मीय, वेगळ्या संस्कारांनी प्रेरित.

एक प्रमूख व्यक्ती मॉरिस फ्रीडमन-पोलंडमध्ये क्राकॉव्हला अत्यंत गरीब गलिच्छ ज्यू वस्तीत (घेट्टो) मध्ये जन्मलेला. वयाच्या तेराव्या वर्षांपर्यंत पांढरी ब्रेड खायला मिळाली नाही. दात घासण्यास टूथ ब्रश नव्हता!

पण प्रचंड बुद्धी व भावना. वर्गात नेहमी पहिला. पंधराव्या वर्षीच कॉलेजची प्रवेश परीक्षा पहिल्या नंबरात ९३ टक्के मार्क मिळून पास झाला, व इंजिनियर झाला. २१ व्या वर्षीच शंभर एक नव्या शोधांची आपल्या नावाची पेटंट घेऊ शकला. पण मन स्वस्थ होईना. मॉनेस्टरीमध्ये आश्रमात शिरला. मनन-ध्यान सुरू झाले. सैतान आपल्याला चिडवितो आहे. ह्या वेड्याने कड्यावरून स्व-परीक्षा व परमेश्वरावरील विश्वास व्यक्त करण्यास उडी मारली. झाडाला अडकले म्हणून वाचला!! हा मार्ग आपला नाही, आपण इंजिनियर, इलेक्ट्रिक यंत्रांचा शोध सुधारणेच्या मागे लागले पाहिजे असे मानून पॅरिसला कारखान्यात नोकरी सुरू झाली. थोड्याच दिवसांत संशोधनाची प्रमुख लॅबॉरेटरी त्याच्या ताब्यात आली. त्याच फॅक्टरीचा तो मुख्य मॅनेजर झाला. मग एकदम कृष्णमूर्ती हॉलंडमध्ये भेटले व हिंदुस्थानला जाण्याचा ध्यास लागला. (१९३३)

याच वेळी म्हैसूर संस्थानचे प्रगतिशील व विद्वान मुख्यमंत्री सर मिर्झा इस्माईल पॅरिसमध्ये संस्थानच्या उद्योगीकरणासंबंधी विचारविनिमय करण्याकरता आले होते. (१९३५) म्हैसुरात सर एम. विश्वेश्वर अय्या यांच्या कारकीर्दीत अनेक धरणे बांधली गेली होती. विद्युत्-उत्पादन वाढत होते. अशा वेळी सर मिर्झांना विजेची उपकरणे व यंत्रे तयार करण्याचा कारखाना काढायचा होता. त्यासाठी अनेक कारखाने पाहता पाहता एक दिवस मॉरिस फ्रीडमनच्याच कारखान्याला त्यांची भेट झाली. योगायोग की अत्यंत चाणाक्ष सर मिर्झावर मॉरिस फ्रीडमनची जादू पडली व त्यांनी त्याला म्हैसूरला बोलाविले.

झाले, एक महिन्यातच मॉरिस बंगलूरला येऊन पोचलाही व गव्हर्नमेंट इलेक्ट्रिक फॅक्टरीचा मॅनेजर म्हणून जुळवाजुळव करू लागला. अचानक, अकल्पित योगायोग तो असा.

पुढे १९३७ साली इंग्लडचे शिक्षण पुरे करून आप्पा हिंदुस्थानात पोचला. औंधमध्ये काय करायचे, वडिलांना मदत म्हणजे काय? वगैरेचे काहूर डोक्यात होते. त्याच्या डोक्यात मार्क्स. लेनिन, क्रांती, स्वातंत्र्य, समता, वगैरेही कल्पना भोंगळ स्वरूपात अस्ताव्यस्त भरल्या होत्या.

स्वभाव भावनाप्रधान, सुबुद्धता जवळ जवळ नाहीच. त्यामुळे नवे, झगझगणारे, चैतन्यरूप पाहिले की आप्पाला ते 'फॅन्टॅस्टिक' 'वंडरफूल' 'सुपर्ब' वाटे. भुरळून जाई. भ्रमिष्टासारखा त्याच गोष्टीचे मागे कानात वारे भरल्यासारखे धावे. राजाला त्याला संभाळूनच कामाला लावावयाचे होते. हारतुरे, मिरवणुकी, मेजवान्या संपल्यावर राजाने अप्पाला संस्थानचा दौरा करून येण्यास सांगितले. काय काय 'आम्ही' सुधारणा केल्या आहेत ते पाहा. मग हळूहळू कारभार हाती घे. मी आहेच तुझ्या मागे.

याचे वेळी औंध कौन्सिलचे कुंडल-किर्लोस्करवाडीचे नियुक्त सभासद सांब दर्शने होते. आप्पावर त्यांचा विनाकारण लोभ. अगदी आपल्या धाकट्या भावासारखा. राजापाशी स्वतःच्या चारित्र्यामुळे व स्पष्टोक्तीमुळे उत्तम वजन. राजाला त्यांनी सुचविले की आप्पाला तीन महिने म्हैसूरला पाठवू या. तिथे राज्यकारभार उत्तम कसा चालतो हे पाहायला मिळेल. मग औंधमध्ये त्याला काम करू दे.

सांब दर्शने याच वेळी बंगलोरमध्ये किर्लोस्करांचे एजंट म्हणून काम पाहात होते. त्यांच्या घरीच अप्पाचा मोटार, हुजऱ्या, आचारी, ड्रायव्हरसकट मुक्काम. तीन महिने!!

पहिल्या प्रथम सर मीर्झांची गाठभेट वगैरे औपचारिक झाले. चहा बिस्किटे संपली. कामाला जुपी झाली.

एक-दोन आठवड्यानंतर कारखाने बघण्याचा कार्यक्रम सुरू झाला. या वेळेपर्यंत १९३५ ते ३८, मॉरिस फ्रीडमननी त्यांचा कारखाना तर मोठ्या नावारूपाला आणला होता. जिकडे तिकडे त्यांच्या बुद्धीचे, इंजिनियरिंग ज्ञान कल्पकतेचे सत्वर कौतुकच होई.

पण, म्हैसूर संस्थानात आल्यापासून मॉरिसची वागणूक विचित्र. जगावेगळी. सर्वचा सर्व पगार (३००० रु.) गरीब विद्यार्थ्यांना वाटून टाकावयाचा. भगवान रमण महर्षीच्याकडे जाऊन दिवस-दिवस बसे. सारखे प्रश्न, चर्चा करून त्यांना सतावून सोडे. मला संन्यास द्या, म्हणून त्यांच्या पाठीमागे लागे.

रमण महर्षींनी त्याला भगवी वस्त्रे देण्याचे साफ नाकारले म्हणून दुसऱ्या कोणा अज्ञात साधूकडे जाऊन भगवी वस्त्रे घालून “स्वामी भारतानंद” झाला. रमण महर्षी व श्री कृष्णमूर्ती “वेडा रे वेडा,” म्हणून हसली. पण मॉरिस हटवादीच.

सर मिर्झांनी मात्र सांगितले, धर्म, ध्यान हे तू काहीही कर पण कारखान्यात व आम्हाला तू इंजिनियर म्हणूनच हवास. स्वामी म्हणून नाही. कारखान्याला भेटीकरता कोण, ‘महत्त्वाचा,’ माणूस आला की हा भगवा पोशाख चालणार नाही, सुटा-बुटात नाहीतर म्हैसुरी कपड्यात तुला आले पाहिजे.

बिचारा मॉरिस, आप्पाच्या कारखान्याच्या भेटीच्या वेळी त्याला सूट-बूट घालावयाला लागले होते. नाखुषच होती स्वारी.

अप्पा मोटारीतून ऐटीने उतरून हसत हात पुढे करतो तो चिडक्या रागीट आवाजात मॉरिस म्हणतो- “काय राजपुत्र, इलेक्ट्रिसिटी-इंजिनियरिंगसंबंधी काही आपल्याला कळते का? की मी माझा महत्त्वाचा वेळ विनाकारण दवडतो आहे?” ही पहिली सलामी ! आप्पाला नेहमीच घमेंड असे की, आपली छाप पाहता क्षणी दुसऱ्यावर नेहमी पडते म्हणून. पण मॉरिसच्या या तडाख्याने घमेंड वितळून रागाचा पारा चढला व म्हणाला, “बरे मी जातो. आपल्याला विनाकारण त्रास दिला, क्षमा करा.”

लागला आप्पा मोटारीत बसायला. मग, एकदम मॉरिसची स्वारी शुद्धीवर आली व म्हैसूर संस्थानच्या पाहुण्यांशी असे वागायला नको होते हे लक्षात आले. दोघांचे अर्ध्या तासात सूत जमले.

अनुक्रमणिका

शास्त्रशुद्ध, तडफदार, सरळ, सोपी, पण पूर्णपणे तर्कशुद्ध विचारसरणी, स्पष्टोक्ती, पण जात्याच प्रेमळ वृत्ती व सर्वांत आधी म्हणजे विचाराबरोबर ताबडतोब आचार कसा करावयाचा, कामाला सुरुवात कशी करावयाची, साधने कोणती, खर्च किती या सर्वांचा साकल्याने विचार व मग कामाला सुरुवातच.

महिनाभर मग दोघे भेटतच राहिले. खूप नवे नवे विचार, दृष्टिकोण आप्पासमोर आले व एकदम मॉरिसला तो म्हणाला, "मॉरिस, औंधला एक सहा महिने चल. मला गावची सुधारणा करण्याचे जे वडिलांनी ३० वर्षांपूर्वी काम सुरू केले आहे त्याला गती द्यायची आहे. औंध संस्थान गरीब आहे. सहा महिन्यांचा ५०००० रुपये पगार आम्हाला सोसणार नाही पण खाणे-पिणे, प्रवास आपण बरोबर करू. येतोस?"

मॉरिस म्हणाला, "सर मिर्झांना विचार." आप्पाने विचारले. सर मिर्झा म्हणाले, "हो जरूर, पत्र पाठवा राजेसाहेबांचेकडून."

बंगलोरच्या उरलेल्या दिवसांत मॉरिस आप्पाला रमण महर्षींच्या आश्रमात चार दिवस घेऊन गेला व 'भेटू लवकरच', म्हणून दोघे आपापल्या दिशेने चालते झाले.

औंधला परत आल्यावर (नोव्हेंबर १९३७) आप्पाने राजाकडून सर मिर्झांना मॉरिसबद्दल पत्र लिहविले. आठ दिवसांत त्याचे उत्तर आले, "मॉरिस कामाचे गडबडीत आहेत, येऊ शकणार नाहीत. दिलगीर आहे !!!"

आपली छाप सर्वांवर पडते या आप्पाच्या अहंकाराला आणखी एक तडा गेला. बिचारा गप्प बसला.

विचार करू लागला, कशी कामाला सुरुवात करावी? काय करावे?

तात्या इनामदार औंध सोडून गुजरातेत इंदूर संस्थानात शिक्षणाधिकारी होते. त्यांच्यावर अप्पाचा विश्वास व जरी ते त्यांचे भाचे होते तरी वडील बंधूचे प्रेम त्यांच्यावर. तात्यांना बोलावले. धोंडोपंत मास्तर, पाठक, मास्तर, जोशी मास्तर, बाबूराव बापट यांच्याशी विचार-विनिमय सुरू झाला. संस्थानच्या सर्व लहान-थोर व्यक्तींची गुप्त व सामूहिक चर्चा झाली. त्या वेळी श्री. नानासाहेब चापेकर हे संस्थानचे सरन्यायाधीश होते. त्यांच्याशी अनेक दिवस बोलणी झाली. अत्यंत बुद्धिमान, तडफदार व प्रेमळ आण्णासाहेब बखले यांचे व आप्पाचे सूत जमले व त्यांचे विचार ऐकले.

मग किर्लोस्करवाडीला जाऊन श्री. लक्ष्मणराव (लखूमामा) यांच्याशी खूप विचार-विनिमय केला. श्री. शंतनुराव आपल्या कामात गर्क असत पण या वेळी व पुढेही सौ. यमुनाताई किर्लोस्करांनी अगदी धाकट्या भावासारखे लेखून संस्थानच्या सुधारणेबाबत आपलेही विचार त्याला सांगितले. आप्पाचे लहानपणचे आदर्श - 'हीरो' -शंकरभाऊ किर्लोस्कर हसतखेळत गप्पा मारीत शिकवायचे आप्पाला. शिकार, पिक्‌निक्, फोटोग्राफी, प्रवास, सिनेमा, नाटके, क्रिकेट मॅचेस या सर्वांत अनेक वेळा त्यांनी आप्पाला २०-२५ वर्षांनी लहान असूनसुद्धा आपल्या बरोबरीने वागविले होते. त्यांच्याशी गप्पा झाल्या.

मग आप्पा ओगलेवाडीला गेला. तेथील सर्वांच्यात तो नेहमीच अगदी कुटुंबियांसारखा वावरे. चुलतबंधू आण्णासाहेब ह्यांचे घरी वहिनींचा व वहिनींच्या मातोश्री श्रीमंत ताई पाठक (लखू-पोपट-बाबूंच्या माताश्री) यांच्या सुग्रास स्वयंपाकावर ताव मारीत थट्टामस्करीत आत्मारामपंत, नागूदादा, आबा, व्यंकू, अवधूत

ओगले यांचे बरोबर चारसहा दिवस त्यांची दृष्टिकोण व त्यांची विचारपद्धती समजावून घेतली. ओगलेवाडीस या वेळी दूरवर विचार करणारे व विधायक मतप्रणालीचे सदाशिवराव पाध्ये हे ग्लास वर्क्सचे जनरल मॅनेजर होते. त्यांच्या विचार-आचारांचा आप्पावर मोठाच परिणाम झाला. सरते शेवटी औंधात पंडितजी सातवळेकर यांचे संस्थानच्या प्रगतीसंबंधी व पुढील कार्य व कार्यपद्धती यासंबंधी विचार समजावून घेतले. याचबरोबर गावसफाई, श्रमदानाने रस्ते करणे, बाजारकट्टे करणे, शाळा, पंचायती, हरिजनांचे तक्के दुरुस्त करणे ही कामे जोराने सुरू झाली. सर्वजण भारून मजेत कामात सामील होऊ लागले. अधिकारीवर्गही धोतर पगडी सावरीत सावरीत मदर करू लागले. या सर्वांत अगदी बरोबरीने जबरदस्त कामाला जुपी करून घेणारा बाबू बापट लहानपणचा लंगोटी यार. यालाच आपला सेक्रेटरी म्हणून नेमावा अशी आप्पाची मनीषा.

पण ही दुक्कल लहानपणापासून काय काय खेळ खेळत आली होती हे राजाला माहीत होते की काय कोण जाणे... एक दिवस पगडी घालून अगदी अदबीने नमस्कार करून कुंडलकर राम हॉलमध्ये, जिथे अप्पाचे वास्तव्य, ऑफिस, व्यायाम, घर, आल्या-गेल्या पाहुण्यांची व्यवस्था करणे हे सर्व एकवटलेले होते, तिथे आले व म्हणाले, "मी आपला सेक्रेटरी, महाराजांनी मला आपल्याबरोबर राहून सर्व काम करण्यास सांगितले आहे."

आप्पाला एकदम वडिलांचा राग आला. हे काय? मला आता कोणाला सेक्रेटरी म्हणून घ्यावा, घेऊ नये हेही कळू नये का?

पण चूप बसला. बंगलोरच्या सफरीत कुंडलकर बरोबर होतेच. पुढील दहा वर्षे स्वतःच्या तब्येतीकडे न पाहता, घरकाम, कुटुंब, वडील-मातोश्री यांच्याकडे दुर्लक्ष करून अत्यंत नेकीने, निष्ठेने, कार्यक्षमतेने, कोणास कधीही न दुखवून, मोठ्या समजूतदारपणाने, चोख, भरीव सेवा 'आपला धर्म' म्हणून कुंडलकर यांनी औंध, औंधचा राजा व प्रजा यांची अत्यंत झपाट्याने बदलत्या काळात केली. धन्य त्याची....धन्य अप्पाच्या नशिबाची की त्याच्या उतावळी, भावनाप्रधान, आधी कार्य व मग विचार ह्या प्रवृत्तींना कुंडलकर यांनी नेटाने ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला.

या सर्व खेळ, गप्पा, विचार-विनिमय, व्याख्यान, प्रवासातून हळूहळू हे दिसू लागले की राजाने खूप धडपड केली. एक शुद्ध सात्त्विक वातावरण निर्माण केले, लोकसंग्रह केला, विचारवंत, आचारवंत, कर्मवीर जवळ केले. टीकाकारांनाही जवळ बसविले.

प्रजेमध्ये आपल्याबद्दल प्रेमादर निर्माण केला. या बरोबर राज्ययंत्रणा, अधिकारी सर्वच योजना बरोबर राबवून लोकांच्यापर्यंत त्यांचे लोण पोचविण्यास असमर्थ ठरल्या.

अधिकारी.... 'अधिकारी'....म्हणूनच वागत. राजा साधेपणावर भर देई. आपल्या साधेपणाचा, जरा जादा अहंकारही त्याला होता. तो लोकांना बोचेही, पण लोकजागृती व स्वतःच्या कर्तव्यकर्माबाबत जितक्या प्रमाणात राजा खटपट करीत होता तितक्या प्रमाणात ती वठली नाही.

अनुक्रमणिका

सरंजामशाही, राजा मालक, आम्ही प्रजा, तोच पोटाला देणार, त्याचेच अन्न आम्ही खाणार, ही गुलामी वृत्ती नवीन जगाची जी घोडदौड चालू झाली होती त्याला विसंगती होती. आप्पाला या लाचार, भेकड, भोळ्या प्रवृत्तीबद्दल, वडिलांच्याबद्दल प्रेमादर असूनसुद्धा भयंकर चीड येई.

आप्पा आला विलायतेहून तो सर्वच्या सर्व त्याला अगदी लवून खाली वाकून नमस्कार करताना पाहून तर त्याच्या अंगावर शहारे आले. बोटीवरून उतरल्याबरोबर सामोरे येणारांत पाठक मास्तर ('अरे पोऱ्या' म्हणणारे) होते. त्यांनीही आप्पाला खाली वाकून नमस्कार करण्यास सुरुवात केल्याबरोबर आप्पा धावलाच व ओरडून म्हणाला, "पाठीचा कणा ताठ ठेवावयाचा. आता स्वातंत्र्य येणार, लाचारी, भीती जाणार. मास्तर हे तुम्हीच मला शिकविले आणि हे काय?"

मास्तर शरमले, म्हणाले, "मला आवरले नाही, जुने संस्कार अजून डोकावतात" -पाठक मास्तरांच्यासारख्या विचारी, धाडसी, स्पष्ट बोलण्यास न भिणाऱ्या माणसाचे हे असे तर इतर भिकमागू घाबरटांचे काय? अप्पा सुन्न झाला.

खरंच, जसे व्यक्ती व अधिकारयंत्रणा यांचे संबंध असतील तसाच समाज निर्माण होतो. अधिकारी पुरुष, पुढारी, बुवा, महंत, गुरू, मुल्ला, बिशप, यांच्यासंबंधी हे आमचे पालनपोषण करणारे, हेच आम्हाला शिक्षा करणार, बक्षीस देणार, वाट दाखवणार, मोक्षाला नेणार, स्वर्गाची किल्ली यांच्याच हातात, अशी प्रवृत्ती असलेला समाज स्वातंत्र्य मिळवू शकत नाही व ते मिळाले तर पुढाऱ्यांचे, हाती ते येऊन पुन्हा आपला भयग्रस्त, भिकारी, भयभीतच राहतो.

स्वतंत्र, समाजनिर्मितीला स्वतंत्र बाण्याचे, सुबुद्ध, कार्यक्षम, संयमी, शिस्तीने चालणाऱ्या नागरिकांची जरुरी असते. कोणतीही राज्यपद्धती, पार्लमेंटरी अथवा प्रेसिडेन्शियल, अथवा साम्यवादी आणली तरी भेकड, दुर्बल नागरिक असतील तर व्यक्ती दारिद्र्यात, लाचारीत, गुलामगिरीतच राहणार.

इतक्या वर्षांचे शुद्ध संस्कार या राजाने देण्याची खटपट करूनही औंधची प्रजा भेकड, भोळसट, लाचार खरीच होती का? का नुसती गप्प वाट पाहात बसली होती, काही नवचैत्यनाची?

आप्पाला हे लवकरच उमगले. बातमी आली की औंधच्या पंढरपूरनजिकच्या आटपाडी भागात लोक जागृत होऊन सारासूट मागत आहेत, ब्रिटिश राजवटीत सारा जसा आहे, तसा ताबडतोब झाला पाहिजे, नाहीतर सारा बंद म्हणत आहेत. सभा भरवत आहेत, मिरवणुका निघत आहेत. चार-पाच हजार आटपाडीचे गरीब बेचैन शेतकरी औंधवर (आटपाडीपासून साठ मैल लांब-बस वाहतूक त्या वेळी नव्हती.) मोर्चा घेऊन निघाले आहेत. झाले, राजा विचार करू लागला. माझे प्रजाजन असंतुष्ट का? दिवाण दर्शने होते, होम-म्हणजे पोलिस पंडितराव हिवरेकरांच्याकडे, मुख्य पोलिस पटवर्धन, ट्रेझरी ऑफिसर व्ही. के. कुलकर्णी, सारे राजाच्या चित्र काढण्याच्या खोलीत जमले. राजाला सल्ला देण्याकरिता आपापले विचार मांडू लागले. दिवाण म्हणाले, "चावट लोक असा कितीसा सारा देतात? त्यांना दाद देता कामा नये, सूटबीट दिली तर संस्थानचा खर्च कसा चालणार?" पटवर्धन हे ब्रिटिश आमदानीतील निवृत्त अधिकारी. बंदोबस्त करण्याची सवय. लोकांवर फक्त दहशतीनेच (त्या वेळी भ्रष्टाचाराचे भूत उठले नव्हते नाहीतर सल्ला आला असता पैसे द्या) राज्य करता येते. सुव्यवस्था ठेवता येते. या जमावाला राजवाड्यापाशी येऊन येता कामा नये.

“आगबीग लावायला हे वात्रट लोक कमी करणार नाहीत. मी पोलिस बंदोबस्त करतो, गावाबाहेरच्या मैदानात (खेळण्याच्या) त्यांना नेऊ, तिथे सभा भरवू देत. आम्ही सर्व रिपोर्ट महाराजांना देऊ.”

पंडितराव हिवरेकरांच्या तोंडात विड्याचा तोबरा होता. ते बोलायला सुरू करणार इतक्यात आप्पाने प्रश्न केला आपल्यापाशी पोलिस आहेत किती? सर्व संस्थानात फक्त २५ पोलिस होते. त्यांपैकी औंधला सहा-सात असत. त्यांपैकी तुरुंगावर राखण म्हणून एक, डी. एस. पी. च्या ऑफिसात दोन. मग चार पोलिसांमार्फत सहा हजार लोकांचा हा भावनाप्रधान लोंढा कसा थोपवावयाचा ? बंदोबस्त ?...

आप्पाने सुचविले, “बाबा, मी बाबू बापट व पाठक मास्तर आम्ही या मोर्चाला सामोरे जातो. मी त्यांच्याशी बोलीन, पाहू काय होते ते.”

आतापर्यंत पंडितराव हिवरेकरांचा घसा साफ झाला होता. घोगऱ्या आवाजात ते म्हणाला, “मी सगळ्या लोकांना भात कालवणाची व्यवस्था करतो, आताच ५ आचारी कामाला लावतो. रमण्याची मोठी भांडी आहेतच तयार. शाळेतील १० मुले व्हॉलंटिअर म्हणून घेतो.”

झाले, अर्धी चड्डी, गांधी टोपी, औंधमध्येच बनविलेल्या पठाणी चपला घालून आप्पा, पाठक मास्तर बाबू बापट, बाबूचे वडील आण्णा बापट (हे आटपाडीला अनेक वर्षे मामलेदार म्हणून राहिले होते) यांना घेऊन पायी निघाला.

दीड एक मैल आटपाडीच्या मार्गावर गेला असेल तो दुरून जय हो, जय हो, महात्मा गांधी की जय, जवाहरलाल नेहरूकी जय, इन्किलाब झिंदाबाद वगैरे ठरावीक साच्याच्या घोषणा ऐकू येऊ लागल्या. कोणी बातमी आणली की तात्यासाहेब शिखरे, दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे सरचिटणीस मोर्चाच्या अग्रभागी आहेत. बातमीदार म्हणाला, त्यांची भाषणे फार तिखट असतात. दुसरा बातमीदार म्हणाला, शंकरराव देव, अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीचे मेंबर हे स्पेशल मोटार घेऊन येणार व संध्याकाळी जाहीर सभेत बोलणार आहेत.

आप्पा एखाद्या स्वप्नात असल्यासारखा सर्व नुसता पाहात, ऐकत होता. आपण काय करावे, कसे करावे याचा विचारच त्याच्यापाशी नव्हता. सर्व आपोआप होत होते.

मोर्चा जवळ आल्यावर पुढील घोळक्यात तात्या शिखरे यांची शेकाटी मूर्ती, जाड पांढऱ्या मिश्या, रागीट चेहरा, किलबिले डोळे व हातात चांदीच्या मुठीचा सोटा दिसू लागला.

जथ्यातील काही लोकांनी आप्पाला पाहिले. तो त्यांना एक पहिला आश्चर्याचा धक्का बसला. त्यांना सांगितले गेले होते की, प्रचंड त्याग करावा लागेल, छातीवर गोळ्या झेलाव्या लागतील. हे राजे लोक तुमची पिळवणूक लढा दिल्याशिवाय सोडणार नाहीत. त्यांना ताळ्यावर आणण्यास एकी केली पाहिजे, वगैरे नेहमीचेच.

अनुक्रमणिका

पण ते त्यांच्या समोर पाहतात तो, पिळवणूक करण्याऱ्या राजाचा नुकताच इंग्लंडहून परतलेला उंचा पुरा लांड्या चड्डीत वावरणारा राजपुत्र. एक-दोन मिनिटेच ही स्तब्धता टिकली व कोणी तरी म्हणाले, “औंध संस्थानचा जय हो,” दुसरा म्हणाला, “आप्पासाहेब महाराजकी जय....”!!!

झाले, गोंधळ सुरू झाला. ह्या घोषणा देणारा व विरुद्ध बाजूने बातचीत व आरडाओरडा सुरू झाला.

इतक्यात आप्पाच पुढे जाऊन म्हणाला, “बाबा आपल्या सर्वांशी बोलू इच्छितात. पण दमून आला आहात आपण सर्व, आधी जेवा, तयारी आहे. दुपारी चार वाजता वाड्यापुढे आपण जमू, बोलू. सर्व काही सर्वांच्या कल्याणाकरिताच करू. जयहिंद.”

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. एकदम मोठी गर्जना झाली, “आप्पासाहेब महाराजांचा विजय असो. भवानराव महाराज की जय.”

आटपाडीची बत्तीस गावे, व गुणडाळ तालुक्यातील सोळा नेहमीच दुष्काळी. दहा वर्षांतून सात वर्षे दुष्काळ. एक वर्ष उत्तम व दोन वर्षे मध्यम. असेच अनेक वर्षांच्या अनुभवाचे. इतर दक्षिणी संस्थानांप्रमाणे ब्रिटिश मुलखापेक्षा दुप्पट तिप्पट जमीनसारा जास्त. शेतकऱ्यांचे मागणे रास्तच होते. पण औंधची परिस्थिती फारच केविलवाणी झालेली होती. १८४८ साली ब्रिटिशांनी जबरदस्तीने औंध संस्थानचा बागेवाडी हा सुपीक तालुका २४ गावांचा ताब्यात घेऊन त्याऐवजी १९ दुष्काळी मुलखातील गावे औंधला दिली. खरे म्हणजे या वेळी औंध संस्थान असे नव्हतेच, कराडचे प्रतिनिधी म्हणूनच ते ओळखले जात. कराड, बागेवाडी तालुक्यासह हा सर्व मुलूख इंग्रजांनी ताब्यात घेतल्यानंतर श्रीनिवासराव महाराज औंधला जगदंबेपाशी, राहायला गेले व तेव्हापासून प्रतिनिधींचा मुलूख औंध संस्थान, म्हणून समजला जाऊ लागला.

पण १९४८ च्या पूर्वीचा प्रतिनिधींचा १८ लाख रुपये (त्या वेळचे, आज १८० कोटी किंमत) चा मुलूख फक्त दोन लाख रुपये उत्पन्नाचा झाला. मग खर्च कसा भागणार? हत्ती, घोडे, अंबाऱ्या, हौदे, हुजरे, उत्सव, पूजा, वगैरे कसे चालणार? म्हणून सारा वाढतच गेला व शेतकऱ्यांमध्ये असंतोषही.

१९२० सालापासून शेतसाऱ्याबद्दल तक्रारी राजा निमूटपणे ऐकी. लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करी. पण लोकांनाही या राजाच्या मोटारी, हत्ती, लवाजमा, उत्सव दिसतच होते. दुसरे गत्यंतर नाही म्हणून लोक सहन करीत गप्प होते. १९३० - ३५ पर्यंत हा असंतोष वाढतच गेला. राजाचे कुटुंबही वाढायला लागले. त्याबरोबर खर्चही वाढला. दुसऱ्या मुलाला तर राजाने विलायतेलाही पाठविले. विमान ग्लायडरचे शौक पुरविले. स्वतः वृद्ध असूनही मुलाबरोबर एकटा त्याच्या दोन सीटच्या उघड्या विमानात बसून नवशिक्या, विमानपटूचे कौतुक करावयाचे म्हणूनच केवळ त्याच्या बरोबर आटपाडी, कुंडल तालुक्याला भेटी दिल्या. धाडस केले खरेच. पण हा खर्च वाजवी, जरुरी का? असे प्रश्न गरीब ग्रासलेल्या शेतकऱ्यांच्या पुढे आले नसले तरी ते पुढारी-औंध संस्थानचे व दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे -उदाहरणार्थ तात्यासाहेब शिखरे, वामनराव पटवर्धन, कणबूर (गोविंदराव) यांनी निर्माण केले.

शेतकरी संघटना आटपाडी तालुक्यात १९३० सालापासून दृढमूल झाली. १९३५ पर्यंत विश्वनाथपंत दर्शने, रस्तुमराव देशमुख, गणेश बंडो देशपांडे, मिटूलाल कलाल, कुरेशी वकील ही मंडळी सारासुटीबद्दलच्या

चळवळीच्या कार्याला लागली. याच काळात राजाचे अचानकपणे आजारपण, व त्याचा प्रकृतिस्वास्थाकरता केलेला परराष्ट्रप्रवास १९३५ आणि अधिकारीवर्गाची बदलत्या काळाची रूपे ओळखून पाऊल टाकण्याची असमर्थता, यामुळे आटपाडीत व इतर ठिकाणी असंतोष वाढत गेला.

अभ्यंकर, तात्यासाहेब शिखरे, वामनराव पटवर्धन व त्यांचे चिरंजीव शासाहेब व इतर स्थानिक संस्थांनी पुढाऱ्यांच्या कार्याला ब्रिटिश हिंदुस्थानमध्ये, प्रांतातून जी मर्यादित लोकशाही सुरू झाली व त्याला प्रतिसाद म्हणून कॉंग्रेसने जे नऊ राज्यांत अधिकारग्रहण केले, त्यामुळे वेग तर प्रचंड आला. आता ही जुनीपुराणी सरंजामशाही टिकणारच नाही. राजे नष्ट होणार, लोकांचे राज्य येणार अशी स्वप्ने अनेकांना पडू लागली.

ब्रिटिशांनी हे सर्व जरूर ओळखले व सर्वच संस्थानिकांना त्यांनी काळाची पाऊले ओळखा, अन्याय, अत्याचार दूर करा, लोकांच्या रास्त मागण्या स्वीकारा, स्वतःवरचे खर्च कमी करा, असा सल्ला वारंवार दिला.

राजेलोकही हे सर्व पाहात होते. गोंधळले होते. बेचैन होते. पण इतक्या दिवसांच्या सवयी, सरंजामशाही संस्कार, आपमतलबी, खुशामती सल्लागार, व्यसने व दूरवर विचार करण्याची जवळ जवळ सर्वच्या सर्व संस्थानिकांची असमर्थता, त्यामुळे व कोणत्याही परिस्थितीत ब्रिटिश आपले संरक्षण करतीलच ही भोळी कल्पना यामुळे संस्थानिक हतबल राहिले.

त्यातल्या त्यात बडोद्याचे सयाजीराव गायकवाड व म्हैसूर त्रावणकोरमधील संस्थानिकांनी स्वयंप्रेरणेने व योग्य सल्लागार मिळाल्याने काळाची काही पाउले ओळखली होती. प्रचंड प्रगतीही केली होती. पण या राजेलोकांत अशीही एक कल्पना दृढमूल होती की, ब्रिटिश अजून शंभर-सव्वाशे वर्षे तरी हिंदुस्थान सोडीत नाहीत. राजे-रजवाडे, मुस्लिम लीग, यांना हाताशी धरून कॉंग्रेसला ते मोडून झोडपून काढणार. हे ठिकठिकाणी करता यावे म्हणून सर्वच संस्थानिकांना ब्रिटिश सल्ला देतच होते, ‘तुमची पोलिस खाती कार्यक्षम करा, आमच्याकडून तरबेज पोलिस ऑफिसर घ्या, स्वसंरक्षणाला तयार राहा’ वगैरे.

म्हणून संस्थानिक, स्वस्थ होते पण घाबरलेही होते. कारस्थाने, कारवाया करीत होते, पण आपल्या प्रजाजनांशी बोलण्याला, त्यांची समजूत घालण्याला धाडस करीत नव्हते. त्यांच्यात आपल्या प्रजेबद्दल प्रेम नव्हते की काय? प्रेम असेल तिथे भीती, क्रोध, तिरस्कार, कारस्थाने यांची जरुरी काय? सर्वच्या सर्व संस्थानिक अगदी चांगले होते हे म्हणणे अगदी बरोबर होणार नाही. तसेच्या सर्वच्या सर्व प्रजेचे पुढारी, ‘कार्यकर्ते’ (!!) अगदी धुतल्या तांदळासारखे होते हेही म्हणणे चूक होईल.

सांगली, फलटणसारख्या संस्थानांतून प्रगतीची पावले पडत होती व रावबहादूर गोडबोले, डे सारखी ज्ञानी, अनुभवी माणसे योग्य सल्ला देण्याची खटपटही करीत होती. तशीच संयमी व कर्तबगार, त्यागी, निर्भयपणा, माणुसकी न सोडणारे असे प्रजेमध्ये कार्यकर्तेही होते.

पण काळच इतक्या झपाट्याने बदलत गेला, विशेषतः दुसऱ्या जागतिक लढाईच्या काळात-की राजे, प्रजा, प्रजेचे कार्यकर्ते पुढारी, खुद्द ब्रिटिश सरकार व कॉंग्रेसही-अनेक वेळा निसरड्या उतारावरून पळताना जशी तिरपीट उडते असे सर्वांचेच झाले.

ब्रिटिश सरकारचा संस्थानिकांना सल्ला (म्हणजे हुकूमच, ताटाखालील मांजरेच होती ती. त्यांच्या संरक्षणाशिवाय काय चालणार होते राजेलोकांचे?) अनेक वेळा परस्पर विरोधी या काळात (१९३७-४७) होत गेला.

दक्षिणी संस्थानचे एजंट जनरल (ए. जी. जी.) कोल्हापुरात राहात. निष्णात अनुभवी पोलिटिकल डिपार्टमेंटचा बहुतेक कर्नल या जागी असे, त्याचे गुप्तहेर खाते राजेरजवाड्यांच्या कुलंगड्यांचा बरोबर हिशेब ठेवी. राजा जरा टुरटुर करू लागला की गुप्त फाईलच त्याच्या पुढे टाकली जाई की आला बिचारा पुन्हा दावणीवर!!

ए. जी. जी.चा पट्टेवाला कारकून जरी संस्थानात भेटीसाठी आला तरी संबंधित अधिकारीच नाही तर राजे, प्रधान, दिवाण, राणी, राजपुत्र सर्वच्या सर्वच त्यांच्या सरबराईच्या संबंधी काळजीत पडत.

मग ए. जी. जी. आला तर पुण्याहून सर्व सामान, बर्फ, कोंबडी, बकरी (स्थानिक पसंत न पडली तर), पाव, लोणी, चहा, इतर पेये व खानसामा वेटरही, असा सर्व सरंजाम येई. कधी कधी तंबू, टेबले, खुर्च्याही येत, अर्थात खर्चाकडे कोण बघतोय? हिशेब ठेवण्याचे नावच नसे. इतकेच की ए. जी. जी. साहेब ४-२ वर्षांतून एखादेच वेळी दर्शन देत ! काही अगदी कमी-जास्त असेल तर मात्र गोष्ट वेगळी.

बिचारे संस्थानिक, एका बाजूला ब्रिटिश सरकार व दुसऱ्या बाजूस कॉंग्रेसने उठवलेले प्रजाजन. अनेक वेळा त्यांचीच दया आल्याशिवाय राहिली नाही. १९३० मध्ये असे हे वेगवेगळे परस्पर विरोधी, संघर्षात्मक, राजकीय, शासकीय, आर्थिक सामाजिक प्रवाह जोराने वाहात होते आणि यातच आप्पाचा पहिला अनुभव आटपाडीचा या भव्य मोर्चाचा.

दुपारी दोन-अडीच वाजल्यापासून जेवण करून ही सर्व मंडळी वाड्यापुढे जमू लागली. त्यांना काय घोषणा द्यायच्या, राजाशी कोणी बोलावयाचे वगैरे रस्तुमराव, गणेश बंडो समजावीत होते.

या आटपाडीच्या पुढाऱ्यांत, मुख्य रस्तुमरावच. देशमुख असल्याने व सडेतोड, सरळ व तसा प्रेमळ स्वभाव असल्याने बहुजन समाज रस्तुमरावांच्याच पाठीमागे होता. राजाबद्दल रस्तुमरावाला प्रेमादर होता, पण अधिकारीवर्गाबद्दल प्रचंड घृणा होती.

गणेश बंडो देशपांडे हा संस्थानात मोजणीचे काम करी. मोजणीदारच त्याला लोक म्हणत. काही लफड्यांमुळे, नोकरीतून त्याला काढला होता. त्यामुळे मनात भयंकर क्रोध होता. मुळात शेतीचा सुधार व्हावा, सर्वांचे बरे व्हावे हेही होतेच. पण, “अधिकारीवर्गाला या गणेश बंडोचा इंगा दाखवून देईन” हीही जबरदस्त ईर्षा होती. त्यामागे द्वेषही होता. त्याला शांत करण्यास पुष्कळच प्रयत्न करावे लागले.

मिटूलाल कलाल रागीट मुद्रेचा, कर्कश आवाजाचा, लोकांना भडकविण्याचे बोलणारा (ओरडणारा) पण खरा प्रेमळ, सरळ ध्येयवादी. अधिकारीवर्गावर फारच राग, अधिकारीवर्गाकडून काहीही कधीही होणार नाही हेच त्याला नेहमी वाटे. अधिकारलालसा स्वतःला नव्हतीच. पण कोणताही नवीन मुद्दा पुढे आला की गडबडून जाई. मिटूलालवर लोकांची श्रद्धा होती. त्याच्यामागे तरुण पिढीतील भिका सावळाराम भागवत, अब्दुल्ला मास्तर वगैरे मंडळी होती.

अनुक्रमणिका

कुरेशी वकील बिचारा साधासुधा होता. पुढारी म्हणून आपल्याला आदर, मान मिळावा इतकीच इच्छा. प्रेमळ होता. लोकांचे कल्याण व्हावे हीच इच्छा होती. जवळ जवळ सर्व मुसलमान जमात त्याच्या बाजूनेच होती. हरिजन लोकही त्याला मानीत.

बरोबर चार वाजता नेहमीच्या सरावाप्रमाणे अगदी वक्तशीर राजा लोकांपुढे उभा राहिला.

तांबडे पागोटे, खादी (संस्थानचीच) आंगरखा, धोतर, उपरणे, व हातात सिंहाचा मुखवटा असलेला जाड सोटा, आधी सांगितलेले जयघोष सर्वच एकदम विसरले, व, "भवानराव महाराज की जय, आप्पासाहेब महाराज की जय", लोक गर्जले. पुढाऱ्यांना कसनुसे झाले.

राजा म्हणाला, "इतके लांब कशाला आला? मला बोलवायचे. आटपाडीला मी आलो असतो. मुलगा आताच आटपाडीत होता. त्याच्याशी का नाही बोललात? आपले भांडण आहे का? सर्वांचे कल्याण आपल्याला करायचे आहे. आप्पाशी बोला. काहीही ठरवा. आपण सर्व मिळून संस्थानचा उद्धार करण्याच्या पाठीमागे लागू या. सारा जास्त वाटतो ना? आता मी त्यासंबंधी तपासणी करण्याकरता कमिटी नेमतो."

कमिटी नेमणे म्हणजे अगदी घशाशी आले असेल ते जरा वेळ बाजूला करावयाचे म्हणजे लोक विसरतात! पण राजाने आप्पालाच सांगितले, त्या सर्व मंडळीसमोर. "सर्व संस्थानच्या शेतकऱ्यांचा सारा योग्य करण्याबाबत दोन महिन्यांच्या आत रिपोर्ट दे."

झाले, आप्पाच्या गळ्यात ज्याबद्दल त्याला काहीही माहिती नव्हती ते करण्याची जबाबदारी पडली. त्याने आण्णा बापट व आटपाडीचे त्या वेळचे अत्यंत सुज्ञ व कामाला चोख आणि स्पष्टवक्ते मामलेदार बाळाप्पा कुलकर्णी, गुणदाळ भागातील राहणारे यांना मदतीला घेऊन एका महिन्याच्या आत प्राथमिक रिपोर्ट सादर केला. औंधच्या प्रजाजनांना आता काही न्याय मिळेल असे वाटू लागले. पुढे संस्थानचा सारा योग्य झाला पण नवीन मोजणी व तुकडपट्टी झाल्यावर वाढलाच, कमी नाही झाला. या कामाला निवृत्त कलेक्टर का. ग. धांदरफळे, साताराचे राहणारे यांनी फार मौलिक मदत केली.

पण त्या मोर्च्याच्या दिवशी रात्री तात्या शिखरे व शंकरराव देव आप्पाला भेटण्यास राम हॉलमध्ये आले. दोन-तीन तास चर्चा झाली. पंडित सातवळेकरही हजर होते.

एकमेकांचे दृष्टिकोण समजल्यावर विधायक कार्यक्रम हाती घेणे सोपे झाले.

आटपाडीचा मोर्चा, संस्थानचा सारा योग्य करण्याच्या खटपटीत अनेक खेड्यांना भेटी देऊन लोकांशी विचार-विनिमय करण्याचा खटाटोप, हे सर्व चालू असता एक दिवस मे महिन्यात (१९३८) दुपारी दीड वाजता मॉरिस फ्रीडमन ऊर्फ भारतानंद, राम हॉलमध्ये दत्त म्हणून उभे राहिले आणि औंध, आप्पा, राजा यांच्या सर्वचे सर्व जीवनाची अगदी उलटापालट झाली !!!

आश्चर्यानंदाचा पहिला झटका उतरल्यावर आप्पा म्हणाला, "मॉरिस तू कसा इथे ? सर मिर्झा सर म्हणाले की तुला म्हैसुरात फार काम आहे? किती दिवस राहणार?"

मॉरिस म्हणाला, “मी म्हैसूर कायमचे सोडले, राजीनाम दिला. मी कुणाचा कधीच गुलाम नव्हतो व नसणार. तुझ्याबरोबर औंधमध्ये कामाला आलो आहे !!!” आप्पा राजाकडे मॉरिसला दुपारी राजाची विश्रांती संपल्यावर घेऊन गेला. राजाचे व त्याचे एकदम सूत जमले. योगायोगच, केव्हाचा ? या जन्मीचा की पूर्वजन्मीचा ? आहे पूर्वजन्म ? कोणाला? का मॉरिसना चांगुलपणा राज्याच्यात प्रतिबिंबित झाला ?

झाले ! देवी, म्युझियम वगैरे पाहून झाल्यावर एक आठवड्यातच मॉरिसला घेऊन आप्पा सर्व संस्थान फिरून आला.

आटपाडीचा उजाड, खडकाळ प्रदेश, ते रेतीने परिपूर्ण ओढे-ज्यांना वर्षातून एकदोनदाच पाणी येते व दोन तासांत आटते; ती हवालदिल व तप्त झालेली जनता.

नंतर कृष्णा काठचे कुंडल (फक्त कवितेतच हं. आता कृष्णा तीन मैल दूर गेली आहे) किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी, मग कृष्णाकाठचे गुणदाळ व काळ्याभोर मातीतील क्षारयुक्त जमीन व भरपूर धुळीने भरलेली बिनपाण्याची १६ गावे. सर्व मॉरिस हिंडला, दोघांचा विचारविनिमय सारखा सुरूच होता. त्यात आप्पाचे सेक्रेटरी कुंडलकर व औंध संस्थानच्या मोठ्या भाग्याने मिळालेले औंधचेच इंजिनियर, शंकरराव केळकर हेही अधूनमधून शंका काढत.

मॉरिस सर्व शंकांचे यथायोग्य, अगदी सोप्या भाषेत निरसन करी. मराठी, कानडी भाषेत चाललेले तास न् तास वादविवाद शांतपणे बसून ऐके. मराठीचे एक अक्षरही त्याला येत नव्हते. कानडी तर नाहीच नाही. थोडे हिंदी पोलिश स्वरात बोले.

याच वेळी आप्पाचा विलायतेतील खास मित्र फ्रॅन्सिस वाटसन औंधला एक वर्ष राहून पुस्तक लिहिण्यास आला. पुढील सर्व घडामोडींत फ्रॅन्सिस वॉटसनचा मोठाच भाग होता.

फ्रॅन्सिस विद्वान विचारवंत, खंदा लेखक व बी. बी. सी. वर नेहमी भाषणे देणारा अत्यंत सुसंस्कृत मानव. सौंदर्याचा मोठा उपभोक्ता. चित्रकला, शिल्पकला यांचा गाढा अभ्यास. यामुळे आप्पाचे व त्याचे सूत जमले होते.

आप्पाची व फ्रॅन्सिसची गाठही अचानक, अकल्पित रीत्या पडलेली होती. आप्पाचा दुसरा एक जानी दोस्त रॅल्फ व्हिटलिंग इटलीमध्ये व्हेनिस शहरात सुट्टीवर गेला असताना एका पुलावर दोघेही काही रम्य देखाव्याचे फोटो घेत असताना त्यांची गाठ झाली. मैत्री वाढली. रॅल्फ एक खंदा शिक्षक. जगातील अवघड कोणी न पादाक्रांत केलेल्या ठिकाणी जाऊन फोटो काढणे व त्यांच्या स्लाईड्स करून आपल्या विद्यार्थ्यांचे क्षितिज उंच करण्याची धडपड. रॅल्फमुळे आप्पा व फ्रॅन्सिस भेटले आणि तिघांची मैत्री पुढे पन्नास वर्षे टिकली. रॅल्फ ही औंधला अनेकदा आला व ग्रामोद्धाराच्या कार्यात त्याने हातभार लावला.

फ्रॅन्सिस, मॉरिस, आप्पा राम हॉलमध्ये सारखे एका ठिकाणी बसून सर्व विषयांवर विचारविनिमय करीत. युरोप, रशिया, अमेरिका, युद्धाचा संभव, नात्सीझम् फसिझम, गांधी, नेहरू, सुभाषचंद्र बोस, अहिंसा, कृष्णमूर्ती, रमण महर्षी, औंध, औंधची खेडी, औंधचा राजा, ह्या सर्व विषयांवर भवती न भवती सारखी चाले. बाबू बापट, पाठक मास्तर, कुंडलकर, शंकरराव केळकर, हे सारे वादविवाद ऐकत व गप्पच बसत.

मॉरिस, फ्रॅन्सिस, रॅल्फ, एव्हेलिन हे आप्पाचे अगदी ‘दोस्त’ असल्याने त्यांची, ‘साहेब’ म्हणून खास वेगळी व्यवस्था वाड्यात मुळीच नसे. ‘राम हॉल’ मधे सर्वांनी गालिच्यावर गाद्या टाकून झोपायचे. सकाळच्या ‘चहाला’ दिगंबर कोटणीस यांना सांगून ठेवलेले असे. फुटके कप व रंगबेरंगी विचित्र बश्यांतून चहा. ब्रेड वगैरे नाहीच. कधी कोणी पुण्याला गेलाच तर हंटले आणि पामरची जुनी, शिळी बिस्किटे असत. बिचारे आनंदाने कोमट चहा पीत.

हो ! तेवढा तरी मिळे !! नाहीतर ‘पूर्वी’ म्हणजे १९२०-४० पर्यंत वाड्यात चहा अजिबात बंद होता. राजाचा पुतण्या आण्णा त्यातल्या त्यात ‘सुधारलेला’ मुंबईला व्हिक्टोरिआ टेक्निकल स्कूलमध्ये शिकत होता. तिथे म्हणे हॉटेलात जाई. चहा पी. आम्लेटसुद्धा खाई म्हणे. औंधमधे तर आत्याबाई वगैरे त्याला ‘बेफाम बिघडला’ असेच समजत.

एकदा आण्णा सुट्टीत आला तेव्हा त्याने अगदी ‘गुप्त’ रीतीने चोरून एक ब्रेडचा ‘लोफ’ आणला. शेगडीवरच चहा केला. कारण त्या वेळी स्टोव्हचा मोठा आवाज होत असे. राजाला ऐकू जाईल!!

एक ब्रेड व त्याबरोबर चहा पिण्याचा कार्यक्रम सोनूताई काळे यांच्या खोलीत दुपारी सुरू होणार इतक्यात...!!

कसे राजाला कळले कोणास ठाऊक? तरातरा लालबुंद होऊन स्वारी आली. आकाश-पाताळ एक झाले.

“लाज नाही वाटत शेण खायला !! आणि वरती ते घोड्याचे... पिता !!!”

कसे राजाला कळले की चलाखी करून आण्णाने ब्रेडचा लोफ कपाटात टाकला होता कोणास माहीत. पण पोपटांना वर चढवून तो खाली आणला. मेलेला उंदीर हातात धरल्यासारखा तो ब्रेडचा तुकडा नेऊन ‘जॉकी’ कुत्र्याला घातला!!!

राजेसाहेब राजाचे पहिले चिरंजीव (१८८८-१९२३) असताना त्यांच्या चहाची व्यवस्था उत्तमच असे - पण सगळे अगदी गुपचूप. राजाला माहीत होतेच. राजेसाहेब गेल्यावर, आप्पाचा लहानपणीच वाड्यातील चहा बंद झाला होता. त्यानंतर, म्हणजे १९४२ नतर चहाची खरी व्यवस्था नलिनी औंधला आल्यावरच झाली. सहज सुंदर कपबश्या, वेलबुट्टीची सुरेख किटली. चहा वर खोलीत आणण्यास एक एनेमलचा ट्रे. पण १९४२ पर्यंत पाहुण्यांचे ‘हाल’ जॉकी कुत्रासुद्धा नुसता पाहातच होता.

पण खरे फ्रॅन्सिस - पीटर - एव्हलीन यांचे ‘कष्ट’ राजाचे वेळी होत. वाड्यात सर्व दिवाणखानेच. खोल्या नाहीतच. बंद दरवाज्यांना बंदीच होती !! स्नानगृह म्हणजे एक हॉलच. तीन नळ्या व खाली तांब्याची ‘घंगाळे’. दीड दोन घागरी पाणी त्यात बसे. पाणी तापवायला भली मोठी चूल. शिवाय एक तांब्याचा शिवाजी मेटल वर्क्सचा सोलापुरात टिकेकरांनी बनविलेला मोठा बंब. गरम पाणी भरपूर असे. पण घंगाळातून तांब्याने अंगावर ओतून घेण्याचे.

‘विलायती’ लोकांना टबात बसून स्नानाची सवय. त्याच पाण्यात साबण लावून तेच पाणी साबण धुऊन टाकायला!!! त्याच पाण्यात, एका पाठीमागून दोन, तीनसुद्धा आंघोळी होत !!! पण मॉरिस अगदी

हिंदुस्थानातल्यासारखा स्वतः शिवलेला लंगोट घालून स्नान करी व स्वतःचे कपडे धुऊन स्वतःच वाळत घाली.

फ्रॅन्सिस - पीटरना मॉरिसने हे सर्व समजावून सांगितले, पण लंगोटाबद्दल बोलण्याचे विसरला!!

झाले ! फ्रॅन्सिस - पीटर पहिल्याच दिवशी सकाळी ६॥ वाजता स्नानाला गेले. सर्व कपडे, म्हणजे सर्वच्या सर्व काढून पाणी घेण्यास आरंभ केला... इतक्यात राजाची धाकटी सावत्र बहीण, आत्याबाई कडेगावकर स्नानघरात आल्या.... व, "इश् श्‌श्" म्हणून पळाल्या!!! फ्रन्सिस - पीटरला "इश्‌श्" चा अर्थ माहीत नव्हता म्हणून बरे, पण मॉरिसने त्याच दिवशी स्वतः बसून दोन लंगोट फ्रॅन्सिस-पीटर करता शिवून दिले. ते फ्रॅन्सिस, पुढे २-४ वर्षे प्रेमाने वापरत असे. असे होते आमचे 'साधे' औंध.

ह्या 'साधेपणाचा' राजाला थोडा गर्वच होता. नलिनीच्या लग्नानंतर एकदा बापूसाहेब द्रविड व त्यांचे तीन मोठे मुलगे, भाऊ, डॉ. दादा, व नाना, यांना राजा अभिमानाने सांगत होता, "हो, असे आम्ही अगदी साधे आहोत."

भाऊसाहेब द्रविडांना राहवले नाही हे ऐकून व फटकन् बोलून गेले, "हो, आम्ही सुद्धा साधेच आहोत"!!!

खाली बाहेर आल्यावर डॉ. दादा भाऊसाहेबांना म्हणाला, "अरे राजाचे साधेपण वेगळे व आपले वेगळे." भाऊ म्हणाला, "खरंच की, ते मला सुचलंच नाही !!"

१९३८ च्या नोव्हेबरमध्ये राजाच्या वाढदिवसाच्या समारंभाची तयारी जोरात चालू होती. नेहमीप्रमाणे दुष्काळ होताच. आटपाडी, गुणदाळ, कुंडल तालुक्यातील लोक अस्वस्थ होते.

राजाच्या वाढदिवसाच्या आठ दिवस आधी १५ नोव्हेंबरला, पहाटे मॉरिस काही लिहीत बसला होता. सकाळी त्याने एक त्याच्या मोठ्या बटबटीत पण चारित्र्यपूर्ण अक्षरात लिहिलेला कागद फ्रॅन्सिस व आप्पाच्या पुढे टाकला.

हा राजाने त्याच्या वाढदिवसाला करण्याच्या घोषणेचा मसुदा होता. त्यात राजा म्हणतो, "आता औंध संस्थानची माझी प्रजा आपला सर्व कारभार स्वतः करण्याला समर्थ आहे. यासाठी गेली तीस वर्षे आम्ही त्यांना शिकवून तयार केले आहे.

आजपासून राज्याचा सर्व कारभार लोकांच्या हातात देऊन आम्ही, लोक आपले कर्तव्यकर्म कसे करतात, हे स्वस्थ बसून पाहणार आहोत. लोकांनी आपले, प्रतिनिधी कसे निवडावे व ग्रामराज्याचा स्वयंपूर्ण कारभार कसा करावा याचे नियम वगैरे योग्य सल्ला घेऊन लवकरच जाहीर केले जातील."

स्वातंत्र्याची लाट सर्व हिंदुस्थानभर जोरात वाहात आहे. औंध सुधारणेत आतापर्यंत सर्वांच्या पुढे आहे. आता अखेरचे पूर्ण त्यागाचे पाऊल राजाने टाकले पाहिजे यावर या त्रिकुटाचे एक तासाच्या चर्चेनंतर एकमत झाले.

अनुक्रमणिका

राजा रोज अगदी नियमाने ९ वाजता कचेरीच्या हॉलमध्ये कामाला बसे. द. ग. कुलकर्णी (कवी) टपाल फोडून राजापुढे ठेवीत. मग तेच वृत्तपत्रे वाचून दाखवीत. दिवाण दर्शने (शिवरामपंत), होम अधिकारी पंडितराव हिवरेकर, चीफ मेडिकल ऑफिसर केळकर वगैरे सर्व अधिकारी येऊन कामासंबंधी चर्चा होई.

त्या दिवशी राजा खुर्चीवर जाऊन बसतो न बसतो तोच हे त्रिकूट कचेरीत आले. राजाने प्रसन्न वदनाने नेहमीप्रमाणे त्यांचे स्वागत केले. आप्पाने खाली वाकून नमस्कार केला आणि मॉरिसने आपला क्रांतिकारी मसुदा राजाच्या पुढे ठेवला.

सत्तराहून अधिक वय असूनही राजा चष्मा लावीत नसे. डोळ्यांचे व्यायाम व सूर्यदर्शनाने त्याने चाळीस वर्षे चष्मा लावल्यावर टाकून दिला होता. पण कागद जरा लांबच धरून राजाने तो वाचला. मॉरिसची काही अक्षरे त्याला लागत नव्हती.

दोन-तीन मिनिटांतच तो म्हणाला, “व्हेरी गुड, आय लाईक धिस, थँक्यू मॉरिस.”

झाले, नेहमीप्रमाणे कागद राजाने कविच्याकडे दिला. व म्हणाला, “वटोबा इंगळे, टायपिस्टकडून ताबडतोब टाईप करून आणा.” फॅन्सिसकडे वळून म्हणाला, “यातील इंग्रजी बरोबर आहे की नाही हे कृपा करून पाहा.”

आयुष्यातील क्रांतिकारी महत्त्वाच्या कल्याणकारी घटना अशा अगदी सहज, सोप्या असतात. ओढून ताणून आणाव्या लागत नाहीत. जबरदस्ती, क्रोध, हेवा, मत्सराने महत्त्वाच्या कल्याणकारी घटना दूर जातात.

औंधच्या नव्या राज्यघटनेचा जन्म मॉरिसच्या हाताने राम हॉलमध्ये आप्पा-फ्रॅन्सिस वॉटसन यांच्या साक्षीने झाला. राजाने तो सहज स्वीकारलाही, काय गंमत आहे !!!

दुपारी हे त्रिकूट या मसुद्याची कॉपी घेऊन नानासाहेब चापेकर, आण्णासाहेब बखले व पंडितजी सातवळेकर यांना भेटले. राजाने हे सर्व सहजरीत्या एकदम मान्य केले, यावर त्यांचा विश्वासच बसेना. अचंबा वाटला. साहजिक आहे, सहजासहजी स्वखुषीने अधिकार कोण सोडतो?

पंडितजी सातवळेकरांनी सुचविले की असा संस्थानात क्रांतिकारी आमूलाग्र बदल करायचा तर, उत्तमात उत्तम सल्ला म्हणजे महात्मा गांधींचा घ्यावा. नंतरच पुढले पाऊल टाकावे. कॉंग्रेस मग आपल्याला मदतच करील.

झाले. गांधींचा सल्ला घ्यावा हे पाच मिनिटांत ठरले. राजालाही ते पसंत पडले. ताबडतोब पंडितजींनी महात्माजींना पत्र लिहून पोस्टात टाकलेही.

राजाची तेवीस नोव्हेंबरच्या ७३ व्या वाढदिवसाच्या सभेत ही घोषणा होण्याच्या आधी महात्माजींच्याकडून स्वाक्षरीत पंडितजींना पत्र आले की डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात यावे.

अनुक्रमणिका

मॉरिस, आप्पा, कुंडलकर, बाबूराव बापट निघाले वर्ध्याच्या गाडीने. स्टेशनवर शेठ जमनालाल बजाजचे सेक्रेटरी आलेच होते टांगा घेऊन. सकाळी आठ वाजता गाडी पोचली वर्ध्याला व ११ वाजता सेवाग्रामला गांधींचे पहिले दर्शन झाले.

# ३

२३ नोव्हेंबरच्या समारंभात राजाने घोषणा केली, पण प्रजा या सर्वांवर विश्वास ठेवायला कुठे तयार होती? अनेक वर्षांच्या सरंजामशाहीच्या सवयी, लाचारी, भीती, गरिबी यामुळे मान वर काढून जगाकडे स्वतःच्या डोळ्यांनी बघण्याची शक्तीच नाहीशी झाली होती. स्वतः आपल्या हाताने, स्वसामर्थ्याने आपण काही करू शकतो ही भावनाच, असा आत्मविश्वासच नव्हता. राजा, प्रधान, पुढारी येईल तेव्हाच आम्ही खाऊ नाहीतर उपाशी मरू असे लोकांना वाटे. मनात द्वेष, क्रोध भरला होता पण भीतीही होती. नपुंसकत्वच हे. आटपाडीच्या प्रजापरिषदेचे चार-दोन, गुणदाळचे गोविंदराव कणबूर, कुंडलचे आप्पा व नाथा लाड, औंधचे रामभाऊ इंगळे हे लोक सोडले तर औंध संस्थानचा एकंदर समाज निद्रित व येईल ते निमूटपणे सहन करणाराच होता.

बाहेरच्या काँग्रेसच्या उठावाचे काही प्रतिध्वनी विकृत स्वरूपात उमटत होते. पण स्वयंप्रेरित, कर्तव्यदक्ष, सुबुद्ध, क्र्मप्रवीण जागृत जनताच नसेल तर चार-दोन पुढारी तरी काय करू शकतील? हे लोक जागृत होतील का? स्वराज्य चालवतील का? का सुसंस्कृत कर्तव्यदक्ष एक राजाच्या ऐवजी गावोगाव लोकशाहीच्या नावाखाली धुंद, दुष्ट गुंडच समाजाची पिळवणूक करतील?

लोकजागृतीचे कार्य कसे सुरू करायचे? कोणी करायचे? किती दिवस लागतील?

हे व अशा अनेक प्रश्नांवर मॉरिस व आप्पा बाँबे-नागपूर-कलकत्ता मेलने वर्ध्याच्या वाटेवर असताना विचार करीत होते. राजसत्ता जाऊन लोकसत्ता आणण्याच्या खटपटीत आप्पा का पडला? राजाला मदत करावयाची होती ना? म्हातारपणी त्याला संभाळावयाचे होने ना? पण राजाचे राजत्वच नाहीसे करण्याची ही कसली सेवा? का आप्पाच्या सुप्त-गुप्त मनात वडिलांच्या सत्तेबद्दल मत्सर-हेवा-निंदा त्याला न समजता कार्य करीत होत्या? वडिलांची सत्ता नष्ट करून लोकांच्या हातात देणारा त्यागी (?) सुधारणावादी, क्रांतिकारी, धाडसी मुलगा म्हणून मिरवायची, लोकांच्या पुढे येण्याचीच, खरी त्याची ईर्षा होती ? का त्याचा पुतण्या, बापू, आक्काचा धाकटा भाऊ, जो वडिलांच्या नंतर राजा झाला असता, त्याचा राज्याचा अधिकारच लोकांना सत्ता वाटून देऊन काढून घेण्याचा व वर आपण स्वतः पुढारी क्रांतिकारी साम्यवादी म्हणून मिरवायचा आप्पाचा खरा हेतू होता? काही लोकांनी हा प्रश्न काढलाही. का हे सर्व तर्क-कुतर्क विनाकारण वांझच होते? आजूबाजूचे सर्वच प्रवाह, विचारांचे, आचारांचे, जागतिक, आर्थिक, सांस्कृतिक झपाट्याने बदलत असताना अशा वांझ विचारात मग्न होणे म्हणजे कर्तव्यकर्मापासून दूर जाणे होते का?

खऱ्या अर्थाने आजूबाजूच्या क्रांतिकारी परिस्थितीला अनुसरून सुबुद्धतेने, योग्य कर्तव्यदक्षतेने कर्म करणे म्हणजेच खरी वडिलांची सेवा. त्यांना सांभाळणे होणार ना? औंध, राजा, परंपरा, अंबाबाई हे सर्व काळाच्या ओघात बदलते स्वरूप घेऊनच टिकणार होते. राजा खरा त्याग करीत होता की मॉरिस, फ्रॅन्सिसच्या आधुनिक विचाराने प्रभावित होऊन, विलायती लोकांना पसंत पडणारी व त्यामुळे आपल्याला मान मिळणारी आपण गोष्ट करीत आहोत असेच खरे त्याच्या मनात होते?

हे सर्व महात्मा गांधींना विचारावे, स्वतःचे मन साफ करावे या हेतूने आप्पा, मॉरिस, कुंडलकर, पंडितजी सातवळेकर, बाबूराव बापट यांच्यासह, शेठ जमनालाल बजाजांच्या १९२१ साली खरीदलेल्या फोर्ड

गाडीतून विना-रस्त्याच्या रस्त्याने बरोबर ११ वाजता सेवाग्राम आश्रमात पोचला. गांधींना भेटायचे म्हणजे अगदी वक्तशीरच असले पाहिजे. एक मिनिट सुद्धा इकडे तिकडे होणार नाही.

धूळ, घूप सेवाग्रामात भरपूर होती पण धांदल नाही. एवढ्या मोठ्या साम्राज्यशाहीशी लढा देत असताना शस्त्रास्त्रांचा खणखणाट, आरडा-ओरडा, क्रोध, द्वेष भावना भडकाविणे, असत्य, डावपेच हे सेवाग्राममध्ये नाही. सर्व शांत, स्तब्ध. लोक हळू बोलत, हसतमुख असत. पट्टेवाला, पहारेकरी, पास, झडती काही नाही. कोंबड्या, मेंढ्या, गाढवे, गुरे सर्वच स्वतंत्र....

आप्पाला गंमतच वाटली. मॉरिस म्हणाला-आप्पा हेच ते सत्य युग. पाहून घे. औंधमध्ये आपण याचे बीजारोपण करण्याकरता झटू या.

११-३० ला अर्धा मिनिट असताना प्यारेलाल औंधची प्यादी बसली होती तिथे येऊन अर्धा सेकंदच हसल्यासारखे भासवून त्यांना गांधींच्या झोपडीत घेऊन गेले.

छोटेखानीच ती झोपडी पण स्वच्छ, सर्व नीटनेटके. ओंगळ किंवा भोंगळपणा नाही. साधेपणा म्हणजे अजागळ, अव्यवस्थितपणा नाही.

गांधी सुत कातीत होते. तोंडावर मंद, शांत, प्रेमळ हास्य होते. डोळ्यात चमकदार, मिस्किलपणा, विनोदही भरला आहे असेच वाटे.

पंडितजींनी, "ये आप्पा हय," म्हणून म्हणताच गांधीजी हसून म्हणाले, "अरे वा, मला भेटायला यायचे म्हणून खादीचा पोशाख करून आलास की काय ? बैस."

वडिलांचे व अंबाबाईशिवाय खाली वाकून नमस्कार आप्पाला माहीत नव्हताच. पण भावनापूर्ण वंदन या सर्वच मंडळींनी केले व खाली बसली.

"हं, बॅरिस्टर करून आलास, आता शहरात जाऊन गरिबांची पिळवणूक करून पैसा मिळवणार की औंधच्या लोकांची गरीब जनतेची, जिने तुझे आजपर्यंत सर्व खर्च सोसले त्यांची सेवा करून त्यांची परिस्थिती सुधारणार?" म. गांधी.

"बापू, असा आपण प्रश्न टाकलात तर मी काय उत्तर देऊ? पण बाबांना मदत करावी, औंधातच राहावे, औंधच्या लोकांना सुखी करावे, असे आज तरी मनात आहे" -आप्पा.

मिस्किलपणे हसून महात्माजी म्हणतात, " हे बघ आप्पा, माझ्याशी तुझी आता गाठ आहे. माझे जुने जानी मित्र सातवळेकरांनी मला लिहिले आहे की, औंधचा राजा सर्वच्या सर्व राज्य लोकांचे ताब्यात देण्याला निघाला आहे म्हणून. हे जर खरे असेल तर ते आपल्या जुन्या परंपरेला धरूनच आहे. सत्ता हा कोणाचा जन्मसिद्ध हक्क नाही. विश्वस्त म्हणूनच, सेवेकरताच, सत्ता वापरायची असते. रामचंद्र प्रभूंनी हे जाज्वल्य उदाहरण आपल्यापुढे ठेवले आहे. "आपला जन्मसिद्ध हक्क आहे फक्त आपले कर्तव्य-कर्म करण्याचा. समाजाची खऱ्या अर्थाने सेवा केल्याशिवाय हक्क, अधिकार, मिळूच शकत नाहीत. "पण तुझा व माझा वेळ

विनाकारण दवडू नकोस. बोल, मी जे सांगेन ते सर्व तू पूर्णपणे न चुकता, करणार असशील तर मी तुझ्याशी बोलेन." आप्पा विचारतो, "पण बापूजी आपण काय सांगणार? ते मी करू शकेन की नाही कोण जाणे? आधी सांगा तरी. मग मी आपल्याला वचन देऊ शकतो की नाही ते ठरवीन. हे तर्कशुद्ध आहे ना?"

"हे बघ आप्पा माझ्याकडे येणारे सर्व लोक म्हणतात की, बापू मोठे कठोर शिक्षक (हार्ड टास्क मास्टर) आहेत. तेव्हा तू हो म्हणशील तर मी तुला सांगतो बोल...." महात्माजी काही भलतेसलते सांगणार नाहीत, कदाचित ते नुसती परीक्षाच करीत असतील असे आप्पाला वाटले व तो हो म्हणाला.

गांधीजी म्हणतात, "खऱ्या अर्थाने तुला जर तुझ्या वडिलांची व औंधची सेवा करावयाची असेल तर तीन कडक नियम तुला पाळावे लागतील. पहिला, औंधची खेडी सोडून दहा वर्षे दुसरे कोठेही जावयाचे नाही. शहरात राहावयाचे नाही. औंधबाहेर प्रवास फक्त वर्षातून दोनच वेळा करावयाचा व तोही अगदी जरुरीच असेल तर. आहे कबूल?" आप्पा हो...

"दुसरा औंधमध्ये तुझे कार्य चालू आहे तोपर्यंत स्वतःच्या हाताने सूत कातून त्याचाच कपडा वापरायचा. दुसरा कपडा विकत घ्यायचा नाही. तसेच औंधमधील जनता जे खाऊ किंवा वापरू शकत नाही ते खायचे नाही, ते वापरायचे नाही. स्वतःवर महिना पन्नास रुपयांपेक्षा जास्त खर्च करायचा नाही. त्यात टूथपेस्ट, ब्रश वगैरे सर्व आले. लग्न केलेस तर महिना शंभर रुपयेच खर्च करायचे. अगदी जरुरीशिवाय मोटार वापरायची नाही. आहे कबूल ?" -महात्माजी.

"तिसरा...औंधमधील जनता जशा झोपडीत राहते, ज्या साधेपणाने राहते, तसेच राहायचे" गांधीजी.

आप्पा जरा दचकलाच. म्हणजे औंधात राहून वडिलांच्यापासून वेगळे राहायचे की काय? गांधीजी फारकत करण्यास सांगतात की काय?

मधेच पंडितजी म्हणाले, "महात्माजी, औंधमध्ये असताना आप्पाला वडिलांच्यापासून वेगळे राहणे बरोबर दिसणार नाही. औंधच्या बाहेर हा नियम लागू करावा."

महात्माजींच्या चमकदार डोळ्यांतील मिस्किलपणा उफाळून दिसला व ते म्हणाले, "बरे आहे. आप्पाला येवढी सूट देऊ."

आप्पा काय बोलू शकणार? एका नवीन अद्‌भुत, प्रचंड प्रवाहात तो एकदम पडला होता. फॅसिझम, कम्युनिझम्, औंध, बाबा, अंबाबाई, कोठेतरी दूर सूक्ष्म भासत होते. ऑक्सफर्ड, बार-एट-लॉ तर पूर्णपणे विसरला होता.

पंडितजी व महात्माजी काही तरी बोलत होते. आप्पाचे लक्ष फक्त महात्माजींच्या मुद्रेकडे होते. त्याला जे सर्व प्रश्न औंधबद्दल, वडिलांच्या घोषणेबाबत, औंधमधील एकंदर परिस्थितीबद्दल विचारायचे होते त्या सर्वांचे त्याला पूर्ण विस्मरणच झाल्यासारखे झाले. महात्माजी बोलत होते, कल्पनेप्रमाणे सुराज्य, स्वराज्य, म्हणजे ज्या राज्यात राज्ययंत्रणा, अधिकारी, पुढारी, राजकारण, नसणारच ते असेलच तर फक्त तज्ज्ञ सल्ला देण्याकरताच.

“सत्ता केंद्रित झाली, अवाढव्य झाली म्हणजे त्यातून अनर्थ, गोंधळ, निर्माण होतात. सत्ता काबीज करणे, राज्यावर बसणे, अधिकार गाजविणे इकडेच सर्वांचे लक्ष लागते व समाजकल्याणाकडे दुर्लक्ष होते.

“म्हणून पूर्वीची आपली ग्रामराज्यांची योजना आजच्या परिस्थितीत त्यात जरूर ते फेरबदल करून व पूर्वीच्या ग्रामराज्याच्या परंपरेत जे विकृत, दुष्ट, आले असेल ते टाकून देऊन अंमलात आणली पाहिजे.

“पण हे सर्व घडवून आणायचे तर निष्ठावान, तत्पर व कार्यक्षम कार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत.राजकारणातून व सत्ता-स्पर्धेतून दूर राहून विधायक कार्यास पूर्ण वाहून घेतलेल्या सेवकांनी खेड्यातच आपले सर्व जीवन घालविण्याची शपथ घेतली पाहिजे.”

आप्पा विचारणार होता की याला वेळ लागणार, कार्यकर्ते तयार होईपर्यंत थांबायचे की काय? पण एक तास संपला होता, “आता उद्या बोलू” म्हणून गांधीजी उठलेच.

दुसरे दिवशी पुन्हा ११-३० वाजता गांधीजी आपले विचार मांडू लागले. या दिवशी काका कालेलकर, जमनालाल बजाज, सुशीला नायर, महादेवभाई देसाई, कुमाराप्पा, व आर्यनायकम् हेही उपस्थित होते.

दुसरे अनेक लोक वेगवेगळ्या विषयांवर येऊन बोलून गेले असले तरी महात्माजींची बुद्धी-मन इतके तयार होते की काहीही नोट्स वगैरेशिवाय काल जिथे शेवटले वाक्य संपले असेल तिथूनच बरोबर आज संभाषणाला सुरुवात.

महात्माजी म्हणाले, “आप्पा, तू खरोखरी औंधच्या प्रजेचा सेवक म्हणून काम करण्यास तयार आहेस की नाही हे नक्की ठरीव. निष्ठा, सातत्य असेल तरच सेवा करता येते. मार्ग अत्यंत कठीण आहे पण पराक्रम करण्याची उमेद असेल तर सर्व अडचणींना आनंदाने सामोरे गेले पाहिजे.

बोल, केव्हाही कोणत्याही परिस्थितीत रागावणार नाही, चिडणार नाही, दुसऱ्याला तुच्छ किंवा कमी लेखणार नाही ही शपथ आधी माझ्यापाशी घेतोस? खूप खूप त्रास होईल. जवळचे, दूरचे द्वेष करतील, निंदा होईल, एकटा पडशील, तरीही न डगमगता मनाची प्रसन्नता, सोडणार नाही हे माझ्या पुढे बसून ठरवतोस का? हे नक्की झाल्यावर मग पुढे बोलू, बोल...”

काय बोलणार आप्पा ? वर्गकलह, क्रांती, रक्ताचे पाट जीवनदान, लढाई, झेंडे, ही सर्व मग कोठे या प्रसन्नतेच्या साच्यात बसणार? इंग्रजांचे द्वेषाशिवाय समाज कसा लढ्याला तयार होणार?

महात्माजींना हा आप्पाचा गोंधळ समजला व हसत थोडी टिंगल करीत म्हणाले, “अरे, मनाची अनेक वर्षांची किंवा जन्माची सवय एका दिवसात जात नाही. सतत प्रयत्न करीत करीत हळूहळूच मन ताब्यात येते. पण प्रयत्न निष्ठेने, श्रद्धेने करावयाचे. आधी मनाचा निश्चयच केला नाही तर काहीच होणार नाही. घाबरू नकोस, सेवेत आनंद, समाधान, शांती आहे. सेवा हे विष नाही, वाईट तोंड करून सेवा होत नाही.”

अनुक्रमणिका

आप्पा हळूच खाली मान घालून पुटपुटला... “प्रयत्न तर करीनच, किती जमेल ते सांगता येत नाही” - महात्माजी मग पुन्हा मूळ विषयावर बोलू लागले. मॉरिस, प्यारेलाल, महादेवभाई देसाई, काका कालेलकर लिहून घेऊ लागले.

“समाजात न्याय व समता, सेवाबुद्धीमुळेच प्रस्थापित होते. एकमेकांची सेवा करीत करीतच, सर्वोदय होऊ शकतो. समाजात अहिंसा निर्माण होते जेव्हा सेवाधर्म सर्व पाळू लागतात.

“पण आधी वरिष्ठांनी, ज्यांनी आजपर्यंत भोगले, अधिकार गाजविला त्यांनीच पूर्ण त्याग केला पाहिजे. सत्ता-संपत्तीवरील ताबा त्यांनी पूर्णपणे सोडला पाहिजे. सेवा करून समाज जे देईल तेच उपभोगावयाचे हे व्रत निष्ठेने, धैर्याने पाळले पाहिजे.

“गावोगावी ही त्याग व सेवेची भावना निर्माण करण्याचे कठीण कार्य कार्यकर्त्यांनी करावयाचे आहे. पण कार्यकर्त्यांमध्येच अहंकार, अधिकारलालसा, क्रोध, द्वेष भरला असेल तर त्यांचे ऐकणार कोण? या सर्व चक्राला प्रथम गती देण्याचे काम तुला औंधच्या खेडोपाडी जाऊन सतत कमीत कमी दहा वर्षे तरी करावे लागणार. आप्पा, या कार्याच्या आड जे काही येईल ते सर्व त्याज्य, वर्ज्य असे समजशील का?

“औंधमधील प्रथम आद्य-सेवक, तुझे वडील; आप्पा, त्यांनी राज्याची सर्व जबाबदारी लोकांवर सोपविली पण त्यांनी जेवढे औंधचे लोक त्यांना तनखा, वेतन, खाजगी खर्च, म्हणून देतील त्यावरच राहण्याचे ठरविले पाहिजे. उद्या, समज लोकांना असे वाटले की, हा औंधचा राजा आपल्या काही कामाचा नाही, विनाकारण याला का पोसावे? या राजाचे हत्ती, घोडे, शिपाई, मोटारी, छंद पुरविण्याकरता काय म्हणून सारा द्यावा? तर राजाने ते जरी काही देत नाही म्हणाले तरी आपले आद्य-सेवकाचे, कर्तव्यकर्म सोडता कामा नये.”

आप्पापुढे औंधमधील सर्व दृश्ये येऊ लागली. बाबा चित्र काढीत आहेत, कवी, कारभारी वर्तमानपत्रे वाचीत आहेत, जेवणाची घंटा होती आहे, लहान-मोठी बहीण-भावंडे गडबडीने गलगलाटात जेवायला जाताहेत.

हे सर्व मग कोठे जाणार? कसे चालणार? यांची सर्वांची शिक्षणाची, लग्न-मुंजीची, कपड्यालत्त्यांची सोय काय?

औंधच्या राजाने काय, किती व केव्हा त्याग करावा याची कबुली महात्माजींचे पुढे देणारा आप्पा कोण? राजाचा छोटा नातू बापू (छोट्या) त्याचा यात काही संबंध नाही काय?

अनेक वेळा आप्पाच्या अनुभवास येई की काही महत्त्वाचे, आनंदाचे किंवा दुःखाचे, समाधानाचे किंवा धाडसाचे प्रसंग आले म्हणजे हे सर्व एक स्वप्नच आहे असे त्याला भासे.

महात्मा गांधी, मॉरिस, काका कालेलकर, कुंडलकर हे सर्व आपण स्वप्नातच पाहतो आहे असे त्याला वाटू लागले. काय बोलावे? कोण बोलणार? असे वाटते तो आवाज ऐकू आला.

“बापूजी, हे महत्त्वाचे प्रश्न तुम्ही ज्याला त्याग करायचा आहे, ज्याच्या हातात सत्ता आहे, वैभव आहे व ते सर्व त्याने सोडावे असे म्हणता त्या औंधच्या राजालाच विचारावे. मी, आप्पा त्याच्याकरता त्याग करणारा कोण? माझा काय अधिकार आहे त्याच्या, किंवा छोट्या बापूच्या वतीने बोलण्याचा?” आप्पाचाच आवाज आप्पाने ओळखला.

महात्मा म्हणाले, “मग मीच औंधच्या राजाला विचारतो. येऊ देत त्याला मला भेटायला.”

स्वप्नातून एकदम जागा होऊन आप्पा म्हणतो, “म्हणजे बापूजी आपण बाबांना इथे येण्याला निमंत्रण देता आहात?”

गांधीजी म्हणतात, “अलबत, घेऊन ये त्यांना. मीच बोलतो त्यांच्याशी. तुझी मध्यस्थी नकोच.”

आप्पा विचारतो, “केव्हा आणू त्यांना?”

बापूजी, ताबडतोब उद्या, परवा, त्याग करण्यास तयार झालेल्या हिंदुस्थानातील एकमेव राजाला मी केव्हाही भेटण्यास तयार आहे. मी तुझ्यामार्फत त्यांना इथे येण्याला निमंत्रण देतो.

पुन्हा आप्पा गेला स्वप्नात…म्हणाला आता जातो, बाबांना घेऊन येतो.

तास संपला. औंधची मंडळी उठली. आप्पा बसलाच होता. मॉरिसने त्याला उठवला.

जमनालाल बजाजांच्या गेस्ट हाऊसवर घेऊन गेला. सर्वच स्वप्न. तो काय, पंडितजी, कुंडलकर, दर्शने (दिवाण) सर्व अगदी हवालदील होऊन बसले होते….हे काय आप्पाने कबूल केले? संस्थानिकांनी गांधींना भेटणे म्हणजे ब्रिटिश राज्यदरबारी भयंकर गुन्हा आहे….औंधचा राजा ए. जी. जी. ला व दिल्लीला विचारल्याशिवाय गांधींना कसा भेटणार? इंग्रजांना न विचारता वर्ध्याला आलाच तर औंध या क्षणी खालसा होऊ शकते. काय म्हणावे या भ्रमिष्ट आप्पाला?

आप्पा सुन्न होता. मॉरिस व तो रात्रीच्या मेलने बसून मुंबईला व मुंबईहून पुण्याला आले. तिथे राजाच्या मोटारी होत्या. मोटार घेऊन औंधला आप्पा एकटाच गेला. मॉरिस पुण्यातच राहिला. कारण याच वेळी (डिसेंबर १९३८) कृष्णमूर्ती पुण्यात होते. मॉरिस त्यांचा एक भक्तच.

औंधला आप्पा येतो तो वाटेतच कळाले की, राजा आटपाडीला बोरे खायला गेलाय. आप्पा चार तासांत आटपाडीच्या वाड्यात हजर. तिथे कळाले, राजा मारुती व्यंकूच्या बोरांच्या झाडाखाली वनभोजन करतोय.

गेला तिथे. आप्पा म्हणाला, “बाबा, महात्माजींनी आपल्याला वर्ध्याला बोलावले आहे.”

राजा ताबडतोब म्हणाला, “चला”…हा एक असाच राजा होता.

औंधला त्या रात्री मुक्काम की पहाटे पाच वाजता निघून एकदम मुंबईला, मोटारनेच. दादा पारध्यांच्याकडे मुक्काम. फिरती कामगार म्हणून पंडितराव हिवरेकर व कवी कुलकर्णी, राजाचे सेक्रेटरी बरोबर. दत्तात्रेय गणेश जोशी, मोतीवाले, औंधच्या शाळेत शिकलेले (१९१०-१९१३) त्यांनी नागपूर मेलची वर्ध्याची तिकिटे काढून एक स्वतंत्र डबाच रिझर्व्ह केलेला होता. राजाला पहाटे २ वाजता उठून स्नान-संध्या-नमस्कार आगगाडीतही घालण्याची सवय. दिल्ली, कलकत्ता, ग्वाल्हेरला जायचे म्हणजे रात्रीचा प्रवास. मग गाडीतच सर्व नेहमीचे आन्हिक उरकून सकाळी सात वाजता कोणत्याही इतर कार्यक्रमाला शुचिर्भूत होऊन राजा तयार.

राजा गांधींना भेटायला जातो याची वार्ता कोल्हापूरला थोडी उशीराच, ४८ तासांनंतर, राजा मुंबईला पोचल्यावर कळली असणार. कारण ए. जी. जी. ची तार औंधला राजा मोटारीत बसून मुंबईला गेल्यावर चार तासांनी आली. त्यात ए. जी. जी. ने खडसावून म्हटले होते- “माझा सेक्रेटरी, मेजर मॅगोर, आपल्याला भेटण्यास ताबडतोब पाठवीत आहे. त्याला भेटल्याशिवाय औंध सोडू नये हे बरे,”

खरे म्हणजे सर्व संस्थानिकांची बित्तंबातमी ए. जी. जी. ला असे. पोलिटिकल डिपार्टमेंटचे गुप्तहेर खाते म्हणे अगदी कार्यक्षम होते.

आप्पा परत आल्यापासून त्याची विलायतमध्ये तो असताना जी फाईल त्याच्याविषयी तयार झाली होती ती कोल्हापूरला पोचलीच असणार. इंग्लंडमध्ये ऑक्सफर्ड व लंडनमध्ये त्याच्यावर पाळत असेच. आप्पा ऑक्टोबर क्लब (कम्युनिस्ट क्लब) चा मेंबर झाल्यापासून हा उपद्व्यापी दिसतो, जरा कडक नजर ठेवावी हे झालेच असणार. इंडिया हाऊसमधील पुढे एकदा दोस्त बनलेल्या नॅस्टर नावाचे शिक्षण अधिकाऱ्याने तसे आप्पाला सुचविलेही होते.

मग हा औंधचा राजा त्यांना सर्वांना चुकवून वर्ध्याला कसा पोचला?

बरे, औंधला आलेली अर्जंट तार औंधातील “कार्यक्षम” अधिकाऱ्यांनी साध्याच पत्राने वर्ध्याला “केअर ऑफ महात्मा गांधी” असा पत्ता लिहून पाठवून दिली. ती राजाला, अर्थात दोन दिवसांनी, त्याच्या महात्मा गांधींच्या दुसऱ्या भेटीनंतर मिळाली!!

योगायोग हे असे असतात. समजा राजा एक दिवस आटपाडीलाच राहून औंधला आला असता किंवा औंधलाच एकदोन दिवस आटपाडी प्रवासाचा शीण कमी होण्याकरता थांबलाच असता (तो आता ७३ वर्षांचा म्हातारा होता ना) किंवा औंधमधील अधिकाऱ्यांनी हुशारी (?) दाखवून तार मुंबईलाच पाठविली असती तर?

तर, औंधचा राजा महात्मा गांधींना भेटला असता? औंधची नवीन राज्य-घटना झाली असती? कोण जाणे?

वर्धा स्टेशनवर गाडी सात वाजता सकाळी पोचली. जमनालाल बजाज, जयरामदास दौलतराम, काका कालेलकर, महादेवभाई देसाई, दादा धर्माधिकारी राजाला सामोरे आले होते. राजा तर सूर्यनमस्कार वगैरे करून, स्नान-संध्या आटोपून तयारच होता कामाला लागायला.

अनुक्रमणिका

जमनालाल बजाजांच्या गेस्ट हाऊसमध्ये नास्ता करून, मॉरिस, आप्पा व संस्थानी अधिकारी व पंडित सातवळेकरांना बरोबर घेऊन राजा बरोबर १०-१० ला सेवाग्रामला पोचला. १०-३० वाजता महात्माजींच्या झोपडीत गेला. रामभाऊ चितारी फिल्म व फोटोग्राफ घेतच होते.

मोठ्या आनंदाने, आदराने, राजाने महात्माजींना वंदन केले व बापूजींच्या समोर बसला. हसत खेळत दोघांचा संवाद सुरू झाला. महात्माजी बोलत होते- "राजाचा राजधर्म हा प्रजेचे रंजन, सेवा करण्याचा. राजा हा प्रजेच्या सदसद्विवेक बुद्धीचा विश्वस्त. राजा हा प्रजेच्या उत्कर्षाच्या आकांक्षांचा वाचा देऊन त्यांना कल्याणाप्रद, अभ्युदयाप्रत नेणारा त्यांचा एक मार्गदर्शक."

हे सर्व राजाने आजपर्यंत आपल्या कीर्तनांतून व भाषणांतून व्यक्त केलेच होते. राजा जोराने मान हलवीत होता. आपल्याच मनातील विचार गांधीजी बोलत आहेत असे त्याला वाटत होते.

गांधीजी म्हणाले, "राजाने सर्वस्वाचा त्याग करून समाजसेवेचा धडा प्रजेला दिला पाहिजे. अनासक्तीशिवाय अहिंसा नाही. सत्ता व उपभोग याबद्दल राजा पूर्णपणे अनासक्त असेल तरच प्रजेकडून स्वधर्मपालन होऊ शकते."

मॉरिस, प्यारेलाल, काका कालेलकर भराभर नोट्स घेत होते. औंधच्या नव्या राज्यघटनेचा मसुदा तयार होत होता.

गांधीजी म्हणाले, "उत्तम राज्यव्यवस्था ती की ज्यात अधिकार यंत्रणा, धंदेवाईक, सत्तासंपत्तीकरता केले जाणारे राजकारण व अहंकारी राजकारणी असणारच नाहीत. त्यांची जरुरीच नाही समाजाला भासणार म्हणून प्रत्येक प्रजाजन आपआपले स्वतःचे कर्तव्यकर्म उत्तम रीतीने बजावून समाजाच्या सुस्थितीला व समाधान निर्माण करण्याला, सदा तत्पर असेल. प्रजेत जागरुकता सदैव तेवत ठेवण्याला शिक्षण, शिक्षक व समाजाची सेवा हेच व्रत ज्यांचे आहे असे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. छोट्या औंधमध्ये तुम्ही आजपर्यंत केलेल्या कार्यामुळे हे अशक्य होऊ नये."

राजाला बापूजींचा हा शेरा ऐकून किती आनंद झाला असेल? एक आधुनिक काळातील ऋषिमुनी आपला गौरव करतो आहे. "धन्य झाली" असेच त्याला वाटले असणार. मग बापूजी सांगतील ते करायला तो तयारच होणार हे निश्चित.

आप्पा हे सर्व समजून घेत होता. आजपर्यंत बाबांनी जीवनाची अनेक दालने त्याच्यापुढे खोलली होती. बाबांना तो चिकटून, त्यांच्या प्रेमात, व्यक्तिमत्त्वात अखंड गुरफटला होता आजपर्यंत.

पण आता महात्माजी, बापूजी एक नवेच दर्शन त्याला घडवीत होते. बाबांनी, जे मर्यादित स्वरूप जीवनाचे दाखविले त्याच्या पलीकडे भव्य, विस्तीर्ण असे, मानव्य; ते व्यक्त करणारे कर्तव्यकर्म सर्वांच्या पुढे आहे हे गांधीजी दाखवीत होते.

आप्पाला वाटले आता आपण बाबांच्या मिठीतून सुटतो आहोत. एक नवीन तेजस्वी मार्ग दाखविणारा पिता....आपल्याला बाबांच्या वलयातून मुक्त करतो आहे.

अनुक्रमणिका

महात्माजी बोलू लागले, “व्यक्ती समाजाशिवाय जिवंत राहू शकत नाही. सुधारणा, सर्वोदयाशिवाय, सर्वच्या सर्व समाजाच्या उद्धाराशिवाय नाही. व्यक्तीची किंवा व्यक्तींच्या एखाद दुसऱ्या गटाचीच सुधारणा होईल तर समाजात निश्चित विकृती व संघर्ष होणार. असे परिपूर्ण सामाजिक जीवन खेड्यातच शक्य आहे. यंत्रीकरण झालेल्या शहरांतून ते दुरापास्त आहे. म्हणून सुधारणेचा, सर्वोदयाचा पाया हे खेडेच, छोटा समाजच होऊ शकतो. म्हणून रामराज्य, ग्रामराज्यातच शक्य आहे.”

“ग्रामराज्यात अधिकारयंत्रणेची, राजकारणी पुरुषांची, पुढाऱ्यांची, नेतृत्वाची जरुरीच नाही. सुज्ञ कार्यकर्ते, त्यागी, योगी कार्यक्षम, सेवकांचे कार्यक्षेत्र हे खेडेच झाले पाहिजे.

“औंधमध्ये अशी स्वतंत्र, पूर्ण स्वायत्त खेडी निर्माण झाली पाहिजेत. औंधमधील सर्व राजसत्ता, दिवाण, पोलिस व सर्व अधिकारीवर्ग व त्यांची कामे औंधच्या खेड्यातच, खेड्यातील लोकांनी, आपलीच उन्नती करण्याकरता स्वतः केली पाहिजेत. हे कार्यक्षमतेने करण्यास कार्यकर्ते खेड्यात राहिले पाहिजेत. तज्ज्ञ सल्ला औंधमधून जरूर तेव्हा मिळण्याची व्यवस्था करावी. राजाने हे सर्व कसे चालले आहे, कोठे चुकते आहे, कोठे जादा मदत हवी आहे, कोठे समतोल ढळतो आहे हेच फक्त पाहावे व प्रेमाने सूचना द्याव्यात. राजाला सूचना, सल्ला, देण्याचाच अधिकार. अधिकार स्वतः वापरणेचा अधिकार नाही.” महात्माची न्याहाळून पाहात होते की हा डोस, राजाला कितपत मानवतो. राजा गंभीर विचारात आहे हे त्यांनी जाणले व म्हणाले,

“लोकांच्या सदसद्विवेक बुद्धीचा विश्वस्त व त्यांचा आद्यसेवक म्हणून राजाला तनखा जरूर मिळाला पाहिजे. पण त्याबद्दल आग्रह किंवा आपला तो हक्क आहे असे राजाने मानू नये. राजाने स्वधर्मपालन केले तर प्रजा त्याला उपाशी राहू देणार नाही हे निश्चित. पण राजाच्याच मनात अहंकारामुळे आपला स्वयंभू अधिकारांचा गर्व असेल तर संघर्ष निर्माण होईलच. पूर्ण अहिंसा पूर्ण त्यागाशिवाय, अनासक्तीशिवाय नाही, हा धडा राजानेच लोकांच्या सदसद्विवेक बुद्धीचा विश्वस्त म्हणून स्वतःच्या आचरणाने घालून दिला पाहिजे. “राज्याच्या महसुलाचा १/१० भाग राजाला मिळण्यास हरकत नसावी. पण हे सर्व लोकांनीच ठरवावे.”

दीड तास संपला म्हणून राजा व महात्माजी उठले. राजाला दारापर्यंत पोचविले. हस्तांदोलन झाले व सर्वांनी वर्ध्याच्या वाटेने धुळीने भरलेल्या रस्त्यावरून जुन्या मोडक्या मोटारीतून प्रवासास सुरुवात केली. राजा विचारत होता. आप्पा स्वप्नातच.

दुसरे दिवशी पुन्हा १०-३०ला संभाषणाला सुरुवात झाली. आदले दिवशी दुपारी राजाने खादी ग्रामोद्योगाचे आद्य उपासक कुमारप्पा यांच्यासहित ग्रामोद्योग केंद्रास भेट दिली. आर्यनायकम व त्यांच्या सुविद्य बंगाली पत्नी आशादेवी यांच्याशी नयी-तालीम, बेसिक एज्युकेशनवर चर्चा केली.

महात्माजी म्हणाले, “प्रत्येक गावात पाच पंचांची ग्रामपंचायत सर्व गावचे लोकांनी मिळून नियुक्त करावी. या पंचायतीला गावचा कारभार चालविणेचा अधिकार द्यावा. शिक्षण, संरक्षण, गावचे रस्ते, बाजार, यात्रा, शेती, ग्रामोद्योग यासंबंधी विधायक कार्याकरता त्यांना संस्थानचे महसुलापैकी अर्धा हिस्सा कमीत कमी मिळाला पाहिजे.

अनुक्रमणिका

तसेच गावातील तंटे-बखेडे गावातच संपले पाहिजेत. गावात टगे लोक व वकील लोक भांडणे लावतात व आपापली घरे बांधतात. म्हणून ग्रामपंचायतीपुढे येणाऱ्या सर्व तंट्यांचा निकाल समझोत्यानेच शक्यतोवर करावा. कोर्ट फी, स्टँप फी ही ग्रामन्यायालयापुढील कज्ज्यांना नसावीत. वकील दिलाच तर मात्र दुप्पट कोर्ट फी त्या पक्षकाराला द्यावी लागेल.

“पंचायतीला सल्लामसलत देऊन कायद्याप्रमाणे व्यवस्थित शिस्तशीर न्याय पंचायतीची कामे चालवावीत. याकरता पंधरा पंधरा गावांच्या गटाला एक फिरता न्यायाधीश नेमावा.

“पंधरा ते वीस गावांच्या गटाची तालुका समिती असावी. गावोगावची कामे पाहात असताना इतर गावांचे हितरक्षण व सहकाराने तालुक्याची सर्वांगीण उन्नतीची चर्चा विचार-विनिमय तालुका समितीने करावी. तालुक्यातील संरक्षणाचे, पोलिसचे, सर्व काम तालुक्याला जरूर तितके पोलिस ठेवून तालुक्यांनीच करावे. मात्र सर्व संस्थानचे असे एक पोलिस खाते असावे.

“प्रत्येक तालुक्यातून तीन सभासद औंधच्या कौन्सिलवर नियुक्त तालुका समितीनीच करावेत. “राजेसाहेबांना या मध्यवर्ती कौन्सिलमध्ये पाच तज्ज्ञ, ज्ञानी, कर्तृत्ववान संस्थानमधील किंवा बाहेरील इसम नेमण्याचा अधिकार राहील. दरवर्षी या कौन्सिलच्या निदान दोन बैठकी व्हाव्यात.”

महात्माजी बोलत होते. सर्वांच्यावर जादू टाकत होते. त्यांचा प्रत्येक शब्द म्हणजे करुणा व शांतीतून उमटलेला मंत्रच. मॉरिस लिहून घेत होते. टाईप करून औंधच्या नव्या राज्यघटनेचा मसुदा तिसऱ्या दिवशी विचारात घेण्याचे ठरविले गेले. मंडळी वर्ध्याला परतली.

ए. जी. जी. ची तार जमनालालजींचे गेस्ट हाऊसमध्ये साध्या पाकिटात आलेली होती. कवीनी ती फोडली. दर्शने, पंडितजी एकदम शुद्धीवर (?) आल्यासारखे अस्वस्थ झाले....आता काय होणार? राजाने ब्रिटिश साम्राज्याचा हुकूम मोडला.

आम्हाला वाटतच होते की आप्पासाहेबांच्या ह्या घाईघाईचे परिणाम चांगले होणार नाहीत. आता राजेसाहेबांना ही भयंकर बातमी कोण सांगणार? मॉरिसला धाडले. मॉरिसने तार राजाला दाखविली. राजा हसला. गप्प बसला.

तिसऱ्या दिवशी महत्माजींना ही तारेची कथा आधी कोणी तरी सांगितली होती. राजा येऊन बसल्याबरोबर बापूजी हसत, डोळे मिचकावत मिचकावत म्हणाले, “मला या ब्रिटिशांचा चांगला परिचय आहे. चांगले असेल, कल्याणकारी असेल ते, ते आज नाही-उद्या मान्य करतात त्यांच्याशी प्रेमाने, अहिंसेनेच सामना द्यावयास हवा.”

राजा म्हणाला, “बापूजी, गेली पस्तास वर्षं मी औंधच्या प्रजाजनांना स्वावलंबी व सुसंस्कृत करण्याचे व्रत पाळीत आलो आहे. तुमच्या उत्तम सल्ल्याने ते व्रत तसेच आजच्या काळातही चालू ठेवणार. माझी ही प्रजा, माझीच मुले आता रांगू, चालू लागली आहेत. त्यांना मी मांडीवर घेऊन बोळ्याने दूध पाजण्यात काय अर्थ आहे? सर्व मसुदा तयार आहे. औंधची नवी राज्यघटना तुमच्याच आशीर्वादाने अमलात येईल.” येथे राजा हसून म्हणाला, “खरे तर मीच तुमच्यापेक्षा चार-सहा वर्षांने वडील व ब्राह्मण. मीच तुम्हाला आशीर्वाद

देणार!...ए. जी. जी. माझा मित्र आहे. त्याला समजावून सांगीन. जरूर तर दिल्लीला जाऊन व्हाइसरॉयलाही भेटेन व यात काय गैर आहे हे त्यांनाच विचारीन," दर्शने, कवी, सातवळेकर थक्क झाले. बापूंना गहिवर आला असेल तर तो त्यांच्या मुद्रेवर दिसलाच नाही. नेहमीप्रमाणेच त्यांचे वदन प्रसन्न-शांत होते. आप्पा-मॉरिस चुळबूळ करू लागले. महात्माजींनी विचारले,

"काही प्रश्न, शंका आहे?"

मॉरिस म्हणाला, "हो. निवडणुकांत भाग घेण्यास वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना अधिकार हवा ना?" बापूजी ठामपणे म्हणाले, "नाही, मत देणे ही एक मोठी जबाबदारी आहे. जबाबदारी ही काही तपश्चर्येशिवाय, फुकट मिळाली तर त्याची किंमत वाटत नाही. फुकट मिळालेले वाया जाते व समाजात जबाबदारीची जाणीव कमी होते. समाजाचा ऱ्हास होतो.

"औंधात प्रत्येक फक्त साक्षर प्रौढ स्त्री-पुरुषांनाच मत देण्याचा अधिकार राहील!"

आप्पा एकदम गडबडला. हे काय? डेमॉक्रसी, क्रांती, समतेचे कसे? मूठभर शिकलेले लोकच राज्य करणार की काय? तो नेहमीच्याप्रमाणे एकदम आवेशात येऊन म्हणाला,

"बापूजी, ही काय डेमॉक्रसी, लोकशाही झाली की थट्टा झाली ? लोकांना ते कसे पटेल?"

प्रशांत बापूजी म्हणाले, "अरे आप्पा, लोकशाही म्हणजे सर्वांनी अधिकारावर बसणे नाही. लोकशाही म्हणजे प्रत्येकाने सुबुध्याने आपली आपल्यावर असलेली जबाबदारी, समाजाच्या धारणेकरता वापरून आपले कर्तव्यपालन, यथायोग्य रीतीने करणे; लोक हे समजू शकले नाहीत व फक्त मानाकरता, सत्तालोभाकरता झटू लागले तर राज्यातील राम जाईल व ते रावणराज्य होईल."

आप्पा उतावळेपणाने म्हणाला, "म्हणजे औंधची नवी राज्यघटना सुरू होण्यास उशीर लागणार! सर्व प्रौढ साक्षर होण्यास किती वेळ लागेल कुणास ठाऊक?"

महात्माजी म्हणाले, "अरे आप्पा, ही राज्यघटना केव्हा अंमलात आणावयाची, किती लवकर लोक साक्षर होऊ शकतील हे तुझ्यासारख्या कार्यकर्त्यांनीच ठरवावयाचे. औंधमधील सर्व शिक्षक व प्रौढ शिकलेली मुले-मुली व सर्व अधिकारी कामाला जुंपले व किती दिवसांत सर्व प्रौढ निदान साधे पहिलीचे पुस्तक वाचू शकतील इतके साक्षर होऊ शकतील? काही अंदाज आहे तुला?

"शिवाय या नव्या राज्यघटनेचा मसुदा आहे या कौन्सिलमध्ये पास करून घेऊन तो कायदा म्हणून जाहीर तर एक महिन्याच्या आत होऊ शकतो. कायदा झाला की नवी राज्यघटना सुरू झाली. ती प्रत्यक्ष अंमलात आणण्यास लोकांना साक्षर करून पहिली निवडणूक घेण्यास किती वेळ तू लावणार हे तूच सांग. तुझ्या कर्तबगारीवर सर्व अवलंबून आहे. किती महिन्यांत सर्व औंध साक्षर करशील?"

ही महात्माजींची कार्यपद्धती. व्यक्तीच्या सामर्थ्याची, निपुणतेची, निष्ठेची, ध्येयपूर्तीकरता अविरत कार्य करण्याची परीक्षा. एक परीक्षा पास झाली की दुसरी की तिसरी. महात्माजींच्यापाशी टिकावयाचे म्हणजे मोठी, भयंकर, तपश्चर्याच.

सर्व औंध झटपट साक्षर केलेला राजपुत्र तडफदार कार्यकर्ता, क्रांतिकारी सेवक, वगैरे स्वप्न आप्पाला पडू लागली. लहानपणापासून आपण हिरो, शिकार, घोडा, बंदूकबहाद्दर, विमानविद्याविशारद, वगैरे सदैव स्वप्नरंजनात रमणारा आप्पा बोलून गेला. -"तीन महिने"-!!!

राजाने मुलाकडे पाहिले व मंद हास्य केले. म्हणाला, "बापूजी, एक एक पाऊल टाकू. ही घटना एक महिन्यात म्हणजे १९३९ जानेवारी अखेरच्या आत जरूर त्या नियमानुसार आहे त्या कौन्सिलकडून पास तर करून घेऊ.

"मग शक्य तितक्या लवकर, म्हणजे मे १९३९ च्या अखेरपर्यंत निदान पन्नास टक्के लोकांना तरी साक्षर म्हणजे सोपे पुस्तक वाचावयास येईल इतपत तयार करू व मग ग्रामपंचायती व तालुका पंचायती, व कौन्सिलच्या निवडणुका करून दिवाळीच्या सुमारास नव्या राज्यघटनेप्रमाणे नियुक्त झालेले कौन्सिल आपला पुढारी निवडेल व हा प्राइज प्राय-मिनिस्टर निवडला गेला म्हणजे सर्व कारभार प्रजेच्या हाती देण्याचे स्वप्न साकार होईल.

महात्माजी म्हणाले, "अहिंसेची, त्यागाची, अनासक्तीची बैठक असेल तर अधिकाराचा गैरवापर होऊच शकत नसेल, अशी शुद्ध बैठक जर नसेल तर अधिकारी समाजाची पिळवणूक शोषणच करतील व एक राजा परवडला, हे अनेक देशप्रेमी, कार्यकर्ते, क्रांतिकारी नकोत असेच लोकांना वाटू लागेल.

अधिकारयंत्रणा विकेंद्रित जर झाली तरच धंदेवाईक राजकारणी या छोटाशा अधिकार-प्राप्तीकरता चुरस करणार नाहीत. जितके केंद्रीकरण अधिकाराचे तितके भय जास्त की सत्ता-पिपासू भ्रष्ट, चारित्र्यहीन व्यक्ती निश्चित सत्ताकेंद्र काबीज करून देशात व जगात थैमान घालतील, अनर्थ घडेल." (हे महात्माजी १९३८ साली बोलले ते जसेच्या तसे त्याच वेळी टिपणे शक्य नव्हते. पण सर्वच्या सर्व त्यातील सत्य भावार्थ मात्र या ठिकाणी मांडण्याची खटपट आहे. त्यात क्षम्य चुका, मागेपुढे काही प्रसंग असणे शक्य आहे पण वाचनाबरोबर रंजनही व्हावे हाच उद्देश.)

आज महात्माजींचे बोल देशातील व जगातील भीषण जीवन पाहिले, अनुभविले म्हणजे किती सत्याने भरलेले आहे व आपण सर्व कसे वाटच चुकलो आहोत हे विचारवंतांना तरी कळावे. महात्माजींच्या आश्रमातून त्यांचा निरोप घेऊन मंडळी निघतात न निघतात तो जमनालालजी राजाला म्हणाले की राजाच्या स्वागतार्थ संध्याकाळी सभा आहे.

सभेला, सत्काराला, जयरामदास दौलतराम, दादा धर्माधिकारी, किशोरीलाल मश्रूवाला, श्रीमन नारायण, जमनालालजी हे उपस्थित होते. समाज काही फार मोठा नव्हता. पण भाषणामुळे राजाला फार बरे वाटले. आप्पाला बोलण्यास सांगितले तेव्हा नेहमीप्रमाणे जोरदार भाषण झाले पण त्याला नक्की काय सांगावयाचे होते हे काही कुणालाच समजले नाही-त्यात तो स्वतःही होता!!

अनुक्रमणिका

राजा औंधला मुंबईस मुक्काम करून तीन दिवसांनी पोचला. ए. जी. जी. चा खास दूत गुप्त खलिता घेऊन राजाची वाट पाहात होता.

खलित्यात होते, “ताबडतोब येऊन भेटलात तर आनंद होईल. याच, वाट पाहात आहे.”

राजा रविवारी औंधला पोचला. सोमवार, मंगळवार राजाचे उपासाचे दिवस. राजाने जासुदाबरोबर उत्तर लिहिले, “आप्पाला घेऊन बुधवारी येत आहे. आपल्या भेटीचा लाभ होणार म्हणून आनंद वाटतो.”

आता या महत्त्वाचे भेटीत काय झाले, या भेटीचा परिणाम छोट्या औंधवर, ब्रिटिशांचा औंधच्या या विकेंद्रित ग्रामराज्याच्या प्रयोगाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला का नाही, छोटे औंध व विशाल काँग्रेसचा स्वातंत्र्याचा लढा यांचे संबंध व सूत्र कसे राहिले हे सर्व चवथ्या प्रकरणी पाहू.

अनुक्रमणिका

# ४ १९३८-४२

राजा मुंबईला पोचतो तो हिंदुस्थानातील सर्वच्या सर्व वृत्तपत्रांनी औंधचा राजा महात्मा गांधींना भेटला, "सर्व अधिकार प्रजेला," "इतर संस्थानांनी आता काय करावे?" वगैरे ठळक मथळ्याखाली सर्व सेवाग्रामचे वृत्त छापले होते. राजाला अर्थात बरे वाटले, समाधान झाले. मानमान्यतेकरता त्याला नेहमीच हपापल्यासारखे होई. बिचारा आप्पा, तोही कल्पना करू लागला, हिंदुस्थानच्या प्रचंड क्रांतीला छोट्या औंधातून सुरुवात-ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध औंधने रणशिंग फुंकले-

औंधल्या पोचल्यावर वस्तुस्थिती काय आहे, या पुढची पावले अगदी जपून टाकली नाहीत तर औंधला नामशेष करण्यास ब्रिटिशांना उशीर लागणार नाही, हे हळूहळू उमगू लागले.

नशीब आप्पाचे की याच वेळी त्याचा विलायतेतील दोस्त फ्रॅन्सिस वॉटसन औंधला होता. राम हॉलमध्ये मॉरिस, फ्रॅन्सिस यांच्या गप्पा सुरू झाल्या तेव्हा आप्पाचे मन भडकत आहे हे समजून फ्रॅन्सिस त्याच्या नेहमीच्या अत्यंत शांत, सुसंस्कृत भाषेत म्हणाला, "आप्पा, औंधचा हा विकेंद्रित लोकशाहीचा प्रयोग मूलतःच कल्याणकारी, व महत्त्वाचा आहे. अशा या कल्याणकारी, उत्तम प्रयोगाला ब्रिटिशांच्या द्वेषाचे गालबोट लावू नकोस. सर्वच्या सर्व ब्रिटिश काही साम्राज्यवादी नाहीत. सुजाण, सुबुद्ध ब्रिटिशांना जर तू तुझ्या विधायक कार्यात हा प्रयोग यशस्वी करून दाखविलास तर त्यांना आनंद तर होईल, पण ब्रिटिश धोरणावर परिणामही होईल. शांत रीतीने, वैमनस्य मनात न ठेवता, महात्माजी सांगतात त्याप्रमाणे औंधचा हा विकेंद्रित ग्रामराज्य प्रयोग हा एक सत्य व अहिंसेच्या द्वारा छोट्या छोट्या समूहात राहून व्यक्तीला स्वातंत्र्य व समाधान अनुभवू देण्याकरता आहे व समाजाच्या सर्वांगीण उद्धाराकरता आहे हे तू पटवून देऊ शकतोस. आम्ही तुला मदतच करू."

पुढे अनेक वेळा (१९४२-४४) जेव्हा औंधवर भयंकर संकटे आली त्या वेळी फ्रॅन्सिस दिल्लीला इन्फर्मेशन खात्यात प्रमुख पदावर होता. दुसरी जागतिक लढाई त्या वेळी ब्रिटिशांच्या आंगलट येत होती. १९४२-४४ चा स्वातंत्र्य संग्राम व "चले जाव" चळवळ फोफावत होती. जयप्रकाश नारायण, अरुणा आसफअल्ली, नरेंद्र देव, अच्युत पटवर्धन, राम मनोहर लोहिया भूमिगत होते. सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील आगगाड्या पाडीत होते, पोस्टे व तिजोऱ्या लुटीत होते, प्रती सरकार (पत्री सरकार?) स्थापन करण्याचा प्रयोग चालू होता.

छोट्या औंधची ७२ गावे इतस्ततः विखुरलेली. काही साताऱ्यात, काही विजापूर जिल्ह्यात तर काही पंढरपूरपाशी. औंधचे २०-२५ पोलिस संरक्षण, बंदोबस्त ते काय करणार?

आप्पाही स्वप्नात होताच. जयप्रकाश, अच्युतराव, राम मनोहर लोहिया, अरुणाबाई यांना अधूनमधून भेटी. नाना पाटील तर मुक्कामालाच कुंडलला होते. रत्नाप्पा कुंभार, केसकर (पुढे इन्फर्मेशन ब्रॉडकास्टचे मंत्री) औंधमधूनच भूमिगत कार्य (!!!) करीत होते. राजाला हे सर्व माहीतही होते, मग ब्रिटिशांना माहीत असणारच.

अनेक वेळा ए. जी. जी. कडून दिल्लीला रिपोर्ट केले गेले, मुंबई सरकारकडूनही, की औंधचा राजा व विशेषतः त्याचा मुलगा, आपल्या हिताविरुद्ध कार्य करीत आहेत. पण काही सुज्ञ ब्रिटिशांमुळे व फ्रॅन्सिस

दिल्लीला महत्त्वाच्या हुद्द्यावर होता म्हणून छोट्या औंधची खरी बाजू व अडचणीही ब्रिटिशांच्या पुढे अगदी लंडनपर्यंत ठेवल्या गेल्या.

ब्रिटिशांच्या सरकारी दप्तरातूनच हे पुढे (१९७०) निदर्शनाला आले. पण ह्याबाबत ओघाने पुढे येईल. कोण, केव्हा, कसा, कालाच्या प्रवाहाला वेगळे वळण लावण्याकरता पुढे येतो, उपयोगी ठरतो हे एक जीवनाचे सूक्ष्म गूढच आहे. किती वेळा तरी त्याची प्रचिती येते. माणूस, स्वस्थ मनाने हे अनुभवत नाही, येवढेच. ही नियती का? का हे सर्व अचानक, अकल्पितच असते? का होणार? केव्हा? कसे? हे काहीच सांगता येत नाही. आपण मात्र जे आले, जे आहे, तेच व्यवस्थित, कार्यक्षमतेने, शांत चित्ताने, आनंदाने करीत राहावे, येवढेच. आपल्या हाती आहे हे एकदा उमगले म्हणजे मग मनाला त्रागा, त्राण, त्रास होतच नाही. खरे ना?

सोमवार, मंगळवारचे उपवास झाल्यावर राजा कोल्हापूरला त्या वेळच्या एका "कर्नल" ए. जी. जी. कडे गेला. हा जरा जुन्या विचारांचा. ब्रिटिशांचे वर्चस्व राखणे, राजा-महाराजांना ताटाखालच्या मांजराप्रमाणे वागविणे, हे त्याच्या स्वभावधर्माला अनुसरूनच होते. पहिल्या वेळी औंधला त्याने भेट दिली त्या वेळी राजाने त्याला मोठा मान देण्याच्या दृष्टीनेच देवीच्या देवळात जाहीर दरबार भरविला होता. देवीच्या देवळात जाण्याकरता सर्वांनाच जोडे-बूट काढावयास लागतात, म्हणून ए. जी. जी. करता एक खुर्ची त्याचे बूट-मौजे काढण्याकरता ठेवली होती.

दरबारची सर्व मंडळी जमली होती. ए. जी. जी. ची वाट पाहात होती. राजा देवळाबाहेरच त्याच्या स्वागताकरता उभा होता.

ए. जी. जी. आला. त्याने आपल्याला बूट काढून मगच दरबारात जावे लागेल हे ओळखले व राजाला म्हणाला...राजासाहेब दरबार सुरू करा, मी बाहेरच बसणार....आपले भाषण झाल्यावर मी येथूनच बाहेरून बोलेन!!!

या ए. जी. जी. ने नंतर दिल्लीला रिपोर्ट केला की, राजा म्हातारा आहे. बुद्धिभ्रंश झाला आहे. त्याचा मुलगाच संस्थान चालवीत आहे. ब्रिटिशांबद्दल त्याच्या मनात आदर नाही. त्याच्यावर पाळत ठेवली पाहिजे वगैरे. अशा प्रवृत्तीचा हा ए. जी. जी. राजाचे या वेळी स्वागत कसे करील, याची कल्पना येणे अवघड नाही. राजाला आपल्या ऑफिसच्या खोलीतच त्याने भेट दिली. आंप्पाला बाहेरच थांबावयाला सांगितले. थोडे औपचारिक वगैरे झाल्यावर तो राजाला जरा गुर्मीत म्हणाला, "आमच्या परवानगीशिवाय त्या गांधीला भेटावयास गेला हे आम्हाला पसंत नाही."

राजा म्हणाला, "तुमचे व्हाईसरॉयसाहेबही गांधींना भेटतात तर मला भेटून त्यांचा सल्ला घेण्यास काय हरकत आहे?"

ए. जी. जी. म्हणाला, "आमची गोष्ट वेगळी आहे. संस्थानिकांचे ब्रिटिश राजसत्तेशी करार-मदारांनी बांधील असे हितसंबंध आहेत. या नियमबद्ध संबंधामुळे स्वतःच्या मनाप्रमाणे करण्याचा संस्थानिकांना हक्क मुळीच नाही हे विसरू नका. अशा घोडचुका न केलेल्या बऱ्या."

अनुक्रमणिका

हे सर्व चालू असताना राजाचा पारा हळूहळू चढत होता. राजाचे व ब्रिटिश साम्राज्याचे संबंध व त्याच्या वागणुकीबद्दल ए. जी. जी. चे वक्तव्य हे सर्व राजाच्या सहनशिलतेच्या पलीकडचे होते. राजा एकदम उफाळून म्हणाला, “गेली तीस वर्षे माझ्या प्रजाजनांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. माझे सर्व अधिकार प्रजेच्या स्वाधीन करणे ह्या माझ्या स्वकर्तव्य-पालनाचा शेवटचा टप्पा असे मी समजतो. उत्तम सल्ला घेऊन लोकांचे कल्याण कसे करावे हाच ध्यास मला सतत लागला आहे. जगदंबेला स्मरून मी स्वधर्म-पालन करीत आहे; हे माझे स्वधर्मपालन तुम्हाला किंवा कोणा इतरांना पटण्याकरता मी करीत नाही. माझे वागणे व विचार आपल्याला पसंत नसतील तर हा मी परत जातो औंधला अंबाबाईचे चरणी!!!”

राजा ताडकन उठून दाराकडे तरातरा चालायला लागला. ए. जी. जी. ची गुर्मी जरा शांत झाली. तो झटकन उठून राजाचा हात पकडून आर्जवून म्हणाला, “राजेसाहेब, क्षमा करा. माझे शब्द आपल्याला लागले वाटते. माझा हेतू एवढाच आहे की, या कठीण काळात ब्रिटिश व संस्थानिक यांचे धोरण एक हवे. काँग्रेस फार बलवान बनत आहे. युरोपमध्ये महायुद्ध पेटण्याच्या मार्गावर आहे. जगामध्ये मोठे बदल होणार आहेत. संस्थानिक व ब्रिटिश यांचे हितसंबंध एकमेकांशी निगडित आहेत.” कितीही रुद्रावतार आणला तरी भवानराव राजाला थंड होण्यास मुळीच वेळ लागत नसे. तो खाली बसला व वर्ध्याला झालेल्या महात्माजींच्या संभाषणाचा वृत्तान्त त्याने ए. जी. जी. ला दिला व म्हणाला, “काळाची झपाट्याने बदलती पावले ओळखून प्रजेला आपल्या विश्वासात घेऊन त्यांना आपल्या स्वतःचा सर्वोदय करण्यास संधी द्यावी हाच माझाही हेतू आहे. सर्व सत्ता औंधलाच केंद्रित केल्याने माझ्या मनात असूनसुद्धा राज्ययंत्रणेतील दोषामुळे व अधिकारशाहीच्या असमर्थतेमुळे सुधारणा होण्यास उशीर लागतो. म्हणूनच महात्माजींची विकेंद्रित ग्रामराज्य पद्धती औंधला उपयोगी ठरेल असे आजच नाही तर गेली २५ वर्षे मला वाटत आले आहे. त्या दृष्टीने १९२० सालापासून मी पावलेही उचलली आहेत. आता आप्पाही तुमच्या विलायतेतील उत्तमोत्तम शिक्षण घेऊन परतला आहे. त्याच्या मदतीने हा प्रयोग यशस्वी होणारच अशी माझी खात्री आहे.”

या ए. जी. जी. च्या नंतर एडवर्ड्स व त्याच्या नंतर अत्यंत समजूतदार, हुशार, प्रेमळ मित्र कर्नल गेसफोर्ड हे दोन ए. जी. जी. औंधच्या नशिबाने दक्षिणेतील संस्थानिकांना सल्ला देण्याकरता नेमले गेले. त्यासंबंधी पुढे बोलूच.

हे छोटेसेच ग्रहण सुटले व झपाझप औंधच्या जीवनात प्रचंड बदल होऊ लागले. औंधला परतल्यावर मॉरिस व फ्रॅन्सिस राजाला धन्यवाद देण्याकरिता रंगाच्या खोलीत आले तेव्हा राजा त्यांना म्हणाला, “आत्ता आप्पाला योग्य मार्ग दाखवा. औंधला तुम्हा दोघांची जरुरी आहे.”

आता आप्पापुढे सर्व संस्थान तीन महिन्यांत साक्षर करण्याचा व नवीन राज्यघटनेच्या मसुद्याचे कायद्यात रूपांतर करण्याचा हे दोन महा कठीण प्रश्न होते.

साक्षरता मोहीम कशी सुरू करावयाची, कोणाला कामाला जुंपावयाचे हे ठरविण्याकरता श्रीनिवास हायस्कूलमध्ये सभा घेतली गेली. धोंडोपंत मास्तर, गजानन मास्तर, पाठक मास्तर हे या कार्यक्रमासंबंधी पूर्णपणे उत्साही तर इतर काही मास्तर व अधिकारी हे सर्व वेडेपणाचा बाजार आहे असेच पुटपुटणारे.

अनुक्रमणिका

तीन महिने शाळांना सुट्टी देण्याचे ठरले. प्रौढ विद्यार्थी, विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सामील करून प्रत्येकाने पाच पाच प्रौढांना साक्षर करण्याचेही निश्चित केले.

या सर्वांकरता उपकरणे, फिरती, भोजन, राहण्याची व्यवस्था यासंबंधी ठरले.

पण, साक्षर करण्याची पद्धती कोणती चांगली यावर खूपच वादविवाद करून श्री. आप्पासाहेब भागवंताना साक्षरता प्रचाराच्या च्यांच्या पद्धतीसंबंधी शिक्षण देण्यास बोलाविण्याचे ठरले.

श्री. आप्पा भागवतासारखा ध्येयनिष्ठ, मोठा कार्यकर्ता औंधची ही जरुरीची व निकडीची गरज भागवण्याकरता धावूनच आला. दोनही आप्पा, संस्थानभर शिक्षकांना ही पद्धती शिकवण्याकरता अनवाणी, बैलगाडीतून, मोटारीतून हिंडले. आप्पा भागवतांनी सर्वच वातावरण उत्साही बनविण्यास अमूल्य मदत केली. केवढे त्यांचे उपकार छोट्या औंधवर!! फक्त साक्षरताच नाही तर एक समाधानी, सुसंस्कृत, सेवाभावी, स्वावलंबनाने सुधारणारा समाज कसा निर्माण करता येईल यासंबंधी अनेक खेड्यांतून स्वतः धडे शिकविले. इकडे नानासाहेब चापेकर व आण्णासाहेब बखले, हे महात्माजींनी मंजूर केलेल्या नवीन राज्यघटनेचा मसुदा कायद्याच्या स्वरूपात बसविण्याच्या खटाटोपाला लागले.

२१ जानेवारी १९३९ हा नवीन राज्यघटना सुरू करण्याच्या शुभ दिन जाहीर झाला.

दादासाहेब मावळणकर व मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना महात्माजींनी ग्रामराज्य राज्यपद्धतीच्या उद्‌घाटनाला औंधला जाण्यास सांगितले. शंकरराव देव, कर्नाटककेसरी गंगाधरराव देशपांडे, राजाचे डेक्कन कॉलेजमधील वर्गबंधू हे हुबळीहून येणार होते. मोठाच सोहळा होणार होता. कायद्याचा मसुदा तयार झाल्यावर महात्माजींना दाखविण्यास आप्पा, कुंडलकर, बाबू बापट सेवाग्रामला गेले. महात्माजींनी काही जुजबी दुरुस्त्या सुचविल्या व पंडित जवाहरलालना तो दाखविण्यास सांगितले.

आप्पास कसनुसेच झाले. १९३० सालचे ऑक्सफर्डमधील जवाहरलालजींचे सिंहासारखे चवताळणे व त्यांची सर्व संस्थानिक नष्ट झाले पाहिजेत, ही गर्जना, तो विसरला नव्हता. हळूच महात्माजींना आप्पा म्हणाला, “बापूजी आता वेळ कोठे आहे हा मसुदा पंडित जवाहरलालना दाखवायला? नंतर दाखवू का?”

बापूजी हसले व म्हणाले, “अरे वेड्या, जवाहरलाल सर्व हिंदुस्थानातील प्रजा परिषद व लोकांच्या मुख्य संघटनेचे अध्यक्ष आहेत. जा, लवकर जा, ते उद्याच मुंबईत आहेत. त्यांना भेट जा, ते काय म्हणतील ते फेरबदल कर, जा...”

कुंडलकर व आप्पा आले मुंबईला. कमलाकांत महाराजांच्या फ्लॅटवर शिवाजी भुवनात दादरला उतरले. पंडित जवाहरलाल राजा व बेटी हाथीसिंग यांच्याकडे कारमायकेल रोडवर उतरले होते. सकाळी नऊ वाजता त्यांच्या फ्लॅटवर जाऊन घंटा वाजविली. बेटी हाथीसिंगानीच दार उघडले, “पंडितजी सकाळी सात वाजता बाहेर गेले आहेत. आता संध्याकाळी जाहीर सभेच्या आधीच ५ ते ५-३० लाच भेटतील आपण कोण?”

“आप्पा पंत.”

“या, आत या, बसा चहा घेणार का कॉफी?” बेटी हाथीसिंग.

“दूध,” आप्पा.

राजा व बेटी अत्यंत सुसंस्कृत. आप्पाचे व त्यांचे सूत्र जमण्यास वेळ लागला नाही. पाश्चिमात्य वागणुकीची पूर्ण छटा त्यांच्यामध्ये सेवाग्राम आश्रमातील वातावरण व कारमायकेलवरील फ्लॅटमधील यात जमीनअस्मानाची तफावत. आप्पाला लहानपणापासून वेगवेगळ्या विचार-आचार-उच्चारांची सवय. त्यामुळे हे काहीच अवघड नव्हते. राजा हाथीसिंग केंब्रिजचा तर आप्पा ऑक्सफर्डचा एवढाच फरक. दोघांचेही परदेशात चार-सहा वर्षे संस्कार समानच.

दुपारी ४-४५ मिनिटांनी कारमायकेल फ्लॅटची घंटा पुन्हा दाबली. कायद्याचा मसुदा एका उत्तम फाईल कव्हरमध्ये ठेवून आप्पा जपून संभाळत होता. फ्लॅटचे दार एका नोकरानेच उघडले. खोलीत वेगवेगळ्या पोशाखाचे, चेहऱ्याचे, वेगवेगळ्या भाषेत बोलणाऱ्या २५-३० व्यक्ती उभ्याच राहिल्या होत्या. बसावयास जागा होत्या त्या सर्व स्त्रियांनीच घेतल्या होत्या. बेटी व राजा हाथीसिंग हसत खेळत सर्वांच्याशी बोलत होते. राजा हळूच येऊन म्हणाला, “पंडितजी आताच येतील. थकलेले असणार, फार वेळ घेऊ नका.”

५-७ मिनिटांत दार खाडकन् उघडले. एक झंझावतच आत आला. रागीट, तापट, त्रासलेली मुद्रा. एकामागून एकाला एखाद-दुसरा प्रश्न विचारून झटपट दाराबाहेर घालवीत होते. “उगाच वेळ घेतात, काही समजूच शकत नाहीत”.....दोन तीन वेळा बेटीला म्हणाले त्रासून...

सर्व खोली खाली झाली. कुंडलकर व आप्पा एका कोपऱ्यात उभे, गपचिप.

जवाहरलालजी एकदम ओरडले, “ कैसे आ गये?”

आप्पाचे व कुंडलकरांचे हिंदी औंधाचे. त्यांना वाटले विचारीत आहेत की बसने आलात, टांग्यात बसून की चालत?

भीत भीत आप्पा म्हणाला, “टॅक्सीने...”!!!

एकदम सर्व राग, त्रागा, मावळला. हसू आले या गावंढळ लोकांचे. डोळ्यांत दयार्द्र करुणा झळकली. आप्पा म्हणाला, “गांधीजींनी हे आपल्याला दाखवायला सांगितले आहे. औंधच्या नवीन घटनेचा महात्माजींना विचारून तयार केलेला मसुदा.”

जवाहरलालनी एकदम आप्पाचा हात पकडला. म्हणाले, “बैस”. सर्व मसुदा दोन वेळा वाचला. दृष्टी एकदम दूर दूर गेली. म्हणाले, “काम काही सोपे नाही. ब्रिटिशांनी अडचणी नाही आणल्या तरी परिश्रम पडतील. सुरुवात कराच. मला येऊन भेटत जा.” पुढे ३५ वर्षे आप्पा जवाहरलालना सारखा भेटतच होता.

२० जानेवारीच्या आधी सर्व तयारी झाली. पाहुण्यांची व्यवस्था झाली. समारंभ सुरू झाला. बाळासाहेब खेर काँग्रेसचा तिरंगी झेंडा उंचविणार होते. राजा म्हणाला, “शिवाजी महाराजांचा भगवा झेंडाही मी स्वतः

अनुक्रमणिका

उंचविणार.” शंकरराव केळकर औंधचे चीफ इंजिनियर. त्यांनी सर्व व्यवस्था नेहमीच्या त्यांच्या कार्यपद्धतीप्रमाणे उत्तम केली. वाड्यापुढेच मोठे डायस. त्यावर शंभर माणसे सोईस्कर रीतीने बसतील अशी लोड-तक्क्या-गालीचे घालून सुंदर व्यवस्था. मिरवणुकीपासून ते भाषणे होईपर्यंत सर्व कार्यक्रम उत्तम झाला. राजा म्हणाला,

“आता राज्य तुमचे. अधिकार, पैसा, सुधारणा, सर्व तुम्हीच तुमच्या हाताने करणार; पण जर अधिकाराबरोबर कर्तव्याची सदैव जाणीव ठेवली नाही तर सर्व नाशच होईल. आनंदाने राज्य करा, सर्वांना सुखी करा-जय जगदंबे.”

दुसऱ्या दिवशी सकाळी जुन्या औंध कौन्सिलची बैठक सुरू झाली. कायदा वाचन व नंतर विसर्जन. अधिकारत्यागाची मूळ कल्पना मॉरिसची, ग्रामराज्याचे विचार गांधीजींचे, राजाने सर्व मानले. कायदा बखले-चापेकर यांनी केला. आप्पाचा मात्र सर्व गोंधळच झाला. कायदा कसा मांडावयाचा, काय बोलावयाचे हे पार विसरून गेला. सांगलीचे दिवाण डे, मिरजेचे, बुधगावचे दिवाण, फलटणचे सुज्ञ, कर्मकुशल रावबहादूर गोडबोले यांना आप्पाच्या एकंदर कार्यपद्धतीबद्दल खरे काय वाटले असेल ते त्यांनी अर्थात बोलून दाखविले नाही.

समारंभ सोहळा वर्तमानपत्रातील भरून आलेले रकाने व लीडर आर्टिकल्स विसरली. सर्व औंधच्या शाळेला तीन महिने सुट्टी झाली व एक अद्वितीय नवा अनुभव सर्वांच्या वाट्याला आला.

एक वेगळेच चैतन्य व उत्साह सर्व औंधच्या खेड्यापाड्यांत व झाडा-झोपडीतून उफाळू लागला. मुले-मुली, राजपुत्र-राजकन्या, मास्तर, पोलिस, अधिकारी, कारकून सर्व आपापल्या घराबाहेर प्रत्येकी ५ लोकांना साक्षर करण्यास पडले. कथा, कीर्तने, व्याख्याने, मिरवणुका, मॅजिक, लॅन्टर्न, स्लाईडस, नकाशे, चित्रे यांच्या सर्रास उपयोगाने शिकणारामध्येही उत्साह निर्माण झाला. आपण का शिकतो? ही काय सर्व भानगड आहे? आपल्यामागे ही सर्व पोरे का लागली आहेत हे नकळत सुद्धा म्हाताऱ्याकोताऱ्या, सुवासिनी, बापई च, ग, म, र, न करू लागले. एक नवा अनुभव अनुभवू लागले. या धुमधडाक्याने संस्थानबाहेरील अनेक नेते, कार्यकर्ते आकर्षित झाले व या ज्ञान-यज्ञात सामील झाले. त्यात रावसाहेब पटवर्धन ह्यांनी तर गावोगावी जाऊन साक्षरता कार्याची तपासणी केलीच पण, लोकशाही, लोकांची कर्तव्ये, स्वातंत्र्याचा लढा वगैरेवर लोकांना व्याख्याने देऊन मंत्रमुग्ध केले. भाऊ व नाना धर्माधिकारी या तरण्याबांड, बुद्धिमान कार्यकर्त्यांनी तर औंधमध्ये दोन वर्षे ठाणच मांडले व ग्रामोद्योग, खादी, नई तालीम, ग्रामराज्य, स्वातंत्र्य यासंबंधी एक ज्ञान-सत्रच उघडले. दरवेळी पंचवीस-तीस औंधीय कार्यकर्त्यांना, कार्यास समर्थ करण्याकरता शिक्षणाचे त्यांनी एक शिबिरच महादेवाच्या देवळात उघडले. असे पाच-सहा, वीस-पंचवीस शिक्षक, शेतकरी, कामगार यांचे वर्ग त्यांनी घेऊन मोठेच काम केले. १९३९ जानेवारी ते नऊ ऑगस्ट १९४२, शंकरराव देव, आचार्य भागवत व आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी संस्थानच्या अनेक खेड्यांना भेटी दिल्या व नवे नवे दृष्टिकोण लोकांचे पुढे ठेवले.

या सर्वांत अत्यंत आपलेपणाने, सतत अविरत औंधमध्ये स्वतःला आपणहून जुंपून घेणारे तात्यासाहेब शिखरे, वर्षांतून दोन-तीन महिने तरी औंधातच त्यांचा मुक्काम होऊ लागला. शिक्षणाचे वर्ग काढणे, ग्रामोद्योग-ग्रामोद्धाराची शिबिरे काढणे, हिंदुस्थानातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील अनेक कार्यकर्त्यांना आणून औंध संस्थानात लोकशिक्षणाला जुंपणे, हे सर्व कार्य त्यांनी औंधला खरे ‘दत्तक’ घेऊनच केले!! सारखे

अनुक्रमणिका

आप्पाच्या मागे लागत, “हां, चला, शिबिर काढू या. सर्व ग्रामपंचायतीच्या सभासदांना काय करावयाचे, कसे करावयाचे, या सर्वांमागे मूलभूत तत्त्वे कोणती आहेत हे समजावून सांगू या.” आण्णासाहेबांनी तर आटपाडी येथे खादी-ग्रामोद्योग संस्थेमार्फत एक मुख्य केंद्रच खोलले. ठाकरे या अत्यंत कर्तबगार, ध्येयनिष्ठ, पूर्ण गांधीवादी कार्यकर्त्याला तिथे बारा वर्षे ठेवला. ठाकरे यांनी लोकशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य अप्रतिम रीतीने बजावले.

नव्या औंधचे निर्माते मॉरिसनी तर कमालच केली. आटपाडीजवळ डबई वई या नावाचे कुरण आहे. भला मोठा एक ओढा या कुरणातून अकरा महिने बिनपाण्याचा वाहत जाऊन आटपाडीतून पुढे माण नदीला मिळतो. डबई म्हणजे कुरण कसले, कुसळे व दगडच. जमीन नाहीच!! सरकारी खिलार तिथे कसे जगे हे एक मोठे गूढ आश्चर्यच.

या डबईच्या कुरणाला बांध घालून खाली हजारो एकर जमीन बागाईत करण्याची स्वप्ने पडू लागली. बंगलोरहून १००० रु. महिना देऊन बी. रामराव ह्या इंजिनियरांना आणले. त्यांनी नकाशे केले, पाहणी केली, गणिते केली. खर्च बारा लाख रुपये येणार...औंध तिजोरीत शिल्लक शून्य.

मग क्लृप्ती निघाली श्रमदानाने धरण बांधण्याची, क्लृप्ती मॉरिससाहेबांचीच. झाले ! पाट्या, कुदळी, फावडी, पहारी, फोंड्या माळावर धाड् धाड्, ठाण् ठाण्, आवाज करू लागली. ससे, खोकडे घाबरून पळू लागली. ४-६ महिन्यांत काम थंडावले.

मॉरिससाहेबांचा निश्चय. म्हणाले मी जाऊन राहतो या माळावर. कोठे? बांधीन झोपडी; राहण्यास गेले व स्वतंत्रपूर जन्माला आले. एका घाणेरड्या, खुरट्या, बाभळीच्या झाडाखाली मॉरिससाहेबांचा मुक्काम. बसायला तट्ट्या. तोच रात्री स्वतःभोवती गुंडाळून निद्रा...पिण्याला जवळच्या शेतकऱ्याच्या विहिरीतून मचूळ पाणी. प्यायला उंटिणीचे दूध, (त्या कुरणात सरकारी वीस पंचवीस, उंट असत. औंध-आटपाडी डाक दर आठवड्याला सांडणी-स्वाराबरोबर हा साठ मैलांचा प्रवास द्रुत गतीने चार दिवसांत करी !!) खायला कच्चे मोड आलेले धान्य. कधी कधी कोणी काहीही दिले तर अत्यंत प्रेमाने निःशंक मनाने खात, खरा संत, महंत..

मॉरिससाहेबांच्याच आग्रहावरून राजाने स्वतंत्रपूरला, औंधच्या तुरुंगातील कैदी पाठविले. स्वतंत्रपूरला, तुरुंग नाहीच, कैद्यांवर मॉरिससाहेबांच्या सहवासाचा संस्कार. सर्वच्या सर्व तेथे आलेले कैदी एक-दोन वर्षांत नवीन जन्म घेऊन मानाने पुन्हा समाजात परत जात. एक नव्या प्रकारच्या तुरुंगाचे, प्रात्यक्षिक मॉरिससाहेबांनी खऱ्या प्रयत्नाने जगापुढे ठेवले. त्यांना सदैव मदतीला त्यांचा प्रमुख शिष्य, अब्दुल काझी मास्तर, नंतर औदुंबर भिंगे व अनेक तरुण मनांवर मॉरिससाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा आजन्म प्रभाव पडला.

हा क्राकॉव्हमध्ये जन्मलेला ज्यू-इंजिनियर संन्यासी बनून डबईच्या कुरणात तपश्चर्या करण्यास का आला? त्याचे व डबईच्या कुरणाचे, व औंधमधील खुनी-दरोडेखोर-रागीट-तामसी-अज्ञानी व्यक्तींचे काय नाते? हे सर्व अकल्पितच का? काढा की शोधून?

आप्पाही सारखा औंधच्या खेड्यांतून फिरतच होता. पायी, मोटारीत बसावयाचे नाही. पट्टेवाला शिपाई, पोलिस नाही. स्वयंपाक करायला मधू कुलकर्णी. आंघोळीचे पाणी वगैरेची मदत करावयाला दोन वर्षांच्या

वयापासून ज्याने प्रेमाने संभाळले तो दमेकरी, म्हातारा, थकलेला, सिताराम. रोज वेगळे गाव मुक्कामाला. मुक्काम देवळात, तक्यात, शाळेत, ग्रामपंचायत ऑफिसमध्ये, ढेकणात, पिसवात, कुत्री भुंकण्याच्या आवाजात. शांत निद्रा, सकाळी नमस्कार, गावची मुले-मुली, पोरं पाहायला जमत. हजामत स्वतःच्या हाताने करीत बसला तर प्रेक्षक आहेतच. रात्री झोपला तरी सोप्यात, देवळात. नेहमी तिथे झोपणारे सोबतीला. गम्मतच गम्मत...

गावा-गावांतून पार्ट्या, भांडणे, तक्रारी, चिक्कार. तडजोडी करण्याचे सत्रच काढले. कुंडलकर, गिजरे, ए. डी. देशपांडे, धोंडोपंत मास्तर बरोबर गावातील बुद्रुक, टगे, यांना सर्वांना जवळ बसवून सहकार्य, सेवा, सर्वोदय यांचे सारखे डोसावर डोस पाजावयाचे. सर्व तक्रारी, तंटे, मुक्कामात निकालात काढण्याचा कसोटीने प्रयत्न करावयाचा. कायद्याच्या चौकटीत कसे बसवायचे याचे तज्ज्ञ कुंडलकर, सेक्रेटरी टु-दी-गव्हर्नमेंट; मुलकी नियमात काय येते, येत नाही याबाबत सल्ला ए. डी. देशपांडे, गिजरे करीत. धोंडोपंत मास्तर नवीन नागरिक, घरचे वातावरण, समाजाचे कर्तव्य, यावर झोड उठवीत. सर्व शाळामास्तरांची वारंवार गटागटाने शिबिरे-संमेलने घेत. मुलांचे मेळावे, त्यात खेळ, शर्यती, सूर्यनमस्कार सांघिक रीतीने करावयाचे. रात्री नाटके, संवाद, करमणूक, चार हजार-पाच हजार विद्यार्थ्यांचे हे प्रचंड मेळावे. गंगाधरराव देशपांडे, शंकरराव देव, तात्या शिखरे, रावसाहेब पटवर्धन व खुद्द स्वतः राजा यांच्या व्याख्यानांनी, प्रवचनांनी दुमदुमत. नवे नवे समाजाच्या धारणेला, कल्याणाला उपयोगी संस्कार सारखे होतच राहिले. कोठे तंटा, द्वेष, संघर्षाची थोडी चाहूल जरी लागली की ताबडतोब सर्वच्या सर्व धावत. असंतोष, क्रोध, द्वेष याचा वणवा होण्याच्या आधी विझवत.

समाजात हे सारखे करावेच लागते. सहजासहजी ऐदीपणाने, सुसंस्कृत समाज निर्माण होऊ शकत नाही. मनाची सहज प्रवृत्ती आपले कर्तव्यकर्म न करण्याचीच असते. याला कारण पूर्वीचे वाईट संस्कार मनाला सवयच तशी लावतात. एकदा वाईट सवयी लागल्या की त्या पुसून टाकायला खटपट फारच करावी लागते. नुसते अधिकार हाती आल्याने परिस्थितीत काहीही फरक होत नाही. उलट असंस्कृत, अप्रबुद्ध, क्रोधी, लोभी, अहंकारी लोकांच्या हातात सत्ता आली की समाजाचा विनाश ठरलेलाच.

पण, सुसंस्कृत व जागृत समाजच अधिकारी, व्यक्तीवर नियंत्रण ठेवून त्यांच्याकडून योग्य काम करवून घेऊ शकतो.

औंधमधील या दहा वर्षांच्या काळात हा मेळाव्यांचा, शिबिरांचा, प्रदर्शनांचा, व्याख्यानांचा, फिरतीचा, जो धूमधडाका उडाला त्याचा मुख्य उद्देशच लोक-जागृतीचा होता.

सतत लोक-जागृतीचे कार्य करणारे निर्भिड, निःस्वार्थी, निगर्वी, निरलस, जितके जास्त कार्यकर्ते असतील तितक्याच प्रमाणात समाज सुसंस्कृत राहतो. राज्यशासनयंत्रणेमार्फत, हे कार्य होईल की अपेक्षाच मूर्खपणाची व आळस, अज्ञाननिदर्शक आहे.

१९३९ जानेवारी २१ ला औंधच्या ग्रामराज्याचा कायदा जुन्या कौन्सिलने पास केला व ते विसर्जन पावले. साक्षरता प्रसार मे १९३९ पर्यंत योग्य गतीने कार्य करीत राहिला. तीन महिन्यांत सत्तर टक्के औंधच्या नागरिकांना निदान अक्षर-ओळख तरी झाली. साक्षर झाले असे म्हणाले तर ती अतिशयोक्तीच होणार. पण

अशा मोठ्या प्रमाणात केलेल्या उठावाचा वेग कायम ठेवणे कठीण असते. मुले-मुली कंटाळली. नवीन एक धाडसी खेळ ही भूमिका तीन महिन्यांत मावळू लागली. घरच्या आठवणी येऊ लागल्या.

महात्माजींना भेटून जून महिन्यात निवडणुका झाल्या. सत्तर-पंचाहत्तर टक्के लोकांनी मते दिली. ग्रामपंचायती (७०), तालुकापंचायती (५), निवडल्या गेल्या व औंधचे नवे कौन्सिल अस्तित्वात आले. त्यात राजाच्या विरुद्ध घोषणा करणारे गुणडाळचे गोविंदराव कणबूर, औंधचे रामभाऊ इंगळे मास्तर, आटपाडीचे रुस्तुमराव देशमुख, मिटूलाल कलाल, कुरेशी वकील व विश्वनाथपंत दर्शने निवडून आले. आप्पाही औंध तालुका समितीमार्फत निवडला गेला. कुंडल तालुक्यातून शंकरराव किर्लोस्कर, बाबूराव लाड व बिचुदचे इनामदार, पंडितराव कुलकर्णी निवडून आले. राजाने आप्पाला ग्रामराज्य व्यवस्थेचा पहिला पंतप्रधान, म्हणून नेमले. अर्थात टीका खूप झाली. वृत्तपत्रांतून ठळक शीर्षके आली. कणबूर, इंगळे रागावलेही.

आप्पाने गडबड करणारा आटपाडी तालुका या तालुक्यामार्फत निवडून आलेले कुरेशी वकील यांना राजाला सांगून, आपला पहिला मंत्री, म्हणून घेतले. साधासिधा माणूस पण, मुसलमान....वकील, पण कणबूर, इंगळे सारखा शिकलेला व ब्राह्मण नाही, तसा जरा गावंढळच आणि बहुजन मराठा समाजापैकीही नाही. उंच कुळीही नाही. गाइकुड, देशमुख नाही. हे काय आप्पाने केले असेच लोक म्हणाले. पण सर्वच नवीन होते. "पाहू या हा खेळ" असे म्हणाले. शंकरराव देव, तात्या शिखरे, आप्पाचे हे पहिला साथीदार म्हणून निवडणे समजू शकले.

ही सर्व नवी मंडळी कामाला लागण्याच्या पूर्वीच शिवरामपंत दर्शने, दिवाण, होम सेक्रेटरी, पंडितराव हिवरेकर, व्ही. के. कुलकर्णी, ट्रेझरी ऑफिसर, यांनी राजापुढे आपले राजीनामे टाकले. आप्पाला त्यांनी स्पष्ट सांगितले की रस्तुमराव, कुरेशी, बाबूराव लाड, अशा 'हलकट' लोकांच्या हाताखाली आम्ही काम करू शकणार नाही. आम्हाला पेन्शन द्यावी. आप्पाने ताबडतोब व आनंदाने हे कबूल केले. पटवर्धन डी. एस. पी. ही निघून गेले. त्यांची कामे मोहिते, बिडकर, ढग्गे यांनी आटपाडी, औंध, कुंडल तालुक्यात कार्यक्षमतेने केली. काहीही बिघडले नाही.

आप्पाला राज्यकारभाराची प्रत्यक्ष माहिती नाही. ७-१२ म्हणजे काय? अमानत खाते कशाला म्हणतात? मुलकी खात्याचे नियम, जमाबंदी, वगैरेचा गंधच नाही. अधिकारीवर्गाला हे सर्व अर्थात माहीत होतेच. त्यांना कदाचित वाटले असणार की आप्पा तोंडघशी पडले, मग हा सर्व खेळ बंद होईलच.

पण बाळाप्पा (कुलकर्णी), शाहूपुरे, ए. डी. इनामदार, गिजरे, असे कारभाराची पूर्ण माहिती असलेले, माणुसकीची चाड व नव्या काळाची पाऊले ओळखणारे अधिकारीही आप्पाला लाभले. शिवाय आण्णा बापटांनी अगदी खेड्यातील पाटील, कुलकर्णी यांच्या दप्तरापासून ते बजेट बनविणेपर्यंत सर्व स्वतःचे अनुभवी ज्ञान आप्पाला दिले. या सर्व कामात कुरेशी यांच्या संथ स्वभावाचे व सभ्य वागणुकीने मदतच झाली. कणबुरांनी मंत्री केले नाही म्हणून काही काळ कुरबूर केली पण तेही, औंधचे हे कार्यक्षेत्र, आपल्याला फार लहान आहे असे समजून शांत झाले. राजालाही हे आपण टाकलेले पाऊल स्थिर होणार असे वाटू लागले.

अनुक्रमणिका

पण ! पण खेडोपाडी ही सर्व भानगड, दौरे, मेळावे, शिबिरे यांचा परिणाम होण्यास दोन वर्षे लागली. राजाचा मुलगा वणावणा पायाने का फिरतो? नवस केला असेल,....इतका गोड, गोड बोलून आपल्यात का मिसळतो?...अहो आता त्याला गावातील सर्व माहिती झालीय. बघा आता सारा वाढ होणार... हे सर्व थोतांड आहे. फसू नका.... पण त्यांच्या विश्वासापैकीच जेव्हा विभूतवाडीकर इनामदार, उत्तमराव ढग्गे, रस्तुमराव, बाबूराव लाड, होनराव वगैरे त्यांना सांगू लागले की खरोखरच सर्व अधिकार लोकांचे हातात आले आहेत. स्वतः आपल्यालाच आता यापुढे कामाला लागावयाचे आहे. स्वावलंबनाने समाज-सुधारणा करून आपल्या सर्वांच्या जीवनात सहकार व समतोल निर्माण करायचा आहे, तेव्हा हळूहळू लोक जमा होऊ लागले. भीती, शंका, लाचारी, कमी होऊन स्वतःची बुद्धी व उपजत सामर्थ्य वापरू लागले. महात्माजींनी राजाला सेवाग्राममध्ये सांगितलेच होते की, सत्तादानाने, लोकांत एक नवे चैतन्य निर्माण होऊन विधायक कार्याला वेग येईल. तसे होण्यास दोन वर्षे लागली.

मग हळूहळू अनेकांना, मास्तर, अधिकारी, शेतकरी, रामोशी, हरिजन, व्यापारी, उद्योगपती यांना औंध माझे आहे व मी औंधची सुधारणा करण्यास मदत करू शकतो व या सुधारणेत माझ्या कार्यक्षमतेला अनुसरून, समाजाला न बाधेल असे हक्कही मी उपभोगू शकतो असे मनापासून वाटू लागले.

राजाही फिरती करीतच होता. सर्व खेडोपाडी जावयाचा, बसून सर्वांना विचारायचा. त्यालाही दिसले की लोकांत एक अपूर्व उत्साह, आपलेपणा व आत्मविश्वास निर्माण होतो.

म्हाताऱ्या राजाला आपण सत्ता लोकांना दिली पण लोक आता आपल्याला जास्तच मानतात म्हणून फार समाधान झाले. लोकांचे प्रेम न मोठमोठ्या पुढाऱ्यांतही सर्व हिंदुस्थानात मान-मान्यता म्हणून राजाला धन्य वाटू लागले.

कधी कधी असे वाटते की नियतीला सदा सर्व समाधान सोसत नसावे. याच वेळेला घरामध्ये राजाला न रुचेल अशा घटना घडत गेल्या. राजाला वाटले, मला का नाही विचारले? आजपर्यंतचे सर्व संस्कार फुकटच की काय? या घटना काही महत्त्वाच्या नव्हत्या, पण अहंकार आहे ना? मी अगदी धुतल्या तांदळासारखा, माझी राहणी, माझे कुटुंब आदर्श, सर्वांच्यापेक्षा वेगळे. नियती मग दाखवून देते की पूर्ण आदर्श फक्त परब्रह्मच. अहंकार नको, नम्रता हवी, आहे ते उत्तम रीतीने वापरण्याची, चालविण्याची वृत्ती हवी.

आजूबाजूचे हे झपाट्याने होणारे बदल हिंदुस्थानच्या राजकीय शासकीय प्रवाहात वाहत जाणारी औंधची छोटेखानी नौका हे सर्व काहीतरी वेगळे चित्र बघून राजाचा नातू, बापू, छोट्या, बेचैन झाला. उत्तम क्रिकेट खेळे, अत्यंत हुशार, दिलदार, प्रेमळ, औंधच्या परंपरेचा मोठा अभिमानी. लहानपणीच (सहा वर्षांचा होता तेव्हा) वडील व आई सोडून गेली. नोकर-हुजऱ्यांनी पुढे होणारे "आपले मालक", "आपला पोशिंदा", म्हणून वागविल्यामुळे त्याच्या राजेपणाच्या कल्पना व १९४० ची वस्तुस्थिती यामध्ये बापूला फार मोठी तफावत दिसली.

हिंदुस्थानात अभ्यास होईना, कोणी शिकवणीला तयारच होईना. म्हणायचा, अपयश, कोणी पदरी घ्यावे? आप्पाने सुचविले, पाठवू या इंग्लंडला. क्रिकेटमध्ये नाव काढील. जाईल ब्रेसनोझ कॉलेजमध्ये. शिकेल. ब्रेसनोझमध्येच आप्पा तीन वर्षे होता.

अनुक्रमणिका

ब्रेसनोझमध्ये पाठविला तेथेही जमले नाही. लढाई सुरू झाल्यावर चार-सहा महिन्यांत परतला. औंधमधील ग्रामराज्य, वगैरे यात त्याला रस नव्हताच.

या सर्व नव्या झपाट्याने बदलत्या परिस्थितीत बापूला काय कार्य द्यावे हे राजाला एक कोडेच पडले. जागतिक महायुद्धामुळे राजकीय व आर्थिक वातावरण सर्व देशभर बदलू लागले. त्याचे परिणाम छोट्या औंधवरही झाले. १९४१-४२ चा भयंकर दुष्काळ व धान्य-कडबा टंचाई महागाईमुळे औंधच्या खेड्यांत हाहाकार उडाला. मंत्रिमंडळाने सुज्ञ व कार्यक्षम अधिकारी कुंडलकर व शाहुपुरे यांना म्हैसूर व हैदराबाद येथे धान्य खरेदी करता पाठविले. कोल्हापुरातून कडबा आणला. तालुका समिती व ग्रामपंचायतीच्याच मार्फत वाटत झाले. कशीबशी वेळ मारून नेली पण ताबडतोब साखर महागली. दुर्मिळ झाली. रेशन दुकाने, लायसेन्स सुरू झाले. हे सर्व डिपार्टमेंटच बापूकडे द्यावे व सर्व कोटा रेशनची व्यवस्था त्याने करावी असे राजाला सुचविले. बापू काहीतरी काम करू लागला. बाबूराव बापट त्याचे सेक्रेटरी झाले. वसंतराव सातवळेकर सल्लागार झाले.

साखर, धान्य, कडबा, पत्रे, क्रूड ऑईल, घासलेट, पेट्रोल यांचे दुर्मिळतेमुळे एकदम ध्यानी आले की स्वावलंबी-स्वयंपूर्ण होण्यास औंधला किती अवधी आहे व ते किती कष्टाचे आहे.

लायसेन्स, कोटा, वाटप, हे सुरू झाले रे झाले की तालुका समित्या व ग्रामपंचायती यांच्या कारभारात वेगाने फरक पडू लागला. एकदम विकृती, भ्रष्टाचार जरी निर्माण झाला नाही तरी, याच कामाकडे व वाटप लायसेन्स मिळविण्याकरता वशिला लावणे इकडेच सर्व लक्ष लागले. ग्रामराज्यामधून स्वायत्त, स्वतंत्र, स्वावलंबी खेडी निर्माण करण्याचे स्वप्नच राहणार की काय, अशी भीती वाटू लागली. ग्रामराज्ये, खेडी किंवा खेड्यांचे छोटे छोटे समूह ज्या वेळी आर्थिक सामाजिक गरजा व उत्पादन उपभोग यात पूर्ण स्वावलंबी होतील त्याच वेळी ती खरी स्वतंत्र होऊ शकतील. एकेकाळी सुगम दळणवळण नाही, अंदाधुंदी, अराजकता, यामुळे खेडी स्वयंपूर्ण स्वावलंबी झाल्याशिवाय त्यांना जीवन अशक्य होते. त्यामुळे राजे, बादशहा आले तरी खेडी जशीच्या तशीच स्वावलंबी राहिली. सर्व जातिजमाती कशाबशा जबरदस्तीने का होईना सहकारानेच राहिल्या. दुसरा पर्यायच नव्हता, गत्यंतर नव्हते त्यांना. म्हणून खेड्यात उत्पादन. गरजा, वाटप, यात त्या वेळी समतोल राखावाच लागे. यात कोणी बळी झाला, जबरदस्ती करू लागला तर गाव, जमात त्यावर निर्बंध घाली. उपभोगावर दुसरे तिसरे मिळण्याची शक्यताच नसल्याने संयम (?) राखावाच लागे. हा खऱ्या अर्थाने संयम नव्हता. दुसरे काही गत्यंतर नाही, जात-जमात सोडता येत नाही, रूढी आहे, परंपरा आहे म्हणून खाण्या-पिण्यावर, व्यवहार-वागण्यावर संयम म्हणजे खरा निर्बंधच होता.

औंधच्या ग्रामराज्याच्या स्वावलंबनाच्या, स्वप्नाला रेशन, लायसेन्स, कंट्रोल, भाववाढ यामुळे धक्का बसू लागला.

तरीही आटपाडी, खेरसुंडी, कुंडल, गुणडाळ, औंध या तालुका समितीने १९४५ पर्यंत समर्थ कार्य केले. बाहेरून आणून का होईना त्यातल्या त्यात समतोल, शिस्त, संयम राखण्याची शिकस्त केली. कुंडल तालुक्याला तर शंकरभाऊ किर्लोस्करच तालुका अध्यक्ष म्हणून मिळाले होते. खेळीमेळीने, योग्य ध्येयदृष्टीने, उत्तम वक्तव्याने 'भाऊंनी' सर्वच कुंडल तालुका नमुनेदार बनविला. अळसंदसारख्या मागासलेल्या खेड्यात गुन्हे, तंटे यात नावाजलेल्या गावात जेथे पाच वर्षे सतत शांततेकरता पोलिस पार्टी ठेवावी लागली होती, जेथे एक मास्तरची शाळासुद्धा टिकत नसे, तेथल्या खुनी-दरवडेखोर म्हणून

अनुक्रमणिका

प्रसिद्धीस आलेल्या दत्तोबा पाटलालाच हाती धरून त्यांनी अळसंद गाव सर्व औंधच्या ७२ खेड्यांत पहिल्या नंबरचे बनविले!! चार वर्षांत ७वी पर्यंत शाळा नेऊन शाळेत दहा शिक्षक, उत्तम इमारत, व दीडशे विद्यार्थी शिकू लागले.

औंधच्या ग्रामराज्याचे न्यायदान खरेच आदर्श बनू लागले. आधी आण्णासाहेब बखल्यांनी भक्कम पायावर नव्या ध्येयवादाने प्रेरित सर्व न्यायदान पद्धती उभी केली, नवे नियम तयार केले, सर्व पंचायत सेक्रेटरींना, तालुका समितीच्या सभासदांना पहिल्या प्रथम एका १५ दिवसांच्या शिबिरांचे मार्फत व नंतर सर्व पंचायतींना स्वतः भेटी देऊन कार्याला तयार केले व तीन फिरते उत्तम कार्यकर्ते, कायदेपंडित पंचायतींना सतत मार्गदर्शनाकरिता नेमले.

औंध ग्रामराज्याच्या यशाचा सर्वात मोठा या अत्यंत बुद्धिमान, खऱ्या अर्थाने कर्मयोगी (योगः कर्मसु कौशलम्) आण्णासाहेब बखल्यांनाच आहे. आप्पा-मॉरिस-फ्रॅन्सिस तर सारखेच आण्णासाहेबांच्याकडे मार्गदर्शनाला, मदतीला धावत. राजाचा आण्णासाहेबांच्यावर पूर्ण विश्वास होता. आण्णासाहेबांचे औंधच्या ग्रामराज्याच्या स्थापनेचे कार्य नानासाहेब जोशी यांनी पुढे सहा वर्षे अत्यंत उत्तम रीतीने चालविले. कार्यपद्धती भिन्न दोघांची, पण तोच ध्येयवाद, तीच शिस्त, तीच कर्म-कुशलता, तीच मानवता, केवढे भाग्य छोट्या औंधचे!!

महिना हजारो रुपये तनखा देऊन न मिळणारे हे विद्वान निष्णात ध्येयवादी औंधात का गुंतले? राजा चांगला होता म्हणून? काही नवीन विधायक कार्य या गरीब मागासलेल्या खेड्यांत होत होते म्हणून?

आण्णासाहेबांचा व नानासाहेब जोशी यांचा उद्देश होता की प्रत्येक खेड्याला दहा वर्षांत पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेटचे अधिकार उत्तम रीतीने बिनदिक्कत वापरता येतील इतके तयार करणे, तसेच १०,००० रुपये किंमतीचे कबज्यापर्यंत निकाल करण्याचे अधिकार देणे.

दहा वर्षांत औंध संस्थानमधील वीस खेड्यांना मुलकी व फौजदारी खटले चालविण्याचे पहिल्या दर्जाचे अधिकारी मिळू शकले. बाकीच्यात पन्नास न्याय समितींना दुसऱ्या वर्गाचे व बारांना तिसऱ्या वर्गाचे अधिकार मिळाले.

न्यायसभेचे औंधमधील कार्य पूर्णपणे यशस्वी करण्यात आण्णासाहेब बखले, नानासाहेब जोशी, तर होतेच पण नानासाहेब चापेकर यांनी उच्च न्यायाधीश म्हणून दहा वर्षे मौलिक मार्गदर्शन केले. जुन्या पिढीतील अत्यंत बुद्धिमान, अभ्यासू, लेखक, गाढ विचारवंत म्हणून महाराष्ट्रात त्यांची ख्याती. स्पष्टवक्तेपणामुळे ते राजाला फार आवडत. दरवर्षी पंधरा ते वीस दिवस औंधात मुक्काम होत असे.

न्यायसभेचे गावातल्या गावात तंटे संपविण्याचे अधिकार व उत्तम मार्गदर्शन यामुळे लोकांत त्यांच्याबद्दल विश्वास व आदर निर्माण झाला. हळूहळू तडजोडीने, समझोत्यानेच गावात शांतता राखावयाची, कर्जे होऊन द्यायचे नाहीत, इकडेच प्रवृत्ती वाढू लागली. राजाला मोठे धन्य वाटले, महात्माजींनी हरिजनमध्ये स्वतः या प्रयोगाच्या यशाबद्दल अभिनंदन केले !!

अनुक्रमणिका

व्याख्याने, मिरवणुका, सभा, संभाषणे, शिबिरांपेक्षाही औंधच्या खेडोपाड्यांत जे एक नवीन चैतन्य निर्माण झाले ते ग्रामपंचायतीच्या न्यायव्यवस्थेमुळे. खरोखरीच नव्या राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे न्याय स्वस्त व घरोघरी मिळू लागला. वकील नाही, कोर्ट फी नाही, न्याय ताबडतोब मिळावयाचा घरबसल्या, प्रवासखर्च, हॉटेल, सिनेमाचा खर्च नाही. शिवाय गावात ऐक्याची, आपण सर्व एक, एकमेकांवर अवलंबून आहोत. आपणा सर्वांना एकमेकांची जरुरी, गरज आहे, गावावेगळे आपल्याला अस्तित्वच असू शकत नाही, ही भावना व त्यातून गावाचा, गावच्या देवळांचा, मशिदींचा, शाळेचा, धरणांचा, अभिमान, स्वाभिमान निर्माण झाला.

एकदा आप्पा फिरत फिरत खरसुंडी या प्रसिद्ध खंडोबा (नाथ) या देवस्थानचे गावाजवळील एका लहानशा खेड्यात गेला होता. गावाची लोकसंख्या असेल १००, २००. सर्वच्या सर्व गाव मुसलमानांचा. एकही हिंदू घर नव्हते. सर्व खंडोबाचेच वतनदार. पण कट्टर मुसलमान, खरसुंडीच्या प्रसिद्ध जत्रेच्या वेळी "शासने" नेण्याचा त्यांचा अधिकार. म्हणजे पोलादी भले मोठे खांब. १०-१२ फूट लांब निमुळते. ही शासने (शस्त्रे) म्हणजे खंडोबाचे भाले...या जत्रेत या शासनांना देवळाबाहेर काढून त्यांची मोठी मिरवणूक होई. हजारो लोक जत्रेला येत. या मुसलमान खेड्यात आप्पाचे स्वागत नेहमीप्रमाणे झाले. पीकपाण्याबद्दल विचारपूस झाल्यावर आप्पाने काही तक्रारी आहेत का? असे विचारले. जमलेल्या लोकांत कुजबूज सुरू झाली. विचारावे की नाही? विचारले तर हा राजपुत्र काय म्हणील असे काही चालू होते आपापसांत. त्यांतील एक दाढीवाला म्हणाला, "महंमद भाई तुम पूछो ना. महाराज तो क्या घुस्सा करेंगे? पूछो !"

महंमद भाई बोलले, "गावात एक मारुतीचे देऊळ आहे. त्याला आजपर्यंत 'पेटा' खात्यातून दरमहा एक रुपया, वर्षाचे १२ रुपये, पूजेकरता मिळत असत. ही नवी राज्यघटना आल्यापासून गेले आठ महिने नेमणूक नाही, देवाची पूजा गावाने कशी करावयाची? आपणच आम्हाला सांगा." आपलेपणा तो हा....

न्यायपंचायतीच्या कामाप्रमाणे पंचायतींची इतर कामे, शिक्षण, रस्ते, धरणे, विहिरी, ग्रामोद्योग, शेती सुधार, सहकारी संस्था, वगैरे मुख्य दोन अडचणींमुळे तितक्या प्रमाणात यशस्वी होऊ शकली नाहीत.

सहकाराने अगदी कमी खर्चात, झटपट शाळांच्या इमारती बांधल्या गेल्या खरे. दोन-तीन शाळांच्या इमारती तर खरोखरी ४८ तासांत बांधून झाल्या. लोकांचा उत्साह व आत्मविश्वास वाढला, काही लहान लहान धरणे, पाट, तालीही श्रमदानाने झाल्या. प्रत्येक मेळावे शिबिरे यांच्या वेळी गाव व बाहेरील आलेली पाहुणे मंडळी यांच्या सहकार्याने अनेक कामे उठली.

पण आड आली गरिबी...पंचायतींना गावाचा सर्व महसूल, जत्रा कर, अबकारी उत्पन्न दिले तरी दरडोई २ किंवा तीन रुपयेच मिळत. म्हणजे सरासरी एक हजार वस्तीचे गावाला जास्तीत जास्त २ हजार रुपये मिळू शकत. यात शाळा, दवाखाना, गावाची झाडलोट यांनाच एक हजार-बाराशे रुपये लागत मग सुधारणा खर्चाला काय मिळणार? मुळात उत्पादनता वाढली पाहिजे तरच उत्पन्न वाढून सुधारणांवर खर्च करता येतो.

जमीन निकस, दुष्काळी मुलूख, पाणी नाही, नवी खते, बी-बियाणे, जमीन कसण्याच्या नव्या शास्त्रशुद्ध पद्धती नाहीत तर कसे उत्पन्न वाढावयाचे? बाहेरील कर्ज काढून हे काही करता येईल का? डबईतील १२-

अनुक्रमणिका

१४ लाखांच्या धरणाकरता अर्ज, ब्रिटिश सरकारातून मिळेल का? हे कर्ज निदान धान्याच्या स्वरूपात मिळेल? धरण झाल्यावर १०-१२ वर्षांत परत फेडू.

मॉरिस, फ्रॅन्सिस बसत असत. गुणाकार, भागाकार, वजाबाकी करीत. ब्रिटिश सरकारला विचारावयाचे ठरले. कौन्सिलमध्ये चर्चा झाली. राजा हो म्हणाला. मॉरिसनी डबईचे धरण बांधण्याची ही सर्व योजनाच बंगलोरचे अनुभवी इंजिनियर बी. रामाराव यांच्या मदतीने अशीच केली होती की तीन वर्षांत थोड्या तरी जमिनीला पाणी मिळावे. आठ वर्षांत सर्व धरण पूर्ण व्हावे. हजार ते बाराशे लोकांनी मजुरी म्हणून धान्यावर काम करावे. दरवर्षी १०,००० पोती ज्वारी लागणार होती. याशिवाय सिमेंट, लोखंड वेगळे. एकंदर २५ ते ३०,००० पोती धान्य लागले असते.

हे साल होते १९४०. मुंबईला बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळाने कॉंग्रेसच्या आदेशानुसार राजीनामा दिला होता. बाळासाहेब खेर जर मुख्यमंत्री या वेळी असते तर धान्याच्या स्वरूपात कर्जाची काही व्यवस्था कदाचित होऊ शकली असती.

आता दुसरा उपाय नाही म्हणून दिल्लीला विचारणा करणे भाग पडले. फ्रॅन्सिस म्हणाला की आधी तोच दिल्लीला जाऊन कानोसा घेऊन मगच कसे, किती, कोणाला कर्ज मागायचे हे ठरवू. आप्पाने मग ए. जी. जी. ला भेटावे. पण कोल्हापूरचा ए. जी. जी. या वेळी औंधकडे तुच्छतेने व साशंक नजरेने पाहणारा होता. आप्पा जेव्हा त्याला भेटला तेव्हा तो म्हणाला, “या तुमच्या योजनेसंबंधी जरूर योग्य तो विचार केला जाईल. राजेसाहेबांना लेखी लिहावयास सांगा. अर्थात एवढे मोठे कर्ज छोट्या औंधला दिले तर आमचा एक दिवाण, राजेसाहेबांना कर्ज फिटेपर्यंत घ्यावा लागेल. तुमचे हे ग्रामपंचायतीचे खूळ बंद करावे लागेल.”

आटपाडीचे धरण १९४० साली खुंटले. १९५२-५३ साली, स्वातंत्र्यानंतर पुन्हा हे काम हाती घेता आले. हे धरणाचे स्वप्न साकार झाले खरे पण त्याला १८ वर्षे वाट पाहावी लागली !!

महात्माजींनी सांगितले होते की, उपभोगावर कडक संयम हवा. समाजातील समतोल व समाधान बिघडणार नाही अशीच उपभोग घेणारी व्यक्ती समाजात राहून घेऊ शकते. व्यक्तीला मनमानेल तसा उपभोग करण्याचा अधिकार नाही.

याबरोबरच उत्पादन वाढत गेले तर त्याला अनुसरून उपभोग जरूर वाढवावेत. उत्पादनक्षमता वाढण्यास यंत्रशास्त्राचा उपयोगही करावा. पण ही यंत्रे साधी, स्वस्त, खेड्यात रुचतील व पचतील अशी हवी. वाटेल ते यंत्र-तंत्राने, ते परदेशात चालते, त्यामुळे नफा होतो, सुधारणा होते म्हणून घेण्याचा हा दृष्टिकोण चुकीचा आहे. यामुळे सुधारणा नाही, कुधारणाच होणार.

नवी ग्रामराज्याची पद्धती औंधात रुजती न रुजती तोच १९३९ साली महायुद्धाचा भडका सप्टेंबरमध्ये युरोपमध्ये पेटला व तो आशियात पसरणार अशी चिन्हे दिसू लागली. महात्मा गांधींच्या व्यक्तिगत सत्याग्रहाने ब्रिटिशांच्या एकंदर युद्धतयारीवर काहीच परिणाम झाला नाही.

औंधमध्ये गावागावांतून फिरत असताना ह्या जागतिक युद्धाच्या वणव्याने फ्रॅन्सिस अत्यंत अस्वस्थ झाला. नाझी व फॅसिस्ट यांच्या कारवायांमुळे हे युद्ध केव्हाना केव्हातरी येणार हे फ्रॅन्सिससारख्या मानवी इतिहासाचा व एकंदर जीवनाचा सूक्ष्म विचार करणाऱ्यांना माहीत होतेच. पण प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले हे ऐकून व इंग्लंडवर बॉम्ब पडणार, कदाचित हिटलर-मुसोलिनी आपल्या देशावर आक्रमणही करू शकतील ही भीती आता खरी होणार व ब्रिटिश नागरिक म्हणून आपल्याला आपले कर्तव्य ब्रिटनच्या मदतीकरता करावे लागणार, या सर्व विचारांनी भावनाप्रधान, प्रेमळ, सात्त्विक, फ्रॅन्सिस कित्येक दिवस आटपाडीच्या फोंड्या, उजाड, माळावर स्वप्नात असल्यासारखे फिरत राहिला. एक दिवस भिमाशंकरच्या पहाडात दडून बसलेल्या रम्य शुक्राचार्यांच्या देवळाच्या गच्चीवर बसला असताना म्हणाला, “आप्पा, मला दिल्लीला गेले पाहिजे व माझे कर्तव्य-कर्म ब्रिटनचा नागरिक म्हणून बजावले पाहिजे. औंधमधील कार्य महत्त्वाचे आहे. ते तू करीत राहाच. मानवतेच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. पण माझी जागा आता दिल्ली-सिमल्यात आहे. कदाचित परत इंग्लंडलाही जाईन. तुला सोडून जाताना वाईट वाटते, पण आपल्या वाटा आता वेगळ्या आहेत. राजेसाहेबांना भेटून जातो. तुझे काम तू कर. कोठेही आपण दोघे असलो तरी एकमेकांचा संपर्क कायम ठेवू.”

पुढे सात वर्षे फ्रॅन्सिस दिल्ली-सिमल्याला महत्त्वाचे गुप्त काम करीत राहिला. जवाहरलाल, विजयालक्ष्मी पंडित व महात्मा गांधी यांच्याशी अनेक वेळा त्याच्या गाठीभेटी झाल्या. औंधला एकदोन वेळा येऊनही गेला.

स्वकर्मतत्पर फ्रॅन्सिसला निरोप देताना राजाला गहिवरून आले. फ्रॅन्सिस राजाच्या मोठ्या कुटुंबातील घरचा माणूस झाला होता. फ्रान्सचा पाडाव व इंग्लंडची पीछेहाट (१९४०-४१), जपानचे फिलिपाईन्स, मलेशियावर आक्रमण व हिटलरचा तात्पुरता मैत्री करार या सर्व परिस्थितीमुळे मुस्लिम लीग व कॉंग्रेसच्या राजकारणालाही भयंकर वेग आला. कराचीमध्ये जिनांनी पाकिस्तानची घोषणा केली.

कॉंग्रेसची बैठक पुण्यात भरली (१९४१). आप्पा अधूनमधून जवाहरलालना मुंबई, सेवाग्राम वगैरे ठिकाणी भेटे. छोट्या औंधच्याबद्दल बोले. पुण्याच्या या कॉंग्रेसच्या बैठकीच्या वेळी तो पुण्याला होताच. सहज जेवण्यावेळी जवाहरलालना म्हणाला, “येता का औंधला?” ताबडतोब ते म्हणाले, “हो, परवा निघू, दोन दिवस तुझ्याकरता!!”

आप्पा नेहमीप्रमाणे एकदम मनात आले ते साधक-बाधक विचार न करता बोलला. आता औंधमध्ये आधी जाऊन सर्व व्यवस्था कोण करणार? तात्या इनामदार पुण्यात होते. ते ताबडतोब गेले. राजाला सांगितले. त्याला फार आनंद झाला.

औंध, किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी, व परत पुणे, असा सर्व प्रवास मोटारीनेच झाला. विजयालक्ष्मी पंडित, भारती साराभाई, बळवंतराय मेहता बरोबर होते. आप्पा गाडी चालवत होता.

सर्व कार्यक्रम अगदी साधेच होते. पण व्यवस्थित पार पडले. औंधला देवाच्या देवळात जाहीर सभा झाली. हजारो लोक हजर होते. पण त्या काळातील मायक्रोफोन!!...पंडित नेहरू अगदी हळू बोलत होते. भाषा सोपी, खेडुतांना समजेल अशी होती. पण देवळात बसलेल्यांना त्यांचे भाषण काहीही ऐकू आले नाही!! बाहेर हजारो लोक जमले होते त्यांना उत्तम ऐकू आले.

किर्लोस्करवाडीचा कार्यक्रम व सभा यमूताईंनी स्वतः आखला होता. उत्तम रीतीने पार पडला. भाषणाला २०,००० लोक आले होते. वाटेत कुंडललाही त्यांना अडविलेच होते.

किर्लोस्कर, ओगल्यांचे कारखाने, जवाहरलालजींनी काळजीपूर्वक पाहिले. ब्रिटिशांच्या विरुद्ध बंड पुकारलेल्या या स्वातंत्र्ययोद्ध्याला दोनही कारखान्यांची भरमसाट भरभराट व वाढ ब्रिटिशांना युद्धमदतीला लागणारा माल उत्तम रीतीने पुरविल्यामुळे आहे हे ऐकून काय वाटले असणार?

जीवनात असा हा परस्पर विरोध एकाच कर्मातून नेहमीच निर्माण होतो का? जगातील कित्येक कारखान्यांची आजची भरभराट एकमेकांना जलद उत्तम कार्यक्षमतेने-जास्तीत-जास्त खर्चात मारण्यावर आहे हे आजच्या (१९८५) जगात सत्य आहे ना? अमेरिका-फ्रान्स-जर्मन-हॉलंड-इटली-बेल्जियम-स्वित्सर्लंड, रशिया, पोलंड चेकोस्लोव्हाकिया, या देशांच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यातील भयानक उत्पादनापैकी मोठा भाग जर विकला गेला नाही तर हे कारखाने तोट्यात येतील, बंदही पडतील... मग तेथे मजुरी करणारांचे कसे? शस्त्रास्त्रे बाहेर विक्री करण्यावर या सर्व देशांची श्रीमंती, समाजातील स्थिरता-समतोल अवलंबून आहे. म्हणजे लढाया, संघर्ष, यावरच हे समाज जगतात... एकदम शांती निर्माण झाली तर? हे सर्व डोलारे कोसळणार का? मग? क्रांती? साम्यवाद? जागतिक युद्धे, क्रांती, साम्यवाद, जातीय दंगे, दुष्काळ ही सर्व पार्श्वभूमी पण दैनंदिन संसार चालूच असतो. राजाच्या नातीला-आक्काला, त्रिंबक कला भवनात हस्तव्यवसाय गरीब होतकरू स्त्रियांना शिकविण्याची त्याने व्यवस्था करून दिली होती. कार्य उत्तम चालले होते. आक्काच्या कामाची वाखाणणी गांधीजींच्या, जवाहरलालजींच्या कानावर गेली होती. जवाहरलालजी यांनी औंधच्या दौऱ्यात आक्काचे काम प्रत्यक्ष बघितलेही होते.

पण आक्काला आता राजाच्या नात-भाच्याशी, कमलाकांत महाराज पंडितांशी प्रेमविवाह करायचा होता. राजाने आनंदाने मान्यता दिली हे वृत्त गांधीजींना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी पृच्छा केली, “म्हणजे औंधला एक नवीन कार्यकर्ता लोकांच्या सेवेकरिता मिळाला आहे की उत्तम व निष्ठेने सेवा करणारी आक्काच औंध सोडून जाणार?”

राजाला आता तीर्थयात्रेला जायचे होते. औंधच्या कामाला आप्पाला जुंपले होतेच. आप्पाबद्दल काही विशेष तक्रारी त्याच्या कानावर आल्या नव्हत्या पण तो सारखा फिरतीच करतो, त्यागी, विरक्त म्हणविणाऱ्या (कधी कधी भोंदूही...) गांधीवाद्याबरोबर नेहमी हिंडतो-फिरतो-उपास-तापास करतो. कधी लग्नाबाबत बोलतच नाही !!

अविवाहित मुलींचे चिंताग्रस्त आई-वडील भेटायला आले तर शिकारीला पळून जातो, नाहीतर मुद्दाम लांडी चड्डी घालून आपल्या त्याग-सेवाधर्माचे, प्रदर्शन करतो...काय करावे याला? असे कधी कधी त्याच्या मनात येत असेलही पण आक्काच्या लग्नाचा सोहळा आटपून मात्र राजा बद्रिकेदार, बद्रिनाथ, गंगोत्री, जम्नोत्रीला यात्रेला गेला. सर्व प्रवासाची उत्तम फिल्म व स्लाईड्स काढायला बरोबर रामभाऊ चितारी होतेच.

राजाला अखंड देव समजून पूजा करणारी साध्वी, त्याची तिसरी राणी सेवेला बरोबर होतीच. दोन महिने हिमालयात फिरला. औंधच्या कटकटी, ए. जी. जी., महायुद्ध, आपले स्वतःचे म्हातारपणही विसरला. ताजातवाना होऊन परतला.

अनुक्रमणिका

सारखे खेड्यात फिरावयाचे, कोठेही पाणी प्यायचे, विहिरीत, नदीवर स्नान करावयाचे, काहीही खायचे यामुळे आप्पाला अमेबिक डिसेंट्री झाली. प्रकृतीवर परिणाम होऊ लागला. थकवा येऊ लागला पण रोज १७५ नमस्कारांचा नेम मात्र चुकला नाही. १९२७ सालच्या आजारात आसन्नमरण पडला होता तेव्हा चिंताक्रांत वडिलांच्या चेहऱ्यावर भयदुःखाची छटा पाहिल्यावर "बरा झालो तर रोज नमस्कार घालीन, कधी चुकणार नाही", असे त्याने कबूल केले होते ना?

आप्पाची थोडी थकलेली, सुकलेली मूर्ती यात्रेहून परत आल्यावर राजाने पाहून मनात विचार केला असणार याचे लग्न झाले तर बरे!!

मुक्ताबाई इनामदार, तात्या इनामदारांची धाकटी बहीण, शिक्षिका होती अमरावतीला. त्या प्रख्यात स्त्री-शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापिका मथूताई द्रविड, नटेश आप्पाजी द्रविड हे भारत सेवक समाजाचे (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे) आद्य संस्थापकांपैकी नामदार गोखल्यांचे सहकारी, यांच्या सुविद्य, निष्ठावान पत्नी.

मुक्ताबाईंची व नलिनी द्रविड यांची गाठभेट झालेली. विलायतेहून एफ. आर. सी. एस. ही उच्च पदवी घेऊन आल्यावर बिकानेर संस्थानात स्त्रियांचे हॉस्पिटलमध्ये नुकतीच सर्जन म्हणून कामाला सुरुवात करीत होती.

मुक्ताबाईंना लग्ने जुळविण्याचा नादच. त्यांच्या मनाने घेतले, नलिनी-आप्पा?...तात्यांच्याशी बोलल्या. आप्पाशी बोलण्याची सोय नव्हती...पळून गेला असता. तात्या एक दिवस राजाला बोलले. छोटेखानी एक फोटो दाखविला.

आप्पा सेवाग्रामात होता. राजाला सारखे वाटे की हा आप्पा विनाकारण सेवाग्रामला पळतो, तिथे आठ आठ दिवस राहतो. "सारखा सारखा काय महात्माजींचा सल्ला घ्यायचा, राजा कचेरीत बसला असता एक-दोनदा रागाने म्हणाला होता.

या वेळी महात्माजींनीही आप्पाला पाहिले आणि म्हणाले, "तब्येत बरी दिसत नाही. मुंबईला जा, जीवराज मेहताकडून नीट तपासून घे, ते सांगतील ते औषध घे, पूर्ण बरा झाल्याशिवाय परत कामाला जायचे नाही. कार्यकर्त्याला स्वतः आजारी पडून समाजावर स्वतःचा बोजा टाकण्याची अजिबात अधिकार नाही, 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्', जा, मला येऊन नंतर ताबडतोब भेट, ही जीवराज मेहतांना चिठ्ठी."

आप्पा गेला मुंबईला. डॉ. जीवराज मेहता के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये मुख्यच. दोन दिवसात पूर्ण तपासणी झाली. रिपोर्ट आला, अमेबिक डिसेंट्रीमुळे वनस्पतिजन्य प्रोटीन पचत नाहीत. मांस, अंडी, मासा यातील प्रोटीन पचू शकेल. ते खाल्ले पाहिजे. गोळ्याही दिल्या.

गांधींना रिपोर्ट दाखविला. गांधी म्हणाले, "मांस खाल्ले पाहिजे. तब्येत उत्तम असेल तरच अहिंसा, आक्रमणाकरता, दुसऱ्याची पिळवणूक करण्याकरता, नफ्याकरता, सत्तेकरता, अहिंसा नको असते. पण कार्यकर्ते जर शरीराने व नंतर दुबळ्या क्षीण शरीरामुळे दुबळे झाले तर त्यांना अहिंसेचे कार्य करण्याची,

समाजाची, समाजाची सेवा करण्याची शक्तीच राहणार नाही. जा, घरी जा, पूर्ण बरा झाल्याशिवाय घर सोडावयाचे नाही, समजलास."

औंधला परतण्यापूर्वी पुण्याला दोन दिवस राहिला होता, पंताच्या गोटात. हे वडिलार्जित जुने छोटेखानीच बंगलीवजा घर, समोर उत्तम बाग. संगमरवरी दगडाने औंधला बनविलेले कोरीव कारंजे, कारंज्यात शिवाजी शांत मूर्ती. शंकराच्या जटांत दडून बसलेल्या गंगेच्या मुखातूनही पाणी येई.

एक दिवस सकाळी (नोव्हेंबर १९४१) मोठ्या हॉलमध्ये आप्पा बसला होता. तो एक तेजस्वी वृद्ध गृहस्थ, डोक्यावर तांबडी पुणेरी पगडी घातलेली, करवती काठी उपकरणे, बंद गळ्याचा रेशमी कोट, हातात काठी घेऊन आत आला व म्हणाला, "मला माफ करा. मी आपल्याला आधी निरोप न देता आलो. मला आपल्याशी काही खाजगी बोलावयाचे आहे. बोलू?"

बापूसाहेब द्रविडांची ती शांत, प्रसन्न मुद्रा, प्रेमळ हसरा चेहरा, विनोदी पण गंभीर आवाज याचा आप्पाच्या मनावर व्हायचा तोच परिणाम झाला. आप्पा नुसता हूं म्हणाला.

"मला एक मुलगी आहे. तिचे नाव नलिनी. एफ. आर. सी. एस. झाली आहे. नुकतीच परतली आहे विलायतेहून. एडिंबरोला, स्कॉटलंडमध्ये, दीड दोन वर्षे होती. आता बिकानेरला हॉस्पिटलमध्ये काम करते.

न लग्न झालेली मुलगी म्हणजे बापापुढे एक कायमचे प्रश्नचिन्ह असते!! माझी व मथूताईंची इच्छा आहे की तुम्ही दोघांनी भेटावे. पण लग्न करण्याबद्दल ती जरा हटवादी आहे. अशा कोणा लग्न करायला निघालेल्याला भेटण्यास ती मुद्दाम इकडे येणार नाही. एकमेकांशी निदान भेटल्याने आम्हा दोघांस आनंदच होईल."

औंध, बाबांना सांभाळण्याचे, सेवा, त्याग, सूतकताई, स्वावलंबन हे सर्व आणि संसारही? जमणार का?

आप्पा विचारात पडला.

बापूसाहेब हळूच हसत बोलले, "हे बघा, नलिनी डिसेंबरमध्ये मुंबईला येणारच आहे. जमले तर सहज तुमची भेट होऊ शकेल."

झालीही. पण जानेवारी १९४२ मध्ये.

# ५ १९४२-४५

१९४२ हे वर्ष छोट्या औंधच्या दृष्टीने खरोखरीचे क्रांतिकारी ठरणारे होते. औंधच्या खेड्यापाड्यांतून हिंडताना, लोकांच्याशी बोलताना, त्यांना बोलताना ऐकताना, काम त्यांचे व स्वतःचे पाहताना आप्पाला नेहमी विचार येई की माणूस मुळातच चांगला आहे का संस्कारानेच त्याला चांगला बनविता येईल? फक्त संस्कार चांगले असतील तर भागेल का? का शिस्त, संयम, शिक्षा, बक्षीस, शाबासकी, हेही लागतात? शिस्त, शिक्षा, बक्षीस, शाबासकी देणारा कोण? राजा? धर्मगुरू? जात? समाज? देव?

असेच संस्कार देता येतील का की ज्यामुळे व्यक्ती सहज रीतीने संयमी, शिस्तबद्ध काम करणारी, सहकार करणारी तयार होईल.

पंचायती, अधिकारीवर्ग, शिक्षकांच्याबद्दल आप्पांच्या मनात उत्साह, आशा, असे. पण अनेकदा निराशाही होई. लिही लांबलचक पत्रे महात्माजींना. ते म्हणीत, “यात काय? सर्वच कार्यकर्त्यांच्या याच अडचणी आहेत. तुझी जशी तपश्चर्या वाढेल तशा या सर्व अडचणी सुटूही शकतील. मुळात व्यक्तीला आनंद, प्रेम, स्थिरता, मैत्री हेच आकर्षण आहे, मूढतेमुळे हे मुळातील आकर्षण बुजले जाते, संस्कार फक्त साफसफाई करून मुळातील माणसाची प्रकृती नैसर्गिकरीत्या वाहू लागेल हेच करतात. हे घडवून आणण्यास अहिंसा, सत्याग्रह हाच मार्ग आहे.”

त्याच वेळी आप्पाला असे भासू लागले होते की, राजाचा हा अधिकारत्याग, सेवेची भावना, जरा पोकळच आहे. खरे म्हणजे अहंकार, लोकांची मानमान्यता, मोठेपण, याचाच भाग त्यात जास्त आहे. मॉरिसचे व त्याचे याविषयी अनेकदा बोलणे होई. व राजा खरा मनापासून लोकांचा सेवक कसा होईल? का तो त्याच्या स्वभावधर्माप्रमाणे, त्याच्या आजपर्यंतच्या संस्काराला अनुसरूनच काम करणार?

पण बाबांनी पूर्णपणे खरेखुरे आदर्श असावे असे आप्पाला वाटे. लिहिले त्याने गांधीजींना!! मॉरिस बापूजींचा परत निरोप घेऊन आला. आप्पा म्हणतो तशी परिस्थिती खरीच असेल तर आप्पाने वडिलांना स्पष्टपणे, प्रेमाने सांगावे की या आपल्या वर्तनाचे शुद्ध्यर्थ मी आठ दिवसांचा उपास करणार. माझ्या स्वतःचे शुद्धीचे आपल्या वागणुकीत जे मला दोष दिसतात त्यांचे क्षालन करणार....!!!

महात्माजींचा हा सल्ला अनपेक्षित नव्हता. पण आप्पाला धक्का बसला...बाबांच्या विरुद्ध उपास? अशक्य. बाबांना, संभाळायचे की त्रास द्यायचा? अशा उपासाने त्यांचे आयुष्य वाढेल का कमी होईल?

कितीही वरून अहिंसा, प्रेम, सेवा बोलत असला, स्वतःची फसवणूक करीत असला तरी या वेळी ‘भीती’ व वडिलांच्या वरील त्याची ‘आसक्तीच’ व्यक्त झाली. वडील आदर्श असावेत, कशा करता तर आप्पाच्या अहंकाराला टेकू द्यावा म्हणून....!!

“मॉरिस हे माझ्या हातून होणार नाही. बाबांना मला असे काही करून दुखवायचे नाही,” आप्पा म्हणाला. मॉरिसला वाईट वाटले. आप्पाही (पुष्कळ इतरांप्रमाणे) महात्माजींच्या कसाला उतरत नाही म्हणून. महात्माजींच्या कसाला कोण टिकला? ज्याचे त्यालाच माहीत. दुसऱ्याने धोंडा टाकू नये हेच खरे.

अनुक्रमणिका

मॉरिस म्हणाला, “खरे सांगू आप्पा, वडिलांच्यावर तुझे प्रेम-नाहीच, आसक्ती आहे. खरे प्रेम असते तर तू त्यांचा अहंकार, त्यांची स्वतःला फसविण्याची सवय, दुसऱ्याने मोठे, चांगला राजा म्हटले म्हणजे बरे वाटणे, हे जे सर्व अज्ञानाचेच निदर्शक आहे ते खोडून टाकून त्यांना मुक्त करण्याचाच प्रयत्न केला असतास. आता फक्त तू ते या अज्ञान-निद्रेत असताना त्यांना जागे करण्याऐवजी त्यांना पांघरूण घालून जास्तच झोपायला-लावतोस. त्यांना न दुखविणे म्हणजे त्यांना अंधकारात ठेवणे होय...”

आप्पाच्या बुद्धीला हे सर्व पटत होते. पण स्वतःच्याच कमजोरपणामुळे किंवा खऱ्या प्रेमाचा उदयच न झाल्यामुळे नेहमीच्या सवयीमुळे आप्पा आपला चालढकलच करीत राहिला.

महात्माजींची स्वतःची शक्ती, खऱ्या प्रेमाची... करुणेची...होती का फक्त मनाच्याच पातळीवर मनाच्या निग्रहाची होती, एकाग्रतेची होती? मनाच्याच पातळीवर जर ती फक्त निग्रहाची, एकाग्रतेची असेल तर ती शक्ती मर्यादित स्वरूपाचीच असणार, कधी यशस्वी होईल व कधी अयशस्वी.

मॉरिस, फ्रॅन्सिस, आप्पा व केव्हा केव्हा एव्हेलिन वुड, एक अत्यंत बुद्धिमान मित्र, यांच्यात ही चर्चा सतत चाले. कृष्णमूर्तींनाही ह्यासंबंधी त्यांनी अनेक वेळा पृच्छा केली होती.

मनाच्या पातळीच्या पलीकडील शक्ती-तेज-करुणा कधी कधी महात्माजींच्या द्वारे स्फुरत असावी हे निःसंशय. सगळ्यांचा हाच अनुभव होता.

कृष्णमूर्ती सतत सांगत की, अरे हे मनोनिर्मित जे आहे असा भास करतो त्यातून करुणेचा उदय होत नाही. प्रेमाचे, करुणेचे जे प्रचंड चैतन्य आहे त्याचे स्फुरण मनाचे कोणतेही व्यापार वक्र व विपरीतच करणार. मनोव्यापाराने मर्यादित, स्तंभित झालेले कर्म संघर्ष, दुःख निर्माण करणार. सर्वच्या सर्व मनोव्यापार, निग्रह, एकाग्रता, पूजा, अर्चा, व्रते, वैकल्ये ही सर्वच्या सर्व मननिर्मितच आहे. मन शांत झाले म्हणजे जे उदयाला येते आहे तेच स्पष्ट होते, ते “सत्य-नित्य आनंदमय.”

हे सर्व औंधच्या खेड्यापाड्यात हिंडत, बसत, बोलत, रागवीत, चिडत, निराश होत, थकत, विनाकारण धावपळ करत, शिकण्याचा, आत्मसात करण्याचा प्रयत्न आप्पा करीत होता. जागे होण्याच्या खटपटीपेक्षा जागे राहणे जास्तच दुरापास्त आहे असे आप्पाला वाटे.

आप्पाचे-महद्भाग्य की जन्मापासून त्याला जागे करणारे नि वडील, आई (जिच्याबद्दल त्याला काहीही स्मृती नाही) नंतर पाठक-धोंडोपंत मास्तर, नंतर फ्रॅन्सिस व अखेर मॉरिस मिळाले. मॉरिसने तर सतत आप्पाला अज्ञानातून, स्वतःच्या फसवणुकीच्या सवयीतून वर काढण्याचे प्रयत्न वीस वर्षे केले. रमण महर्षींच्याकडे मॉरिसनेच आप्पाला नेले, नंतर कृष्णमूर्ती, नंतर गांधीजी, सरतेशेवटी इहलोक सोडण्याच्या आधी, निसर्गदत्त महाराजांना त्यानेच भेटविले.

जागे करण्याचा व जागे राहण्याचा कार्यक्रम सततच चालू राहावा लागतो, नाहीतर झटपट झोप लागते.- आप्पाच्या महद्भाग्याने त्याला सहधर्मचारिणी मिळाली, नलिनी, (१९४२ एप्रिल). तिने तर सतत अगदी सुरीच्या धारेवर धरून आप्पाचे भोंदुत्व, भेकडपण, त्याची स्वतःची फसवणूक करण्याची खोड मोडून तोडून काढण्याचे व्रतच अंगीकारले होते. मथूताई द्रविडांचीच कन्या ती. मथूताईंना भोंगळपणा, भोंदूपणा,

भ्याडपणा कधीही खपला नाही. जे काही करावयाचे ते अगदी व्यवस्थित, नीटनेटके, स्वच्छच झाले पाहिजे. जरा तसूभर इकडले तिकडे झाले, गुंजभर जरी चुकले, तरी आकाश-पाताळ एक होत....त्यांचा दरारा जितका भयानक तितके प्रेमही अलोट. शुद्ध, स्वच्छ, व्यवस्थित, उत्तम असावे असाच हेका. त्यांची सुधारून आधुनिक स्वरूपात नलिनीची आवृत्ती...आप्पाला सतत परीक्षाच परीक्षा !! तो तर खंदा परीक्षा नापास होणारा, पण हळूहळू (फारच हळूहळू) निवळू लागला.

लग्न एप्रिलमध्ये झाले. औंधच्या खेड्यापाड्यातून लोक आले. आप्पाला प्रेमाने त्यांनी अगदी जखडले होते. ए. जी. जी. ही कोल्हापुराहून लग्नाला आला. ही नवा आलेला ए. जी. जी. कर्नल गेसफोर्ड, अत्यंत सुसंस्कृत, सुज्ञ, साकल्याने विचार करणारा होता. औंधचा तो मित्र बनला. औंधाबद्दल त्याने दिल्लीला उत्तम रिपोर्ट केले व अनेक संकटांतून पुढे वाचविले.

नलिनी जन्मापासून वाढली त्या वातावरणात व औंधच्या वातावरणात भयंकर अंतर. सरंजामशाही औंधची, बुद्धिवादी सुसंस्कृत-लोकशाही हे बापूसाहेब द्रविडांचे ब्रीदवाक्य; औंधमध्ये सर्वच्या सर्व कार्यक्रमांचा मध्यबिंदू राजा; द्रविडांच्या कुटुंबात शिस्त-संयम होते पण प्रत्येक व्यक्ती एक स्वतंत्रच केंद्र. औंध खेडे तर नलिनी वाढली, शिकली, पुण्यात-नागपुरात-मुंबईत-एडिंबरोत, म्हणजे शहरात. पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा म्हणून आप्पाच्या वागणुकी-सवयीपासून ते एकंदरीत जे औंधात या वेळी चालले होते ते सर्व अगदी कठोर, चिकित्सक दृष्टीने व वेधक बुद्धीने तिने पाहिले. पण ते होत होते त्यात सामील होण्याचाही, मदत करण्याचाही शिकस्तीचा प्रयत्न मात्र तिने कधीही सोडला नाही.

राजाला नलिनीचा स्वभाव व दृष्टिकोण एकदमच पसंत पडला. तसे अनेकांपुढे बोललाही. आता तरी आप्पा ताळ्यावर येईल व ह्या संत-साधू-भोंदू-भोंगळ विचित्र लोकांच्या आकर्षणापासून मुक्त होईल असे त्याला वाटले!!

आप्पाला ताळ्यावर आणायला, ताब्यात ठेवायला आणखी एक व्यक्ती अचानक या वेळी औंधात कार्याला लागली. रामाप्पा बिद्री हे मूळ गुणडाळचे बी. ए., एलएल. बी.; त्यांची व आप्पाची गाठ झाली व मैत्रीच जमली. स्पष्ट पण मृदू व मधुर कानडी स्वरातून मराठी बोलणे. काळी कुळकुळीत कांती पण मृदा शांत, सदा आनंदी. अत्यंत प्रेमळ. कार्यात सदा आत्यंतिक उत्तमता राखण्याचा प्रयत्न. सर्वांना खूष करून कार्याला लावण्याची पद्धती. एका वर्षात रामाप्पा बिद्री मिस्त्री वकिलांच्या नंतर औंधचे मंत्री झाले व दोन वर्षांत (१९४३-४४) पंतप्रधान म्हणून राजाने त्यांना नेमले.

नेहमी कर्जात असलेले संस्थान रामाप्पाने तीन वर्षांत पूर्ण निष्कर्जी केले. तालुका समित्या, ग्रामपंचायती, मध्यवर्ती सरकार यांच्या हिशोब, जमाखर्चावर कटाक्ष ठेवून सर्वांची कार्यक्षमता वाढविली.

रामाप्पा बिद्री पंतप्रधान झाल्यावर राजाने त्यांच्या सल्ल्याने आटपाडीचे रस्तुमराव देशमुख व कुंडलचे बुद्धिवान बाबूराव लाड यांना त्यांच्या साहाय्याला मंत्री म्हणून दिले. या मंत्रिमंडळाचा सेक्रेटरी म्हणून आप्पा काम करू लागला.

हळूहळू लोकांनी राजवाड्याकडे अजिबात न पाहता स्वाभिमानाने, स्वावलंबनाने, स्वकर्तव्य उत्तम रीतीने करून स्वतःच औंधचे ग्रामराज्य यशस्वी करावे हा ह्या मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेमागील हेतू. अधिकाराच्या

अनुक्रमणिका

जागेवर बसले म्हणजे खुर्ची मऊ लागायला लागते हा सर्वत्र अनुभव. आप्पाला हा लोभ (जन्मजात) नव्हताच असे म्हणता यायला काहीही हरकत नाही.

शिवाय आप्पा हळूहळू प्रत्यक्ष अधिकार-यंत्रणेतून आपले अंग काढून घेण्यात यशस्वी झाला तर लोकशाहीवर लोकांचा विश्वास वाढेल याचीही शक्यता होती.

राजाचा नातू ज्याला राज्य, राजा, अधिकार, यासंबंधी वेगवान भावना होत्या त्या बापूलाही, कदाचित यामुळे जरा हायसे वाटले.

आजूबाजूला राजकीय घडामोडींनाही वेगळाच, आजपर्यंत अननुभूत असा वेग येऊ लागला होता. त्यांच्याकडेही आप्पाला आकर्षण होतेच. औंध, ग्रामराज्ये, हिंदुस्थानचा स्वातंत्र्य लढा, यांचे एकमेकांशी निकटचे नाते आहे हे तो समजत होता.

काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा निकराला आला तर औंध एकाकी राहू शकणार नाही हे स्पष्ट होते. मॉरिस, आप्पा मग मार्गदर्शनाकरता सर्व नेत्यांना भेटू लागले.

जसजसे जपानी सैन्य हिंदुस्थानच्या जवळ जवळ येऊ लागले तसतसे ब्रिटिश साम्राज्य व ब्रिटिशांचे संस्थानिकांशी केलेले कराररमदार यासंबंधी प्रश्न निघू लागले. या करारात ब्रिटिशांनी संस्थानांचे रक्षण करण्याच्या व त्याबदला संस्थानिकांनी ब्रिटिशांचे अधिराज्य (सोव्हरेनटीही) कबूल करण्याची ही कलमे मुख्य होती. ब्रिटिशच हिंदुस्थानमधून गेले तर या अधिराज्याचे काय? ही सोव्हरेनटीही नष्ट होणार का ब्रिटिशांना ती ज्यांच्या हाती ते हिंदुस्थानच्या राज्याची सुत्रे जाताना देतील त्यांच्याकडे आपोआप ती जाणार?

प्रश्न कायद्याचा खरा पण प्रत्यक्ष पुढे उभे राहणाऱ्या अडचणींचाही होता. १९४२ पासून सर्व संस्थानांमधील चळवळींना उग्र स्वरूप येऊ लागले होते. औंध मात्र शांततेने ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी करण्यामागे होते. औंधीय सर्वच्या सर्व (यात अतिशयोक्ती नाही, अभिमान असेल) आनंदाने विधायक कार्यक्रमात गर्क होते. भाऊसाहेब रानडे सेवादलाची शिबिरे किन्हई-औंध येथे घेत होते. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे वर्षातून दोन वेळा तरी आटपाडीला ४-६ दिवस मुक्काम ठोकून बौद्धिके घेत होते. औंधच्या ७५००० प्रजाजनांवर इतके नामवंत, विचारवंत क्रियावंत उत्तम संस्कार घडवीत होते की त्यांना प्रतिसाद न मिळता तरच आश्चर्य. शिवाय शंकरभाऊ किर्लोस्कर, पंडित सातवळेकर, संस्थानातून व सर्व हिंदुस्थानातील अनेक नामांकित विद्वान वर्षातील दोन वेळा औंधमध्ये भरणाऱ्या ज्ञानसत्रामार्फत लोकांची क्षितिजे विस्तीर्ण करीत होते. केवढे या छोट्या औंधचे भाग्य! इतर संस्थानिक व त्यांच्या प्रजेला पुढे काय होईल यासंबंधी काळजी लागली असली तरी औंधचा राजा व प्रजा निर्भय, निःशंक मनाने औंधचा ग्रामराज्याचा गाडा सुखाने हाकीत होती.

१९४२ मे, जूनपासून गांधी जास्तच अस्वस्थ दिसत होते. जीवन-मरणाच्या लढ्यात गुंतलेल्या ब्रिटिशांना गांधींचा अहिंसेचा, व्यक्तिगत अहंकाराचा मंत्र उपयोगी नव्हता. त्यांना हिंदुस्थानात मुख्य ठाणे करून जपानचा पाडाव करावयाचा होता. ब्रह्मदेश जपानच्या ताब्यात आल्यावर गांधींची खात्री झाली होती की,

अनुक्रमणिका

आता ब्रिटिश सत्ता संपुष्टात येणार म्हणून. ब्रिटिश आजपर्यंत प्रौढीने वल्गना करीत असत ते हिंदुस्थानचे संरक्षण ब्रिटिश करू शकणार नाहीत, ही त्यांची आता खात्री झाली होती.

म्हणून ऑगस्ट १९४२ मध्ये हिंद छोडो (क्विट इंडिया) हा मंत्र गांधींनी दिला. आता काँग्रेस-ब्रिटिशांचा संघर्ष अटळ आहे हे निश्चित दिसू लागले.

अशा वेळी औंधने काय करावे? मोठा प्रश्नच पडला. शंकरराव देव, काका कालेलकर यांचे औंधावर अलोट प्रेम. शंकरराव तर काँग्रेसचे सेक्रेटरीच. त्यांनी गांधीजींच्याकडे बोट दाखविले, “त्यांनाच विचारणे, आता तेच आमचे एकमेव पुढारी.” आप्पा, मॉरिस, वल्लभभाई पटेलांना भेटले. ते म्हणाले, “हे छोटेखानी संस्थान काय करू शकणार, गप्प बसा...” पंडित नेहरू सारखेच गडबडीत. आप्पा ते जिथे उतरले असतील (राजा हाथीसिंग) यांच्या घरी केव्हाही यायचा-जायचा.

घरचाच आदमी. पण या वेळी जवाहरलाल भयंकरच गडबडीत. सारखे आपल्याच विचारात. आप्पाला वाटे ते भयंकर चिंतेत आहेत. त्याला वाटले जवाहरलालना असे तर वाटत नसेल की फॅसिझम विरुद्ध ब्रिटिश लढा देत असताना, अत्यंत अडचणीत ते असताना त्यांना याच वेळी पेचात टाकावे का? एक दिवस (६ ऑगस्ट १९४२) गडबडीने खोलीबाहेर पडून ब्रेकफास्ट न घेता तसेच गाडीत बसत असताना आप्पाने त्यांना पकडलेच व त्याच्या गाडीतच दाटीवाटीने बसला. वेळ थोडा म्हणून भराभर प्रश्नाचा भडिमार केला.

पंडितजी सौम्य हसले व मृदू शब्दात म्हणाले, “अरे आप्पा, प्रसंग इतका गुंतागुंतीचा आहे, कठीण आहे की, उद्याचे सोड पण आणखी दोन तासांनी काय होणार हेही सांगता येणार नाही. मी जर तुझ्या जागी असतो तर सर्व जरा शांत चित्ताने पाहून, काळाची गती कशी आहे त्यावर पुढचे धोरण ठरवीन. काँग्रेसच्या या अधिवेशनानंतर शक्य झाल्यास भेटू. नाहीतर माझे प्रेम व सदिच्छा तुझ्याबरोबर व छोट्या औंधबद्दल सदैव आहेत हे विसरू नकोस.”

शेवटी गेला गांधींच्याकडे. प्रश्न विचारला, “औंधने काय करावे?”

गांधीजी आप्पाच्या तोंडावरील ती थोडी भीती, जादा चिंता व नेहमीचीच मनातील चलबिचल पाहून हसले, म्हणाले,

“बघ, प्रसंग अत्यंत महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानचे रक्षण ब्रिटिश करू शकणार नाहीत. जपानी कदाचित हिंदुस्थानावर आक्रमणही करतील. तसे झाले तर त्यांच्याही विरुद्ध आपला लढा चालूच राहणार.

“अशा वेळी ताबडतोब औंधच्या राजेसाहेबांनी व्हाईसरॉयला स्पष्ट लिहावे की औंधचा हा राजा प्रजेच्या पूर्ण सहमतीने ब्रिटिशांना औंधचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करीत आहे. पूर्वीचे सर्व करार-मदार आता रद्द समजावे. औंध स्वतंत्र आहे व ते तसेच राहणार.

“व्हॉईसरॉय किंवा त्याच्या प्रतिनिधींनी भेटण्यास बोलाविले तर जरूर जावे. धीराने व पूर्ण विश्वासाने पुढील पाऊल टाकावे. काँग्रेसच्या बैठकीनंतर औंधच्या राजाने काय करायचे ठरविले आहे हे मला सांग. जा...”

ही गोष्ट ७ ऑगस्ट १९४२.८ तारखेस काँग्रेसचे सेशन गवालिया टँकवर. आप्पा व नलिनी, डॉ. द्रविड नलिनीचे बंधू यांच्याकडे ऑपेरा हाऊस जवळ उतरले होते. काँग्रेस सेशनला आप्पा, नलिनी, व्यंकटराव ओगले, सकाळपासून संध्याकाळपर्यंत बसले. भाषणे, ठराव झाले. पंडितजींचे कडाडून भावनाप्रधान भाषण, वल्लभभाईंचा-शांत भारदस्तपणा, मौलानांचे उच्च उर्दू सर्व ऐकले. मनाचा गोंधळ कायमच होता. औंधचे काय? काय करावे? कसे करावे?

गांधीजींचे प्रशांत, धीरोदात्त, आवाज उंच सखल न करता गंभीर भाषण. हिंद छोडो, एकच मंत्र. मनात शंका, विचारांचा गोंधळ नाही. ब्रिटिशांचे कर्तव्य, "हिंद छोडो." ब्रिटिशांचा जपान, जर्मनी विरुद्ध विजय व्हावयाचा असेल तर अहिंसेनेच होणार. सत्याचा विजयच आहे वगैरे.

"हिंद छोडोचा" ठराव व्हॉईसरॉयना पाठविणार आहे. त्यांना भेटेन. त्यांच्याशी सामोपचारानेच बोलीन. ते अडचणीत आहेत हे मी जाणतो पण कर्तव्यकर्म व्यवस्थित केल्यानेच विजय मिळतो. लोकांनी शांत असावे.

निश्चय मात्र, करेंगे, नही तो मरेंगें...!!

आप्पा स्वप्नावस्थेतच घरी परतला. लग्न झाल्यापासून ही आप्पाची वृत्ती नलिनीला माहीत होती. लग्न होऊन चार महिने झाले तरी संसाराला सुरुवात झालीच नव्हती. पहिल्या 'हनिमूनला' सुद्धा आप्पाचे पोपट-पंडित-लखू-व्यंकूचे टोळके आपापल्या पत्न्यांच्यासहित हजरच होते.... आप्पाच्या या आचरट सवयीचे नलिनीला हसू येत असावे. नऊ ऑगस्ट उजाडला. टेलिफोन बंद. वृत्तपत्रे नाहीत. रस्त्यावर सर्व शुकशुकाट. टॅक्सी, बस, घोडागाड्या, ट्रॅम सर्व बंद.

आप्पाला राजा हाथीसिंगला टेलिफोन करावयाचा होता. पण स्वस्थ बसला.

११ ऑगस्टला टेलिफोन वाजला. आप्पालाच आला होता. "अच्युत बोलतोय. भेटायला या, जागा"... आप्पा एकदम गोंधळातच. "अच्युत कोण ?" विचारले.

"मी रावसाहेबांचा धाकटा भाऊ. बोलू नका, कोणाला सांगू नका, लवकर या. फार वेळ नाही." टेलिफोन बंद...

गेला आप्पा शोधत शोधत, पत्ता ऑपेरा हाऊसपाशीच होता. तिसऱ्या मजल्यावर. भेटल्याबरोबर अच्युतराव पटवर्धनांनी नेहमीप्रमाणे मिठीच मारली. बोलणे सुरू झाले. एक-दोन तास कसे भरकन निघून गेले. दुसरेही आले. नवीन नवीन चेहरे, नव्या समस्या. नवी उत्तरे? उत्तरे नव्हतीच. सर्व एका नवीन प्रवाहात वाहत चालले होते. प्रत्येकाला वाटावयाचे की "मीच तो प्रवाह आहे. माझ्यापासूनच सुरू आहे तो "...

मात्र सर्व भारून गेले होते... "हिंद छोडो," "करेंगे या मरेंगे."

काय करणार? कसे करणार? कोण करणार? कोठे सुरुवात करावयाची?

अच्युतराव बोलत होते. ब्रिटिशांची दळणावळणाची साधने रोखली पाहिजेत. आगगाड्या थांबल्या पाहिजेत. पोस्ट-तारायंत्रे बंद झाली पाहिजेत, कोर्टे बंद झाली पाहिजेत, शाळा कॉलेजे सर्व, सर्व बंद. ब्रिटिश सरकारचा साराही बंद. शिक्षा करतो म्हणून त्याची आपण मर्जी पुरवितो, नाहीतर या नोकरीतून काढेल, पोटाला मिळणार नाही ही भीती, व लाचारी, असह्यता व आत्मविश्वासाचा अभाव यातूनच राज्य-यंत्रणा आपली सत्ता, हुकूम, टिकविते.

१९४२ च्या लढ्याच्या आधी वीस वर्षे हिंदुस्थानातील लोकांची मतेच बदलण्याचे प्रचंड क्रांतिकारी कार्य महात्माजींनी केले. स्वावलंबनाचे, स्वयंपूर्णतेचे, धडे देत देत कोणत्याही राज्यसत्तेवर जो अवलंबून राहात नाही तोच खरा स्वतंत्र हा मूलतंत्र दिला.

खरे म्हणजे आमची मने माहात्मा गांधींच्या सतत शिकवणीने किंवा त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र, स्वावलंबी उदाहरणांनीही स्वातंत्र्याकरता, हापापलेली नव्हतीच. आमची मने हापापलेली होती, अधिकाराकरता, दिल्लीच्या तख्तावर इंग्रजांऐवजी स्वतः बसण्याकरता, अधिकार गाजविण्याकरता, उपभोगाकरता. आमच्या आधुनिक काळात म्हणजे गेल्या २-३ शे वर्षांच्या काळात तृप्त न झालेल्या अहंकाराला पोसण्याकरता.

महात्माजींचा मार्ग स्वातंत्र्याचा, व्यक्ती पूर्ण स्वतंत्र, स्वावलंबी बनविण्याचा. समाजात राहून आपले कर्तव्यकर्म उत्तम रीतीने करीत करीत व्यक्तीने, कोणत्याही अधिकारयंत्रणेवर अवलंबून न राहता सहकाराने समाजात शांती, समाधान, सुबत्ता, समता, निर्माण करावयाची, हा गांधीजींचा मार्ग.

पण ब्रिटिश आता थकले. सर्वत्र त्यांचा पराभव होऊ लागला. त्यांची सत्ता, त्यांची प्रौढी, त्यांचा दिमाख, त्यांचा सर्वत्र होणारा गौरव, हा आता आपल्याला मिळणार याच भावनेने भारून गांधींच्या मार्गाचा आम्ही त्याग केला.

आमच्यापैकी अनेक आज विचार करीत आहेत की, हे काय झाले आहे? आम्ही स्वातंत्र्य संग्रामात, प्राणार्पण कऱण्यास निघालो, पण आज आजूबाजूला हे सर्व काय दिसते आहे? वाटच चुकली वाटते. आता काय?

औंधला परतताना व्यंकू ओगले बरोबर होते. ते तर अगदी मंत्रमुग्ध झाल्यासारखेच वागत होते.

दुपारच्या पूना एक्सप्रेसने नलिनी, आप्पा, व्यंकू निघाले. गाडीचा वेग व विचारांचा वेग सारखाच होता.

इतक्यात वांगी स्टेशनाजवळ धाड धाड झाले. डबा, प्रचंड कलला, थांबला, रेल रोखोचे ‘प्रात्यक्षिक होते’!! कोणी रुळाच्या फिश्प्लेटस काढल्या होत्या... गाडी चार तास लेट पुण्याला पोचली, १९४२ चा स्वातंत्र्य लढा सुरू झाला... का तो एक मोठ्या नाटकातील लुटुपुटीचा छोटेखानी प्रवेशच होता?

इतिहासकारांनी याबद्दल लिहिलेली असेल. सर्व विश्लेषणे, सर्व बाजूंनी झाली असतीलच. १९४२ची ‘चले जाव’ चळवळ महत्त्वाची होती. याच चळवळीमुळे ब्रिटिशांना आपल्या हिंदुस्थानातील अधिकाराचा गाशा गुंडाळावा लागला असेही काही प्रतिपादन करतील; दुसरे असेही म्हणतील की या चळवळीचा ब्रिटिश राज्यसत्तेवर अगदीच थोडा, जवळ जवळ नाहीच, परिणाम झाला.

अनुक्रमणिका

या १९४२च्या चळवळीमुळेच इंग्रजांनी हिंदुस्थान सोडला हे म्हणणे फारच धाडसाचे व मूर्खपणाचेही, होईल.

युरोपीय व आशियाई युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक परिस्थिती क्षीण होत चालली होती. १९४५-४६ पर्यंत इंग्रजांची साम्राज्य करण्याची तृष्णाही आटली होती. लाखो ब्रिटिशांना ही प्रचंड लढाई व त्यामुळे अपरिमित झालेले नुकसान यांच्या प्रत्यक्ष अनुभवामुळे 'हे आता सर्व नको, बस् झाले', असे वाटू लागले होते.

चले जाव, चळवळीत अनेकांनी भारून जाऊन त्याग केला, काही मृत्युमुखी पडले. पण मुख्य क्रांती या चळवळीमुळे झाली असेल तर ती हिंदुस्थानातील जनतेच्या मनात.

कोणतेही राज्य, साम्राज्य प्रथम लोकांचे मनातच निर्माण होते. हा राजा आपला आहे, आपल्याला पोसतो, संरक्षण करतो वगैरे. १९४२ नंतर आज ३५ वर्षांनंतर तर, उपभोगाकरता, नफ्याकरताच प्रसिद्धीकरताच सर्वत्र स्पर्धा चालू आहे. हा इतका भ्रष्टाचार, कसा निर्माण झाला? कारण नोकरशाहीच आमच्यावर आज सत्ता गाजवीत आहे म्हणून.

आम्ही अन्नाकरता, नोकरीकरता, संरक्षणाकरता, शिक्षणाकरता, मनोरंजनाकरता आता सत्ताधारी व पूर्णपणे केंद्रित राज्य-यंत्रणेवरच अवलंबून राहतो. आमचा रस्ता चुकला आहे हे खरेच आहे. ब्रिटिशांच्यावर जितके आम्ही मनाने व शरीराने, बुद्धीने व व्यवसायाने अवलंबून नव्हतो त्यापेक्षा कितीतरी पटीने आज आम्ही केंद्रित राजशाहीवर अवलंबून आहोत. ब्रिटिशांच्या वेळच्या आमच्या मनातील भीती, लाचारी, क्रोध, हिंसा, द्वेष, मत्सर, आप्पलपोटेपणा, आधाशीपणापेक्षा कितीतरी पटीने जास्त आम्ही तो आज आमच्या प्रत्येक आशा, अपेक्षा, हालचालींवरून जगाला व्यक्त करीत आहोत.

आजच्या युगातील थोर 'ऋषी-मुनी' आमचे खरे गुरू, बाबासाहेब आंबेडकरांनी एक नमुनेदार संविधान आमच्या पुढे ठेवले. स्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वाभिमान या संविधानात पूर्णपणे अभिप्रेत आहेत. पण आमच्या मनातील लाचारी, गुलामगिरी, भीती, परावलंबित्वच आम्ही हे संविधान अंमलात आणीत असता व्यक्त केले, वाढविले, अधिकारयंत्रणेच्या मार्फत सर्व करून घेता येईल या मनोभूमिकेने नोकरशाही वाढविली. आज ही अधिकारयंत्रणा बोजड, अकार्यक्षम, भ्रष्ट, आप्पलपोटी, झाली आहे. इतकेच नव्हे तर अधिकार सत्ता-धुंद राजकारणी व्यक्तींची पूर्णपणे लाचारी करणारी, गुलाम झाली आहे असे विचारवंतांना हळूहळू कळू लागले आहे. तरी अजून अशाच केंद्रित राज्ययंत्रणेमार्फत सुधारणा, समता, समाधान निर्माण होऊ शकेल हा भ्रम आमच्या मनातून गेलाच नाही. याचे कारण की अधिकारावर बसणे किंवा बसविणे म्हणजे स्वातंत्र्य, हे समीकरण अजूनही आमच्या मनातून जाऊच शकत नाही.

केंद्रित राजसत्तेमुळे सुधारणा, समता, समाधान कधीही होणार नाही, त्यातून गुलामगिरी, परावलंबित्व, आळस, नैराश्य, तेवढेच वाढणार आहे हे महात्मा गांधींनी बजावून, अनेकदा सांगूनही आम्हाला समजले नाही, पटले नाही, अजूनही उमगले नाही. केंद्रित राजसत्तेमुळे स्वावलंबन, स्वायत्तता, स्वातंत्र्य नाहीसे होऊन व्यक्ती किती पूर्णत्वाने गुलाम बनते हे आज आजूबाजूस पाहिल्याने सहज ध्यानी येण्यासारखे आहे. आज सरकारशिवाय, शिक्षण नाही, नोकरी नाही, करमणूक, प्रवास, नाही. इतर जगातील "ग्राहकीय" समाजात जसे झाले तसेच महात्मा गांधींच्या हिंदुस्थानात त्यांच्या नंतर अवघ्या चाळीस वर्षांचे आत आम्ही पूर्णपणे परावलंबी, स्वाभिमानभ्रष्ट, लाचार, दुःखी व निराश बनलो आहोत. आमचा आत्मविश्वास खचला

अनुक्रमणिका

आहे, गांधींचा मार्ग आम्ही जाणून बुजून सोडला. स्वावलंबन, स्वकर्मावलंबन सोडले, अधिकार उपभोगाचे मागे लागून शिस्त, संयम, कार्यक्षमता सोडली व ग्राहकी समाजाची लोभ व वासना-प्रक्षोभ, स्पर्धा व संघर्ष यांचे द्वारे मनाची शांती-समाधानही गमावले. हाव, आप्पलपोटेपणा, अहंकारामुळे, दुसऱ्याची कदर करण्याच्या प्रवृत्तीला त्याग करून, सहकार्याची भावना सोडून, सर्व समाजव्यवस्थाच मोडून-तोडून टाकली. या प्रचंड वासना-प्रक्षोभावरच उभारलेल्या या उत्पादन अर्थव्यवस्थेमुळे मानवी मन किती अशांत, प्रक्षोभित, क्रोधी, निराशी, विभ्रांत झाले आहे याची जाणीव आता कोठे थोडी थोडी, हळूहळू व्यक्तीचा व समाजाचा पूर्ण नाश होतो आहे हे पाहून विचारवंतांना होऊ लागली आहे. उपभोगक्षमता व उत्पादनक्षमता यांचा मेळच नसल्याने सरकारने आम्हाला उपभोगाला दिलेच पाहिजे, तो आमचा हक्कच आहे व आम्हाला समसमान उपभोग-आम्ही उत्पादन-क्षमतेने काळजीपूर्वक काम नाही केले तरी सुद्धा देण्याचे 'कर्तव्यच' सरकारचे आहे, तसे झाले नाही तर व्होट नाही ही विकृत वृत्ती बोकाळून यातून सत्ता, संपत्तीचे मदान्ध लोक भ्रष्टाचारच फोफावीत आहेत.

याला आळा घालणे व चुकलेला रस्ता पुन्हा गवसतो का ह्याचा विचार करणे आज अत्यंत जरूर आहे. हे कसे करावयाचे? कोठे, केव्हा, कोणी सुरुवात करावयाची, ही सुरुवात कशी करावयाची, किती मर्यादित क्षेत्रात ती प्रथम सुरू करता येईल याच्या विचारामागे आता लागले पाहिजे.

पण, वरील विचार ३५ सालानंतरचे!!.

पुण्याहून औंधला जाताना, १३ ऑगस्ट १९४२ रोजी नलिनी, आप्पा, मॉरिस, व्यंकू ओगले आपापल्या विचारात मग्नच होते. भविष्यकाळात काय होणार हे केव्हाच कोणालाच कळत नाही हे खरेच. पण मानवी मन हे होईल, हे करू, असे हे होऊ शकेल, या व्यापारात गुंतू शकले नाही तर मानवाकडून कोणतेच कार्य होणार नाही.

आप्पाच्या मनात विचार चालू होता की औंधची खेडी जर औंधवर अवलंबून न राहता स्वावलंबनाने स्वतःच, स्वतःचा कारभार करू शकतात तर ब्रिटिश मुलखातील, सातारा, सोलापुर, कोल्हापूर, विजापूर जिल्ह्यांतील खेडी ब्रिटिश सत्तेपासून 'स्वतंत्र' होऊन पूर्ण स्वावलंबनाने आपला दैनंदिन कारभार का करू शकणार नाहीत? महात्मा गांधींनी सांगितले होते, "करेंगे वा मरेंगे,". स्वयंपूर्ण स्वावलंबी खेडी करून स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट का करू नये?

औंधला गेल्यावर आप्पा वर डोंगरावर नेहमीप्रमाणे देवीला जाऊन आला. वाड्यात आल्यावर राजाला मुंबईला झालेले सर्व सांगितले. महात्मा गांधींचा सल्ला किती आचरण करण्यास कठीण आहे हे आपले मतही सांगितले.

राजा म्हणाला, "गडबडीने आता काहीच करण्यात अर्थ नाही." आप्पाला तरी कोठे, काय, करावयाचे आहे ह्याची कल्पना होती?

९ ऑगस्ट पहाटे ७०,००० काँग्रेस पुढाऱ्यांना एकदम सर्व हिंदुस्थानभर पकडल्यावर "करेंगे या मरेंगे," म्हणजे काय? यावर वेगवेगळ्या व्यक्ती विचार करू लागल्या. अच्युतराव पटवर्धन, अरुणा आसफअली, नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया भूमिगत झाले, गुप्त कारस्थाने सुरू झाली. खेड्यापाड्यातून सभा,

मिरवणुका, झेंडावंदन हेच नेहमीचे कार्यक्रम जेव्हा वाढीला लागले तेव्हा ब्रिटिशांनी लाठीमार व गोळीबाराला सुरुवात केली. पुण्याला एक-दोन वेळा लाठीमार गोळीबार झाल्यावर वरवर तरी शांतता झाल्याचा आभास निर्माण झाला.

कराड-सांगलीचे पुढारी क्रांतिवीर, गौरीहर सिंहासने एका रात्री १० वाजता अचानक वाड्यात आले. राजाला भेटावयाचे म्हणाले, अत्यंत जरुरीचे काम आहे-म्हणाले.

राजा तर झोपलेला. रोज रात्री फक्त दूध पिऊन आठ वाजताच झोपावयाचा. पहाटे अडीच वाजता उठून नमस्कार, पूजा वगैरे सुरू होती. तो एकदा झोपला म्हणजे त्याला कोणी कधीच त्रास देत नसे. नाहीतर रागवावयाचा.

आप्पाही झोपलाच होता. पण उठला, आला खाली, गौरीहर सिंहासनेंना भेटला. त्यांची हकीकत भयंकरच होती. वडूजला गोळीबार झाला होता. दोन लोक ठार झाले होते. अनेकांना गोळ्या लागल्या होत्या अत्यवस्थ स्थितीत होते. ताबडतोब मदत हवी. ब्रिटिश पोलीस पाठलाग करीत आहेत. औंधच्या वाड्यात काही दिवस गुप्त रीतीने राहणे जरूर आहे, वगैरे...

आप्पाला कोडेच पडले. ब्रिटिशांना अटक करावयाची असल्यास गौरीहरांना वाड्यात दडविणे संस्थानच्या हिताविरुद्ध होणार. या वेळी ब्रिटिशांना एकदम नाराज करणे योग्य नाही. पण स्वातंत्र्याच्या संग्रामात भाग घेण्याची संधी आपणाहून आली असताना भिऊन रणांगणातून पळून जायचे का? महात्मा गांधी, पंडित नेहरू, अच्युतराव काय म्हणतील? इत्हास दोष देईल. लोक म्हणतील भित्रा, भंपक, स्वार्थी, देशद्रोही...

आप्पाने राजाला जाऊन उठविलेच. थोडक्यात सर्व सांगितले. राजा खाली आला व गौराहरांना भेटला व म्हणाला, “फार मोठ्या कार्याला लागला आहात. धैर्य लागणार, मदत लागणार, आम्ही तुमच्या पाठीशी आहोतच.

“या लढ्यात औंधचे स्थान कसे असणार, औंधने स्वातंत्र्य युद्धाला कशी, किती, केव्हा मदत करावयाची याबद्दल अजून पूर्ण विचाराला वेळ मिळाला नाही, पण, तुमच्यासारख्या सुजाण पुढाऱ्यांचे स्थान लोकांतच असणार. संस्थानात राहून बाजूला बसलेल्यांसारखे तुम्हाला दाखवून व वागवून चालणार नाही. माझी मोटार घेऊन जा, बरोबर मी माणूस देतो. कराडला जाऊन दुसऱ्या कार्यकर्त्यांना भेटा. नीट सर्व कार्याची आखणी करा. नुसत्या धावपळीने चालणार नाही. माझे संस्थान हिंदुस्थानचाच एक अत्यंत सूक्ष्म भाग आहे. पण स्वातंत्र्य संग्रामात तुमचे पुढेच राहणार, मागे नाही, औंधची प्रजा स्वतंत्र आहे. राजा-प्रजा भेद नाही.”

नलिनीच गौरीहर सिंहासनेंना घेऊन कराडपर्यंत गेली. वाटेत कडेपूरला पोलिसांनी मोटार थांबविली तेव्हा मोटारीत फक्त वहिनीसाहेबच बसलेल्या, दुसरे कोणीच नाही. पोलिसांना त्या काळी सामानाच्या जागेत तपासण्याचे कळले नाही.

वडूजच्या गोळीबारात जखमी झालेल्यांपैकी वडगावचे काँग्रेस कार्यकर्ते बंडोपंत लोमटे यांची दोन मुले होती. हे कळताच डॉक्टर या नात्याने नलिनी ताबडतोब वडूजला गेली व मुलांना पाहून परत आली.

अनुक्रमणिका

आप्पा फिरतीवर गेला. कुंडलला नाथा लाड, आप्पा मास्तर (लाड), बाबूराव लाड आप्पाला भेटले. स्वयंशासित ग्रामराज्याच्या मार्फत ब्रिटिश सत्तेशी सर्व संबंध तोडून औंधच्या आजूबाजूची खेडी स्वतंत्र होऊ शकतील का? किती दिवस टिकाव धरू शकतील? लोकांत शिस्त, ऐक्य हवे, भीती गेली पाहिजे.

नाथा लाड म्हणाले, 'मालकांना बोलतो...'

'मालक' म्हणजे नाना पाटील. आप्पाची व त्यांची भाषण-संभाषणाचे वेळी, सभा, जत्रा, कुस्त्यांच्या फडात वारंवार भेट झाली होती. खेडोपाडी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी जी लोकजागृती केली ती अवर्णनीयच.

नाथा लाड आप्पा मास्तर खरे डाव्या गटातील. बरीच शिस्त, शिकवण साने गुरुजींची. रावसाहेब पटवर्धन, अच्युतरावांच्या विचारांची छाप पण नाना पाटलांच्यावर पूर्ण श्रद्धा. कुंडल हे केंद्र करून, नाना पाटलांना कुंडलमधेच गुप्त रीतीने स्थान देऊन, त्यांनी १९४२ ते ४६ पर्यंत अपूर्व कार्य केले. औंध संस्थानच्या धोरणांशी कधीही प्रतारणा न करता, हे संस्थानचे खंदे अभिमानी कार्यकर्ते खरोखरीचे स्वातंत्र्यवीर.

चुका झाल्याही. चुकून झाल्या असतील काही, काही जाणून बुजूनही. पण प्राणपणाला लावल्याप्रमाणे कार्य केले. बरोबर बाबूराव लाड, शाहीर निकम ही मंडळी होती. रामभाऊ पवारांचे मोठे स्वतंत्र पथक त्यांच्याशी सहकार्य करीत होते. शंकरभाऊ किर्लोस्कर, यमूताई किर्लोस्कर, अंतोबा फळणीकर, या सर्वांनी आतून, बाहेरून मदत होतीच. संस्थानातील सर्व ग्रामपंचायती भूमिगतांना, मदत करण्यास बिनदिक्कत तयार असत.

१९४४ पर्यंत या प्रतिसरकार, म्हणजेच स्वायत्त, स्वावलंबी खेडी निर्माण करण्याचे कार्य सुरळीत चालले असे म्हणता येईल. कोर्ट, कचेऱ्या, शाळा बंद झाल्या. सारा बंद झाला, कराडला कोणी कामाकरता जाणे बंद झाले!!

के. डी. पाटील यांनी कामेरी भागात खूप उठाव केला. पुढे कामेरी कोर्ट प्रसिद्ध झाले. इंग्रजांना मदत करणाऱ्यांना तिथे 'देहान्त' पर्यंत शिक्षा झाल्या!! नागनाथ नायकवाडी यांनी खानदेशात कार्य करून खजिना लुटला. बाबूराव चरणकर हे विचारवंत, व विधायक कार्याकडे यांचे जास्त लक्ष. सर्वांत भरीव व निर्भिडपणे काम करणारे धन्वंतरी कासेगावकर वैद्य. औंधला अनेक वेळा येऊन राहिले - जेलमध्ये सुद्धा! रामानंद स्वामी तर सर्वांचे स्फूर्तिस्थानच, औंध जेलमध्ये एक वर्ष होते - आजारीच होते. औषध नलिनीचे.

पण ब्रिटिश राज्ययंत्रणा पूर्णपणे बंद करण्याचे हे स्वप्न स्वप्नच राहिले!!!

मग कचेऱ्या लुटणे, आगगाड्या पाडणे, बॉम्ब तयार करणे, याकडे लक्ष केंद्रित होऊ लागले. काही लाख रुपये लुटल्यावर भांडणांनाही सुरुवात झाली.

मग मोठा, 'क्रांतिसिंह' कोण याबद्दल स्पर्धा... मग, आपल्याला मानीत नाही त्याला 'शासन' सुरू झाले... प्रति सरकारचे पत्री सरकार झाले. लोकमत विरुद्ध जायला लागले. हिंसा वाढीला लागली. ध्येय सुटू लागले.

अनुक्रमणिका

'चले जाव'..... चळवळीला मदत करीत असताना औंधची - औंधच्या विचारांची - आचारांची - संयमाची - कार्याची व स्वावलंबी आणि स्वतंत्र खेड्यांच्या ग्रामराज्यांची होळी आप्पाला होऊन द्यायची नव्हती.

मुंबईला, पुण्याला, साताऱ्यात, किन्हईत, प्रत्यक्ष औंधात अनेक भूमिगत 'क्रांतिसिंहांशी ' आप्पाने विचार-विनिमय केला. अच्युतराव तर नेहमीच भेटत. अरुणाबाई असफ अल्ली, नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, मेहर अल्ली मुंबई-पुण्यात गुप्त रीतीने भेटत.

मुंबईला गेले की अरुणाबाईंना भेटण्याचा निरोप राम महाराज पंडित, कमलाकांतांचे थोरले-बंधू यांच्यामार्फत यायचा. तेच दोन-तीन वर्षे 'कॉन्ट्रॅक्ट' म्हणून काम करीत. एस. एम. जोशी, अच्युतराव, जयप्रकाश, शिरूभाऊ-निळूभाऊ लिमये यांचे कॉन्ट्रॅक्ट, बाबूराव पाठक ते एक अद्‌भुतरम्य नाटकच असे!! गांधीविचारात गुप्तता, कारस्थाने, बसत नाहीत गाडीचे रूळ उखडणे, टेलिफोनच्या तारा तोडणे बसते का?

झाले वादविवाद सुरू. बाहेर असलेले काका कालेलकर गांधीवादी पण अट्टाहास नाही. आचार्य भागवत, आचार्य जावडेकर प्रचंड बुद्धिवादी, ब्रिटिशांच्या हिंसेपुढेही आमची लुटुपुटीची हिंसा खरी अहिंसाच मानावी!! स्वतःची फसवणूक व गोंधळ चालूच होता. लोक मात्र मारून काम करीत होते. धन्वंतरी कासेगावकर, कामेरीचे के. डी. पाटील, सांगलीला खुद्द 'दादा' वसंतराव पाटील, कोल्हापुरात रत्नाप्पा, साताऱ्यानजिक कोरेगावचे तात्या बोराटे, वाई तालुक्यातील किसनवीर आणि इतर मंडळी. धूमधडाका होता.. उत्साहाचा.

एकदा अरुणाबाई असफ अल्ली, अच्युतराव व अरुणाबाईंचे यजमान यांचा चार तास प्रचंड वादविवाद झाला. अस्फ अल्लींना हा अच्युतराव अरुणाबाईंचा स्वतंत्र्य-संग्राम म्हणजे अगदी पोरकटपणाच वाटे. अत्यंत सुसंस्कृत शब्दात शांत रीतीने ते बोलत होते. अच्युतराव, अरुणाबाईंचा पारा वाढत होता. आप्पाच्या बरोबरच हैदराबादचे वनपरती संस्थानचे राजे, रामेश्वरराव, एक अच्युतरावांचे "कॉन्ट्रॅक्ट" ही होते.

करमणुकीशिवाय असल्या वादातून काहीही निष्पन्न होत नसे. स्थळ होते २१ नेपिअन सी रोड फातिमाबाई इस्माईल यांचे घर. खरे म्हणजे सर्व क्रांतिकारकांचे, कवींचे, चित्रकारांचे, लेखकांचे, तरुण-म्हाताऱ्या विचारवंतांचे, सर्व सुसंस्कृत लोकांचे, हिंदू-मुसलमान-शीख-पारसी-युरोपियन, सर्वांचेच माहेरघर, फातिमाबाई.

हा असफ अल्ली नवरा-बायकोंचा वाद कंठशोषापर्यंत पोचलेला पाहून, "खाना तयार हय, चलो" म्हणून सर्वांना फातिमाने हकलले...!

रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर, सांगली, मिरजेत दडून राहण्याचे कठीण झाले की औंध संस्थानच्या किन्हई गावात राहात. महिना महिना ते तिथे राहिले. शाहूपुरे. तेथील संस्थानचे वहिवाटदार अत्यंत चोख, हुशार, कार्यकर्ता-राजाचा त्याच्यावर लोभ असे. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल, कार्यक्षमतेबद्दल राजाला आदर. आप्पांचा शाळेपासूनचा (१९२५-२८) दोस्त. अत्यंत प्रेमळ पण स्पष्टवक्ता. रत्नापांची सर्व व्यवस्था शाहूपुरे यांच्याकडे इतकेच नव्हे तर कोरेगाव, वाई, तालुक्यातील सर्व भूमिगतांचा अड्डाच किन्हईला असे. किसन वीर हेही किन्हईला येऊन राहात. त्यांचे गाव किन्हईच्या डोंगराचे पलीकडेच. किन्हईला अंबाबाईचे सुंदर

देऊळ, रामाचे व एकवीरेचे अशी आणखी दोन सुन्दर देवायले. येथे सेवादलाचे शिबिर १५ दिवस घेतले होते. शाहूपुरेंनी सर्व व्यवस्था केली होती.

आप्पासाहेब पंत प्रतिनिधी, विशाळगडकर क्रांतिवादी, कम्युनिस्ट. तेही येऊन राहात. सर्व हालचालींची सातारा, सोलापूर, कराड, तासगाव, वडूजवरून खबर सातारचा कलेक्टर, पुण्याचा कमिशनरमार्फत मुंबई प्रांताचे गव्हर्नरकडे जाई. पण तो बिचारा काय करणार!! औंध पडले संस्थान! त्याला औंध संस्थानच्या इतस्ततः विखुरलेल्या खेड्यांची शीव ओलांडण्याची मनाई होती. त्या वेळचा साताऱ्याचा पोलिस सुपरिडेंडेंट येट्सचा जळफळाट होई. पण गप्प बसे. सूड घेण्याची संधी शोधत होता. त्याचा हस्तक डी. एस्.पी. वालावलकर फार हुशार. ब्रिटिशांना मानणारा. काँग्रेसला तुच्छ लेखणारा. औंधवर भयंकर राग. तोच येट्स साहेबांचे कान फुंकी. पण इतके सगळे औंधच्या विरुद्ध रिपोर्ट गेल्यावर मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लमले यांनी दिल्लीला औंधच्या विरुद्ध रिपोर्ट केला. ते रिपोर्टात लिहितात, (मूळ रिपोर्ट इंडिया ऑफिस लायब्ररीमधे आहे. त्याचे शब्दशः भाषांतर)

“माझ्या मनात तिळमात्र संशयाला जागा नाही की हे चळवळे गुंड गाड्या पाडतात, पोस्ट व ट्रेझरी लुटतात व संरक्षणाकरता औंधच्या खेड्यांचा आश्रय घेतात, तसेच औंधचा राजपुत्र (दिवाण) त्यांना सक्रिय मदत करतो याबद्दलही मला संशय उरला नाही. बाकीची संस्थाने ज्याप्रमाणे मिरवणुका, सभा यांना बंदी घालून ब्रिटिशांना ही गुंडगिरी रोखण्यास मदत करतात, तशी मदत औंधमध्ये जोपर्यंत हल्लीची राज्यव्यवस्था आहे तोपर्यंत अशक्य आहे.”

हा रिपोर्ट दिल्लीहून कोल्हापूरला आला असणार. सुयोगाने ए.जी.जी. या वेळी औंधचा दोस्त कर्नल गेसफोर्ड होता. आप्पाला व नलिनीला त्याने आपल्याकडे कोल्हापूरला राहायला बोलावले. दुपारभर सूर्यनमस्कार, योग, चित्रकला, इतिहास, जगातील घडामोडी, युरोप आशियातील युद्ध, हिंदुस्थानचे युद्धानंतरचे भवितव्य वगैरे विषयांवर दीर्घ चर्चा झाली. अत्यंत खेळीमेळीने, सुसंस्कृत रीतीने जे अत्यंत कठोर व कडू असेल ते सहज अगदी शेवटी बोलण्याची ब्रिटिशांची शैली आप्पाला माहीतच होती. जेवण, कॉफी झाल्यावर कर्नल गेसफोर्ड नलिनीला म्हणाला, “आम्हा दोघांना काही बोलावयाचे आहे. आम्हाला परवानगी द्या. आम्ही आमचे ऑफिसमध्ये जाऊन बसतो, माझी पत्नी तुम्हाला सोबत करीलच.”

आप्पाला आधीच गेसफोर्डचे बोलावणे आल्याबरोबर माहित होते की “सर्व हिशेब देण्यास” बोलावणे आहे म्हणून. मनात भीती होतीच. पण हे सर्व पत्करलेल्या नाटकाच्या भूमिकेतील न चुकणारा कठीण असा भाग होता तो जाणून होता. यानंतर पडदा पडणार व मध्यंतरानंतर, दुसरा नवा अंक सुरू होणार हे ठरलेलेच होते.

ऑफिसच्या भल्या मोठ्या खोलीत बसल्यावर गेसफोर्ड एकदम मुद्द्यालाच आला. म्हणाला, “आप्पासाहेब, तुमच्याबद्दल व औंध संस्थानाबद्दल दिल्लीला मुंबईहून वाईट रिपोर्ट गेले आहेत. तुम्ही या गुंड लोकांना भेटता, त्यांच्या सभेला हजर राहता असा हा एक रिपोर्ट. दुसरा वीस हजार रुपयांचे ज्याला पकडून देण्याबद्दल बक्षीस जाहीर झाले आहे अशा नाना पाटलाला कुंडलमध्ये आसरा देता हा एक रिपोर्ट. तिसरा असा की पटवर्धन, असफ अल्ली बाई व जयप्रकाश नारायणांनाही तुम्ही भेटलात. तुमच्याशी प्रत्यक्ष बोलूनच मी दिल्लीला माझे मत कळविणार आहे.”

अनुक्रमणिका

वडिलांची व महात्माजींची शिकवण. आयुष्यात खोटे बोलणे आप्पाच्या जिवावर येई. अगदी कधीही 'नरो वा कुंजरो वा,' केले नसेल असे मात्र नाही. आप्पा म्हणाला,

"हो, मी आपण सांगितलेल्या लोकांना भेटतो. नाना पाटील कुंडलला येतात, जातात. औंध संस्थान सर्वत्र पसरलेले आहे. कोण केव्हा येणार, जाणार यांच्यावर लक्ष ठेवणे दुरापास्तच आहे.

"शिवाय आज आजूबाजूला जो काँग्रेसच्या चळवळीचा, या स्वातंत्र्य संग्रामाचा, उठाव होत आहे त्याचा असर औंधच्या खेड्यांतील जनतेवर होणारच. त्यांना जर या वेळेला योग्य रीतीने मार्गदर्शन केले नाही तर जाळपोळ, खून, दरवडे, औंधातही होऊ शकतात.

"कर्नलसाहेब, तुम्ही माझे एक मित्र म्हणून मी आपल्याशी स्पष्टच बोलतो. या स्वातंत्र्य संग्रामाच्या बाहेर राहणे, प्रेक्षक होणे, माझ्यासारख्याला शक्य नाही. या स्वातंत्र्ययुद्धाच्या नाटकात माझा पार्ट आहे पण जाळपोळ, लूटमार करणाराचा नाही हे निश्चित. लूटमार जाळपोळीवर ज्यांचा विश्वास असेल त्यांच्याशी मी बोलत नाही, त्यांना भेटत नाही, असे मी म्हणणारच नाही. त्यांच्याशी मी बोलतो, वारंवार भेटतोही पण माझ्या समजुतीप्रमाणे जे चुकीचे मार्ग ते पत्करतात त्यांच्याबद्दल योग्य शब्दांत बोलून त्यांना या आत्मघातकी मार्गापासून परावृत्त करण्याचीही खटपट करतो, याबद्दल माझ्यावर विश्वास ठेवावयाचा की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवावयाचे.

"काही झाले तरी माझी हाडे हिंदुस्थानातच पुरली जाणार. आपण, कर्नलसाहेब, प्रेक्षकांच्या भूमिकेवर आहात. उद्या आपल्या मायदेशी परताल. माझी व आपली भूमिका, दृष्टिकोण वेगळेच असणार. पण ब्रिटिशांनी केलेल्या चांगल्या गोष्टीबद्दल मला त्यांचा आदर वाटतो. अनेक ब्रिटिश स्त्री-पुरुष माझे मित्र आहेत. स्वतंत्र बाणा तुम्हीच आम्हाला, अलीकडच्या काळात, शिकविला. आताही हिटलर-मुसोलिनी-टोजो यांच्या विरुद्ध लढून एका दृष्टीने तुम्ही स्वातंत्र्याचेच रक्षण करीत आहात. "ब्रिटिश सरकारला माझी व्यक्तिशः वागणूक पसंत नसेल तर मला औंध सोडून जाण्याचा तुम्ही हुकूम देऊ शकता, किंवा गिरफदार करून तुरुंगात ठेवू शकता.

"वडील आता थकले आहेत. त्यांना त्रास होईल असे मला काहीही करावयाचे नाही. त्याबरोबरच औंधचा ग्रामराज्याचा प्रयोग एका दृष्टीने सबंध हिंदुस्थानलाही उपयोगी पडणार आहे, असे मला वाटते. महात्माजींनीच या प्रयोगाला प्रोत्साहन दिले आहे. तो बंद न व्हावा असे मला वाटते." कर्नल गेसफोर्ड खरा उमदा गृहस्थ. तो म्हणाला, "उत्तम. मी तुला पूर्णपणे समजू शकतो.

माझ्यासारख्या इंग्लंडमध्ये अनेक लोक समाजाच्या वेगवेगळ्या स्तरावर आहेत की ते हिदुस्थानच्या स्वातंत्र्याला मदतच करणार.

आमची तुम्हाला मदत करण्याची पद्धती वेगळी असेल, केव्हा केव्हा तुमचे आमचे यासंबंधी गैरसमजही होऊ शकतील. पण हिंदुस्थानाबद्दल आस्था, प्रेम, आदर असणारे लोक आज इंग्लंडमध्ये खूपच आहेत. महत्त्वाच्या हुद्द्यावर आहेत. राजकारणीही आहेत.

"आप्पा, मी तुला एक गुप्त गोष्ट सांगतो. लढाईनंतर आम्ही हिंदुस्थान सोडून जाण्याचे निश्चित केले आहे. आता तुम्हाला सर्व कारभार करावा लागणार आहे. त्याच्या तयारीस तुम्हाला लागले पाहिजे. माझा रिपोर्ट उद्या दिल्लीला जाईल. तुझ्या वडिलांना, माझ्या मोठ्या मित्राला, माझा प्रेमाचा नमस्कार सांग..."

[हे सर्व १९४४, जूनमध्ये!!]

झाले!! पडदा पडला. अंक संपला. आता मध्यंतर व लगेच दुसरा अंक....जीवन हे असे सारखे चालूच आहे. "गच्छतीति जगत्."

औंधला जाऊन राजाला सर्व सांगितले. त्याला बरे वाटले.

गेसफोर्डच्या रिपोर्टाला, पुस्ती देणारा फ्रॅन्सिस एका प्रमुख जागेवर दिल्लीला होताच. सर्व मदत करावयास दिल्लीला या वेळी आणखी एक आप्पाचा ऑक्सफर्डचा दोस्त पीटर राईट हा मेजर जनरल म्हणून वरवर शिक्षण खात्यात पण खरे म्हणजे गुप्त हेर खात्यात होता. त्याचाही उपयोग औंधला या वेळी फार झाला.

फ्रॅन्सिस आप्पाला १९३९ मध्ये एकदा म्हणाला होता की औंधच्या ग्रामराज्याचा प्रयोग चांगला व कल्याणकारी आहे, तो विनाकारण ब्रिटिशांचे विरुद्ध जो तुझ्या मनात द्वेष, त्वेष, मत्सर असेल त्याने कलुषित करू नकोस..!!

विलायतेला दिल्लीने जो औंधबद्दल पुढे रिपोर्ट पाठविला त्यामुळे ह्या फ्रॅन्सिसच्या वाक्याची आप्पाला राहून राहून आठवण होते.

खरेच आहे, जे चांगले आहे, कल्याणकारी आहे, [सत्य ! करुणा? सुंदरता? चैतन्य? नावे अनेक आहेत व नाहीतही-शून्य-परिपूर्ण-पूर्ण-पण, आहेत ते आहे] त्याला प्रतिसाद चांगल्याकडून मिळतोच. चांगले फक्त हिंदू, मुसलमान (पाक-नापाक?), ख्रिश्चन, ज्यू, मध्येच असतात का? गोऱ्यात, काळ्यात, पिवळ्यात, तांबड्यातच असतात का? मग हा अनर्थकारी अहंकार का? लंडनमधून, दिल्लीमार्फत मुंबईला १९४३ मध्ये एक आदेश आला त्यातील काही भागात लिहिले होते. [हेही इंडिया ऑफिस लायब्ररीमधील रेकॉर्डवरून].

"औंधच्या या प्रयोगात अनेक दोष असू शकतील, (Whatever the shortcomings of this exeperiment) परंतु हा प्रयोग चांगले काम करीत आहे हे स्पष्ट आहे. याचे कारण असे असावे की ग्रामराज्य हिंदुस्थानातील सांस्कृतिक, धार्मिक, वैचारिक, परंपरांना अनुसरूनच काम करू लागले आहे. ही एक आनंदाचीच गोष्ट आहे की औंधच्या ह्या प्रयोगाला काँग्रेस श्रेष्ठींचीही मान्यता आहे. औंधच्या या प्रयोगाला काँग्रेसने मान्यता दिली आहे म्हणून तिला त्याज्य समजता येत नाही. हा प्रयोग यशस्वीरीत्या काम करून राहिला आहे व आम्ही दिल्लीहून मुंबई राज्याला स्पष्ट करून सांगितले आहे की औंधबद्दलचे त्यांचे रिपोर्ट व टीका जरा जास्तच भडक व अप्रस्तुत आहे व औंध ब्रिटिशांच्याशी सहकार्य करीत नाही हे वस्तुस्थितीला सोडून दिसते !!!"

औंधच्या या १९४२च्या स्वातंत्र्य संग्रामाविषयीच्या कार्याबाबत सातारचे कलेक्टर व पोलिस आणि मुंबईचे गव्हर्नर यांच्याच मनात वस्तुस्थितीला सोडून, भलते अतिशयोक्तिपूर्ण भ्रम होते. इतकेच नाही तर या

अनुक्रमणिका

स्वातंत्र्याच्या नाटकातील ‘आपला पार्ट महत्त्वपूर्ण आहे’ असे औंधीयांना व विशेषतः आप्पाला उगीचच, विनाकारण वाटे, हेच खरे.

नाना पाटील, सातारा, सोलापूर, कोल्हापूरचे अट्टल दरवडेखोर यांना गुप्त रीतीने आपण भेटतो ह्याचे आप्पाला महत्त्व वाटे. रात्री नाथ बुवा लाड कुंडलचे बंगल्यावर यावयाचे व “बाळंतीण अडली आहे वहिनीसाहेब ताबडतोब चला”, म्हणावयाचे. मग अगदी कादंबरीत वर्णन करतात त्या थाटात इकडून तिकडे जरा फिरवून आप्पाला व नलिनीला या सर्व ‘भयंकर’ कृत्ये केलेल्या व करू पाहणाऱ्या लोकांना भेटावावयाचे. आप्पाचे नेहमीचेच व्याख्यान, अहिंसा, सत्याग्रह, स्वातंत्र्य, व्यक्तीच्या जबाबदाऱ्या, समाजाचा समतोल स्थापनेकरता, शिस्त-संयम, कंटाळा येईपर्यंत चालावयाचे की परत बंगल्यावर. झाला आप्पाचा स्वातंत्र्य संग्रामातील पार्ट... गंमतच होती !!

पण साताराचे कलेक्टर पोलिस सुपरिंटेंडेंट येट्स साहेब, व विशेषतः वालावलकर यांना दाखवून द्यायचे होते की नुसतेच आप्पासारखा भ्रमिष्ट ब्रिटिशांचे धोरणाविरुद्ध जाऊन काँग्रेसच्या गुंडांना थारा देत आहे असे नाही तर किर्लोस्करांच्यासारखे कारखानदारही या दरवडेखोरांना हत्यारे वगैरे पोचवीत आहेत!!!

साताराचे त्या वेळचे कलेक्टर व पोलिस सुपरिंटेंडेंट इतके पोरकट व मूर्ख असतील अशी कल्पनाही करवत नाही. पण वालावलकर द्वेषाने पेटलेला. सर्वसाधारण समज असा असतो की सरकार म्हणाले की धोरणात, धोरणांचे अम्मलबजावणीत सुसंगतता, सूत्रता, कार्यक्षमता असते. विशेषतः ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातील राज्याबद्दल अनेकांचा असा गैरसमज होता.

पण नेहमीच, निरपवाद कोणत्याही केंद्रित सत्तेत परस्पर विरोधी व्यक्ती व गट, धोरण आखण्यात व या धोरणाचे अमंलबजावणीत, एकमेकांविरुद्ध कारस्थाने करतात व एकमेकाला सत्तेवरून हटविण्याचा प्रयत्न करतात.

संकटकाळी, लढाईच्या वेळी सुद्धा अशा प्रवृत्ती एकमेकांविरुद्ध असतातच. पण साताराच्या येट्ससाहेबांनी एक घाणेरडे खेड्यातील साध्या लोहाराने वालावलकर यांच्या सांगण्यावरून केलेले लहानसे पिस्तूल जेव्हा किर्लोस्करवाडीत लपवून ठेवून ते एकदम अर्ध्या तासाचे आत शंभर दोनशे हत्यारबंद आपल्या पोलिसांमार्फत संस्थानचे अधिकाऱ्यांना परवानगी न विचारता, मुंबईच्याही हुकुमाशिवाय, शोधून काढण्याचे नाटक केले त्याला निव्वळ मूर्खपणा म्हणायचे नाही तर काय?

आप्पा त्या वेळी आटपाडीच्या रानात भटकत होता. तिथेच एकदम, अचानक शंकरभाऊ किर्लोस्करांची मोटार घेऊन एका दुपारी आले व आप्पाला गाडीत बसवून किर्लोस्करवाडीला आणले. वाटेतच सर्व वृत्तान्त सांगितला.

सकाळी ७-३० ते ८ च्या सुमारास एक कोणी अज्ञात इसम अनंतराव फळणीकर यांच्या घरी आला. विचारू लागला की अनंतराव आहेत का म्हणून. अनंतराव हे किर्लोस्करवाडीच्या कारखान्याचे त्या वेळी जनरल मॅनेजर होते. ते कारखान्यात गेले होते. श्रीमती फळणीकरही घरी नव्हत्या. त्यांचा धाकटा मुलगा तिथे होता. त्याच्या हातात या अज्ञात इसमाने एक छोटेसे कागदात गुंडाळलेले पार्सल दिले व त्याला सांगितले की हे जपून फळणीकर साहेबांचे टेबलाचे ड्रॉवरमध्ये ठेवावे, चुकू नये !!! मुलगा लहानच होता, त्याला

खेळण्यास जाण्याची किंवा शाळेला जाण्याची गडबड होती. ते पार्सल तसेच खिशात ठेवून तो घराबाहेर पडला...

अर्ध्या तासाच्या आतच येट्ससाहेब वालावलकरांसह शंभर दोनशे हत्यारबंद पोलिसांना घेऊन आले ते एकदम झडतीचे नाटक सुरूच झाले!! शंकरभाऊ, शंतनुराव, लक्ष्मणराव, गुर्जर, शंभोराव जांभेकर या सर्वांनी येट्ससाहेबांना ते कोणाच्या परवानगीने औंध संस्थानच्या व किर्लोस्करवाडीच्या हद्दीत आले, त्यांचा परवाना हुकूम कोठे आहे याबद्दल पृच्छा केली. येट्ससाहेबांनी सर्वांना धुडकावून लावून झडतीचा सपाटा चालविला. कारखाना अगदी उलटापालटा केला. एक पोलिसांची तुकडी सरळ अंतोबा फळणीकरांचे घरातच तकड गेली.

लोणच्याचे बरणीपासून तुपा-तेलाच्या भांड्यापर्यंत सर्वच्या सर्व तपासले. त्यांना ते "कागदात गुंडाळलेले पार्सल" तेथे सापडावयास हवे होते.... ते अनंतरावांच्या धाकट्या मुलाच्या खिशात होते, तेथे कसे सापडणार?...

इकडे कारखान्याची झडती जोरात चालू होती. एका तासाचे हे. नाटक एकदम एका वाळूच्या पिंपातून एक ओबडधोबड पिस्तुलाचा बिडाचा लहानसा एक भाग हुडकून काढून संपले...!!!

मोठ्या दिमाखाने हा एकच भाग हातात घेऊन येट्ससाहेब शांत शंतनुरावांच्या ऑफिसमध्ये आले व अगदी तोऱ्यात म्हणाले, "किर्लोस्कर, हे असले पिस्तुलाचे भाग या कारखान्यात होऊ शकतात?" नेहमीप्रमाणे अत्यंत शांत आवाजात, हसत, शंतनुराव म्हणाले, "अहो साहेब, आम्हाला हिणवू नका; असले हे ओबडधोबड बिडाचे पदार्थ आमचा सुतार किंवा गवंडीही करणार नाही. त्याला असले काम करायला लाज वाटेल. या आमच्या कारखान्यात उत्तमोत्तम पोलादी ओतीव काम होतात. त्यांपैकी सर्व तपासून ती परिपूर्ण आहेत असे सिद्ध झाल्यावरच मग ब्रिटिश सरकारचे, तुमच्याच्याच सरकारचे, सैन्याधिकारी ते तुमच्या युद्धोपयोगाकरता खरीदतात. या आमच्या उत्तमोत्तम कामापैकी शेकडा २ टक्के सुद्धा ते टाकावू ठरवीत नाहीत. उत्तमतेबद्दल किर्लोस्कर प्रसिद्ध आहेत...!!!"

अगदी शांत रीतीने, थोडासुद्धा गर्वाचा किंवा नाटकी अतिशयोक्तीचा भाग नसलेले हे वक्तव्य ऐकून येट्ससाहेब थंडगार पडले. मग चहा-बिस्किटे शंतनुरावांच्या घरी खाऊन आपल्या घरी गेले.....

हे सर्व ऐकून आप्पाला हसू तर कोसळलेच पण आता एक 'बौंडरी' मारायला मिळणार म्हणून आनंदही झाला.

शंकरभाऊंना घेऊन तो तडक औंधला गेला. तेथे रामाप्पा बिद्री, बाबूराव लाड, रस्तुमराव या मंत्रिमंडळाशी विचार-विनिमय केला व राजाला भेटला. सगळ्यांच्या विचारे असे ठरले की ए. जी. जी. ला या सर्व प्रकाराबाबत ताबडतोब राजाच्या सहीचे सर्व घडलेल्या हकिकतीचे जसेच्या तसे वर्णन करणारे पत्र लिहून ए. जी. जी. ला या सर्व प्रकारची 'पूर्ण चौकशी' करण्याकरता त्यांचेच पोलिस सल्लागार, जोशी, यांना नेमावे, असे सुचवावे. त्यांनी दोन महिन्यांत पूर्ण चौकशीअंती ए. जी. जी. ना रिपोर्ट करावा व मग ए. जी. जी. च्या सल्ल्याप्रमाणे औंध संस्थानचे आपले पुढले असले गैरवाजवी, गैरसमजाचे, प्रकार होणार नाहीत, याबाबतचे धोरण आखावे.

अनुक्रमणिका

आप्पा स्वतः हे पत्र घेऊन ए. जी. जी. ला भेटला, त्यालाही आश्चर्याचा धक्का बसला. वाईटही वाटले. या येट्ससाहेबाच्या आततायी व आचरटपणाबाबत!! त्या वेळी कर्नल एडवर्डस हा ए. जी. जी. होता. सरळ सालस माणूस. जोशी हे 'पोलिटिकल डिपार्टमेंटचेच' पोलिस अधिकारी, म्हणजे गुप्तहेर खात्यापैकीच गृहस्थ, अत्यंत सज्जन व राजकारणात मुरलेला. औंधबद्दल, औंधच्या राजाबद्दल आदर. आप्पा त्यांना भेटला. त्यांनी साध्या शब्दांत सल्ला दिला की "औंध विरुद्ध काही मोठे कारस्थान शिजत आहे. जपून पावले टाकली पाहिजेत."

आप्पा म्हणाला, "ए. जी. जी. साहेबांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. मुंबई सरकार व त्यांच्या अधिकाऱ्यांबाबत मात्र आम्ही काहीही बोलू शकत नाही. आमच्या औंधमधील कार्याबद्दल, आमच्या काही अडचणींबद्दल ते काहीच समजू शकत नाहीत, ह्याचे खरे म्हणजे आम्हाला वाईटच वाटते. आता आपणच आम्हाला सल्ला द्यावा. त्याप्रमाणे पोलिस वाढविणे, देखरेख ठेवणे वगैरे सर्व गोष्टी आम्ही करूच करू, रिपोर्ट मात्र लवकर द्यावा." या वेळी संस्थानचे पोलिस अधिकारी म्हणून कुंडलकरांचे वडील त्यांनी ब्रिटिश पोलिस खात्यातून पेन्शन घेतल्यावर नेमले होते. अत्यंत सालस, सरळ, चोख कार्यकर्ता. औंधच्या खेड्यापाड्यांतून सर्व स्तरांच्या लोकांची मने आपल्या चांगुलपणाने जिंकली होती त्यांनी.

कुंडलकरांची व जोशी यांची दोस्ती होती हे औंधचे या वेळी भाग्यच.

जोशी यांचा रिपोर्ट दोन महिन्यांत आला खरा पण त्यात किर्लोस्करवाडीवर जी धाड घातली होती, त्याबद्दल काहीही नव्हते!! जोशी यांना विचारणा केली तेव्हा ते म्हणाले, "दिल्लीला रिपोर्ट गेला आहे." हे प्रकरण तसेच दाबले गेले. ए.जी.जी. मात्र पुढे सहा महिन्यानंतर एकदा राजा भेटावयास गेला असता हळूच म्हणाला की या किर्लोस्करवाडीच्या प्रकाराबाबत त्याला "फार खेद वाटतो!" फार खेद वाटतो याचा अर्थ "आम्हाला माफ करा", असा घेता येतो. पण यात लेखी मात्र काहीही नव्हते.

जोशी यांच्या औंध रिपोर्टात मात्र पोलिसांची वाढ, त्यांचे ट्रेनिंग, हत्यारे, दारूगोळा वगैरेंचा तपशील होता. हे सर्व ताबडतोब व्हायला हवे. औंधचा पोलिसवरचा खर्च ५०,००० रुपयांनी वाढणार होता!! पण हा हळूहळू म्हणजे पाच वर्षांत वाढवावयाचा होता. १९४५ साली ५०,००० रुपयांची ही रक्कम म्हणजे शाळा, रस्ते, विहिरी, पंचायत, घरे यांना काट लावूनच करावा लागणारा खर्च होता.

पण या जोशी रिपोर्टाचे मुख्य कलम होते, संशयित लोकांबद्दल. तीस लोकांची, कुंडल व आटपाडीतील काँग्रेसप्रेमी लोकांची यादी यात होती. अर्थात ज्या भूमिगत लोकांची यादी या रिपोर्टात होती, त्यांच्याबद्दल औंध संस्थानाला काहीही करणे शक्य नाही, हे सर्व फरारी आहेत असेच सांगावे लागले. पण आप्पा लाड, बापूराव लाड (मंत्री...) अशी ती १५-१६ नावे होती त्याबद्दल काय करावे हा एक प्रश्नच झाला.

बाबूराव पाटलांनी स्वतः त्याबद्दल उत्तम उपाय सांगितला. ते म्हणाले, "महाराज, काळजी का? आम्ही २०-२५ आटपाडीची, व कुंडलची माणसे औंधच्या जेलमध्ये आनंदाने येऊन बसू; तसे आपण ताबडतोब राजेसाहेबांच्या सहीने ए. जी. जी. ला कळवावे."

झाले, औंधचे तुरुंग पुढील तीन वर्षे फुल राहिले. सर्व राजकीय कैद्यांची वजने १०-२० पौंडांनी वाढली!!!

अनुक्रमणिका

क्रांतीचे, स्वराज्याचे, पोवाडे गाऊन मोठ्या प्रमाणात लोकजागृती करणारा कुंडलचा शाहीर निकम याच्या लग्नाला औंध तुरुंगातूनच आप्पा मास्तर (लाड), बाबूराव लाड वगैरे गेले होते. लग्न मोठ्या दिमाखाने आले होते. हजारोंनी लोक हजर राहिले होते.

नाना पाटील, किसन वीर, एस. एम. जोशी हे लग्नाला येणार म्हणून १००-२०० पोलिस कुंडल गावाच्या हद्दीबाहेर सातारा-कऱ्हाडमधून येट्स सुपरिन्टेंडंटने आणले होते. संस्थानच्या हद्दीत येण्याला त्यांना परवानगी नव्हती. सर्वच्या सर्व क्रांतिकारी लग्नाला आले. लग्न झाल्यावर हे "क्रांतिसिंह" पुन्हा औंधच्या तुरुंगात!!! अशी आपखुशीने 'स्वराज्या' करता तुरुंगातही जाऊन बसणारे 'सदा-स्वतंत्र' नागरिक असतील तर समाजात एक वेगळ्या प्रकारचाच आनंद अनुभवास येतो. त्यात एकमेकांबद्दल श्रद्धा, कदर, सहज दुसऱ्यांच्या गरजांबद्दल आस्था असते व कर्मकुशलताही. यात ध्येयवादाचे अवडंबर नसते, तर मॉरिससारखे 'स्वकर्माचे' सदा स्फुरण असते. चांगले व कल्याणकारी कर्माची खरी परीक्षा, चांगल्या व कल्याणकारी, फ्रॅन्सिस वॉटसनसारख्या व्यक्तींनाच होते. इतरांनी उत्तम कर्माची प्रशंसा न केलेलीच बरी.

१९४३-४४ साली लॉर्ड लिन्लिथगो हे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय होते. त्यांना ब्रिटिश सरकारचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, म्हणजे हिंदुस्थान व बर्मा-सिलोन-इराणच्या आखाताचे काम पाहणारे मंत्री, अमेरी, यांचे एक पत्र आले होते. अमेरी म्हणजे खरे 'हुजूर' पक्षीय, ज्यांना अगदी उजव्या बाजूला झुकणारे म्हणता येईल. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या मुख्य पुढाऱ्यांपैकी. त्यांच्या पत्रात खालील मजकूर होता-

[हा मजकूर इंडिया ऑफिस लायब्ररीतील रेकॉर्डवरून भाषांतरित]

"औंधच्या नव्या संविधानाच्या काही अडीअडचणी व प्रश्नांसंबंधी एडवर्डचा तुमच्या मार्फत आलेला रिपोर्ट मी अगदी काळजीपूर्वक वाचला. अनेक ठिकाणी मी वाचले आहे व काही तज्ज्ञांनी मला सुचविलेही आहे की, हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीचा पाया ग्रामराज्ये असावीत व अप्रत्यक्ष निवडणुका (इन्डायरेक्ट) मार्फत सर्व निवडणुका व्हाव्यात. औंध संस्थान ह्याच तत्त्वानुसार आपला लोकशाहीचा प्रयोग ग्रामराज्ये व अप्रत्यक्ष निवडणुकांच्या मार्फत थोड्याफार यशस्वी रीतीने गेली काही वर्षे चालवीत आहे.

"अप्रत्यक्ष निवडणुका अमेरिकेत अगदी पहिल्यापासून खरोखरी एक फार्सच ठरल्या. खरोखरी ज्या निवडणुकाच होत्या, व जो एक अप्रत्यक्ष निवडणुकांचा टप्पा मध्ये ठेवला गेला, त्याचा या प्रत्यक्ष निडणुकांचेवर काहीही परिणाम झाला नाही. "हिंदुस्थानात मात्र वेगळा अनुभव येण्याचा संभव आहे. गावातल्या सार्वजनिक मतदानाने निवडलेल्या पंचायतीमार्फत पुढे वरच्या निवडणुका जर झाल्या तर खेडुतांना माहितगार व ज्यांच्यावर त्यांचा विश्वास आहे अशा प्रतिनिधींचे मार्फत लोकशाही राबविणे जादा सोपे जावे. नुसते एक पिवळी किंवा हिरवी मतपत्रिका महात्मा गांधींच्या पेटीत टाकून ज्यांचा त्यांचा काहीही संबंध नाही अशांना निवडून आणून खरे, लोकराज्य, हिंदुस्थानात स्थापन होईल असे वाटत नाही. हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशात सर्वांत जास्त भीती ही आहे की, मध्यवर्ती सत्तेचा वापर करण्याकरता येवढी मोठी केंद्रित शासनयंत्रणा निमाण करावी लागणार की या केंद्रित अवाढव्य यंत्रणेचा व लोकांचा प्रत्यक्ष संबंध पूर्णपणे तुटून अनर्थ निर्माण होणार.

“आज जरा मागे वळून जर पाहिले तर असे वाटते की, हिंदुस्थानात अगदी पहिल्यापासून लोकराज्ये गावागावातून बसवून जर त्यांना लोकशाही कार्यक्षमतेने चालविण्यास तयार केले असते तर हिंदुस्थानात खऱ्याखुऱ्या लोकशाहीचा भक्कम पाया घालता आला असता...”

ह्या अमेरिसाहेबांच्या रिपोर्टाला आता चाळीस वर्षे होऊन गेली. या चाळीस वर्षांची हिंदुस्थानातील लोकशाही तसेच केंद्रित शासन व राज्ययंत्रणा यांची वाटचाल जर आपण स्वच्छ, अदूषित, सूबुद्धतेने, परीक्षली तर कदाचित आपणाला असे वाटण्याचा संभव तरी आहे की आज ते आमच्या आजूबाजूला आम्हीच जाणून किंवा न जाणता निर्माण केले आहे त्यातून समाजाचा व त्याच्याबरोबर “व्यक्तीचा पूर्ण नाश होऊ घातला आहे. आमची वाट आम्ही चुकलो आहोत!”

मग आता काय? जादा भ्रष्टाचार? अकार्यक्षमता? वैफल्य? निराशा? निष्क्रियता? द्वेष, क्रोध? मत्सर? दुःख? सर्वनाश?

मात्र एवढे स्पष्ट होण्यास हरकत नाही की कोणतीही राज्यपद्धती जर व्यवस्थित, कार्यक्षमतेने, चालवावयाची असेल तर अव्यवस्थित, अकार्यक्षम, दुर्बुद्ध, भ्रष्ट, क्रोधी, अहंकारी व्यक्तींच्या मार्फत हे अशक्य आहे.

शिस्त, संयम, सुसंस्कृतता आपोआप निर्माण होत नाहीत. त्याकरिता वारंवार सतत दीर्घ प्रयत्न करीत राहावे लागते. कर्मकुशलता, स्वधर्म, सुबुद्धता ही दीर्घ प्रयत्नाअंतीच प्राप्त होतात. सहजासहजी नाही.

औंधचे भाग्य की भवानरावासारखा राजा मिळाला. महात्मा गांधींच्यासारख्या अद्वितीय योगी, युगपुरुष, मार्गदर्शन प्रोत्साहन देण्यास मिळाला. मॉरिससारखे मानव्याचे उपासक प्रत्यक्ष कार्याला लागले.

फ्रॅन्सिस, वॉटसन, पीटर राईट, एव्हेलिन, वुडसारखे सुबुद्ध दूरदर्शी मित्र मिळाले.

प्रत्यक्ष कार्याला हात घालणारांत पंडित सातवळेकर, नानासाहेब चापेकर, नानासाहेब जोशी, आण्णासाहेब बखले, शंकरराव किर्लोस्कर, रामाप्पा बिद्री, होतेच. अनेक इतरही भारून, आनंदाने कामाला लागले होते.

दैनंदिन राज्यकारभार कुंडलकरांनी अक्षरशः हाडाची काडे करून कार्यक्षमतेने चालविला. त्यांना मदतीला शंकरराव केळकरांच्या सारखे उत्तम पूर्ण प्रामाणिक निरलस कार्यकर्ते होतेच.

उत्तम शिक्षणास धोंडोपंत, लेले, पाठक होते. बाहेर कॉंग्रेसच्या नामवंत अनुभवी ध्येयवादी नेत्यांतून रावसाहेब व अच्युतराव पटवर्धन, शंकरराव देव, तात्यासाहेब शिखरे, गंगाधरराव देशपांडे, आण्णासाहेब सहस्रबुद्धे, भाऊसाहेब रानडे हे औंधच्या जनतेवर सतत संस्कार करीतच होते. फक्त पंचाहत्तर हजार लोकांकरिता इतके “अतिरथी-महारथी” संग्राम क्षेत्रात जेव्हा उतरले तेव्हा कोठे जनतेचे अज्ञान, निराशा, निरुत्साह, हळूहळू जाऊन नवे संस्कार ग्रहण करण्याची क्षमता त्यांची वाढली. पूर्वदूषित संस्कारांची सवय जाण्यास वेळ लागतोच. आज १९८५ मध्ये तर आणखीही अनेक नवीन भयानक दूषित संस्कार मानवी

मनावर झाले आहेत. हे सर्व पुसून टाकून, स्वच्छ नवी दृष्टी येण्यास कितीतरी हजारो भारावून कार्याला स्वतः स्व-प्रेरणेने जुंपणारे सुबुद्ध, सहृदय, समर्थ सेवक सज्ज कसे होणार हा मुख्य प्रश्न आहे.

याचा विचार करण्यास आपणाला आता बसावे लागेल.

अनुक्रमणिका

# ६ १९४५ - ५१

इतिहासाचा प्रवाह कधीकधी प्रचंड वेगाने वाहतो; तर कधी थांबत, खंडित, आटल्यासारखा भासतो, कधीकधी अगदी संथ. प्रशांत दिसतो, तर अनेक वेळा डबकी करून कुजतो आहे असे वाटते, हा प्रवाह अगदी उलटाच वाहतो आहे असे सुद्धा भासते.

खरे म्हणजे इतिहासाचा प्रवाह हा असंख्य व्यक्तींच्या, अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या, वेगवेगळ्या वेळी, एकमेकांना पोषक, मारक, विरुद्ध गतीच्या, चांगल्या, वाईट, राजसी, तामसी, सात्त्विक वृत्ती-विचार-कर्मांचा, भावनांचा, अपेक्षांचा, अपेक्षाभंगांचा, आदर, अनादरांचा, द्वेषांचा, मत्सरांचा, दुःखांचा, काळजी-व्यथांचा, आनंदाचाच बनलेला असतो.

असा फार दिवसांचा साठत आलेला क्रोध, द्वेष, दुःख, यांना तोंड न फुटल्यामुळे, वाट करून देणारा नसल्यामुळे, किंवा अधिकारशाही शोषणाकरिता, अहंकाराकरिता, सत्तेकरिता, प्राप्तीकरिता त्याला क्ररपणे बांध घालीत असल्यामुळे, दबाव वाढत वाढत जाऊन हा बांध एकदम फुटतो व प्रवाह अद्वातद्वा बेफाम वाहायला लागतो. यालाच “क्रांती” म्हणतात.

फ्रान्सची जगावर प्रचंड परिणामकारी १७७९ ची क्रांती. रशियामधील १९१४ मधील प्रचंड नव्या विचारांच्या-आचारांच्या उर्जा जगभर प्रसविणारी ‘लाल झेडा क्रांती’. अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध, सर्व मानवी ‘इतिहासाला’ वेगवान करणाऱ्या क्रांत्यांचेच नमुने आहेत.

पहिल्या १९१४ - १९१८ च्या जागतिक युद्धात जुने अनेक बांध फोडून इतिहासाचा प्रवास वेगवान झाला. पण तीन, साडेतीन कोट लोकांची हत्या झाल्यावर निराशा, वैफल्य, वैताग, अपमानाची भावना इतक्या प्रमाणात वाढल्या की जर्मनीत हिटलर, इटलीत मुसोलिनी, स्पेनमध्ये फ्रॅन्को, व रशियात लेनिन-स्टॅलिन यांनी त्यांना वाचा फोडली व अशी एक गती इतिहासाला मिळाली की त्यातून दुसऱ्या जागतिक युद्धाचा जन्मच झाला!!!

हिंदुस्थानातील भूक, वैफल्य-निराशाग्रस्त, लाचार, मूढ बनलेली जनता अनेक वर्षे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक, जात, धर्म, आपला-परका, या अनेक दबावाखाली दबून चूपचाप अक्षरशः “हरिहरि” करीत बसली होती. पण हा दबाव चार-पाचशे वर्षे वाढतच होता. परचक्रांच्या विरुद्ध एक दोन उठाव नवी अस्मिता निर्माण करण्याकरता इतस्ततः झालेही, काही हत्याही झाल्या. पण साम्राज्यशाहीचा वापर इंग्रजांनी त्यातल्यात्यात कुशलतेने पण जरूर तेव्हा क्रूरतेनेही करून दोनशे वर्षे हिंदुस्थानला नामोहरम केले. आविर्भाव असा की राज्य करून आपण हिंदुस्थानच्या लोकांवर उपकारच करीत आहोत. त्यांच्या सत्तेचा दिमाख, आत्मप्रौढी यांनी खरे म्हणजे हिंदुस्थानातील बुद्धिमान विचारवंतांचेही डोळेच दिपले होते. पण दबाव वाढतच होता.

अनेक वर्षे हिंदुस्थानातील अनेक जाती, धर्म, प्रांत, भाषा, कृती-प्रवृत्तीत हा दबाव वेगवेगळ्या स्तरावर साठत साठत आला होता. पण या दबावाचा दाब केंद्रित, ठिकठिकाणी, एकाच वेळी, एकाच धोरणाने, सर्वांना बरोबर घेऊन केलेल्या कार्यक्रमामार्फत प्रवाहित होऊच शकत नव्हता. त्याला तोंड फोडणारा नव्हता.

आगरकर, रानडे, महात्मा फुले, राममोहन रॉय, अरविंद यांनी असे तोंड फोडण्याचे प्रयत्न केले. पण हा दबाव तसाच अडकून, थबकून राहिला होता.

टिळकांनी, लाला लजपतराय व बिपिनचंद्र पॉल यांना बरोबर घेऊन रणशिंग जोराने फुंकले, व “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे” या मंत्राने दडून, झाकून बसलेली, गुप्त प्रचंड शक्ती कार्यवान केली. केवढे त्यांचे कार्य! महात्मा गांधीनी या अनेक ठिकाणी, अनेक स्तरांवर, लहान, थोर, कुजलेली, घोर, उथळ डबकी, तलाव, ओघ, आपल्या साध्या, सोप्या, ‘अहिंसेच्या’ मंत्राने जोडून मोठ्या क्रांतीत, पुरुष-स्त्री, शिकलेला-अडाणी, गरीब-श्रीमंत, लहान-थोर सर्वचे सर्व ‘स्वधर्मामार्फत’ सहकाराने, कोणत्याही राक्षसी-पाशवी शक्तीशी झुंज करू शकतात हे आपण एकट्याने पुढे जाऊन, धीराने, प्रेमाने करुणेने, दाखवून दिले.

मॉरिस-आप्पा-फ्रॅन्सिस महात्म्यांच्या ह्या प्रेमशक्तीस सर्व संघर्षात, लढ्यात, क्रोधात, दुःखात, कार्यान्वित करून कोणाचाच पाडाव-पराजय-निर्मूलन न करता सर्वच प्रश्न व समस्या सामंजस्याने सोडविण्याच्या अखंड प्रयत्नामुळेच प्रभावित झाले होते.

युरोप, अमेरिका, चायना, जपान मधील ‘रुधिरप्रदिग्ध’ क्रांत्या, उलट-सुलट पुन्हा हिंसामय प्रतिक्रांत्या, कधी न संपणारा हा द्वेष, क्रोध, मद, मत्सर, दुःख हे पाहून व प्रत्यक्ष अनुभवून (मॉरिस व फ्रॅन्सिस) महात्माजींच्या या सत्याच्या शोधाकडे मोठ्या आशेने जसे लाखो इतर, सर्व जगतातून, एक आशेचा किरण म्हणून आकर्षिले तसेच हेही खेचून औढून घेतले गेले होते.

पण गरीब बिचारे छोटेखानी औंध!! १९४५ नंतर सर्वच डाव एकदम बदलायला लागला. राजाही एकदम भयंकर कॉलऱ्याने आजारी झाला. बरा होऊन परत येतो तो ‘हिंदुस्थान फेडरेशनची’ एक भव्य पण ओबडधोबड योजना सर्व संस्थानिकांच्या पुढे मांडली गेली होती. संस्थानिक गोंधळले होते. या योजनेत संस्थाने, अल्पसंख्यांक, जसे मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख, जैन, वगैरे, व ब्रिटिश हिंदुस्थान या तीन गटांचे मिळून हे फेडरेशन बनणारे होते. त्यात प्रत्येक गटाला ८० जागा होत्या. म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानात कॉंग्रेसला बहुमत मिळाले तरी सुद्धा ८० च जागा त्यांना मिळाल्या असत्या. खरे म्हणजे ही योजना १९३९ च्या आधीच पुढे आली होती पण लढाईमुळे मागेही पडली आणि पुन्हा ती १९४५ ला विचारात घेतली गेली. अर्थात कॉंग्रेसला ही पटणारी नव्हतीच. याचबरोबर दिल्लीहून असेही सांगण्यात आले की संस्थानिकांचे ‘यावच्चंद्रदिवाकरौ’ संरक्षणाची जबाबदारी यापुढे ब्रिटिश घेणार नाहीत. बदलती परिस्थिती ओळखून संस्थानिकांनीच आपल्या प्रजेच्या रास्त आकांक्षा पुऱ्या केल्या पाहिजेत!!

१९४५ नतंर औंधसारख्या छोट्या संस्थानिकांना स्वतंत्र अस्तित्वच राहणार नाही हे आता स्पष्ट होऊ लागले होते. मग आपला ग्रामराज्याचा संसार आटोपता घ्यायचा का? विचार पडला.

१९४४ साली सर क्लॉड ऑकिनलेक हे हिंदुस्थानचे सरसेनापती. लढाई आता संपणार व नंतर ब्रिटाशांचे हितसंबंध अरबी समुद्र, इराणचे आखात, हिंदी महासागर या परिसरात कसे सांभाळायचे याबद्दल दूरगामी योजना त्यांनी हिंदुस्थान सरकारपुढे ठेवली. ब्रिटिश सरकारनेही इंग्लंडमध्ये त्यावर खूपच भवति न भवति केली.

अनुक्रमणिका

या योजनेत असे स्पष्ट केले होते की, जर ब्रिटनने हितसंबंध जगातल्या या महत्त्वाच्या भागात संरक्षण करण्याचे असतील तर 'स्वायत्त' हिंदुस्थानवर पूर्णपणे अवलंबून ब्रिटनला राहता येणार नाही. हिंदुस्थानचा पश्चिम भाग, व बंगालचे आखातात बंगाल-आसाम हे प्रदेश ब्रिटनला नेहमी पूर्ण सहायक ठरतील अशीच राजकीय योजना करणे जरूर आहे.

सर क्लॉड ऑकिनलेक, शूर, बुद्धिवान, सैनिक होते तसेच सुज्ञ व समंजसही होते. वास्तववादी असल्याने रशिया, चीन कोणती पाउले लढाईनंतर उचलतील हे त्यांनी ध्यानात घेऊनच ही योजना पुढे केली होती.

सर क्लॉड ऑकिनलेकचा सल्ला व मदत पुढे स्वतंत्र हिंदुस्थानलाही अत्यंत मौलिक झाली.

पण या योजनेचा फायदा जिनांनी घेतला व १९४४ साली पाकिस्तानची घोषणा केली. म्हणजे राजे-महाराजे, काँग्रेस, मुस्लिम लीग यांचा तिरंगी सामना होणार हे १९४५ला दिसून येऊ लागले.

ब्रिटिशांच्या संरक्षणाशिवाय संस्थानिक टिकूच शकणार नाहीत हे जेव्हा हैदराबादसारख्या फ्रान्सएवढ्या मोठ्या संस्थानिकाला व्हाईसरॉय लॉर्ड रीडिंग यांनी खडसावून सांगितले (१९२६) तेव्हापासून ब्रिटिशांचे सार्वभौमत्व (सॉव्हरेनटी) सर्वच्या सर्व संस्थानिकांनी कबूल केले. १९२७ साली ब्रिटिश सरकारने सर हायकोर्ट बटलर यांचे अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमून हिंदुस्थानात मोठमोठ्या व काही निवडक छोट्या संस्थानिकांना भेटून त्यांनी या ब्रिटिशांचे धोरणावर शिक्का-मोर्तब केली.

बटलरसाहेबांनी या रिपोर्टात एक मात्र मखलाशी केली होती. त्याने संस्थानिकांचे समाधान काय झाले असेल कोण जाणे. मखलाशी अशी होती की ब्रिटिशांचे सार्वभौमत्व जर संपुष्टात आणावयाचे असेल, किंवा ते दुसऱ्या कोणाला (काँग्रेस ? मुस्लिम लीग?) जर ते बहाल करायचे असेल तर तत्पूर्वी ब्रिटिशांनी प्रत्येक संस्थानिकाची संमती घ्यावी!!!

अशा रीतीने १९३० पासून इतिहासाची पावले अशी पडत होती आणि जागतिक वेगवान प्रवाह असे वाहू लागले होते की बिचारे संस्थानिक बेचैन व दिग्मूढ झाले होते!!!

१९३९ मध्ये आपल्या औंधच्या लोकांवरच आपला सर्व बोजा टाकून अधिकार-विमुक्त भवानराव मात्र 'स्वस्थ सुखी' होता.

पण ७२ गावांची, ७२००० वस्तीची ही गरीब ग्रामराज्ये 'समाधानी' जरी झाली तरी ती टिकणार का? प्रश्न मोठा गुंतागुंतीचा.

झाले, पंडित सातवळेकर, रामाप्पा बिद्री, तात्या शिखरे, शंकरराव देव यांच्या गाठी-भेटी सुरू झाल्या.

राजाही आपले विचार स्पष्ट करू लागला.

सांगली संस्थानचे सुविज्ञ, सुज्ञ, त्यागी कार्यकर्ते कोरे हेही विचार करू लागले. जमखिंडीचे निरलस कार्यकर्ते साबडे हे या सर्व लोकांशी विचार-विनिमय करीत असताना १९४५ साली असा विचार निघाला की

दक्षिणी १९ संस्थानांचे एक 'संघराज्य' बनवावे. राजे लोकांनी आपली सर्वच्या सर्व सत्ता या १९ संस्थानच्या प्रजेने निवडलेल्या प्रतिनिधींचे 'कॉन्स्टिट्यूशन असेंब्लीकडे' सोपवावी.

यासंबंधी विचार करण्यास संस्थानातील कार्यकर्त्यांची परिषद जमखिंडी इथे भरविण्याचे ठरले. सभा उत्तमच झाली. भाषणे, विचार, ऊहापोह, आरडा-ओरडा, द्वेष, निंदा वगैरेंनी भरली नव्हती. विधायकच होती. राजे लोकांच्या एक वरिष्ठ कौन्सिलचीही तरतूद दक्षिणी संस्थान संघराज्यात या परिषदेने केली होती.

परिषदेत असे ठरले की साबडे, कोरे, पंडित सातवळेकर यांच्या कमिटीने सर्व संस्थानिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांची या योजनेला संमती घ्यावी.

बिचारी ही कमिटी! औंध, फलटण व भोर शिवाय कोणतेच संस्थानिक त्यांना भेटण्यास तयार नव्हते. नाही कोणी म्हणाले नाही. पण प्रजेला सर्व सत्ता देणे? संघराज्य करणे? ब्रिटिशांना काय वाटेल व खरोखरी टिकेल का ? हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर त्याला मान्यता मिळून एक स्वतंत्र अस्तित्व या संघराज्याला राहील का ? अनेक प्रश्न राजे लोकांचे पुढे होतेच.

काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद शंकरराव देव हे दक्षिणी संस्थानच्या प्रश्नासंबंधी अत्यंत आपुलकीने सल्ला देत. औंधला तर त्यांनी दत्तकच घेतले होते. त्यांनी या संघराज्यासंबंधी सरदार पटेलांना बोलावण्याचे मान्य केले. खरोखरी औंधप्रमाणे जर सत्ता लोकांच्या हातात जाणार असेल तर हे संघराज्य हिंदुस्थानचे स्वराज्यात 'काही काळ तरी' टिकायला हरकत नाही असे शंकररावांचे मत होते.

रामाप्पा, आप्पा, शंकरराव किर्लोस्कर, पंडित सातवळेकर यांचे स्वप्न हे की औंधचे ग्रामराज्य १९ संस्थानमध्ये पसरून मोठ्या क्षेत्रात हा प्रयोग जास्त यशस्वी करून दाखविता येईल!!!

१९४५ पर्यंत औन्धच्या सर्वच्या सर्व खेड्यांत ग्रामराज्याबद्दल प्रचंड अभिमान निर्माण झाला होता. विशेषतः १९४२-४६ च्या लढ्यात औंधमध्ये येऊन अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी जेव्हा थोडी विश्रांती (!!!) घेतली होती व अच्युतराव, रावसाहेब, शंकरराव देव, आण्णा सहस्त्रबुद्धे, रत्नाप्पा कुंभार, किसन वीर, भाऊसाहेब रानडे या सर्व मंडळींना औंध आपलेच आहे, औंधला 'सांभाळले' पाहिजे असे वाटू लागले होते. तेव्हा तर राजापासून ते शिपायापर्यंत औंधमध्ये एक गर्व, अहंकारही निर्माण झाला होता. कितीही उत्तम कार्य असले तरी अहंकार, गर्व म्हटला की त्याला प्रतिसादाऐवजी प्रतिकारच निर्माण होतो. दक्षिणी संस्थानांतील अनेक कार्यकर्त्यांना औंध जरा जादा टुरटुर करते, असे त्या वेळी वाटले असल्यास नवल नाही.

संस्थानिक व त्यांचे सल्लागार यांना तर या म्हाताऱ्या राजाचे हसूच येई!! कधी कधी कीवही येत असावी.

पण!! महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांनी औंधला 'चढवून' ठेवले होते ना? म्हणून लोक आपले गप्प बसत, सहन करीत हा विनाकारणाचा गर्व, हा अहंकार.

दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याच्या या 'टूम' मध्ये औंध जरा जादा पुढारीपण करते आहे हेही अनेकांना बोचलेच असणार.

अनुक्रमणिका

संस्थानिक तर गोंधळले. त्या स्थितीत तटस्थच होते. पण याच वेळी (१९४६ मार्च) नेमके दिल्लीहूनही दंडक निघाले की सत्तांतर झाले तर लहान लहान संस्थाने टिकू शकणार नाहीत. सर कॉनरॅड कॉर्नफिल्ड हे व्हाईसरॉयचे राजकारणाचे (पोलिटिकल) सल्लागार. त्यांच्या एका भेटीत त्यांनी सौराष्ट्रात जसे २०० छोट्या-मोठ्या संस्थानांनी एक संघराज्य बनविले तसे दक्षिणी संस्थानांनीही बनवावे असे सुचविले!!!

जरा उशीरच झाला होता या सल्ल्याला व दक्षिणी संस्थानिक जागे होण्याला!!! पहिल्या बैठकीत तर आप्पाला हसूच आवरेना!!! संस्थाने सर्व काळाच्या जबड्यात नष्ट होणार तरी आपला मान-अपमान, मोठी खुर्ची, लहान खुर्ची, यावरच वेळ जाऊ लागला. दोन तीन अशा संस्थानिकांच्या सभा झाल्यावर वेगवेगळ्या संस्थानांच्या दिवाणांनी महाराजांच्यासमोर एक दक्षिणी संस्थानच्या संघराज्याचा मसुदा मांडला. त्यात लोकनियुक्त कॉन्स्टिट्यूशन असेंब्लीची तरतूद होती. पण राजे लोकांचे अधिकार, प्रिव्ही पर्स (खाजगी खर्च) यासंबंधी या असेंब्लीचे अधिकार मर्यादित स्वरूपाचे होते.

हो ना करता करता हा मसुदा बॅरिस्टर जयकर यांना दाखविण्याचा व त्यांचा सल्ला घेण्याचे ठरले. बॅरिस्टर जयकर यांनी सल्ला (२०,००० रुपये रोख ५ रुपयांच्या नोटांत घेऊन) दिला. त्यावर राजे लोकांनी चर्चा केली. या संघराज्याची मुद्रा (सील) कोणती असावी याबद्दल दोन स्वतंत्र मीटिंग झाल्या.

लोकांनी केलेल्या संघराज्याच्या मसुद्याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे अनेक कार्यकर्ते नाराज झाले होते. साबडे, कोरे हे पुढारी सर्वांचे मत तसे असेल तर दक्षिणी संस्थानचे संघराज्य झाल्यास बरे अशा मताचे होते. कोरे व साबडे, सांगली व जमखिंडी संस्थानचे मंत्रीही झाले होते.

पण कोल्हापूर वगळूनच संघराज्य झाले पाहिजे हा सर्व पटवर्धन संस्थानिकांचा आग्रह. कोल्हापूरचे छत्रपतीही कोल्हापूर स्वातंत्र्यानंतर एक स्वतंत्र जिल्हा म्हणून तरी राहू शकेल, या कल्पनेने भारले होते. ब्रिटिश राजदरबारी युद्धातील त्यांच्या सेवेमुळे त्यांचे वजन तिकडे चांगले होतेच.

शिवाय माधवराव बागल यांना इतर 'सटरपटर' संस्थानांशी संगनमत करणे त्यांच्या स्वभावाला धरून नव्हतेच. रत्नाप्पा कुंभार मात्र पहिल्यापासून सर्व संस्थाने विलीन झाली पाहिजेत अशाच मताचे होते. पण सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचाच त्यांचा, खऱ्या कार्यकर्त्यांचा स्वभाव, त्यामुळे संघराज्याला त्यांनी प्रत्यक्ष विरोध केला नाही. दक्षिणी संस्थानांचे संघराज्य करायचे याला ब्रिटिश अनुकूल होते, पण काँग्रेस कसे? सरदार पटेल यांना, जवाहरलालना, महात्माजींना हे पटले का? अशा राजे लोकांच्या गटांना स्वतंत्र हिंदुस्थानात स्थान राहणार का? आप्पाने ज्या वेळी महात्माजींच्या जवळ हा प्रश्न काढला तेव्हा त्यांना हे संघराज्य, राजे लोकांचे एक कौन्सिल, वगैरे योजना विशेष पसंत पडल्याच नाहीत. त्यांच्या मते औंधच्या लोकांना अशा संघराज्यात जाऊन फायदा कोणता? खेडी, स्वावलंबी-स्वतंत्र झाल्यावर काही खेड्यांचे गट तालुका म्हणून होण्यास हरकत नाही. पण हा व्याप फार मोठा केला तर अवजड होऊन नोकरशाहीच प्रामुख्याने बलाढ्य बनणार. पण महात्माजींनी सरदार पटेल व जवाहरलाल जे काही सांगतील त्याप्रमाणे करावे, पण औंधच्या जनतेच्या मनाविरुद्ध जावयाचे नाही असा सल्ला दिला.

आप्पाला औंधच्या जनतेचे मत दक्षिणी संस्थान संघराज्याच्या बाजूने बनविण्यास खूपच प्रयत्न करावे लागले. सर्व तालुका समित्यांच्या मते हे संघराज्य आपल्या उपयोगी नाही असेच होते.

अनुक्रमणिका

शंकरराव देवांनी सर्व राजे लोकांच्या संयुक्त बैठकीत त्यांच्या निमंत्रणाने जाऊन दोन दिवस खूपच ऊहापोह केला. सरतेशेवटी सरदार पटेलांना बोलावण्याचे त्यांनी कबूलही केले. आप्पा बरोबरच होता.

सरदार पटेलांनी पहिल्या अनेक बैठकींत दक्षिणी संस्थान संघराज्याच्या कल्पनेची, ए मराठा कॉन्स्पिरसी मराठ्यांचे बंड म्हणून टिंगलच केली. आप्पाला फार वाईट वाटले. पण शंकरराव देवांनी खूपच रदबदली केल्यावर, "हा, अच्छा, करो करो, देखेंगे" येवढेच ते म्हणाले.

जवाहरलालनाही आप्पा भेटला. नेहमीप्रमाणे त्यांची दृष्टी उत्तुंग, सर्व जगावर सारखी फिरे.

संघराज्याबद्दल आप्पा अगदी आग्रहाने बोलतो आहे, करू दे बिचाऱ्याला खटपट झाले, असेच त्यांना वाटले असणार. म्हणाले, "आप्पा, सर्व घडामोडी इतक्या जलदी होत आहेत की तुझ्या ह्या संघराज्याबद्दल निश्चित काही सांगणे बरोबर होणार नाही."

या संघराज्याच्या धडपडीत आप्पा असतानाच नलिनी अंमळनेरला प्रताप शेटजींचे हॉस्पिटलमध्ये डॉ. रामभाऊ म्हसकर यांच्या आग्रहावरून काम करण्यास निघून गेली. डॉ. म्हसकर हे जवळजवळ बारा वर्षे राजाच्या निमंत्रणावरून दरसाल औंधला महिना दीड महिना फुकट ऑपरेशन करण्याकरता येत. आटपाडी, कुंडललाही जात. अत्यंत कुशल व पूर्णपणे सेवाभावी. मोठमोठी मेजर ऑपरेशन ते औंधात करीत. नलिनीही सर्जन, तीही त्यांच्याबरोबर स्त्री-रोगांची ऑपरेशन करी. दूरदूरचे लोक येत. पण छोट्या औंधमध्ये नलिनीला असले काम ते किती मिळणार? डॉ. रामभाऊ एक दिवस राजाला म्हणाले (१९४५), "नलिनीबाईंना प्रताप शेटांच्या हॉस्पिटलमध्ये वर्ष दोन वर्षे कामाला पाठवावे. त्यांना त्यांच्या हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ हवाच आहे."

राजाला नेहमीच वाटे की सेवेचे चांगले, पराक्रमी काम करण्याची संधी आली तर ती सोडता कामा नये. राजाने ताबडतोब कबूल केले. नलिनीलाही औंधच्या छोट्या डबक्याचा कंटाळा आला होता. तेच तेच उत्सव, त्याच त्याच सभा, भाषणे, तेच तेच सारखे, राजाचे उदोउदो !!

गेली नलिनी अंमळनेरला आणि मग आप्पा दक्षिण संस्थान संघराज्याच्या भानगडीत, मिरज, सांगली, पुणे, वर्धा, मुंबई बरोबरच अंमळनेरचीही यात्रा करू लागला. आटपाडी, कुंडल, 'प्रतिसरकार' नाना पाटील, नाथा लाड, ह्या सर्व नेहमीच्या कार्यक्रमातही भाग घ्यायचा होता त्याला.

१९४५-४६ सालात आप्पाने इतका का त्रागा केला या संघराज्याबद्दल? ही एक विनाखिंडाराची बिनदरवाज्याची अभेद्य भिंत आहे हे त्याला का कळले नाही? इतिहासाचा प्रवाह कोठे जातो आहे व संघराज्याचे ओबडधोबड बिनसुकाणूचे अवजार कसे या प्रचंड प्रवाहात टिकणार हे खरे म्हणजे इतरांप्रमाणे त्याला उमगायला हवे होते. पण !! 'आसक्ती' आहे ना? बाबा, त्यांना म्हातारपणी सांभाळायचे, म्हणजे त्यांची "मी राजा, मी सर्व प्रजेचा पालनपोषणकर्ता, मी सुधारणावादी, सर्वांच्या पुढे माझे पाऊल" ही प्रतिमा जपावयाची होती त्याला. का? त्यात तो अजूनही लडबडला होता म्हणून.

अनुक्रमणिका

पण आता या सोसाट प्रवाहात छोटी छोटी ग्रामराज्ये कशी टिकणार? मग एक जरा मोठे संघराज्य व्हावे, त्याचा अध्यक्ष, राजा व्हावा. म्हणजे माझे कर्तव्य, 'मी केले', असेच आप्पाच्या सुप्त मनात त्याला नकळत वाटले असावे.

शंकरराव देवांना पुन्हा पुन्हा भेटून त्यांच्या वतीने सर्व राजे लोकांनी सरदार पटेलांना भेटण्याचे ठरले. मुंबईत ताज हॉटेलमध्ये सर्व जय्यत व्यवस्था झाली. चहा, कॉफी, दूध, फळे, फराळाचे सर्वांचे पोशाख, सर्व सर्व अगदी व्यवस्थित.

सरदार पटेलांनी फलटणचे राजे निंबाळकर यांच्याकडून सर्व काळजीपूर्वक आपण ऐकतो आहो असे उत्तम नाटक केले. दोनच शब्द अखेर बोलले, "करो, करो, देखेंगे!!"

राजे घाबरलेच!! आप्पाला म्हणाले, "संघराज्याच्या उद्‌घाटनाला सरदारांना येण्याची गळ तूच घाल. तुझे ते ऐकतीलच." आप्पा चढला हरबऱ्याच्या झाडावर!! गेला पुन्हा सरदारांच्याकडे.

सरदार हसले. म्हणाले, "आप्पा मला इतर कामाचे प्रेशर जरा जास्त आहे. माझी तब्येत बरी असेल तर मी येईन. नाहीतर धाडीन कोणातरी 'महत्त्वाच्या' पुढाऱ्याला."

हा "महत्त्वाचा" "पुढारी" म्हणजे निघाला कमलनयन बजाज!! आप्पाचा दोस्तच. पण राजकारणात, काँग्रेसच्या सर्व कारभारात निष्णात. सरदारांनी कमलनयनला हे संघराज्य होऊ देऊ नको असा कानमंत्र देऊनच त्याचे उद्‌घाटन करणेस सांगलीला पाठवला. हे सर्व राजे लोकांना अगदी अखेरच्या क्षणी, सर्वचे सर्व पूर्ण तोंडघशी पडल्यावरच लक्षात आले !!!

उद्‌घाटनाचे जोरदार, लांबलचक, जरा कंटाळवाणे भाषण कमलनयनने केले. उद्‌घाटन झाले म्हणून जाहीर केले, आणि नंतर फलटणचे राजे निंबाळकर व सांगलीचे अधिपती पटवर्धन यांना सहज म्हणाला, "हे सरदारांच्या मनाविरुद्ध आहे"!!

झाले ! चोवीस तासांत संघराज्य खलास!!! काय पण नाटक झाले!! नाटकात काम करणारी पात्रे, प्रेक्षक, श्रोते, पडदा ओढणारे आप्पासारखे अगदी रंगून गेले होते नाटकात!!!

आता काय? प्रश्न पडला. मग महात्माजींना भेटू. कृष्णमूर्तींची भाषणे, मॉरिस, अच्युतराव, रावसाहेब यांचेबरोबर बसून ऐक, राजालाही कृष्णमूर्तींना भेटव, वगैरे मनःशांतीचे प्रयोग सुरू झाले. औंध ग्रामराज्ये चालूच होती (१९४६). रेशनिग, लायसेन्स, साखर-पत्रा-तेल वाटप तालुका समित्या करीत होत्या. कोठेकोठे 'काळा' बाजारही डोके वर काढीत होता. पण अजून सर्वच्या सर्व सर्रास पैसासत्तेच्या मागे लागले नव्हते. राजाचे ५० वर्षांचे संस्कार, महात्माजींची तपश्चर्या, आण्णासाहेब सहस्रबुद्धे, शंकरराव देव, तात्या शिखरे यांची सतत शिकवण, शंकरभाऊ किर्लोस्कर, रामाप्पा बिदरी यांच्यासारखे चोख व कार्यक्षम कार्यकर्ते व कुंडलकर, केळकर यांच्यासारखे अधिकारी यामुळे ग्रामराज्याचा तोल गेला नाही. सर्व सुरळीत चालले आहे असेच भासे.

राजाही म्हणे, "बरे झाले ही संघराज्याची कटकट गेली. आपले औंध व अंबाबाईच आम्हाला बरी"!!

लोकही म्हणत, “बाहेर काहीही झाले तरी औंधची ग्रामराज्ये टिकली पाहिजेत.” टिकणार का? आप्पाला प्रश्नच होता. मॉरिसशी तो बोले. जोपर्यंत सत्ता-संपत्ती उपभोगांचा पूर आला नव्हता तोपर्यंत संयम-शिस्त-मर्यादा टिकू शकते. मिळत नाही त्याचा त्याग, त्याबद्दल अनासक्ती, अगदी सोपी!!

पण ब्रिटिश सत्ता सोडणार, संपत्तीचे-अधिकाराचे, वैभवाचे-उपभोगांचे आता मालक स्वतंत्र हिंदुस्थान. मोठा मान मिळणार जगात. हिंदुस्थानची कीर्ती जगभर पसरण्यास हातभार लावलाच पाहिजे. ग्रामराज्यात काय आहे? वैभव, पराक्रम, महत्त्वाकांक्षा, जगात मोठा मान हवा. ग्रामराज्येही असू देत, पण अखंड स्वतंत्र, सामर्थ्यवान हिंदुस्थान, भारत आधी, सुभाषचंद्र बोस, टिळक, जवाहरलालानी हेच पुकारले. भगतसिंगाचा त्याच कशाकरता... वगैरे.

प्रश्न - खरोखरच सत्त्वगुण, आकर्षक आहे का? समता, संतोष, सर्वोदय, शांती, प्रेम, अहिंसा, मैत्री ही मानवी मनाला जादा आकर्षक वाटतात का, पराक्रम, सत्ता, “उंचा रहे हमारा झेंडा, सबसे अच्छा,” क्रांती, संपन्नता, उपभोग, मान, आदर, पुढारीपण? रजोगुण, आकर्षक का सत्त्वगुण? सत्त्वगुणाची शिस्त, संयम, अहंकार, त्याग, अनासक्ती, सर्वांवर सारखे प्रेम, सर्वधर्मसहिष्णुता, सर्वोदय, फार खटपटीचे, कष्टसाध्य, सारखे रोजच्या रोज झटायला हवे, एक मिनिट विश्रांती नाही!!! रजोगुणाची वाट सोपी. घोषणा देणे! पुढारी, नेता, माता, राष्ट्रपती निवडणे!! निवडणुकीचे वेळी मतामतांना, “मोजून” मिळतातच!!! मग सर्व नेता करतो. पुढाऱ्यावर, अधिकाऱ्यावर सर्व भार. व्यक्तीला झोपी जायला, आळस करायला, उपभोगामागे धावायला मोकळीक!!! थोडी लाचारी, जादा भय व जास्तीत जास्त आळस!!!

निद्रा आलस्य प्रमादोत्थम् ! म्हणजे तमोगुणच. राजस गुणाचा पराक्रम नाही, धैर्य नाही, कर्तबगारी नाहीच नाही, मग पुनश्च सरंजामशाहीच नाही का? आज १९८४ साली आजूबाजूला काय दिसते आहे? आहे का चित्र हुबेहूब पराक्रमी, कर्तव्य, कर्मपरायण ध्येयवादी, लोकशाहीच्या समाजाचे?

म्हाताऱ्या गांधींनी सांगितले, “सत्ता केंद्रित करू नका, विकेंद्रित, स्वकर्मरत, सेवाभावी, सर्वोदयी, ग्रामराज्ये करा. त्यातूनच खरी लोकशाही निर्माण होईल, समाधान होईल, सुसंस्कृतता येईल.” पण ! मानवी मनाला खरे म्हणजे चैतन्य हवे, उपभोग स्पर्धा हवी, उंचनीच हवाच, कारण मग उंचीच्याला अहंकाराचा आनंद मिळतोना? सर्वोदयी “आश्रमी” समाजात समाधान आनंद मानण्यास शेकडो दोन टक्केसुद्धा तयार नसतील. स्पर्धेमुळे संघर्षामुळे, युद्धामुळे, संहारामुळे, वैतागलेले, दुःखी, कष्टी, गरीब झालेले “आश्रमाचा” आश्रय काही काळ विश्रांतीकरिता म्हणून घेतील कदाचित!! कदाचित, थोडी आश्रमी जीवनाची कल्पना येणारी छोटी छोटी बेटे इतस्ततः निर्माण होतील, लय पावतील. पण सर्वसाधारण मानवी समाजाची व्यवस्था, सर्वत्र आश्रमी, ग्रामराज्ये रामराज्याचे धर्तीवर स्थापून समाजातील सर्व तमो-रजोगुण सात्त्विक ज्ञान-कर्माचे मार्फत नाहीसे करण्याचे स्वप्नच राहणार का?

आप्पा या काळात महात्माजींना अनेकदा भेटला. वर्धा, दिल्ली, मुंबई, पाचगणी, पुणे या वेगवेगळ्या परिसरात. तुरुंगातून सुटून आल्यावर पहिली भेट झाली होती पाचगणीला. बरोबर काका कालेलकर, शंकरराव देव होते. महात्माजींना १९४२ ते ४५ च्या काळात हिंसक चळवळीशी आप्पाचा आलेला संबंध माहीत होताच. पहिला प्रश्न विचारला, “आप्पा तुम भी इसमें थे !!!” काय बोलणार आप्पा !! डोळ्यापुढून त्या थरारक, अच्युतराव, जयप्रकाश, नरेंद्र देव, लोहिया, एस. एम. जोशी, अरुणाबाई, नाना पाटील, यांच्या भेटी, ते बाबूराव पाठक, निळूभाऊ वगैरेंनी कॅपिटाल सिनेमात टाकण्याचे केलेले बॉंब, वगैरे सर्व

आठवले. कुंडलच्या 'प्रतिसरकारने' पाडलेल्या आगगाड्या, लुटलेल्या तिजोऱ्या, जमलेले हजारो रुपये व नंतर त्या रुपयांकरता झालेली भांडणे, सर्वच्या सर्व एकदम आठवले!!!

बापूजी म्हणताच, "अरे, ग्रामराज्ये व्यवस्थित पूर्ण स्वावलंबनाने चालवून औंध ब्रिटिशांचे पासून स्वतंत्रच आहे हे का दाखवून देण्याचे तू सोडून या भलत्याच फंदात पडलास? हा तुझा धर्म नव्हे.

"हो, मी समजू शकतो की तुझी बिचाऱ्याची स्थिती गाडी वेगाने उतरणीवर लागली आहे व गाडीचे ब्रेकच लागत नाहीत, वेग तर वाढतो आहे, आणि तुला त्यातून बाहेर उडी तर टाकता येत नाही अशीच झाली असणार!!!"

त्यानंतर वारंवार गांधीजींना आप्पाला बजावून सांगितले की, हिंदुस्थान जरी स्वतंत्र झाला तरी औंधच्या स्वावलंबी-स्वतंत्र ग्रामराज्यांना काय धोका आहे? ती तशीच टिकू शकतात व सर्वोदयी समाज निर्माण करणेच्या नितांत प्रयत्नांना आनंदाने राहू शकतात. पण विधिलिखित काय होते?

१५ ऑगस्ट १९४७ मोठ्या प्रेमाने, आदराने, श्रद्धेने राजा भवानरावाने साजरा केला. गावातील अंबाबाईचे देवळासमोरची ४५० वर्षांची जुनी, भव्य, सुंदर, उंच दीपमाळ विजेच्या दिव्यांनी सुशोभित केली होती. बरोबर रात्री बारा वाजता राजाने बटन दाबून आपल्या स्फूर्तिदेवतेची अंबाबाईची ही दीपमाळ प्रज्वलित केली. लोकांनी प्रचंड टाळ्यांसह व घोषणाच्या निनादाने आपला आनंद अभिमान व्यक्त केला. गगनातूनही त्याला प्रतिसाद मिळाला. याच वेळी जोरदार विजांचा कडकडाट होऊन मुसळधार पाऊस कोसळला. शकुन झाला? का अपशकुन? जुने सर्व धुऊन गेले. वाहून गेले. काळाच्या जबड्यात गडप झाले. हे मात्र खरे! काही दिवसांनीच कोल्हापूरचे नवे स्वतंत्र हिंद सरकारचे ए. जी. जी. नंजाप्पा (आय. सी. एस.) औंधला आले व जैसे थे (स्टॅन्डस्टील) करारावर सह्या झाल्या. अजून विलीनीकरणाची भाषा बोलली जात नव्हती. औंधच्या लोकांना वाटत होते की, जैसे थे, म्हणजे ग्रामराज्य पुढे चालूच. स्वप्नात होती ती. आप्पाला मात्र पूर्ण कल्पना आली होती. मुंबई सरकार पुन्हा काँग्रेसचे हातात येणार. औंधच्या नव्या राज्यघटनेचे उद्‌घाटन करणारे बाळासाहेब खेरच पंतप्रधान होणार, हे ठरलं होतं. आप्पा गेला भेटायला. वाटले प्रेमाने बोलतील. जुन्या आठवणी काढतील. विचारतील राजाबाबत, पण बाळासाहेब रागाने लालाबुंद झाले होते. आप्पावर एकदम कडाडले व कुंडलच्या ह्या सर्व खुनी, दरोडेखोर, चोर लोकांना सांभाळले, त्यांना मोठे केले!! कसला खेळ खेळत होता!! काँग्रेसला, देशाला, शरम वाटेल असे हिंसक वर्तन!!!

तुरुंगात कोंडले पाहिजे सर्वांना, वगैरे झाले. आप्पा चूपच बसला!! काय बोलणार? मुंबई-गुजरातचे मुख्यमंत्री होणार ना? मोरारजीभाईंनी तर बाळासाहेबांच्यावर कडी केली!! त्यांचा तो 'स्पष्टवक्तेपणाचा' स्वभाव होता ना? हा सर्व अहिंसेचा, आपल्या स्वतःच्या चारित्र्याचा अभिमान होता की खरोखरच १९४२ च्या चलेजाव चळवळीत पडलेले सर्वच्या सर्व फक्त स्वार्थाकरता, प्राप्तीकरताच त्यात झिजले होते? अच्युतराव, जयप्रकाश, अरुणाबाई, लोहिया, चोर डाकू? नाना पाटलांनी काहीच त्याग केला नाही? रात्री बेरात्री फिरणारे रत्नाप्पा, धन्वंतरी कासेगावकर वैद्य, आबा किसन वीर सर्वच नालायक ? किसन वीर, कासेगावकर, रत्नाप्पा यांना आता पुढे काय हा प्रश्नच पडला. 'तुरुंगी' काँग्रेस राज्यावर बसू लागले. मग सुरुंगी १९४२ वाले आता सतत जंगलातच राहणार का? मानखंडना, वनवास हीच त्यांनी जे काय केले त्याचे चीज करण्याची पद्धती का?

अनुक्रमणिका

नाथा लाड, आप्पा मास्तर, किसन वीर, अच्युतरावांना भेटले. तेही अज्ञातवासातच होते. बोलणी झाली की आप्पांनी जाऊन जवाहरलालना बोलावे. ते नुकतेच तुरुंगातून बाहेर पडले होते.

आप्पा त्यांना भेटला, बोलला, म्हणाला या लोकांच्याशी तुम्ही बोला. ते फार निराश झाले आहेत. कॉँग्रेसपैकी कोणी त्यांना थारा देणारे नाहीत. नुसते त्यांना भेटलात तरी त्यांना बरे वाटेल. जवाहरलाल ताबडतोब म्हणाले, “जरूर भेटेन, बोलेन, त्यांच्या त्यागाला महत्त्व आहे. कॉँग्रेसच्या ध्येयाला सोडून त्यांनी काही केले हे म्हणणे चुकीचे आहे. कॉँग्रेसचे ध्येय स्वराज्यप्राप्ती आहे. महात्माजींनी एक मार्ग अहिंसेचा, सत्याग्रहाचा सुचविला. त्यांना पकडल्यानंतर जयप्रकाश, अच्युतराव, अरुणा यांनी त्यांच्या मार्गाने स्वातंत्र्यप्राप्तीकरता जे प्रयत्न केले ते इतिहासात नमूद केलेच पाहिजेत. त्यांना भेटण्याची तू सर्व व्यवस्था कर. ते अजून अंडरग्राऊंड आहेत ना? मग तू मला ‘गुप्त’ रीतीने कसा नेणार त्यांना भेटायला? माझ्या मागे अजून सी. आय. डी. आहेत. त्यांचे कसे?” आप्पा म्हणाला, “करतो व्यवस्था!!!” काय करणार? अच्युतरावांनी यादी केली. त्यात तीनशे, साडेतीनशे लोकांना जमा करावे लागणार असे दिसू लागले. इतक्या मोठ्या जमावाला मुंबई शहरात ‘गुप्त’ रीतीने जवाहरलाल, ज्यांच्या मागे अजून सी. आय. डी. आहेत, ते कसे भेटणार?

नेहमीप्रमाणे अच्युतरावांनी सर्व व्यवस्था ठरविली. ताडदेवला एका फिल्म कंपनीच्या मोठ्या स्टुडिओत भेटण्याचे ठरले. रात्री १०॥ वाजता, अच्युतराव स्वतः सर्वांची ओळख करून देणार.

पण गुप्तता कशी ठेवायची? आप्पा म्हणाला, “आक्का बांद्र्याला राहते. तिच्याकडे पंडितजींना जेवायला म्हणून नेऊ. तेथून गाडी बदलून (!!!) त्यांना मी आणीन.”

बिचारी आक्का व कमलकांत महाराज!! जवाहरलाल एकदम जेवायला येणार? टेबल खुर्च्यांपासून तयारी!!! घरात फक्त सतरंज्याच होत्या. शिवाय आक्काचा शिवण व हस्तोद्योगाच्या क्लासची २५-३० शिवण्याची यंत्रे मुख्य हॉलमध्येच!!! मग काय धावपळच धावपळ. गडबडीने १०० रु. चा एक गालिचा विकत घेतला!! गालिचा विकत घेण्यास वर्गणीच करावी लागली!!!

पंडितजी हा सर्व तमाशा पाहून हसलेच असतील. अगदी गुप्त रीतीने पंडितजी आले!! जेवले. अगदी सगळे घरगुती. फक्त मृदुला साराभाई बरोबर. दुसरे कोणी नाही. गुप्तता राखायची ना?

ताडदेवचा तो फिल्मी हॉल गच्च भरला होता. पंडितजी आल्यावर जवाहरलालजी की जय, अगदी मोठ्यांदा (गुप्तरीतीने) झाली!!!

पंडितजींनी सर्वांचे शांतपणे ऐकून घेतले. उत्तम भाषण केले. अगदी सोप्या भाषेत हिंदीत. ‘कराडी स्वातंत्र्यवीराला’ सुद्धा समजावे!

पंडितजींनी सर्वांच्या त्यागाबद्दल जरूर त्या प्रमाणात उदोउदो केली. जगातील क्रांत्याबद्दल बोलले. शेवटी “आप लोगोंको स्वतंत्र हिंदुस्थान नहीं भूलेगा” म्हणाले. जयहिंद, वंदे मारतम् होऊन खेळ खलास!!

कमलाकांताचे पोलिसमधील जुने औंधपासूनचे दोस्त डी. ए. पी. वाणी दुसरे दिवशी म्हणाले की पोलिसांना, ब्रिटिशांना, हे सर्व माहीत आहे!!! या ताडदेवमधील फिल्मी हॉलमध्ये भरलेल्या मेळाव्यापैकी पुढे (१९५७ नंतर) कितींना मानपत्रे, ताम्रपट मिळाले? मानपत्राकरिता, ताम्रपटाकरिताच भारून काम केले होते का? स्वार्थत्याग, स्वधर्माचरण आणि मानपत्र, जाहिरातबाजी, ताम्रपट, खुर्च्या, यांचा काय संबंध' स्वार्थत्यागी, स्वधर्माचरणी खुर्च्याकरता इतका हपापलेला असू शकतो का?

आता तर 'स्वातंत्र्यवीरांची' पेवेच फुटली आहेत. जो तो स्वातंत्र्यवीरच!!! तनखा मिळतोना? भीक मागणेची प्रवृत्ती. लाचारी, भित्रेपणा, स्वातंत्र्यानंतर संपलाच नाही. खरे कारण याचे म्हणजे 'स्वतंत्र' आम्ही नाहीच. पूर्णपणे 'नेता-पुढारी-तंत्री'. महाराजे गेले, काकासाहेब, मामासाहेब, भाऊसाहेब आले, सरंजामशाही कायमच.

१९४७ नोव्हेंबरच्या अखेरीस आप्पा गेला दिल्लीला. सोबत राजा रामेश्वरराव होतेच. स्वतः त्यागी, सुज्ञ, पराक्रमी. १९४२ मध्ये अच्युतराव, जयप्रकाश, अरुणाबाई, युसफ मेहरअल्ली यांच्याबरोबर आपल्या जिवाची-राज्याची (हैदराबाद संस्थानात) पर्वा न करता संकटात स्वातंत्र्यप्रेमी म्हणूनच उडी टाकलेली. आप्पाचे आणि राजा रामेश्वरराव यांचे अगदी भावा-भावासारखे जमलेले. त्या दिवशी दोघे महात्माजींच्या पुढे बसले. महात्माजी अत्यंत खिन्न व अशक्त दिसत होते. आवाज अगदी जवळ जवळ ऐकूच येत नव्हता. औंधबद्दल आप्पाने प्रश्न केला. जैसे थे करारावर सह्या झाल्या होत्या. आता विलीनीकरणासंबंधी कागद येणार. औंधने काय करावे?

अगदी जवळ जाऊन आप्पा व रामेश्वर ऐकू लागले. महात्मा पुटपुटले, "औंधच्या जनतेला हवे असेल तर प्रत्येक ग्रामराज्य स्वातंत्र्याने, मानाने जगू शकेल. हिंदुस्थान जरी स्वतंत्र झाला तरी ग्रामराज्ये जोपर्यंत सर्वत्र निर्माण झाली नाहीत तोपर्यंत औंधने आपली ग्रामराज्ये चालूच ठेवावीत. आजूबाजूला सर्व ग्रामराज्ये होऊन सत्ता विकेंद्रित पूर्णपणे झाली म्हणजे इतर ग्रामराज्यांशी सहकार सोपा होईल."

महात्मा पुढे म्हणाले, "मला पुढे भयंकर काल दिसतो आहे. सर्व सत्तेकरता पळताहेत. औंधने आपला प्रयोग चालूच ठेवावा."

रामेश्वर हैदराबादेस परतला. आप्पा औंधला. बाबूराव लाड, रस्तुमराव देशमुख, रामाप्पा बिदरी सर्व लोकांचे प्रतिनिधी विलीनीकरणाच्या विरुद्ध. बापूही म्हणे "औंध आहे तसे चालवू." राजा मात्र गप्प होता.

जानेवारी १९४८!! आप्पा मूळपीठाला गेला होता. बरोबर बाबूराव बापट होताच. तो, खालून कोणी पळत वर आला व म्हणाला महात्माजींचा आत्ताच (६-३०) खून झाला!!!

सभा झाली. रात्री झोप नाही. आता काय? औंध ग्रामराज्याची स्फूर्तिदेवताच नाहीशी झाली!!

नवे ए. जी. जी....आप्पा पुन्हा आले औंधला. या वेळी विलीनीकरणाच्या कागदावर सह्या करण्याकरता ते आले होते. राजा आप्पाला म्हणाला, "काय करायचे?" आप्पा गप्पच बसला. काही सुचत नव्हते. स्वतंत्र हिंदुस्थान, जगातील सर्व राष्ट्रांत मानमान्यता, नवे मंत्रिमंडळ, वगैरे काहीही आप्पाच्या मनात नव्हते. फक्त एकच. हे नाटक आता संपले, पडदा पडला!!!

अनुक्रमणिका

बापू रडायला लागला. म्हणाला, “काका, एक दोन महिने थांबले तर नाही का चालणार?”

बिचारा !!! सारे आयुष्य राजा होणार, राजा होणार, म्हणून घोकत आला होता. आता भवानराव औंधचा अखेरचा राजा. ३१५ वर्षांचे औंध, काळाच्या जबड्यात गडप!

राजाने रामाप्पांना बोलावले. बापूही होताच. नंजाप्पाही आले. म्हणाले, “आता सही झाली तर पुष्कळच सवलती मिळतील. राजा किताब राहील. खाजगी मिळकत राहीलच. -सर्व कुटुंबियांच्या करता. शिवाय आपली प्रीव्ही पर्स, ही हिंदुस्थान सरकार कायम चालूच ठेवणार. थांबाल तर पुढे कोणत्या सवलती मिळतील कोण जाणे?”

राजाने कागद वाचला. हिंदुस्थान सरकारने राजेरजवाड्यांचा मान-मरातब राखण्याची हमी वाचली. बाकीची सर्व कलमे नीट वाचली. समोर वडिलांची, श्रीनिवासराव महाराजांची तसबीर होती. तिच्याकडे थोडी टक लावली व म्हणाला-

“जगदंबे, सांभाळ आता या सर्व लेकरांना. ३१५ वर्षं प्रतिनिधींनी या प्रजेला सांभाळून तुझीच सेवा केली. उदयोस्तु!!”

सही झाली. बापूला रडू आवरेना. राजा उठला व संध्याकाळच्या संध्येला निघून गेला.

दुसरे दिवसापासून सूर्यनमस्कार, देवी दर्शन, वाचन, कीर्तन, चित्रे वगैरे नेहमीचे कार्यक्रम त्याच प्रसन्न प्रेमळ मुद्रेने चालूच.

असा एक होता राजा!!!

अनुक्रमणिका

# ७ शेवटी

इतिहासाच्या प्रवाहाला कधी शेवट असतो? का सुरुवात?

हा नित्य-नूतन ओघ सारखा चालूच आहे.

औंध संपते न संपते तो कॉन्स्टिट्यूशन असेंब्लीच्या निवडणुका आल्या. दक्षिणी संस्थानातर्फे एक निवडायचा होता.

आप्पा मोकळाच होता. तात्या शिखरे, कुंडलकर, बाबूराव बापट, रामाप्पा, म्हणाले तू उभा राहा. राहिला उभा!!! आधी राजाला विचारले. राजाची स्टेशन वॅगन घेऊन १९ संस्थाने तात्या शिखरे, सांब दर्शने, बाबूराव बापट यांना बरोबर घेऊन हिंडला. लोकांच्या सभा, राजे लोकांची जेवणे, सर्व धडपड झाली. अर्ज करताना काही कारकुनी चूक राहिली म्हणून कोर्टातही गेला. केस बुधगावकर राजेसाहेबांचे पुढे चालली. आण्णासाहेब बखले, नानासाहेब जोशी, जाडजूड पुस्तकांनिशी गेले. बुधगावला राजेसाहेबांनी निकाल आप्पा सारखा दिला. राहिला उभा. कॉन्स्टिट्युअन्ट असेंब्ली करता. फक्त एकाच मताने त्याचा पराभव झाला!!! कर्नाटक संस्थानांनी एकजूट सर्व मते मुनावल्लीला दिली होती.

झाला आप्पा खट्टू, औंध संपले! संघराज्य नाही!! कॉन्स्टिट्युअन्ट असेंब्ली नाही. मग काय?

राजा म्हणाला, "जाऊ दे कटकट. अंबाबाई तुझ्या पाठीशी आहे."

पुन्हा मॉरिस, कृष्णमूर्ती, रावसाहेब, अच्युतराव पटवर्धन यांच्या भेटी. आप्पा अगदीच नाउमेद झाला होता. नलिनीने सावरण्याचा खूप प्रयत्न केला.

अर्थात छोटी चार वर्षांची आदिती होती व एक वर्षाचा अनिकेतही होता.

नलिनीने तिच्या पुण्याला बांधलेल्या नवीन घरात दवाखाना सुरू केला होता. ती ससून हॉस्पिटलमध्ये ऑनररी सर्जन व प्रोफेसर म्हणून कामही करू लागली होती.

पण! मनात शांती नव्हती. एक 'पिता' महात्मा गेला. इहलोक सोडून. दुसरा राजेपण गमावल्यामुळे असमर्थ झाला. पिता, समर्थ, आदर्श, हीरो, असला तरच 'पिता' म्हणून उपयोगी पडतो. म्हातारा, केविलपणा झाला म्हणजे तो पिता नसतो, नुसताच म्हातारा!!

राजा अजूनही आपल्या अतीव आनंदात मग्न होता. विलिनीकरणाच्या कागदावर सह्या झाल्यावर सर्व औंध संस्थानात पूर्वीच्याच दिमाखाने, खंबीर मनाने हिंडला. सर्वांना भेटला, म्हणाला, "आता तुम्ही स्वतंत्र हिंदुस्थानात गेलात. आता तुमची जबाबदारी वाढली. आता सेवा करण्यास तुम्हाला मोठे क्षेत्र निर्माण झाले. शीलाने, संयमाने वागा, कर्तव्यकर्म दक्षतेने करा. जीवन इतरांना सुखी, समृद्ध करण्यात घालवा. औंधची ही आपली परंपरा ३१५ वर्षांची आहे. जगदंबा तुम्हाला उत्तम बुद्धी देवो!!"

अनुक्रमणिका

राजा नेहमीप्रमाणे शांत मुद्रेने, प्रसन्न वदनाने, जरी ७८ वर्षांचा झाला होता, तरी खणखणीत आवाजात ४-२ हजार लोकांच्या पुढे तासभर उभा राहून बोले. गर्व-अहंकार नव्हता. नुसते प्रेम-माझे औंध, "माझी ही लेकरे यांचे कल्याण व्हावे!!" ही लेकरे. राजा बोलत असताना डोळे टिपीत असे. राजालाही गहिवरून येई. आप्पा मात्र या सर्व समारंभास गैरहजर राहिला. हो, एकदम रडू कोसळायचे!!

पुण्याच्या नलिनीच्या घरात एक दिवस आप्पा अदिती-अनिकेतशी खेळत होता. मनात विचार चालूच होते. इतक्यात रावसाहेब पटवर्धन आले. नेहमीच येत. बोलत. थट्टा करीत. सल्ला देत. म्हणाले, "उद्या मुंबईला जायचे. पंडित नेहरूंनी तुला भेटायला बोलावले आहे!!!"

आप्पा तोंड वासून नुसता पाहातच राहिला. रावसाहेबांनी त्यांच्या अलोट प्रेमाला अनुसरून आप्पाबद्दल पंडित जवाहरलालना लिहिले होते, सभेत समक्ष बोललेही होते. आप्पाचे काय करणार आहात? म्हणून विचारले होते. आप्पाला हे काहीच माहिती नव्हते.

गेला. बिचारा रावसाहेबांच्याबरोबर मुंबईला. राजभवनात गेला. आधी सर महाराजसिंग, गव्हर्नर, यांची भेट. मग नेहरू आले. रावसाहेबांनी एकदम मुख्य प्रश्नच विचारला. पंडितजी म्हणाले, "हो, मी विचार केला आहे. आप्पा, आफ्रिकेत जा. तिथे पुष्कळ काम आहे. पहिल्यांदा पूर्व आफ्रिकेत कृष्णवर्णीय लोकांच्याशी आपले मैत्रीचे संबंध जोडावयाचे आहेत. भविष्य काळात वर्गयुद्धाबरोबर 'वर्ण' युद्ध संभवते. ते आपल्याला काहीही करून थांबविले पाहिजे. जा, मैत्री निर्माण कर. सर्व हिंदी वसाहतवाल्यांना सांगा की त्यांचे कर्तव्य आफ्रिकी जनतेला मानाने स्वातंत्र्य उपभोगण्यास त्यांनी मदत करण्याची, जा. हे काही जमेलच नाही तर निदान ४-२ सिंहांची शिकार तरी कर!!!"

परत पुण्याच्या गाडीत आप्पा बसला. तो स्वप्नातच. वर्णयुद्ध, स्वातंत्र्य, गुलामगिरीतून मुक्तता!!!

आठवले, महात्माजींचे पुस्तक, 'सत्याचे प्रयोग'. जवळ जवळ पाठच केले होते त्याने. एकदम स्वप्न, "गांधींच्या अहिंसक चळवळीने आफ्रिका खंड स्वतंत्र होतो!!!" वगैरे.

रावसाहेब आप्पाची टिंगल करीत होते. "किती लवकर भारावून जातो हा आमचा आप्पा." म्हणाले. नलिनीला तर काळजीच पडली. आधीच वाकड्या तिकड्या उड्या मारण्याची सवय. आता तर काय हिंदुस्थानचा राजदूत, म्हणून जाणार!!! तिने पंडितजींना तात्या इनामदारांना आप्पाबरोबर तीन वर्षे तरी त्याला 'सांभाळून' घेण्याकरता त्याचा सेक्रेटरी म्हणून पाठवावे असे सुचविले!!! आप्पाला हे माहित नव्हते असे नाही. पण तात्यांच्याबद्दल प्रेमदरामुळे त्याला या 'कंट्रोलरांचा' उपयोगच झाला.

राजाला आप्पा म्हणाला, "बाबा, मला पंडित जवाहरलाल आफ्रिकेला स्वतंत्र हिंदुस्थानचा पहिला राजदूत म्हणून पाठवताहेत, जाऊ?"

राजाला काय वाटले असेल? ३६ वर्षे आप्पाला त्याची स्वतःची आई नसताना वाढविला. वाटले, म्हातारपणी आप्पा सांभाळेल आपल्याला. आता तर हा निघाला परदेशी.

अनुक्रमणिका

पण आतून काय वाटले ते कधीही कुणालाही सांगायचे नाही. दुसऱ्याला दाखवायचेही नाही. आप्पाला म्हणाला, "माझे फार दिवसांचे स्वप्न तू पुरे करणार!! मला स्वतंत्र हिंदुस्थानचा प्रतिनिधी व्हायचे होते. बद्रिकेदारला यात्रेला गेलो असताना शिवाच्या भव्य पिंडीला आलिंगन देत असताना मी मागितले होते, हिंदुस्थानचे स्वातंत्र्य; सर्व हिंदुस्थानचा प्रतिनिधी होऊन सेवा करण्याची संधी आता तुला मिळते आहे. जा, जगदंबा तुझ्या पाठीमागे आहे!! माझा आशिर्वाद आहे!!! जा. राणीसाहेब (आप्पाची हल्लीची आई) माझी काळजी उत्तम घेतात. नलिनीला, मुलांना घेऊन जा. आनंदात राष्ट्रसेवा कर. जा."

१९४८ ऑगस्टला आप्पा आफ्रिकेत पोचला व १९४९ च्या अखेरीस राजा, राणी, सहा महिने राहण्यास आला नायरोबीला. हिंदुस्थानचे राजदूताचे वडील म्हणून आफ्रिकन-हिंदी-पाकिस्तानी सर्वांनी त्याला मान दिला. आप्पा बरोबर सर्व पूर्व आफ्रिका, कांगोचा काही भाग राजा फिरला. त्याला खूप खूप आनंद झाला.

आफ्रिकनांनी तर त्याला जवळ जवळ डोक्यावरच घेतले!! ज्योमो केनयाटा, पीटर कोईनांगे, पीटरचे वडील सीनियर चीफ कोईनांगे, यांनी राजाचे वारंवार स्वागत केले.

सीनियर चीफ कोईनांगे वयोवृद्ध, ज्ञानवृद्धा होता तसाच ब्रिटिशांचे अंमलाविरुद्ध कट्टर लढा देणारा होता. फार मोठा माणूस सिनीयर कोईनांगे. त्याला टांझानिया, युगांडा, केनियावरील सर्व आफ्रिकन फार मानीत. ब्रिटिशही त्याला भिऊनच असत.

राजाकरता सीनिअर चीफ कोआनांगेनी मोठी पार्टी केली होती. ३६ वेगवेगळ्या जमातींच्या आफ्रिकी पुढाऱ्यांना राजाबरोबर चहा वगैरे दिला. मोठा मान केला. या म्हाताऱ्या राजाचा व छोट्या औंधचा.

१९५० सालाचे मध्याला (जून) राजा हिंदुस्थानात परतला. १९५१ मार्चमध्ये आप्पाला आक्काचा टेलिफोन व तार : "बाबांना बरे नाही. ताबडतोब यावे!!"

१९५१ मार्च ते १९५१ एप्रिल १३ पर्यंत आप्पा सारखा राजाभोवती होता. देह थकत होता. आप्पाची आई सारखी काळजी करीत होती. आप्पा काय बोलणार?

एक दिवस राजा आप्पाला म्हणाला, "अनिकेतला एकदा पाहायचे आहे. घेऊन ये." अनिकेत असेल ४॥ वर्षांचा. राजाचा त्याला थोडाबहुत लळा आफ्रिकेत असताना लागला होता.

त्या दिवशी अनिकेतला राजापुढे उभा केला. राजाने दोन मिनिटे अगदी त्राटक केल्यासारखी आपली दृष्टी अनिकेतवर दृढ केली. आश्चर्य की अनिकेतनेही राजाकडे डोळे न मिचकावता परत त्राटक केले !! बरोबर दोन मिनिटांनी राजाने मोठा सुस्कारा टाकला. म्हणाला "जय जगदंबा !!!"

१३ एप्रिल १९५१ ला सकाळी ९॥ वाजता राजाने देह सोडला.

व्यंकू ओगलेच्या गाडीतून देहाला औंधला आणले. उतारवयात अत्यंत भाविकतेने जिने राजाची अखंड सेवा केली ती आप्पाची आई राजाचे डोके मांडीवर घेऊन स्वस्थ गाडीत बसली होती. बापू गाडी चालवित होता.

अनुक्रमणिका

पुण्याला पंतांच्या गोटात, लक्ष्मणराव किर्लोस्कर देहाचे अखेरचे दर्शनास आले.

१४ एप्रिलला सकाळी सूर्योदयाबरोबर आप्पाने राजाच्या देहाला अग्नी दिला. जागा होती राजानेच बांधलेल्या त्या अत्युत्कृष्ट म्युझियमचे आवाराची. मुख्य मंत्री बाळासाहेबांनी (खेर) म्युझिअमचे हद्दीतच अंत्यसंस्कार व समाधी बांधण्यास मान्यता दिली होती. अंत्यसंस्काराकरता सर्व जमले होतेच. पोपट, पंडित लखू, बाबू, व्यंकू, बाळा महाराज, दादा महाराज, भाऊ महाराज, सातारचे कलेक्टरही हजर होते. मुंबई सरकारकडून बंदुकधाऱ्या पोलीसांनी अखेर सलामी व ब्यूगल झाला. पण नंतर केव्हाही आप्पाला बाबा गेले, असे कधीच भासले नाही!!! ४० दिवस आप्पाने उपवास केला. प्रायश्चित्त म्हणून? आत्मशुद्धीकरता? का पितृभक्तीचे प्रदर्शनार्थ? कोण जाणे, पण ४० दिवस उपवास केला खरा.

आप्पाचे घरटेच काळाचे झंझावाताने उडवून लावले. आप्पाची छोटी नाव नलिनी, अदिती व अनिकेतना घेऊन जगाच्या प्रवासास निघाली. औंध, कायमचे संपले!!

या जगातल्या प्रवासात सुकाणू राखण्यास व इंजिन वारंवार बंद करण्यास नलिनी नसती तर हे आप्पाचे तारू कोठे भरकटले असते कोण जाणे!!!

आफ्रिकेला परतल्यावर एक दिवस पीटर कोईनांगे भेटीला आला. म्हणाला, “माझ्या वडिलांनी, सिनीयर चीफ कोईनांगे यांनी, तुला तुझ्या सर्व कुटुंबाला घेऊन इष्टमित्रांबरोबर चहाला बोलावले आहे.” नेहमीच्या “औंधी” पद्धती प्रमाणे गेला घेऊन बरोबर २०-२५ हिंदी मित्र. सीनिअर चीफ कोईनांगेच्या मळ्यात प्रवेश करतो ते १००-२०० आफ्रिकन आपले पूर्वापारीचे वेश घालून तिथे उभे होते. आप्पाला वाटले आपले काही चुकले की काय? दिवस चुकला असावा चहापार्टीच्या निमंत्रणाचा!!

सीनियर चीफ कोईनांगे स्वागताला पुढे आले आणि किक्यू भाषेत म्हणाले,

“ये. घरात ये. आज मी तुझे स्वागत हिंदुस्थानचा राजदूत म्हणून करीत नाही. एक हिंदी म्हणूनही नाही. या इथे जमलेल्या सर्व पुढाऱ्यांच्या साक्षीने मी जाहीर करतो की आप्पा व त्याच्या कुटुंबाचे मी स्वागत आप्पा माझा मुलगा म्हणून करतो. माझ्या कुटुंबियांना मी हुकूम करतो की आप्पाला त्याचा वाटा तो मागील तेव्हा त्यांनी द्यायचा,” आप्पाकडे वळून ते म्हणाले, “आप्पा, हिंदुस्थानातील तुझे वडील देवाघरी गेले. आता मी तुझा पिता” !!!

आप्पाला वाटले की सर्व औपचारिक की काय? १९६१ साली तो जेव्हा दिवंगत सीनियर चीफ कोईनांगे, त्याचे ‘दत्तक वडील’ यांचे समाधीवर पुष्पहार घालण्यास गेला तेव्हा कोईनांगे कुटुंबातील सर्व लोक हजर होते. एकमुखाने त्यांनी आप्पाचे स्वागत करताना पुकारले, “आप्पा तुझ्या वाटणीची जमीन तुला दाखवतो, चल आमच्याबरोबर”!!! “आफ्रिकन बाबांचे” स्मरणाने आप्पाला रडू आले.

इंडोनेशियात असताना (१९६२) आप्पाला एक अद्‌भुत अनुभव आला. इंडोनेशियन एक संत-सिद्ध-बापक (बाबा) रहिम यांच्याकडे आप्पा नेहमी जायचा. ध्यानाबाबत, देवाबाबत सारखे प्रश्न विचारी. असली सवयच होती त्याला जन्मापासून.

त्या वेळी आप्पा फारच कठीण परिस्थितीशी टक्कर देत होता. सुकारनो व जवाहरलालजींचे पटत नसे. त्यात एशियन गेम्सच्या वेळी जाकार्तातील राजदूताची कचेरी इंडोनेशियन प्रक्षुब्ध जमावाने लुटली होती!! दिल्लीही आप्पावर नाराज होती. त्याला हिंदुस्थानात ताबडतोब निघून येण्याचा आदेश मिळाला होता. रात्रंदिवस विश्रांती नव्हती. त्या दिवशी आप्पाने बापक रहिमचे घरी जाऊन त्यांच्या खोलीत प्रवेश केला तो बापक काही लिहीत बसलेले दिसले. आप्पाने विचारले, "बापक काय लिहिता आहा?"

बापक म्हणाले, "आप्पा, आज तू एकटा माझ्या भेटीला आला नाही आहेस! तुझ्याबरोबर एक भव्य, तेजस्वी व्यक्ती आहे. डोक्यावर काही तांबडे आहे. हातात तलवार आहे, पोशाख जुनी हिंदी आहे. सांगताहेत आप्पाच्या संरक्षणार्थ मी उभा आहे!!!" असे म्हणून अगदी हुबेहूब औंधच्या राजाचे शब्दचित्रच बापक रहीमनी आप्पांच्या पुढे उभे केले!!! त्यांनी राजाचा फोटोही पाहिला नव्हता. आप्पा दिल्लीला गेला. तिथे काका कालेलकरांची पट्टशिष्या रहेना तय्यबजी. मोठी सिद्ध होती. मुसलमान असून कृष्णभक्त. तिला आंतरज्ञानाने सर्व समजते असे मानून अनेक परराष्ट्राचे राजदूत वगैरे तिच्याकडे जात. आप्पा अगदी धाकट्या भावासारखा म्हणून तासन् तास तिच्याशी बोलत बसे.

त्या दिवशी (१९६२) रहेनाच्या खोलीत आप्पा प्रवेश करतो न करतो तो रहेना एकदम ओरडलीच, "आप्पा तुम्हारे साथ तुम्हारे पिता आये हय. अन् बोलते हय तुमारा संरक्षण करने कि लिये आये है!!!"

आप्पा पुण्याला याच दौऱ्यात दिल्लीतील काम संपवून गेला. नेहमीप्रमाणे धुंडिराज विनोदांना भेटणेस गेला. आप्पाचे हात हातात घेऊन एकदम विनोद उद्गारले. "आप्पा बाबा तुमच्याबरोबर आहेत. काळजी नसावी !!!"

आप्पाला बाबा कधीही दिसले नाहीत. पण, नाहीत असेही कधी वाटले नाही.

१९८० साली राजा रामेश्वरांना घेऊन आप्पा निसर्गदत्त महाराजांच्याकडे गेला होता. मॉरीसनेच त्यांची व आप्पाची गाठ १९७६ साली घालून दिली होती. नेहमीप्रमाणे आप्पा सारखे प्रश्न त्यांना विचारी.

त्या दिवशी आप्पा व रामेश्वर खाली बसल्याबरोबर निसर्गदत्त महाराज म्हणतात –

"कायहो आप्पासाहेब तुमचे सगळ्यात मोठे शत्रू कोणहो? तुमचे वडीलच ना!!!"

रामेश्वरही मोठा पितृभक्त समजी स्वतःला.

दोघांनाही ते महाराजांचे शब्द ऐकून धक्काच बसला. "काय म्हणता आहात काय?" आप्पा म्हणाला. महाराज म्हणतात "काय म्हणजे काय? ज्याला नाम रूप नाही त्याला प्रथम आप्पा संबोधून केवढे तुमचे नुकसान तुमच्या वडिलांनी केले!! त्यातून अजून तुम्ही दोघेही मुक्त झाला नाहीत!!!"

मुक्त कशातून होण्याचे? आसक्तीतून ना ? प्रेमातून करुणेच्या स्पंदनातून मुक्ती? आशीर्वादांचे स्पंदन अत्यंत सूक्ष्म, तेजस्वी, परिणामकारक, अनंतकाळ टिकणारे असते. बाबांचे, आशीर्वादपर निरंतरच आहेत. त्यांचे प्रेम, आनंद, भावनेत व स्मृतीत, आजतागायत आहेतच.

अनुक्रमणिका

मग गेला कोण? राजा? का, नुसता देहच. करुणा, आशीर्वाद, चालूच आहे. करुणेचा कल्याणकारी प्रवाह निरंतरच ना?

“मग असा एक होता राजा”

की

“असा आहे एक राजा!!”

आज सर्वत्र सत्ता, - संपत्ती – उपभोगलोलुपतेमुळे मानवी मनच भ्रांत व भ्रष्ट झाले आहे. मानवाचे मन भ्रांत व भ्रष्ट म्हणजे सर्व समाजात भ्रष्ट. दुःख, संघर्ष, अस्थिरता, अनिश्चितता वाढतच जाणार. जितकी सुधारणा जास्त झपाट्याने तितक्याच प्रमाणात सत्ता-संपत्ती-उपभोग लोलुपता वाढून समाज व व्यक्तींचा ऱ्हासच होणार नाही का? अशा वेळी शेवटचा प्रतिनिधी राजा भवानराव याचे पुण्य स्मरणाने कदाचित काहींच्या मनात तरी असे यावे की आजच्या या समाजाचे व्यवस्थेच्या वेगवेगळ्या पद्धतीशिवाय एक वेगळी व अगदी साधी, सोपी, सुखी पद्धती एका राजाने प्रयोगाने सिद्ध केली होती. - पन्नास वर्षांपूर्वी.

ही विकेंद्रित ग्रामराज्याची पद्धती अमलात येऊ शकेल... किती दुःख, संघर्ष, नंतर? का केव्हाच हे शक्य होणार नाही?

यासंबंधी ऊहापोह तरी करणेस हरकत नसावी.

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

# औन्ध सरकार

औन्ध संस्थानच्या

# राज्यघटनेसंबंधीचा कायदा

सन १९३९ चा १ ला

औन्ध स्टेट प्रेस

१९४७

अनुक्रमणिका

# औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा कायदा १ ला

ज्या अर्थी ता. १-११-३८ च्या जाहीरनाम्यामध्ये औंध संस्थानच्या प्रजाजनांना **संपूर्ण स्वराज्य** देण्याची आपली इच्छा असल्याबद्दल **श्रीमंत सरकार राजेसाहेब संस्थान औंध** यांनी अत्यंत उदारपणाने घोषणा केली आहे, त्या अर्थी खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे.

**१. (अ) सरनामा :** या कायद्यास “औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा १ ला कायदा” असे संबोधण्यात यावे.

**(आ) सुरुवात व व्याप्ती :** श्रीमंत राजेसाहेब जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा कलमे २० व २१ खेरीज करून अंमलात येईल.

२. औंध संस्थानच्या वेळोवेळी होणाऱ्या कायद्यांची ज्याप्रमाणे वेळोवेळी ठरविण्यात येईल, त्याप्रमाणे हा कायदा खालील गोष्टींची हमी घेत आहे. अहिंसा व सार्वजनिक नीतिमत्ता या दोन तत्त्वांस अनुसरून या कायद्याने संस्थानच्या प्रत्येक नागरिकास, व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, समितिस्वातंत्र्य, सभा व चर्चा स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. तसेच लिंग, जाती, धर्म, वर्ण अगर सांपत्तिक स्थिती यामुळे कोणासही राजकीय बाबतीत अपात्र समजले जाणार नाही. कायद्याच्या दृष्टीने औंध संस्थानच्या सर्व प्रजाजनांस पूर्ण समतेने वागविले जाईल. संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पद्धतीने चालेल. प्राथमिक शिक्षण सक्तीने सर्वांस मोफत देण्यात येईल. मतदानाचा अधिकार सर्व साक्षर प्रौढ लोकांस समान राहील. प्रत्येक कामे करू इच्छिणाऱ्या इसमास जगण्यासाठी कमीत कमी लागणारा मोबदला घेऊन काम सरकारकडून मिळविण्याचा हक्क राहील.

३. श्रीमंत राजेसाहेब यांच्याकडे सध्या औंध संस्थानच्या राज्यकारभारासंबंधी अगर तदनुषंगिक असलेले हक्क, अधिकार व सत्ता, हा कायदा अंमलात आल्यास व त्यात अगर त्यास अनुसरून ज्या योजना केल्या असतील, त्याप्रमाणेच त्यांना चालविता येतील. ज्या बाबीसंबंधी या कायद्यात उल्लेख केलेला नाही अशा बाबतीतही कायदे मंडळाचे निर्देशाप्रमाणे त्यांनी आपले अधिकार वापरण्याचे आहेत.

४. संस्थानातील प्रत्येक गाव आपल्या रहिवाशी नागरिकांपैकी ५ कायम व २ राखीव सभासदांची एक **पंचायत** ३ वर्षांसाठी निवडील; मात्र सर्व अगर काही विशिष्ट कारणाकरिता म्हणून संस्थानातील **दोन** अगर दोहोंपेक्षा जास्त अशा खेड्यांना एक **संयुक्त पंचायत** सरकारचे मंजुरीने निवडता येईल.

५. **(अ)** ग्रामपंचायतीकरिता सभासदांची निवडणूक गावातील साक्षर प्रौढ लोकांच्या मताधिक्याने होईल.

**(आ)** ग्रामपंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक पंचायतीच्या सभासदांकडून एकमताने होईल. परंतु अध्यक्षाच्या निवडणुकसंबंधी सभासदांचे एकमत न झाल्यास पंचायतीच्या सभासदांपैकी कोणाही इसमाची अध्यक्षपदासाठी निवडणूक गावातील सर्व मतदार लोकांकडून होईल.

**(इ)** गावच्या शिक्षणाची व्यवस्था, ग्रामोद्धार कार्य, विशेषतः न्यायदान, पाणीपुरवठा, गावचे आरोग्य, रस्ते करणे व दुरुस्त ठेवणे, मोऱ्या, पूल, बंधारे, सार्वजनिक इमारतींची दुरुस्ती, गायरानाची जोपासना, उजेडाची व्यवस्था ठेवणे, जत्रा व बाजार यांचे नियंत्रण, सरकारच्या सहकार्याने प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था, सूत काढणे वगैरे उद्योग सुरू करून बेकारी-निवारणाचा उपक्रम, पशुसंरक्षण आणि संवर्धन आणि ज्या योजनेमुळे लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, सौख्य-सोयी किंवा सामाजिक व आर्थिक जीवनाचे संवर्धन होईल अशा योजना करणे हे काम पंचायतीचे असेल. या सर्व बाबी ग्रामपंचायतीने त्यांच्या ताब्यात दिलेल्या रकमेतून व तालुका समिती व सरकार यांचे नियंत्रणाखाली करावयाच्या आहेत.

**(ई)** जो इसम वेडा असेल अगर ज्या इसमावर नैतिक अधःपतनाचा समावेश होईल अशा गुन्ह्याची शाबिती झालेली असेल अशा इसमाचे नाव मतदारांचे यादीत घातले जाणार नाही. मात्र वर नमूद केलेल्या नैतिक अधःपतनाच्या कारणामुळे मतदानाच्या हक्कास नालायक ठरलेल्या इसमाची नालायकी दूर करण्यासाठी निवडणुकीच्या इन्साफासाठी नेमण्यात आलेल्या कोर्टाकडून नालायकी दूर होण्याच्या कारणासह अशा नालायक ठरलेल्या इसमाने अर्ज दिल्यास व ती कारणे कोर्टास पटल्यास अशा इसमाची नालायकी दूर होऊ शकेल.

मतदारांच्या यादीत नाव दाखल झालेला एखादा इसम वर नमूद केलेल्या कारणामुळे मतदानाचा हक्क असण्यास नालायक आहे असे दिसून आल्यास मतदारांच्या यादीतून अशा इसमाचे नाव खोडले जाईल व तो मतदानास अपात्र समजला जाईल.

६. या कायद्याच्या अम्मलवारीकरिताच शक्य तितक्या लवकर संस्थानातील सर्व गावांचे **पाच गट** करून प्रत्येक गटाला '**तालुका**' असे संबोधण्यात येईल.

७. प्रत्येक तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या अध्यक्षांची मिळून **तालुका समिती** बनविण्यात येईल, व तालुका समितीचे सभासद आपल्या सभासदांतून तालुका समितीचा **अध्यक्ष** निवडतील.

८. संस्थानातील प्रत्येक तालुका समितीला संस्थानच्या उत्पन्नाचा ठराविक भाग मिळेल; व ती समिती गावच्या गरजांप्रमाणे ती रक्कम गावपंचायतींना वाटून देईल. प्रत्येक गावपंचायतीने दरवर्षास तयार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकाची छाननी करणे, त्या तालुक्यातील गावांकरिता विशिष्ट जादा रकमेची सरकारकडे मागणी करणे, ही कामे प्रत्येक तालुका समिती करील; शिवाय तालुक्यातील प्रत्येक **ग्रामपंचायतीचे** कामकाज कसे चालले आहे, यासंबंधी **दर तीन महिन्यांनी** प्रत्येक तालुका समितीने सरकारकडे रिपोर्ट पाठवावयाचे आहेत.

९. **(अ)** श्रीमंत राजेसाहेब व संस्थानचे कायदेमंडळ मिळून संस्थानचे **विधिमंडळ** (लेजिस्लेचर) होईल. संस्थानचे कायदेकानू करण्याची जबाबदारी श्रीमंत राजेसाहेब आणि संस्थानचे कायदेमंडळ मिळून होणाऱ्या विधिमंडळाकडे राहील.

**(आ)** कायदेमंडळ ही संस्थानची वरिष्ठ संस्था राहील, आणि संस्थानचा सुव्यवस्थित राज्यकारभार करण्याकरिता जरूर असणारे कायदे व नियम ही संस्था करील; तसेच संस्थानचे जमाबंदीवर तिचा पूर्ण अधिकार राहील.

**१०. (अ)** या कायद्याच्या (**२७ व्या**) **(आ)** कलमात नमूद केलेल्या योजनेस अनुसरून संस्थानचे कायदेमंडळ **पंधरा** सभासदांचे राहील. संस्थानातील सर्व तालुका समतींचे विद्यमान अध्यक्ष कायदे मंडळाचे सभासद राहतील.

**(आ)** प्रत्येक तालुका समिती दर तीन वर्षांस आपले अध्यक्षाशिवाय आणखी दोन सभासद कायदेमंडळासाठी निवडून देईल. त्यांपैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल.

**(इ)** वयाची **अठरा वर्षे पूर्ण** झाली असतील अशा औंध संस्थानच्या साक्षर व प्रौढ प्रजाजनांखेरीज दुसऱ्या कोणासही कायदेमंडळासाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

**११.** कायदेमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची असून ती कोणासही मोडता येणार नाही. पण या कायद्यातील कलम **४** व **११** प्रमाणे दरसाल **१/३** सभासद कायदेमंडळातून निवृत्त होतील व नवीन निवडून येणारे त्यांच्या जागी येतील.

**१२.** कायदेमंडळाची बैठक वर्षातून **दोन वेळा** भरविण्यात येईल व दोन बैठकींच्या कालामध्ये **सात** महिन्यांतून अधिक काळ जाणार नाही.

**१३**. (स्पीकर आणि डेप्युटी स्पीकर) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवडणूक पहिल्या बैठकीच्या वेळी कायदेमंडळाचे सभासद करतील; प्रातिनिधिक सभेचे सभासद असेपर्यंत अगर एखादी सरकारी नोकरी पत्करीपर्यंत अगर प्रातिनिधिक सभेचा विश्वस्थ असेतोपर्यंत अगर ते कोणत्याही अन्य कारणांकरिता राजीनामा देईपर्यंत अध्यक्ष व उपाध्यक्ष हे आपल्या जागेवर राहतील.

**१४**. कायदेमंडळापुढील प्रश्नांचा निकाल अध्यक्ष अगर त्यांचा जागी काम करणाऱ्या सभासदाशिवाय हजर असलेल्या व मत देऊ शकणाऱ्या सभासदांचे मताधिक्याने होईल. अध्यक्षांस प्रथम मत देता येणार नाही. पण मते समान पडल्यास त्यांस आपले मत कोणत्याही बाजूस देण्याचा अधिकार राहील.

**१५. (अ)** हजर असून मत देत असलेल्या सभासदाच्या मताधिक्यानेच कायद्याचे मसुदे (बिल्स) पसार करण्यात येतील व श्रीमंत राजेसाहेब यांची संमती मिळाल्यावर ते मसुदे कायदे होतील.

**(आ)** एखाद्या कायद्याच्या मसुद्यास तो कायदेमंडळाने नियमानुसार पसार केला असतानाही जर श्रीमंत राजेसाहेब त्यास संमती देण्याचे नाकारतील तर तो कायद्याचा मसुदा परत कायदे मंडळाकडे त्यांनी पाठविला पाहिजे. याप्रमाणे मसुदा परत पाठविताना सदर मसुद्याचा त्यांनी सुचविलेल्या शिफारशीस अनुसरून फेरविचार करावा. अशा सूचनांचा संदेश श्रीमंत राजेसाहेबांना कायदे मंडळास देता येईल. याप्रमाणे फेरविचारासाठी म्हणून असा मसुदा श्रीमंत राजेसाहेबांकडून आल्यानंतर कायदेमंडळ त्या मसुद्याचा श्रीमंत राजेसाहेबांचे संदेशाप्रमाणे फेरविचार करील.

**(इ)** फेरविचाराकरिता पाठविलेल्या मसुद्यात ज्या शिफारशीप्रमाणे फेरविचार व्हावा; अशा श्रीमंत राजेसाहेबांचा संदेश असेल, त्या शिफारशी मान्य झाल्यास तो मसुदा कायदा म्हणून समजला जाईल; परंतु

**अनुक्रमणिका**

अशा शिफारशी कायदे मंडळास अमान्य झाल्यास श्रीमंत राजेसाहेबांना सदरहू कायद्याचे मसुद्यास संमती देण्याचे काम कायदे मंडळाच्या पुढील बैठकीपर्यंत पुढे टाकता येईल. याप्रमाणे संमती न दिलेल्या मसुद्यास लागोपाठ तीन वेळा संमती देण्याचे त्यांना नाकारता येईल. मसुद्यास श्रीमंतांनी संमती न दिल्यामुळे फेरविचाराकरिता पुढे येऊनही तीनही वेळेस जर मूळ स्वरूपातच तो मसुदा मताधिक्याने पसार होईल तर तो मसुदा मूळ स्वरूपातच कायदा म्हणून समजला जाईल.

**१६.** संस्थानचा राज्यकारभार चालविण्याची सत्ता कायदेमंडळाचे वतीने अधिकारारूढ मंत्रिमंडळाकडून वापरण्यात येईल. कायदेमंडळातील सभासदांमधून श्रीमंत राजेसाहेब ज्यांना नेमतील अशा मुख्य मंत्र्यांचे व दोनपेक्षा जास्त नाही. अशा उपमंत्र्यांचे मिळून मंत्रिमंडळ बनेल. राज्यकारभाराच्या सर्व बाबींसंबंधी मंत्रिमंडळ कायदेमंडळास जबाबदार राहील व कायदेमंडळाकडून अधिकारारूढ मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव पसार झाल्यास त्या मंत्रिमंडळाला अधिकारनिवृत्त व्हावे लागेल.

**१७.** जमाबंदीच्या प्रत्येक वर्षारंभी मंत्रिमंडळ कायदेमंडळापुढे त्या वर्षाच्या वसुलाचे व खर्चाचे अंदाजपत्रक मांडील व या अंदाजपत्रकात खालील बाबींची तजवीज केली जाईल.

**(अ)** संस्थानच्या उत्पन्नापैकी १/२ रक्कम राज्यव्यवस्थेचा खर्च चालविण्याकरता व श्रीमंतांचे खाजगीकरिता व पोलिटिकल पेन्शनीकरिता म्हणून राहील.

**(आ)** उरलेली १/२ रक्कम ग्रामपंचायती व तालुका समित्या यांनी करावयाच्या खर्चाकरिता राहील व ही रक्कम त्या त्या तालुक्याच्या वसुलाचे रकमेचे हिस्सेरशीने विभागली जाईल.

**१८**. कलम १७ **(अ)** मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चासंबंधाने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास आहे; परंतु १७ (आ) मधील रकमेसंबंधाने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास नाही.

**१९. (अ)** कायदेमंडळाने पसार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकावर सही करून त्याला श्रीमंत राजेसाहेब मान्यता देतील. अशा तऱ्हेने त्यांनी सही करून मान्यता दिल्याशिवाय संस्थानच्या उत्पन्नापैकी केला जाणार कोणताही खर्च कायदेशीर समजला जाणार नाही.

**(आ)** तालुका समित्यांसाठी ठरवून देण्यात आलेल्या रकमेवर तालुका समितीचा पूर्ण ताबा राहील, परंतु त्यांच्या व्यवहाराची छाननी करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास व कायदेमंडळास आहे.

**(इ)** कलम १५ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच कलम १९ (अ) बाबतीत पसार झालेल्या बजेटला मान्यता न देण्यासंबंधी श्रीमंत राजेसाहेबांना अधिकार राहील.

**२०.** संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पद्धतीचे राहील; संस्थानच्या सरन्यायाधीशाकडून वारंवार ठरविले जाईल त्याप्रमाणे किरकोळ स्वरूपाचे दिवाणी दावे व फौजदारी खटले चालवून न्याय देण्याचे काम पंचायतीने करावयाचे आहे. याव्यतिरिक्त उरलेली न्यायदानाची कामे व पंचायतीच्या निकालावरील अपिले चालविण्याचे काम सरन्यायाधीशाकडून करण्यात येईल. पंचायतीचे न्यादानाचे काम मोफत चालेल, कोणासही दिवाणी आणि फौजदारी बाबतीत कायदेशीर सल्ला व बचावाची

अनुक्रमणिका

मदत मोफत मिळण्याची व्यवस्था सरकारकडून या बाबतीत हायकोर्टाकडून केल्या जाणाऱ्या नियमाप्रमाणेच केली जाईल.

**२१. (अ)** औंध संस्थानच्या सरन्यायाधीशांची नेमणूक श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांचेकडून केली जाईल व सरन्यायाधीश संस्थानच्या न्यायखात्याचे मुख्य म्हणून काम करतील. ग्रामपंचायतीने दिलेले निकाल, हुकूम अगर हुकुमनामे यावर झालेली अपिले अगर तपासणी अर्जाचे काम चालविणेचे व त्याचप्रमाणे त्यांचेकडून ठरविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्राबाहेरील असलेले फौजदारी व दिवाणी कज्जे चालविण्याचे काम सरन्यायाधीशांकडे राहील.

**(आ)** संस्थानच्या सरन्यायाधीशांच्या नेमणुकीचे वेळी त्यांची जी मुदत ठरली असेल त्या मुदतीपर्यंत व त्यांची चांगली वर्तणूक असतोपर्यंत ते आपले अधिकार चालवितील.

**२२.** राज्यघटना अंमलात आल्यावर शक्य तितक्या लवकर अधिकारारूढ मंत्रिमंडळ सार्वत्रिक व मोफत, सक्तीच्या व शक्य तितके स्वावलंबी प्राथमिक शिक्षणाची सोय करील. तसेच औंध संस्थानच्या जनतेची अधिकाधिक सेवा करण्याची संधी देण्याच्या हेतूने योग्य नागरिक बनविण्यासाठी जेवढ्या शिक्षणाची जरुरी असेल तितकेच उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार करील. हा कायदा अंमलात आल्यापासून संस्थानातील सर्व निरक्षरता दूर करण्याच्या हेतूने संस्थानातील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषास मतदानाची योग्यता प्राप्त करून देण्याकरिता त्यांना साक्षर करण्याची योग्य ती तजवीज सरकार एक वर्षात करील.

**२३.** श्रीमंत राजेसाहेब हे संस्थानचे हिशेब व जमाखर्च तपासण्याकरिता मुख्य हिशेब-तपासनिसाची नेमणूक करतील व हे मुख्य हिशेब-तपासनीस या बाबतीत सरकारकडून केलेल्या नियमात नमूद केलेल्या कारणाशिवाय त्या जागेवरून काढले जाणार नाही.

**२४.** श्रीमंत राजेसाहेब हे औंध संस्थानच्या जनतेचे **आद्य लोकसेवक** व जनतेच्या विवेकबुद्धीचे **विश्वस्त** आहेत व या कायद्यात वर नमूद केलेल्या अधिकाराशिवाय खाली लिहिलेले अधिकार त्यांनी वापरावयाचे आहेत.

**(अ)** सार्वभौम सरकाराशी व इतर संस्थानांशी असणाऱ्या संबंधाबद्दलची सर्व राजकीय कामे श्रीमंत राजेसाहेब यांच्या खास नजरेखाली चालतील.

**(आ)** संस्थानच्या कायदेमंडळाची जरुरीच्या वेळी जादा बैठक बोलविण्याचा अधिकार श्रीमंत राजेसाहेब यांना आहे.

**(इ)** श्रीमंत राजेसाहेब हे अधिकाररूढ मंत्रिमंडळाचे विचाराने संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता जरुरीचे जाहीरनामे काढू शकतील, परंतु असे जाहीरनामे काढल्यानंतर ते कायदेमंडळाची जी प्रथम बैठक होईल त्या बैठकीत त्यांना कायदेमंडळाने संमती न दिल्यास ते जाहीरनामे त्या अधिवेशनाच्या समाप्तीनंतर रद्द म्हणून समजले जाईल.

अनुक्रमणिका

**(ई)** संस्थानातील अधिकाररूढ मंत्रिमंडळ निःसंदिग्धपणाने संस्थानचा राज्यकारभार गैररीत्या चालवीत असल्याचे श्रीमंत राजेसाहेबांच्या निदर्शनास आल्यास श्रीमंत राजेसाहेब त्या मंत्रिमंडळास आपला कारभार तहकूब ठेवण्याबद्दल हुकूम देऊन त्याचा कारभार बंद ठेवू शकतील व असा हुकूम दिल्यापासून एक महिन्यापेक्षा जास्त नाही अशा मुदतीच्या आत त्यांनी कायदेमंडळाची सभा बोलाविली पाहिजे.

**(उ)** श्रीमंत राजेसाहेबांना अधिकाररूढ मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून ग्रामपंचायतीत अगर कायदेमंडळात निवडून आलेल्या एखाद्या सभासदाची निवडणूक रद्द करण्याचा अधिकार आहे. मात्र या बाबतीत जरून ते हुकूम निवडणुकीच्या तारखेपासून १ (एक) महिन्याच्या आत झाले पाहिजेत.

**२५. (अ)** मंत्रिमंडळाकडून केल्या जाणाऱ्या सर्व बाबी व करारमदार श्रीमंत राजेसाहेब यांच्या नावे झाले आहेत असे मानले जाईल व श्रीमंत राजेसाहेबांच्या वतीने मंत्रिमंडळाकडून त्याची अंमलबजावणी होईल.

**(आ)** हा कायदा अंमलात येण्यापूर्वी श्रीमंत राजेसाहेब यांनी केलेले सर्व करारमदार औंध संस्थानच्या सरकारच्या वतीने केले गेले होते असे समजण्यात येईल.

**२६. (अ)** औंध संस्थानचे मंत्रिमंडळ या कायद्यास पूरक व आनुषंगिक स्पष्टीकरणासाठी आवश्यक असे नियम तयार करील. पंचायती, तालुका समित्या, राज्यकारभार, न्यायदान, हिशेबतपासणी, शिक्षण, बेकारीनिवारण, संस्थानच्या नोकरांच्या हितसंबंधांचे रक्षण वगैरे गोष्टीकरिता व या कायद्यात समावेश न केलेल्या गोष्टी यासंबंधी मुख्यतः नियम केले जातील.

**(आ)** हे नियम व दुरुस्त्या कायदेमंडळाने पसार केल्या पाहिजेत. कायदेमंडळ स्वतःच्या कामकाजासंबंधी नियम तयार करील.

**२७.** या कायद्याची योग्य अंमलवारी होण्यासाठी श्रीमंत राजेसाहेब खालील अधिकार तात्पुरते म्हणून आपल्याकडे राखून ठेवीत आहेत.

**(अ)** श्रीमंत राजेसाहेब यांनी नेमलेल्या मंत्रिमंडळाविरुद्ध पहिली दोन वर्षे अविश्वासाचा ठराव कायदेमंडळास मांडता येणार नाही.

**(आ)** हा कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यंत श्रीमंत राजेसाहेबांना कायदेमंडळासाठी पाच सभासदांपर्यंत सभासद नेमून देता येतील. अशा सभासदांची मुदत एक वर्षाहून अधिक असणार नाही.

**(क)** हा कायदा अमंलात आल्यावर पाच वर्षांपर्यंत श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी वार्षिक खर्चाकरिता **३६०००** रुपये कायम करण्यात येत आहेत. या रकमेत पोलिटिकल पेन्शन्सचा समावेश होणार नाही.

अनुक्रमणिका

**२८. (अ)** या कायद्यातील कलमांच्या अर्थासंबंधी मतभेद उत्पन्न झाल्यास सरकार अगर जरूर असेल त्या इसमाने हायकोर्टकडे अर्ज करावा. यासंबंधीचा निर्णय अर्ज केल्या दिवसापासून दोन महिन्यांचे आत देण्यात आला पाहिजे.

**(आ)** हायकोर्टाचा निर्णय अखेरचा समजला जाईल, व तो सर्व पक्षांवर बंधनकारक राहील.

**२९.** पुढील परिशिष्टात नमूद केलेले कायदे त्या परिशिष्टातील दुसऱ्या कॉलममध्ये निर्दिष्ट केले आहेत तितके रद्द करण्यात येत आहेत.

| नंबर | वर्ष व कायदा | रद्द केलेला भाग |
|---|---|---|
| १ | सन १९३० चा पहिला कायदा | कलमे २० व २१ खेरीज बाकीची. |
| | | सर्व कलमे रद्द. |
| २ | सन १९३१ चा चौथा कायदा | सर्व कायदा रद्द. |
| ३ | सन १९३८ चा तिसरा कायदा | सर्व कायदा रद्द. |

मंजूर तारीख ६-२-३९

सही सरकारची (मोर्तब)
राजे साहेब, सं. औंध

**औंध संस्थानचे राज्यघटनेच्या कायद्यात दुरुस्ती करणेबाबतचा कायदा सन १९४० चा ३ रा**

ज्या अर्थी औध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे जरूर आहे, त्याअर्थी असा कायदा करणेत येत आहे की :

**१.** या कायद्यास '**औंध संस्थानच्या राज्यघटनेच्या दुरुस्तीचा कायदा**' असे म्हणावे.

**२.** हा कायदा ता. ३-६-४० पासून औंध संस्थानास लागू होईल.

**३**. औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या कायद्यातील (ज्या कायद्यास यापुढे **"सदर कायदा"** असे संबोधण्यात आले आहे.) कलम ५ (अ) मधील पहिल्या ओळीतील '**साक्षर**' या शब्दास काट देण्यात यावा.

४. सदर कायद्याच्या कलम ५ (ई) मधील '**कोर्टाकडे**' या शब्दांना काट देऊन त्याऐवजी **"श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर ते नेमतील त्या अंमलदाराकडे"** असे नवीन शब्द घालण्यात यावेत.

**५**. सदर कायद्याच्या कलम ५ (ई) नंतर नवीन कलम ५ (ड) म्हणून घालण्यात यावे.

अनुक्रमणिका

(ड) कलम (ई) प्रमाणे दुरुस्त झालेली अगर त्या अन्वये कोणी अर्ज न केल्यास निवडणुकीपूर्वी प्रसिद्ध झालेली यादी कायमची समजण्यात येईल व त्या यादीत दाखल असणारा कोणीही इसम मतदानास अपात्र होता अगर त्या यादीत दाखल नसणारा कोणीही इसम मतदानास पात्र असून त्याचे नाव यादीत दाखल व्हावयास पाहिजे होते अशी तक्रार कोणाही उमेदवारास अगर मतदारास करता येणार नाही.

**६.** सदर कायद्याच्या कलम १० (आ) मधील दुसऱ्या ओळीतील "दोन" या शब्दास काट देऊन त्याऐवजी "एक" असा शब्द नवीन घालावा; तसेच "त्यांपैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल " या वाक्याला काट देण्यात यावा.

**७.** सदर कायद्याच्या कलम १० (आ) नंतर खालीलप्रमाणे नवीन कलम १० (इ) घालण्यात यावे.

(इ) तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीकरिता तयार केलेल्या मतदाराचे यादीत ज्या इसमांची नावे नमूद आहेत अशा इसमांनी कायदेमंडळात एक सभासद निवडून देण्याचा आहे. या निवडणुकीस कोणाही औंध संस्थानात रहिवाशी असणाऱ्या अगर औंध संस्थानात ज्याच्या स्वतःच्या मालकीची अगर तो एकत्र हिंदु कुटुंबाचा सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाच्या मालकीची स्थावर मिळकत आहे असा इसमास तो ग्रामपंचायत अगर तालुका समिती यांचा सभासद नसला तरीही उभे राहता येईल. निवडून आलेल्या सभासदांचे कायदेमंडळात फक्त तीन वर्षे सभासदत्व राहील. निवडणुकीचे तारखेपूर्वी पाच वर्षांचे अवधीत खरेदी घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे मात्र कोणासही निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

**८.** सदर कायद्याचे कलम १० [इ] रद्द करण्यात यावे व त्याऐवजी नवीन कलम १० [ई] म्हणून खालील प्रमाणे घालण्यात यावे.

[**ई**] ग्रामपंचायतीच्या निवडणुकीस फक्त साक्षर व ज्याच्या वयाला **२० वर्षे** पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास फक्त उभे राहता येईल. संस्थानातील कोणाही मॅजिस्ट्रेटने सदर इसम 'साक्षर' आहे, म्हणून दिलेले सर्टिफिकेट तो साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल व ते त्यांच्या साक्षरतेच्या प्रश्नावर कायमचे व निर्णयात्मक समजण्यात येईल.

९. सदर कायद्याच्या कलम २४ (उ) मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील मजकूर नवीन घालण्यात यावा.

"तसेच कलम ५ (अ) प्रमाणे अगर कलम १० (इ) प्रमाणे झालेल्या पंचायतीच्या सभासदांच्या अगर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या मतदारांनी निवडलेल्या कायदेमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीबद्दल कोणाही सदर निवडणुकीत उभा असणाऱ्या अगर सदर निवडणुकीतील मतदार सदर निवडणूक गैरकायदा, अगर लाचलुचपत, फसवणूक, अगर धाकदपटशा यांनी दूषित असल्याबद्दल निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून आठ दिवसांत श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर त्यांनी नेमलेल्या निवडणूक चौकशी अंमलदार यांजकडे तक्रार अर्ज निवडणूक जाहीर झाल्यापासून आठ दिवसांचे आत करता येईल व सरकारांनी केलेल्या नियमास अनुसरून चौकशी अंमलदार सदर अर्जाची चौकशी करून श्रीमंत राजेसाहेब यांकडे योग्य ती शिफारस करतील.

अनुक्रमणिका

मंजूर ता. ३-६-४०

**भवानराव** (मोर्तब),
राजेसाहेब, संस्थान औंध

## औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा सन १९४४ चा पहिला

ज्या अर्थी औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) अन्वये सदर कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यंत पाच सभासदांपर्यंत सभासद कायदेमंडळावर नेमून देण्याचा श्रीमंत राजेसाहेब यांना असलेला अधिकार त्यांनी आणखी पाच वर्षेपर्यंत चालवावा असा कायदेमंडळाने ठराव केला असून त्याला श्रीमंत राजेसाहेबांची मंजुरी दिलेली आहे व ज्या अर्थी या ठरावाची अंमलवारी करण्यासाठी औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी असा कायदा करण्यात येतो की,

**१. लहान सरनामा**

या कायद्यास "औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९च्या १ल्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा सन १९४४चा १ला" असे म्हणावे.

**२. सुरुवात व व्याप्ती**

हा कायदा श्रीमंत राजेसाहेब यांनी जारी केलेला एतद्विषयक सन १९४४चा ऑर्डिनन्स पहिला औंध संस्थानचे आज्ञापत्रिकेत प्रसिद्ध झाल्या तारखेपासून अंमलात आला आहे असे समजण्यात यावे व तो सर्व संस्थानास लागू असेल.

**३. औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम (आ) ची दुरुस्ती**

औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) ओळ पहिली यातील "पाच वर्षेपर्यंत" या शब्दाऐवजी "**दहा वर्षेपर्यंत**" असे शब्द घालण्यात यावेत व या दुरुस्तीनुसार अस्तित्वात येणारे पोटकलम (आ) हे प्रथमपासूनच सदर राज्यघटनेच्या कायद्यात ग्रथित आहे असे समजण्यात यावे.

**४. दुरुस्तीपूर्वीच्या नेमणुका दुरुस्तीनुसार असल्याचे ठरवून त्यांची मुदत निश्चित करणे**

श्रीमंत राजेसाहेबांनी दुरुस्तीपूर्वीच्या पोट कलमान्वये ज्या नामदार सभासदांना कायदेमंडळावर सभासद म्हणून नेमून दिले असेल त्यांच्या नेमणुका या दुरुस्त झालेल्या पोटकलमान्वये करण्यात आलेल्या आहेत असे समजण्यात यावे व त्यांच्या नेमणुकांची मुदत त्या करण्यात आल्या तारखेपासून **एक वर्षाची** राहावी.

अनुक्रमणिका

मंजूर ता. २४-४-४४ इ.

**भवानराव** (मोर्तब)
राजेसाहेब, सं. औंध

## संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा सन १९४५ चा बारावा

**१. सरनामा :** या कायद्यास 'संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा, सन १९४५चा बारावा असे म्हणावे.

**२. व्याप्ती :** हा कायदा सर्व औंध संस्थानास लागू होईल.

**३. सुरुवात :** हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून अमलात येईल.

**४. (अ)** औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९चा १ला यातील कलम **२१ (अ)** यातील 'सरन्यायाधीश संस्थानच्या' या शब्दापुढे व न्यायखात्याचे मुख्य या शब्दामागे '**हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर ॲक्टखाली हायकोर्टात करावयाचे नियंत्रणास पात्र राहून बाकी बाबतीत संस्थानच्या**' असे शब्द घालण्यात येत आहेत.

(आ) सदर कायद्याचे कलम २८ (अ) मधील '**इसमाने**' या शब्दापुढील व '**अर्ज**' या शब्दामागील '**हायकोर्टाकडे**' या शब्दाऐवजी '**सरन्यायाधीश कोर्टाकडे**' असे शब्द घालण्यात येत आहेत. तसेच सदर कलमातील पोटकलम 'आ' रद्द करून त्याऐवजी पुढीलप्रमाणे पोटकलम घालण्यात येत आहे.

**(आ) सरन्यायाधीश कोर्टाचे निकालावर नाराज पक्षकारास हायकोर्टाकडे अपील करण्याचा हक्क राहील**

मंजूर ता. १४-११-१९४५ इ.

**भवानराव** (मोर्तब)
राजेसाहेब, संस्थान औंध

## औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणेसंबंधीचा कायदा १९४७ चा आठवा.

ज्या आर्थी औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणे जरूर आहे, त्या अर्थी यावरून खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे.

**१. सरनामा :** या कायद्यास 'औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा १९३९ चा पहिला दुरुस्त करणेसंबंधीचा कायदा सन १९४७ चा ८ वा असे म्हणावे.

अनुक्रमणिका

**२. सुरुवात व व्याप्ती :** हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून सर्व औंध संस्थानास लागू होईल.

**३. कलम :** औंध संस्थानच्या राज्य घटनेचा कायदा १९३९ चा पहिला यातील कलमे १० व ११ कमी करून त्याऐवजी खालीलप्रमाणे नवीन कलमे दाखल करण्यात येत आहेत.

**१.** औंध संस्थानचे कायदेमंडळ २७ सभासदांचे राहील. ते सभासद पुढीलप्रमाणे राहतील.

**(अ)** सर्व तालुका समित्यांचे अध्यक्ष हे कायदेमंडळाचे सभासद राहतील.

**(आ)** प्रत्येक तालुका समितीचे सभासदांतून त्या तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या पंचांनी निवडून दिलेला इसम हा त्या त्या तालुक्यातर्फे विधिमंडळाचा सभासद राहील.

**(इ)** प्रत्येक तालुक्यातील मतदारांनी त्या त्या तालुक्यातर्फे **दोन** सभासद कायदेमंडळासाठी निवडून देण्याचे आहेत सदर इसम ग्रामपंचायती अगर तालुका समित्या यांचे सभासद नसले तरी चालतील. मात्र ते औंध संस्थानचे रहिवासी असले पाहिजेत. **अगर** त्यांच्या स्वतःचे मालकीची किंवा ते एकत्र कुटुंबातील सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाचे मालकीची संस्थानात स्थावर मिळकत असली पाहिजे. निवडणुकांचे तारखेपूर्वी पाच वर्षांचे अवधीत घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे कोणासही निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क राहणार नाही.

**(ई)** विधिमंडळातील एक **स्त्री** सभासद त्या त्या तालुक्यातील मतदारांकडून निवडला जाईल. तो प्रत्येक तालुक्यातर्फे एक याप्रमाणे क्रमाक्रमाने निवडला जाईल. तालुकेवार स्त्री सभासद निवडणेसंबंधीचा क्रम ठरविण्याचा अधिकार मंत्रिमंडळास आहे. ह्या स्त्री सभासदांची मुदत **एक वर्ष** राहील.

**(उ)** औंध संस्थानातील कारखानदारांतर्फे **एक** सभासद कायदेमंडळावर निवडून दिला जाईल.

**(ऊ)** औंध संस्थानातील कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराकडून कामगारांतर्फे **दोन** कामगार विधिमंडळातील निवडले जातील. या निवडणुकीस उभा राहणारा उमेदवार कामगार कारखान्यातील रजिस्टर्ड युनियनचा सभासद असला पाहिजे.

**(ए)** प्रत्येक तालुक्यातील मतदारांकडून मतदाराचे यादीतील एक **हरिजन** इसम विधिमंडळातील सभासदांचे निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यातर्फे उमेदवार निवडला जाईल, व या पाच उमेदवारांतून एक उमेदवार विधिमंडळाचे **२५** लोकनियुक्त सभासदांकडून बहुमताने विधिमंडळासाठी निवडला जाईल.

(ऐ) विधिमंडळावर **दोन** सभासद श्रीमंत राजेसाहेब यांचेकडून नेमिले जातील, व त्यांची मुदत एक वर्षांची राहील.

अनुक्रमणिका

**४. ११ (अ)** विधिमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची राहील. कलम १० पोट कलम (आ) यातील सभासद तो तालुका समितीचा सभासद असेतोपर्यंत विधिमंडळाचा सभासद राहील. तालुका समितीतून निवृत्त झाल्यावर विधिमंडळातील त्या जागेची फेरनिवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

**(आ)** कलम १० पोट कलम इ. उ, ऊ, ए अन्वये येणाऱ्या विधिमंडळातील सभासदांची मुदत चार वर्षांची राहील. त्यानंतर दर चाक वर्षांनी सदर जागेची फेर निवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

**(इ)** कलम १० यात नमूद केलेल्या ज्या सभासदांचे निवडणुकीबाबत हल्ली अमलात असलेल्या नियमात तरतूद केलेली नाही, त्या सभासदांचे निवडणुकीबाबत नियम करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास राहील.

**(ई)** ग्रामपंचायतीच्या निवडणुकीस फक्त साक्षर व ज्याच्या वयास **२१** वर्षे पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास निवडणुकीस उभे राहता येईल. संस्थानातील त्या त्या तालुक्यातील पदवीधर, शिक्षक, ट्रेंड शिक्षक, अगर प्रमुख संचालक व संचालक यांनी दिलेले साक्षरतेचे सर्टिफिकेट सदर उमेदवार साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल, व ते त्याच्या साक्षरतेच्या प्रश्नावर निर्णयात्मक समजण्यात येईल.

**५**. कलम २७ रद्द करण्यात येत आहे व त्याऐवजी पुढीलप्रमाणे कलम घालण्यात येत आहे.

“श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी खर्चासाठी संस्थानच्या उत्पन्नापैकी १/१० रक्कम देण्यात येईल.”

**६**. सदर कायद्याचे कलम ४ यात ‘**तीन वर्षांसाठी**’ असे शब्द आहेत त्याऐवजी ‘**चार वर्षांसांठी**’ असे शब्द वाचण्यात यावेत.

मंजूर ता. २९-४-४७ इ.

**भवानराव** (मोर्तब)
राजेसाहेब, सं. औंध

अनुक्रमणिका

# उपसंहार

**...तीस वर्षांनंतर**

एक राजा गेला. दोन गेले. सगळेच गेले. त्यांचा आधार ब्रिटिश सत्ताच गेली ना?

नवीन राज्य आले. नवा डाव मांडला. जुना डाव मोडला. बरे झाले! जुन्या डावाचे नियम-शिस्त-पथ्ये गेली. नवीन डावाचे नियम वेगळे, गती वेगळी, ध्येये वेगळी, सर्वच काही नवीन; पण नवीन डावाची पथ्ये, शिस्त, नियम काहीच आले नाहीत. शब्दावडंबर मात्र आले. घोषणा, झेंडे, आरडाओरड वगैरे आले. पण कर्तव्य काय, कसे करावयाचे, व नवीन डावाच्या कार्यक्षमतेची शिस्त कशी आणावयाची हे सर्व विसरलेच. जमलेच नाही. म्हणून आता गोंधळच गोंधळ!!

आणि, हो! जुने पुराणे बेकार राजे गेले. घालविले. छानच झाले. पण नवीन राजांचे एक मोठे पेवच फुटले!! गावोगावी, शहरोशहरी 'राजेच राजे'. सत्ता, संपत्ती, उपभोग हेच ध्येय. लोक म्हणू लागले की काय 'लोकशाही ?' का साम्यवाद? हे काय आले? यातून बेकारी, गरिबी, झोपडपट्ट्या, अत्याचार, अनाचार, गुन्हे, भ्रष्टाचार, अस्थिरता जाणार की वाढणारच? मोठा प्रश्न पडला! आता (१९८५) हिंदुस्थानचे काय होणार? ज्या देशात प्रत्यक्ष प्रधानमंत्र्याचा दिवसाढवळ्या खून होतो, ज्या देशात हुंड्याकरता बिचाऱ्या अबला जाळल्या जातात, ज्या देशात पैसा सत्ता उपभोगाकरता, न देशाची, न मानवाची कदर केली जाते, ज्या देशात धर्माच्या नावाखाली राक्षसी अमानुष क्रूरता गावोगावी खेडोपाडी दर घटकेला प्रत्ययास येते, याच देशात शंकर-पार्वती, राम-सीता, कृष्ण-बुद्ध, महावीर-गांधी (महात्मा), नानक-कबीर, खरोखरीच जन्मले का ? हिंदुस्थानचे हिंदु-मुसलमान-शीख-पारशी-ख्रिश्चन आणि इतर अनेक धर्म सर्वच पंथ स्वतःला फसवून स्वप्नाचे जग कायम ठेवण्याकरिताच शिकवितात की काय? ही आत्मवंचनाच ! स्वतःची भुलवणूकच नाही? धर्म हेच शिकवितो की काय? बाकी आपले 'नवे' राज्य निधर्मीच म्हणा!!

'स्वराज्य' आले पण बेकारी, गरिबी हटली नाही. 'सुधारणा' झाल्या पण झोपडपट्ट्या, प्रदूषण, चोऱ्या, खून, जाळपोळ, धक्काबुक्की, खेचाखेची, स्पर्धा, द्वेष, मत्सर वाढलेच की ! मग स्वराज्य कोणाचे ? कशाला?

सुधारणा झपाट्याने (?) झाल्या. रस्ते, मोटारी, विमाने, टी. व्ही., ट्रॅन्झिस्टर, टेरेलिन, हॉटेले, पेये, सर्व सर्व वाढली. दुकाने, वीज-बत्ती वाढले. लोक म्हणतात भ्रष्टाचार नसता, लोकांनी काम जर क्षमतेने केले असते तर सुधारणा तिपटीने तरी जास्त झाली असती!! खरे आहे. सुधारणा करण्याचा पैसा खर्च तर होतो, कधी कधी दुप्पटही होतो. पण खिशात जातो, कामावर खर्चच होत नाही!! मग गरिबी, बेकारी, झोपटपट्टी कमी कशी होणार?

शिवाय आम्हाला सुधारणा हवी. आधुनिकता हवी. नवीन नवीन यंत्रे, तंत्रे हवीत. विमाने, स्कूटर, मोटार, मोटारसायकली, आगगाड्या, सर्व हवेत. अगदी जपान, अमेरिका, युरोपसारखे सर्व सर्व उपभोग हवेत (रशिया-चायनासारखे नाही हं!) मात्र मनोवृत्ती आम्ही अगदी सरंजामशाही ठेवणार. ती बदलणार नाही. हे कसं जमणार?

सरंजामशाही मनोवृत्ती म्हणजे राजाने, राणीने, गुरूने, बापाने, आईने, सरकारने सर्व स्वतः आमच्याकरता सर्व करावे. आम्ही फक्त खावे!!! नवीन यंत्र-तंत्र-शास्त्रयुगीन क्षमता (कॉम्पिटन्स), शिस्त (डिसिप्लीन), संयम (कंट्रोल) आम्हाला नको. ते सर्व सरकारने करावे!! म्हणजे नोकरशाही वाढलीच.

जी जबाबदारी व्यक्तिव्यक्तींची ती त्याने टाळून सगळा भार सरकारवर टाकला. म्हणजे नोकरशाही व 'नेते'शाही वाढून भ्रष्टाचार, गोंधळ, प्रचंड प्रदूषण (सर्व प्रकारचे) वाढते. हा अनुभव फक्त हिंदुस्थानचाच नाही. जगात सर्वत्र जिथे जिथे क्षमता, शिस्त, कामाची सवय कमी, व सर्व सरकारने करावे ही वृत्ती जास्त तिथे तिथे भ्रष्टाचार, अनागोंदी, अस्थिरता, भय-भीती, लाचारी भरपूरच आहे.

असा प्रकार जर आज आपल्या देशात आहे (व इतरत्र अनेक ठिकाणी) तर हे सर्व सावरायचे कोणी? कसे? केव्हा?

आता अगदी नव्या दमाचा, उमदा, देखणा, अत्याधुनिक वृत्तीचा, धाडसी, शांत स्वभावाचा नेता देशाला मिळाला आहे म्हणे. आता मग सर्व अगदी यक्षिणीच्या कांडीप्रमाणे आम्ही व्यक्ति-व्यक्तींनी काहीही न करता, स्वस्थ बसून एकदम कायापालट होणार का? वाढती अपेक्षा, आशा, मानवाला कार्यप्रवण बनवितात. पण भलत्याच, भरमसाट अपेक्षा? काम नाही व नुसताच स्वप्नाळूपणा, आता यापुढे (१९८५-२०००) चालणार का? विचार नको का करायला?

हिंदुस्थानसारख्या देशापुढे समस्या तर भरपूरच आहेत. आधी भरमसाट लोकसंख्या. गरिबी तर पदोपदी डोळ्यांत भरते आहे. आक्रोश ऐकवत नाहीत.

पण गरिबी हटविण्याकरिता क्षमता, जिद्द व मनोवृत्ती हवी ना? ही क्षमता, ही शिस्त, हे नवीन युगांचे संयम आहेत. हे केव्हा यायचे? एकटादुकटा नेता व (अगदी उत्तम असली तरी) नोकरशाही हे घडवून आणू शकतील का?

या नवीन यंत्र-शास्त्र-तंत्र युगाचे नवे नियम, नव्या काम करण्याच्या पद्धती, शिस्त, संयम, क्षमता, मनोवृत्ती, जितक्या प्रमाणात हिंदुस्थानसारखा अफाट देश, आत्मसात करील, असे जपान, जर्मनी, स्वीडन, डेन्मार्क, नॉर्वे यांनी थोड्या फार प्रमाणात केले आहे, तितक्याच प्रमाणात या नव्या युगाचे फायदे आपल्याला मिळणार.

हे नवे यंत्र-शास्त्र-तंत्र युग म्हणजे उत्पादनवाढ, गरजा वाढ व वाढत्या ग्राहकी (कोन्स्यूमर) मनोवृत्तीचे युग आहे.

खूप काम करावे. खूप उत्पादन करावे (नुसती लोकसंख्या नाही !!) खूप, खूप व रोज रोज वाढता उपभोग घ्यावा, असे हे युग. नवीन नवीन उपभोग, प्रवास, दृश्ये (टी. व्ही., सिनेमा, नाटक, कपडे, मोटारी, घरे, वगैरे) नवीन नवीन खाण्याच्या-पिण्याच्या-ओढण्याच्या-वापरण्याच्या वस्तू, नवीन नवीन प्रत्येकाचे मनाला जास्त जास्त गती देण्याकरता चेतना (स्टिम्युलेटस) जसे सेक्स, खेळ, स्पर्धा, शस्त्रास्त्रे, संहार, लढाया वगैरे.

अनुक्रमणिका

या सर्व वाढत्या चैतन्यपूर्ण मनाला खूप गती देणाऱ्या नव्या युगात स्वस्थता, शांतता, समाधान, सहिष्णुता, संयम, सर्वोदय यांना जागाच नाही - कारण धावपळ करावयाची आहे, गाडी गाठावयाची आहे, ऑफिसात, कारखान्यात, यंत्रावर उशीर होता कामा नये. शिस्त मोडेल, उत्पन्न कमी होईल, उपभोग मिळणार नाही!! पळारे पळा ! दुसऱ्याचा, निसर्गाचा, पशुपक्ष्यांचा, जमीन-पाण्याचा, समुद्र-नद्यांचा विचार कोण करतो? हो, पाहायला आहे का वेळ!!! नवीन यंत्रशास्त्र-तंत्र युग नुसते क्षमतेचेच, नाही तर ते खूप गडबडीचे, धकाधकीचे व अत्यंत कठोर आहे. काम करावे - मिळवावे व उपभोगावे. काम नाही - अन्न नाही - खुशाल मरावे!! उद्देश

(मोटिव्हेशन) आहे स्पर्धा - सत्ता - संपत्ती - अहंकार.

ज्या युगात आपण महात्मा गांधींचा जयजयकार करीत करीत त्यांना धिक्कारून आवेशाने प्रवेश केला, त्या यंत्र-शास्त्र-तंत्र-ग्राहकी मनोवृत्तीच्या युगाची गती-चैतन्य व वाढता प्रचंड जगड्व्याळ प्रवाह आपण समजलोच नाही तर आपला तरणोपाय नाही. हे यंत्र-तंत्र-शास्त्र ग्राहकी युग जगद्व्यापी आहे. उत्पादन-विभाजन-उपभोग-सर्व जागतिक पातळीवर. कच्चा माल-यंत्र-वाहतूक-खप-पैसा, सर्वच उद्योग जगाशी संबंध निर्माण करणारे. अगदी लहान खेडेसुद्धा आता जपान, जर्मनी, रशिया, युरोप, अरब देश, अमेरिका यांना बांधले गेले आहे. अमेरिकेत खुट्ट झाले की सर्व जगात गोंधळ!! या युगाची क्षमता-सामर्थ्य-अहंकार अमेरिकेत केंद्रित झाले आहेत. या सत्ता-क्षमता संपत्ती केंद्रीकरणाला रशिया व त्याचे मित्र शह लावू इच्छितात. या दोन बड्या केंद्रित सत्तेचेच स्पर्धा-वैमनस्याच्या खेळात तुम्ही-आम्ही 'आमच्या' इच्छेविरुद्ध खेचून नेले जात आहोत. त्यांच्या बाजारपेठा-उत्पादन-उपभोग-लढाया संघर्ष या सर्वांत आम्ही बळजबरीने सामील केले गेलो आहोत. तेल, यंत्रे, पैसा, बाजारपेठ, शिक्षण या सर्वांकरता त्यांच्याकडेच आम्हाला जावे लागते. कारण आम्हाला क्षमता नाही-पैसा नाही-काम करण्याची धमक नाही, सवय नाही व इच्छाही नाही. म्हणून सर्वच्या सर्व गोंधळ व चुथडाच निर्माण करणारे आहे.

ह्या अशा परिस्थितीत एकुलता एक नवजवान तेजस्वी नेता सर्वच्या सर्व व्यवस्थित (मॅनेज) करू शकेल का? आजची आमची पस्तीस वर्षांपूर्वी तयार केलेली राज्य-शासन-शिक्षण यंत्रणा या सर्व गुंतागुंतीच्या व अत्यंत क्लिष्ट समस्यांना तोंड देऊ शकेल का? कितीही कर्तबगार नेता दिल्लीला बसला व समजा देशभर विमान-हेलिकॉप्टरने भटकला तर आहे या यंत्रणेतून जी क्षमता-धैर्य-मनोवृत्ती या समस्या हाताळण्याकरता जरूर आहे ती सर्व लोकांच्या मनात किंबहुना अनेकांच्या मनात आपोआप निर्माण होईल का?

का हा सर्व खटाटोप व्यर्थ ठरणार आहे? किती झपाट्याने हिंदुस्थानचे यंत्रीकरण शक्य आहे? दहा वर्षांत? वीस वर्षांत? तोपर्यंत आपली लोकसंख्या-बेकारी-झोपडपट्टी किती पटीने वाढले? या यंत्रीकरणाने किती 'भोपाळ' भोगावे लागतील? आज १० लाख वस्तीच्या वरची शहरे हिंदुस्थानात चार-सहाच असतील, आजच्या गतीने पुढील दहा वर्षांत ती ५० होणार!! मग सर्वत्र झोपडपट्टी-हातभट्टी-दादागिरीची चंगळच चंगळ!!!

हे सर्व सुसूत्रित (मॅनेज) दिल्लीवाला, नवजवान नेता एकटाच करणार का?

जलद यंत्रीकरण-शहरीकरणाने ज्या समस्या युरोप-अमेरिका-जपानमध्ये निर्माण झाल्या त्याच्या दसपट समस्या आजच आमच्या पुढे आहेत. धर्म, जात, भाषा, परंपरा, व्यवसाय, यांचे परस्पर विरोधी प्रवाह

आहेत. आजूबाजूला वैरीही ठाकले आहेत म्हणे. या नानक-बुद्ध-वेद-वेदांगांचे, धर्मगुरू, गुरुद्वारांचे, तीर्थ, मशिदी, यात्रा, साधू, संतांच्या देशात, अहंकार, हिंसा, प्रचंड असहिष्णुता, सत्ता, लोभ तर अगदी सारखा उफाळून बाहेर येत आहे.

अशा समाजाचे सर्वच्या सर्व स्तरावर एकदम यंत्री-शस्त्रीकरण होऊन उत्पादन-विभाजन-उपभोग यांचा समतोल (इक्विलिब्रियम) निर्माण होऊन सुखी, सुसंस्कृत समाज निर्माण होण्यास किती अवधी, किती शिस्त, संयम, सुबद्धता, सहिष्णुता लागणार? कोण करणार? सरकार?

उत्पादन-विभाजन-उपभोग हे समतोल असतील तरच समाजात स्थैर्य, सुसंस्कृतता, माणुसकी टिकू शकते. "मला आहे, जास्त हवे", "तुला नसले तरी चालेल", "तुझे मला हवे" हे सुरू झाले म्हणजे अस्थिरता, अन्याय, हिंसा अटळ आहे. मग धर्म-कर्म-पूजा-तीर्थे-गुरू हे सर्व सत्य दडविण्याकरता- "अफूची गोळीच" ती-आम्ही आवडीने खात असतो.

बाकी या हिंदुस्थानात कोठेही, केवढासाही मनस्ताप किंवा ताण निर्माण झाला, थोडीही अडचण आली, काम जास्त पडणार असे वाटले, की आपली अध्यात्मात एकदम बुडी!!! जग बुडले तरी "हरी मला तारी", हीच वृत्ती. यामुळे मनस्तापाला, मानसिक रोगाला तिकडल्या इकडल्या देशाप्रमाणे गोळ्या, मानसिक डॉक्टर वगैरेंची कशाची जरुरीच नाही. 'तीर्थयात्रा स्पेशल ' सरकारने विनामूल्य करावीत, म्हणजे शांतीच शांती!!!! असो.

यंत्रीकरणाबरोबर सत्ता व उत्पादन-विभाजन-यंत्रणा यांचे केंद्रीकरण आलेच. शिवाय सत्ता टिकविण्याकरिता पोलिस, सैन्य, शिक्षण, टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे यांच्यावर कडक ताबा असल्याशिवाय चालणारच नाही.

मग यंत्रीकरण-केंद्रीकरण यातून लोकशाही, सुसंस्कृतता, माणुसकी निर्माण होईल का? यंत्रीकरण केंद्रीकरणातून सत्ता-पिपासा (पावर अर्ज) शमू (?) शकेल? आजूबाजूला दरारा निर्माण होऊ शकेल? फार तर लोक भयभीत-लाचार होतील, जोपर्यंत या केंद्रीकरणात सामर्थ्य (फोर्स), क्षमता (कपॅसिटी) आहे तोपर्यंत. नंतर?

पण ही सत्ता-स्पर्धा वाढतच जाणार ना? उदाहरणे अनेक आहेत. यातून लढाया, प्रचंड हानी निर्माण होत आहे. सर्व जगच धोक्यात आहे म्हणे संपूर्ण नाशाच्या.

हाच मार्ग आपला आहे का? नीट, स्पष्ट विचार करावयास हवा. पहिल्यांदा आपला मार्ग कोणता हे ठरवावयास हवे. सत्ता की सुसंस्कृतता? संपत्ती की माणुसकी.

मग हे किती प्रमाणात आमच्यात आहे या मनोवृत्तीला, क्षमतेला व इतर सर्व परिस्थितीला अनुसरून शक्य आहे हे ठरविले पाहिजे.

हे सर्व घडवून आणण्यास वेळ, खर्च किती येणार? त्याकरिता संयम, शिस्त, सुबद्धता कशी निर्माण होणार? कोण करणार?

अनुक्रमणिका

सरतेशेवटी आज सर्वसाधारणपणे हिंदुस्थानात लोकांची तुम्ही व मी आमची मनोवृत्ती (ऑब्जेक्टिव्ह-मोटिव्हेशन) काय आहे? जगातील एकंदर मनोवृत्ती काय आहे? त्याचा परिणाम काय होणार? कारण नवे जग आज परस्परावलंबी आहे, व एकमेकांशी पूर्ण निगडित आहे.

आज सर्वसाधारणपणे जगामध्ये सर्वत्र सुधारणा हवी. सुधारणा म्हणजे वाढत्या गरजा, वाढते उत्पादन व वाढत्या वासना. हिंदुस्थानात आज आधुनिकता (मॉडर्नायझेशन) म्हणजे वीज, मोटार, कपडे, खाणे वगैरे. उपभोगाचा, आजच्या मनोवृत्तीचा ओघ (फोर्स) आहे वासनांचा व उपभोगाचा. दबलेल्या, अनेक वर्षे दाबलेल्या वासनांचा सर्व जगात स्फोट होत आहे. हिंदुस्थान त्यातून अलग नाही. आजूबाजूस घरीदारी पाहा, जरा नीट न्याहाळून. स्वतःच्या कुटुंबात, बायका-मुलांच्याकडे पाहा. पाहा लहान बछडे टी. व्ही. च्या जाहिराती पाहात असताना त्यांच्याकडे न्याहाळून. सर्वांची मते गुंग आहेत, वासनातृप्तीच्या स्वप्नात. आज त्यांना हे नको, नका करू हे सांगणेही पापच आहे!!

कारण ग्राहक नसेल तर माल खपणार कसा? माल खपला नाही तर उद्योगधंदे चालणार कसे? उद्योगधंदे चालायचे असतील तर माल दरसाल जास्त जास्त खपला पाहिजे. म्हणजे वासना वाढल्याच पाहिजेत. कालचे मॉडेल आज चालणार नाही!! रोज नवी साडी पाहिजेच!!! तिकडे पाश्चात्त्य परदेशात तर नवी बायको, नवा पुरुषही पाहिजे रोज!!

हे चक्र बंद झाले तर, माल घेतला नाही तर, खपला नाही तर, मंदी आली तर, आलीच बेकारी. पाहा युरोप, अमेरिकेकडे आज. बेकारीच बेकारी. गोंधळच गोंधळ!!

मग अशा प्रकारच्या युरोप, अमेरिकेतसुद्धा बेकारी-संघर्ष-संप-लढाया-अनागोंदी निर्माण करणाऱ्या समाजव्यवस्थेने हिंदुस्थानसारख्या देशाचे काय होणार? आपण आपले त्या मार्गाने प्रश्न सोडवू शकू का? विचार नको का करायला?

नव्या दमाचे, नव्या विचाराचे पुढारी आज हिंदुस्थानात पुढे येत आहेत. छानच झाले!! या चैतन्यपूर्ण, गतिमान झटपट बदलणाऱ्या युगात म्हातारी, जीर्ण, धेंडांची अडगळच होणार!! या तरुणांनो! समाजनौका आता तुम्हीच चालवा. पाहालच कोठे जातात ते. कसे तिथे (?) जायचे ते, किती वेळ लागणार, वगैरे. धडाडी चैतन्याबरोबर सुबुद्धताही तुम्हापाशी असावी ही अपेक्षा असणारच. मात्र सुबुद्धतेला सहृदयतेचीही (कम्पॅशन) जोड हवी हं, नाहीतर माणूस यंत्रमानव व्हायचा व रानटी राहायचा. रेडिओ, टी. व्ही., वृत्तसंस्था, जाहिरातबाजीने अगदी गुलाम ताबेदारच बनावयाचा. जे पाहिलं-ऐकलं-वाचलं त्याप्रमाणेच करणारा बनायचा. स्वतःचा असा त्याला काही विचार-व्यवहार-आचार राहायचाच नाही. मग राज्य-यंत्रांचा-नफायंत्रणेचा ताबेदार बनावयाचा तो-म्हणजे तुम्ही व मी.

मात्र तरुणांनो, हे नवे जगद्व्यापी यंत्र-तंत्र-शास्त्र-ग्राहकी युग इतके गुंतागुंतीचे, क्लिष्ट आहे की अगदी उत्तमात उत्तम जास्तीत जास्त किंमतीचा कॉम्प्यूटर सुद्धा मुख्य प्रश्नांची उत्तरे देणार नाही. हे सर्व जगड्व्याळ व्यवस्थित चालविण्यास खरोखरीच अशक्य होणार ही भीती मात्र मनात येते हं. ही भीती सर्वत्र आहे.

अनुक्रमणिका

ह्या यंत्र-तंत्र-शास्त्र-ग्राहकता यांच्यामार्फत समाजाची व्यवस्थिती (इक्विलिब्रियम) जर झाली नाही तर काही दुसरे "मॉडेल", दुसरा नमुना डोळ्यांपुढे, प्रयोगशाळेत म्हणून का होईना असू द्या. खून-मारामाऱ्या-चोऱ्या-भ्रष्टाचार-बेकारी दूर झाली नाही तर दुसरा मार्ग (आल्टरनेटिव्ह) डोळ्यांपुढे असूच द्या हं!

एका व्यक्तीला माणूस म्हणून सुसंस्कृततेने संघर्ष, स्पर्धा, अनिश्चितता याशिवाय, निसर्ग व इतर मानवांशी सौजन्याने, प्रेमाने, आनंदाने राहता येईल असा समज निर्माण होईल का हा विचार मनात डोकावू द्या.

ह्याकरता यंत्र-शास्त्र त्याज्य नाही हं. पण मानवाला यंत्रमानव बनविण्याचीही जरुरी नाही. व्यक्ती माणूस म्हणून जगली पाहिजे. यंत्राला माणुसकी द्या.

आज यंत्र-शास्त्र हे नफा व सत्ता (प्रॉफिट ॲन्ड पॉवर) याकरताच वापरले जातात. सुसंस्कृतता-मानवाची उन्नती, मैत्री-प्रेम-सहिष्णुता करता क्वचितच वापरली जातात. म्हणून संघर्ष, लढाया, सत्तास्पर्धा, यंत्र-तंत्र-शास्त्र यांचा उपयोग सर्वोदयाकरता, सुसंस्कृततेकरता करा.

पण हे सर्व फक्त यंत्रणा (आर्गनायझेशन) बदलून शक्य नाही. इमारत बांधायची तर नकाशा (प्लॅन) हवा. पण विटा, दगड, लोखंड, लाकूड, सिमेंटही उत्तम हवेत. कारागीरही निष्णात हवेत. सरतेशेवटी "माणूस" मुख्य आहे. माणूसच गाढव असला तर यंत्राचे शक्तीने तो अनर्थ निर्माण करणारच.

खरोखरी आमचा मार्ग ३७ वर्षांपूर्वीच चुकला; आम्ही सरकार, म्हणजे काही एक स्वतंत्र, बुद्धिशाली, शक्तिशाली, क्रियाशील सुसंस्कृत अशी यंत्रणा माणसापासून तुमच्या माझ्यापासून अलग आहे, वेगळी आहे असे समजून या "यंत्रणे"कडून अनाठायी अपेक्षा केल्या. सरकार किंवा कोणतीही 'यंत्रणा' माणसा-माणसांचीच बनती ना ? म्हणजे तुम्ही व मी असे अनेक जण सरकारात म्हणजे राजकारणात, शेतीत, शासनात, शिक्षणात किंवा सैन्यात, बँकांत, व्यापारात, धंद्यात शिरतो व एका संविधानाला (कॉन्स्टिट्यूशन) अनुसरून काम करू लागतो तेच होते सरकार!!

मग अशा व्यक्ति-व्यक्तीला जर चार भित्र्या, निष्क्रिय, अज्ञानी, भ्रष्ट, दुष्ट, हवऱ्या (हवे रे ! हवे रे करणाऱ्या !!) असल्या अकार्यक्षम, असल्या हलगर्जी, कामाची नुसती चालढकल करणाऱ्या असल्या तर काय होणार? अशा व्यक्ती, या सरकारातून, बाहेर काय येणार? भ्रष्टाचार, अनागोंदी गोंधळच ना?

कोणत्याही समाजातील व्यक्ती जर कार्यक्षम नसतील, कल्याण, सौंदर्य, मैत्री निर्माण करण्यात असमर्थ असतील तर सरकारकडून केलेल्या अपेक्षा फोलच ठरणार ना ? गेल्या ३५ वर्षांचा अनुभव काय आहे?

सत्ता-संपत्ती-उपभोग-लोलुप व्यक्ती, मत्सरी, क्रोधी, अहंकारी, क्रूर व्यक्ती, असमर्थ, अज्ञानी व्यक्ती केंद्रित शासनाचा ताबा घेऊन सरकार चालवू लागल्या म्हणजे त्यांच्याकडून समाज-कल्याणाची, सुसंस्कृततेची अपेक्षा करणे म्हणजे मूर्खपणाचेच नाही का?

समाजाची यंत्रणा (मॅनेजमेंट) मानवच करणार, यंत्र नाही. मग मानव सुसंस्कृत, सुबुद्ध, कार्यक्षम, सहृदय नसेल तर समाज सुसंस्कृत-सुखी-स्थिर होईला का? म्हणजे अखेर प्रश्न येतो तो "तुम्ही व मी" ह्यांचाच. तुम्ही व मी सुसंस्कृत-शुद्ध-धीर-सुबुद्ध-सहृदय जितक्या प्रमाणात असू तितक्याच प्रमाणात समाज 'राष्ट्र'

अनुक्रमणिका

स्थिर सुसंस्कृत असणार. दिल्लीतील तो नवा नेता कितीही उत्तम असला तरी कार्य तुम्हा-आम्हालाच करणे भाग आहे ना? कर्तव्यकर्म एक यज्ञ म्हणून समाजाची सुसंस्कृतता वाढविण्याकरता, मैत्री-प्रेम-आनंद, सर्वोदयाकरताच आचरिले पाहिजे.

हे सर्व केंद्रीकरणाने, उत्पादन व सत्ता केंद्रीकरणाने होणार नाही. जेवढी यंत्रणा मोठी तितकी ती माणसापासून दूरच जाते. सत्ता, नोकरशाही, अमानुषता (इन्ह्युमॅनिटी) वाढणारच. सर्वत्र आज हाच अनुभव आहे.

म्हणून छोटे छोटे समाज निर्माण करून यंत्रशास्त्रांचा योग्य उपयोग करून प्रत्येक अशा छोटे (२०,००० ते ४०,०००) समाजात सुबत्ता-समता-समाधान निर्माण करता येईल का? छोट्या समाजात (कम्यूनिटी) माणूस माणसाला ओळखू शकतो, निसर्गाशी हितगुज करू शकतो, धावपळ, स्पर्धा, अनिश्चितता, जगातील आर्थिक-राजकीय-सत्ता-संघर्षाचे विटाळ त्याला टाळता येतात. मोठ्या केंद्रीकृत समाजाला हे शक्य नाही. चायनात माओंनी असा प्रयोग "कोम्यून" मार्फतच सुरू केला होता. सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे लागले होते. पण कोठे काय चुकले व सर्व यंत्रणा-भावना-कार्य सत्ता-स्पर्धेत गुंतले गेले. या उत्तम प्रयोगाचे अनुभव आजही आपल्याला महत्त्वाचे आहेत.

पण हिंदुस्थानात आज (१९८५ एप्रिल) मध्ये हे शक्य आहे का? आहे या यंत्रणेपासून ज्यांचा उजवा-डावा फायदाच होतो ते काही अशा नव्या प्रयोगाला ज्यात त्यांचा अंतच आहे त्याला सामोरे जाणार नाहीत? कसून त्याला विरोध करणार.

मात्र जशी आजच्या आर्थिक-राजकीय-शासकीय (इकॉनॉमिक-पोलिटिकल-ॲडमिनिस्ट्रेटिव्ह) यंत्रणेतून समस्या सुटू शकत नाहीत, भरमसाठ वाढतच जात आहे व त्यातून अनर्थ निर्माण होऊन राहिला असे प्रत्ययाला येईल त्या वेळीच म्हणजे आणखी दहावीस वर्षांनतर, लोक म्हणजे तुम्ही व मी दुसरा मार्ग शोधू लागू-मग उशीर होणार हं. दहावीस वर्षात अनर्थ ओढवणार. मात्र आजची ही जगड्व्याळ गुंतागुंतीची, अनिश्चितता निर्माण करणारी, असमतोल (डिसइक्विलिब्रियम) राखणारी, गरिबी-बेकारी नष्ट न करू शकणारी सत्ता-संपत्ती-ग्राहकी वृत्तीवरच केंद्रित झालेली व्यवस्था कोलमडणार हे निश्चित हं. अशा वेळी 'एक मुलखावेगळा राजा' आठवावा लागेल. अशा वेळी आशा-अपेक्षा-उपभोगावर शांती-सुख-समतोल राखण्याकरता संयम-शिस्त हवी, कर्तव्यकर्म क्षमतेने करण्याची व यज्ञ म्हणून माणूस-निसर्ग-पशुपक्षी या सर्वांचे अभ्युदयाकरता, सर्वोदया-करता करण्याची जिद्द हवी हेही ध्यानात येईल. आजच्या या अनागोंदी, धकाधकीच्या काळातही काही नमुने म्हणून तुम्ही-व-मी असे स्वावलंबी-स्वतंत्र समाज (२०,०००-४०,०००) निर्माण करण्याची खटपट करू शकतो.

अशी खटपट करण्यास खूपच वाव आहे व प्रतिसाद ही आहे. विशेषतः तरुण-तरुणींचा सर्व जगात आहे.

हे सत्ता-संपत्ती-स्पर्धा-हिंसाचारी आपल्या मार्गाने जाऊ देत. त्यांना रोखून कोण धरणार? मात्र एक दुसरा स्वतंत्र लोकमार्ग आहे हेही ध्यानात राहू द्या. महात्माजींनी तो दाखविला-भवानराजाने थोड्याफार प्रमाणात त्या मार्गाने वाटचालही केली, आज अनेक अशा या माणुसकीच्या मार्गाने जाण्याच्या धडपडीत आहेत, अगदी आजच्या आपल्या या यंत्र-तंत्र-ग्राहकी युगातही आहेत. सर्व जगात आहेत. जितक्या जास्त व्यक्ती या नव्या (पुराण्या!!) मार्गाने जातील, तितक्या प्रमाणात आजच्या यंत्रणेची शक्ती कमी होईल.

अनुक्रमणिका

या सर्व खटाटोपात यंत्र-तंत्र-शास्त्रांच्याविरुद्ध बैठक नाही. फक्त मानव 'यंत्रमानव', रानटी, राक्षसी बनण्याच्या विरुद्ध ती जरूर आहे.

यंत्राचे, मानवीकरण व शास्त्र "सत्य-कल्याण-सुसंस्कृतता" (सत्यं-शिवं-सुंदरम्) करताच वापरण्याचा संयम-शिस्त-सुबुद्धता-सहृदयता तरुणांनो! तुम्हाला सहजच जमेल. प्रयत्न मात्र पाहिजे. अहो, यंत्र-शास्त्राचे चैतन्य धडाडी (एनर्जी-ॲडव्हेंचर) थरारून सोडणारे तुम्हाला वाटणारच. नवे शोध, नवे पराक्रम, नव्या धडाड्या हे सर्व 'राजस' तेजाचे आकर्षण सर्वांनाच आज आहे. तुम्हा तरुणांना तर जास्तच आहे.

यंत्र-शास्त्रामार्फतच सुखी जीवनही शक्य आहे. दुर्मिळ उपभोग सर्वांना आज 'शक्य' आहेत. पाणी, अन्न, घरदार, सर्व सर्व सर्वांना अगदी 'समद्यांना' उपलब्ध आहे. एक उत्तम यंत्र व एक निष्णात कारागीर एक हजार लोकांना पुरेल इतकी वस्तू-सुखसोयी (गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस) निर्माण करू शकतो आज. किती प्रचंड सुधारणा आहे!! जीवनाकरता यंत्रामार्फत सर्व कंटाळवाणे, किचकट काम करून आज घेता येते. याचे तुम्हाला मोठेच आकर्षण असणार. साहजिकच आहे. योग्यही आहे. वस्तू व व्यक्तीपासून उपभोग-सुख मिळते. म्हणूनच सर्व धावपळ, खेचाखेची, रगडारगडी.

पण वस्तू व व्यक्तीपासून मिळणारे सुख-उपभोग आज आहेत उद्या नाहीत असे असतात ना? त्याच त्या व्यक्तीचा व वस्तूंचा कंटाळा येणारच. पाहा अमेरिका-जपान-युरोपकडे !!

अहो, वस्तू व व्यक्तीव्यतिरिक्त जो आतून उफाळून येतो तोच खरा आनंद बरे का!! हा आनंद सहज व्यक्त होण्यास लागला की सुसंस्कृतता-सहृदयता-सुबुद्धता आलीच.

अहो, उपभोग नको असे नाही. पण तेन त्यक्तेन भुंजीथा !! 'उपभोग' घ्या पण सतत सर्वकाळ त्यातच मन जखडून घेऊ नका. असे स्वतःला बांधून घेतल्याने ना सुख ना आनंद मिळणार. एखादा आनंद उफाळू लागला की हरएक कामाचे तेज काही निराळेच होणार!! उत्तमता-सौजन्य-सुसंस्कृतता मग अगदी सहजच बरं का! मग काम-पैशाकरता, खुर्ची-अहंकाराकरता, सत्ता-नफ्याकरता नाही होत. कामातून आनंद निर्माण झाला म्हणजे मग समाजात सहज रीतीने सुख-शांती-समाधान-सुबत्ता-सुसंस्कृतता निर्माण होणार.

पटते का हे ? अहो, जगात आज या विचाराने भारलेले अनेक विद्वान, द्रष्टे (सेजेस) आहेत हं. शूमाकर म्हणून एका अर्थशास्त्रज्ञाने "स्मॉल इज ब्यूटिफुल" म्हणून पुस्तक लिहिले. म्हणजे "लहान" (समाज) हाच सुंदर (असू शकतो). जगातील बावीस भाषांतून भाषांतरे झाली आहेत या पुस्तकाची.

जर्मनीमध्ये तर एक नवजवानाची नवीन पार्टीच निर्माण केली आहे. त्याचे नाव "ग्रीन पार्टी" (हिरवी पार्टी). अणुयुद्ध, मानवाचे यंत्रीकरण, समाजाचे शहरीकरण, सत्तेचे व संपत्तीचे केंद्रीकरण, याविरुद्ध ही पार्टी काम करते. गेल्याच महिन्यात या पार्टीला जर्मनीमध्ये दहा टक्के मते मिळाली. लोक थक्कच झाले!!

हिंदुस्थानातही ही दृष्टी संत विनोबांनी, जयप्रकाशजींनी, महात्माजींनंतर लोकांचे पुढे ठेवली. संत विनोबांनी तर १४ वर्षे सर्व हिंदुस्थानात यासंबंधी भावना जागृती केली. धन्य त्यांची!!

आमची मात्र नाही हं ! आम्ही झोपीच आहोत. आता तुम्ही, तरुणांनो, ‘उत्तेष्ठित जाग्रत’ !!

एका आंतरराष्ट्रीय विदुषीने, इंदिरा रोदरमुंड यांनी, (मूळ बाई कारवारी!!) अमेरिकन विश्वविद्यालयाकरता एक उत्तम पण छोटेखानी पुस्तक ‘औंधवर’ लिहून प्रसिद्धही केले आहे. म्हणजे जगात या दृष्टीने विचार-आचारधारा सुरू आहे. तुम्ही श्री संत बाबा आमटेचे नाव तर जाणूनच आहात. केवढा हा एक प्रचंड ऋषी आपल्यात आज काम करून राहिला आहे! आहे का जाणीव? त्याची स्फूर्ती घ्या ना.


सुंदरलाल बहुगुणा व चिपको, संघटनेचे नाव ऐकले आहे का? जाऊन बघा हिमालयात व आता कर्नाटकात.

सत्ता-संपत्ती केंद्रीकरणापासून व यंत्र-शास्त्र-तंत्राचा उपयोग स्वार्थ, अहंकारासाठी केल्याने मानवाचा सर्वनाश होत आहे व निसर्गालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. हे जाणून आज सर्व जगभर सुज्ञ-तज्ज्ञ-सर्वज्ञ (होलिस्टिक व्हिजन) तरुण, धडाडीचे नव्या चैतन्याने भारलेले सर्व नवा मार्ग शोधू लागले आहेत. या शोधातून, कल्याण, आनंद निर्माण होणारच. या सर्व कल्याणाला झेंडा, सैन्य, तोफा, नफा, सत्ता, अहंकार, क्रूरता, प्रदूषण, निराशा, दुःख, अस्थिरता, अनिश्चितता यांची मुळीच जरुरी नाही हं.

या मार्गाने आपल्याला आज जाऊन एक नवी मानवी सुसंस्कृती निर्माण करावयाची आहे. किती गंमत आहे नाही ?

याचे स्वप्न एका मुलखावेगळ्या राजाला १९३०-४८ मध्ये पडले होते!!

अनुक्रमणिका



# अनुक्रमणिका



## अनुक्रमणिका



अनुक्रमणिका